**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)**

**पृ.शी.:** सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय व राज्य मार्गाच्या विविध समस्यांबाबत

**मु.शी.:** सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय व राज्य मार्गाच्या विविध समस्यांबाबत या संबंधी सर्वश्री. बबनराव शिंदे, संजयमामा शिंदे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

असुधारित प्रत

श्री.बबनराव शिंदे (माढा) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सोलापूर जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी राज्य मार्गाची दर्जोन्नती करुन राष्ट्रीय महामार्गामध्ये रुपांतर केलेले असणे, त्यामध्ये म्हसवड-अकलुज-टेंभुर्णी-बार्शी-कुसळंब या मार्गास राष्ट्रीय महामार्ग ५४८-सी म्हणून मंजूरी देण्यात आलेली असणे, यापैकी म्हसवड ते टेंभुर्णी या मार्गाचे काम सुरु असून यामध्ये संगम व शेवरे येथे शेतकऱ्यांना मोबदला न मिळाल्यामुळे काम बंद पाडलेले असणे तसेच सद्यस्थितीत टेंभुर्णी-कुर्डूवाडी-बार्शी ते कुसळंब या मार्गाचे टेंडर प्रक्रिया सुरु असणे, माढा तालुक्यातून जाणाऱ्या या राष्ट्रीय महामार्गावर ५ साखर कारखाने असून टेंभुर्णी-कुर्डूवाडी-बार्शी या ठिकाणी एम.आय.डी.सी. कार्यान्वित झालेली असणे, साखर कारखाने हंगाम सुरु झाल्यानंतर हंगामात हजारो वाहने, बैलगाडी यांची वाहतूक असल्याने ४ ते ५ महिने मोठ्या प्रमाणावर वाहतुकीची तासनतास कोंडी मोठ्या प्रमाणावर होणे, त्यामुळे सदरचा टेंभुर्णी ते बार्शी-कुसळंब हा भाग रस्ता चौपदरी करणे गरजेचे असणे, टेंभुर्णी ते कुर्डूवाडी-बार्शी बायपास मार्गे कुसळंब असा ५ कि.मी. लांबीचा रस्ता अत्यंत खराब झालेला असणे, माढा, करमाळा, बार्शी, विधानसभा मतदारसंघातून जात असून पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा यांना

श्री.बबनराव शिंदे....

जोडणारा महत्वाचा राष्ट्रीय मार्ग असणे, परंतु या महामार्गावरील अवजड वाहतुक करणाऱ्या वाहनांची तसेच प्रवाशांची संख्या वाढलेली असणे, त्यामुळे रस्त्यावर वाहतुक कोंडी मोठ्या प्रमाणावर होऊन अपघातांचे प्रमाण वाढणे, या राष्ट्रीय महामार्गाबाबत मा.केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री यांनी लातूर येथील रस्ते लोकार्पण कार्यक्रमात सदर रस्त्याचे चौपदरीकरण करणेबाबत घोषणा केलेली असणे, त्यासाठी राज्य सरकारकडून आवश्यक बाबींची पुर्तता झाल्यास या मार्गावरील अवजड वाहन,प्रवाशी वाहने याचबरोबर ग्रामीण भागातील शेतीमाल पालेभाज्या, फळे वेळेत पोहोचून नागरीकांची मदत होणे, टेंभुर्णी ते कुसळंब हा मार्ग चौपदरी होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांची वारंवार मागणी होत असणे, त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. दत्तात्रय भरणे (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

श्री. बबनराव शिंदे : अध्यक्ष महोदय, अकलुज टेंभुर्णी मार्गावरील राष्ट्रीय महामार्ग ५४८ शेवरे ता. माढा, संगम ता. माळशिरस येथील रस्त्याच्या लांबीचे काम अपूर्ण अवस्थेत आहे. ते काम कधी पूर्ण होणार आणि शेतकऱ्यांना जो अडथळा निर्माण झालेला आहे त्याचे पैसे कधी मिळणार आहेत ? त्याचबरोबर आता रस्त्याचे दुपदरीकरण करा असे शेतकरी म्हणत आहेत ते काम कधी सुरु होणार आहे याबाबत माननीय मंत्र्यांनी माहिती द्यावी.

श्री. दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. बबनराव शिंदे यांनी जी लक्षवेधी सूचना मांडलेली आहे त्यामध्ये म्हसवड, माळशिरस आकलूज आणि टेंभुर्णी हा साधारणत: ५७ ते ५८ किमीचा रस्ता आहे. त्याचे ९० टक्के काम पूर्ण झालेले आहे. त्यामध्ये भूसंपादनाचा विषय आहे. त्या रस्त्यामध्ये ७ गावांचा समावेश आहे. त्यातील ५ गावांनी भूसंपादनाला सहमती दिली आहे. त्याबाबतचा १३ कोटी २० लाख रुपयांचा प्रस्ताव केंद्र शासनाला पाठवलेला आहे उर्वरित शेवरे व संगम गावातील याला विरोधी केला होता. परंतु आता संगम गावातील ग्रामस्थानांशी चर्चा करुन ते काम सुरु करण्यात आलेले आहे. शेवरे गावातील भूसंपादाबाबत पोलीस संरक्षणे देऊन काम सुरु करण्यासाठी ग्रामस्थांनी विनंती केली आहे. सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न विचारला की, भूसंपादनाचे पैसे येईपर्यंत १० मीटर ऐवजी चालू असणाऱ्या ७ मीटर रस्त्याचे काम सुरु करावे. याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, ते काम निश्चितपणे सुरु करुन मे, २०२२ पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

श्री. संजयमामा शिंदे : अध्यक्ष महोदय, हा रस्ता माळसिरस पासून लातूर पर्यंत जातो. या रस्त्यावर पाच कारखाने येतात. त्यामुळे तिथे प्रचंड प्रमाणात वाहतूक सुरु असते. तो रस्ता अतिशय खराब झालेला आहे. मध्यंतरी माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितिन गडकरी यांचे एक पत्र आम्हाला आले की, तो रस्ता एनएचकडे हस्तांतरित झालेला आहे. परंतु आता माहिती घेतली असता असे कळले की, टेंभुर्णी ते बार्शी कुसळंब पर्यंतचे दोन टेंडर आलेले आहेत. टेंभुर्णी ते कुर्डुवाडी-बार्शी या रस्त्याचे १५७ कोटी रुपयांचे टेंडर आहे. ते टेंडर ४० टक्के बिलो गेलेले आहे आणि पुढचे

असुधारित प्रत

श्री. संजयमामा शिंदे....

बार्शी ते कुसळंबपर्यंतचे टेंडर ३९ टक्के बिलो गेले असे सांगितले. शासनाने जी तरतूद केलेली आहे त्यातून हा सर्व रुस्ता पूर्ण होणार आहे काय ? शासनाच्या पैशातून हा रस्ता पूर्ण होणार नसेल तर एनएचकडे देण्यासाठी मी माननीय मंत्र्यांना आपल्यामार्फत विनंती करीत आहे.

श्री. दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, टेंभुर्णी ते बार्शी-कुसळंब या ७३ किमी लांबी असणाऱ्या रस्त्यांचे दिनांक २२ नोव्हेंबर, २०११ साठी दुपदरीकरणासाठी निविदा आलेली आहे. परंतु नंतर माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितिन गडकरी यांनी लातूर येथे बैठक घेतली होती. तेव्हा त्यांनी तिथे पूर्ण चौपदरीकरणाचा रस्ता करण्याचे जाहीर केले होते. त्याप्रमाणे पूर्वी तिथे निविदा स्विकृत झाली होती. परंतु त्यामध्ये जे दुपदरीकरण केले होते ते चौपदरीकरण करण्यासाठी कंत्राटामध्ये सुधारणा करुन तो रोड ताबडतोब मंजूर करण्यात येईल. त्याच्या पुढचा रोड कुसळंब ते ऐडसी आहे त्याचे देखील चौपदरीकरण करता येईल. तशा प्रकारचा प्रस्ताव शासनाला पाठविण्यात येईल.

श्री. संजयमामा शिंदे : अध्यक्ष महोदय, पुणे, सोलापूर आणि हैद्राबाद हा रस्ता जोडत असताना मध्ये टेंभुर्णी एमआयडीसी आहे. तिथे साधारणत: ७०० मीटरचा रस्ता येतो. याचे आणि एमआयडीसीचे ट्राफिक टेंभुर्णी-बार्शी रोडवर येते त्यासाठी माननीय मंत्र्यांना विनंती आहे की, तो ७०० मीटरचा रस्ता केला तर पुढच्या ट्राफिकवर नियंत्रण येण्यासाठी एमआयडीसी ट्राफिक तिथेच थांबविता येईल.त्या दृष्टीने आपण काही सूचना करणार आहात काय ?

श्री. दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, तो रस्ता एनएचमध्ये येत नाही परंतु तो रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून केला जाईल.

श्री. अभिमन्यू पवार : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मी एक प्रश्न विषयाच्या अनुषंगाने आणि एक प्रश्न विषयाच्या बाहेरचा विचारणार आहे. लातूर-टेंभुर्णी हा रस्ता लातूर जिल्ह्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. या

श्री. अभिमन्यू पवार...

रस्त्याबाबत माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितिन गडकरी यांनी लातूरमध्ये एक घोषणा केली होती आणि ते काही हवेत घोषणा करीत नाहीत. त्यानंतर राज्य शासन आणि केंद्र शासन यांचा काही पत्रव्यवहार झाला आहे काय ? कारण राज्य शासनाने काढलेले टेंडर हे दुपदरीकरणाचे आहे. यासाठी करोडो रुपये खर्च केले जाणार आहेत आणि पुन्हा चौपदीरकरण रस्त्यासाठी भूसंपादन करुन रस्ते खोदणार आणि ते रस्ते पूर्ण करणार, असे होऊ शकत नाही. त्यामुळे यामध्ये राज्य शासनाची स्पष्ट भूमिका काय आहे आणि यामध्ये राज्य शासनाने काय कार्यवाही केलेली आहे, हा माझा पहिला प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, माझा दुसरा प्रश्न हा अतिशय महत्त्वाचा आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ तुळजापूर-बुट्टीबोरी या रस्त्यामध्ये लातूर आणि औसा असे दोन टप्पे केलेले आहेत. टप्पा १ मध्ये शहरापासून ५ किमी अंतरावर भूसंपादन झाले आणि त्यासाठी १९६४ रुपये दर दिला. टप्पा २ साठी शहराजवळील रस्ते असताना तिथे हाच दर देण्यासाठी विरोध का केला जात आहे ? असा फरक केल्यामुळे लोकांमध्ये अनरेस्ट आहे. मागच्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला हा विषय आहे. तर ही भूसंपादनाची प्रक्रिया कधी पूर्ण होणार आहे आणि तेथील लोकांना कधी पैसे दिले जाणार आहेत ?

श्री. दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न वेगळा आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी जी मागणी केली आहे त्याप्रमाणे एनएच, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच महसूल विभाग यांच्या अधिकाऱ्यांची सन्माननीय सदस्यांसोबत बैठक घेऊन याबाबत निश्चितपणे कार्यवाही केली जाईल.

श्री. अभिमन्यू पवार : अध्यक्ष महोदय, राज्य शासनाने लातूर टेंभुर्णी योजनेचे टेंडर काढलेले आहे. दुसऱ्या टप्पा हा आमच्या भागातून सुरु होतो. तर माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितिन गडकरी यांनी चौपदरीकरण रस्त्याची घोषणा केलेली आहेत. त्यामुळे आपण या रस्त्याचे चौपदरीकरण करणार, दुपदरीकरण करणार का टेंडर रद्द करणार आहात किंवा नंतर भूसंपादन करुन परत

असुधारित प्रत

श्री. अभिमन्यू पवार....

चौपदरीकरण करणार आहात ? याबाबत राज्य शासनाची नेमकी भूमिका काय आहे, हा माझा पहिला प्रश्न आहे.

श्री. संजयमामा शिंदे : अध्यक्ष महोदय, हा रस्ता चौपदरीकरण करीत असताना टेंभुर्णीपासून बार्शीपर्यंतचा मूळ रस्ता आहे. तर तो रस्ता करण्यासाठी आपल्याला कोणत्याही प्रकारचे भूसंपादन करावे लागणार नाही. बार्शीपासून कुर्डुवाडीपर्यत जुनी रेल्वे लाईन होती. या लाईनचाच सर्व पोर्शन आता ट्रान्सफर होऊन शासनाकडे दिलेला आहे. त्यामुळे त्यामध्ये भूसंपादनाचे कोणतेही मुद्दे येणार नाहीत म्हणून त्या रस्ताचे जेवढे चौपदरीकरण करता येईल तेवढे करावे अशी माझी विनंती आहे.

श्री. दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, दोन्ही सन्माननीय सदस्यांनी आपापले प्रश्न विचारलेले आहेत त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, खरे म्हणजे टेंडर होताना दुपदरीकरणाचे झालेले आहे. तरी देखील आपल्याला यामध्ये सुधारणा करुन तो प्रस्ताव पाठवता येईल. त्यामुळे दुपदरीकरणाचे टेंडर झालेले असले तरी त्याच किंमतीमध्ये चौपदरीकरणाचे टेंडर आपल्याला करता येईल. त्यासाठी काही अडचण नाही. टेंभुर्णी ते कुसळंब आणि कुसळंब ते ऐडसी असे दोन टेंडर झालेले आहेत. त्यामुळे इथे टेंडर करतानाचा आपण चौपदरीकरणचे टेंडर करुया. यामुळे त्याची लांबी कमी होईल. तरी त्यासाठी काही हरकत नाही म्हणून आपण टेंडर करु. एनएच हस्तांतरीत प्रक्रिया अजून प्रलंबित आहे, ती प्रक्रिया ताबडतोब पूर्ण करण्यात येईल.

यानंतर श्रीमती करंदीकर....

श्री. बबनराव शिंदे : अध्यक्ष महोदय, सदरचा रस्ता अत्यंत खराब झालेला आहे. चौपदरीकरण करावयाचे असल्यास ते १० ते १५ कि.मी पर्यंत होईल. पुढील नॅशनल हायवेचे मेन्टेनन्स व दुरुस्ती करणार काय ? आता चौपदरीकरण करताना, डीपीआर करताना या रस्त्यावर एक कारखाना आहे तसेच मजगाव येथे देखील एक कारखाना आहे व दोन एमआयडीसी आहेत. हे सर्व पाहता या सर्वांकरिता डीपीआरमध्ये सेवा रस्ता केला जाणार आहे काय ?

श्री.दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, प्रश्न विचारला आहे की, नॅशनल हायवेची दुरुस्ती केली जाणार काय. या ठिकाणी निश्चित दुरुस्ती केली जाईल. पुढील रस्त्यांची लांबी व्यवस्थित करु. येथे बरीच रहदारी आहे, जास्त वाहतूक आहे. यामुळे येथे सेवा रस्त्याचा अंतर्भाव केला जाईल.

------

असुधारित प्रत

**पृ. शी.** : सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट दक्षिण सोलापूर तालुक्यातून जाणाऱ्या महामार्गाच्या भूसंपादनात झालेली अनियमितता

**मु. शी. :** सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट दक्षिण सोलापूर तालुक्यातून जाणाऱ्या महामार्गाच्या भूसंपादनात झालेली अनियमितता, या संबंधी श्री. सचिन कल्याणशेट्टी वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. सचिन कल्याणशेट्टी ( अक्कलकोट ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट दक्षिण सोलापूर तालुक्यातून जाणाऱ्या महामार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेत अनियमितता झाल्याने उपजिल्हाधिकारी तथा प्रांताधिकारी यांना शासनाने निलंबित करणे, भूसंपादन प्रक्रिया करत असतांना अधिकारी यांनी नियमबाह्य प्रक्रिया राबवणे, एका सर्व्हे नंबर मध्ये असलेल्या दोन वेगवेगळया व्यक्तींपैकी जमिनीची मोजणी न करता एकाच व्यक्तीला मोबदला दिला जाणे, या व्यतिरिक्त भूसंपादन अधिकाऱ्याकडून शेतकऱ्यांसोबत वारंवार आर्थिक गैरव्यवहार होणे, त्यामुळे भूसंपादन अधिकारी यांचे निलंबन होणे, यांची योग्य सखोल चौकशी न झाल्यामुळे निलंबित झाल्यानंतर उपजिल्हाधिकारी तथा प्रांतअधिकारी पुनश्च पदभार घेऊन कार्यरत होणे, त्यामुळे सामाजिक वाद विवाद होणे, परिणामी विभागातील रहिवाशांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष व विभागातील रखडलेले पुनर्वसन प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करून रस्त्यावर आलेल्या जमीन धारकांना त्यांच्या हक्कासाठी न्याय मिळवून देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. सचिन कल्याणशेट्टी : अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात सोलापूर व गुलबर्गा या राष्ट्रीय महामार्गाचे काम अंतिम टप्प्यात आहे. भूसंपादनाचे विषय मागील ३-४ वर्षापासून सुरु आहेत. गंभीर बाब अशी आहे की, भूसंपादन अधिकारी या पूर्वी जे होते त्यांनी शेतकऱ्यांना भूसंपादनाची रक्कम देताना एका गटात दोन नावे आहेत एका सर्व्हे गटात दोन नंबर, नावे असताना पैसे दिले. भूमीअभिलेख यांनी मोजणी शीट ( जी.एम शिट ) द्वारे मोजणी न करता एकाच व्यक्तीला, हरकती असताना देखील पैसे दिलेले आहेत. अशा अनेक घटना आहेत. मंत्री महोदयांना चुकीचे ब्रिफिंग झालेले आहे. माझ्याकडे या बाबत पुरावे आहेत. शेतकऱ्यांनी लेखी तक्रारी दिल्या आहेत. आर्थिक व्यवहाराचे पुरावे देखील या पूर्वी मी मंत्री महोदयांना दिलेले आहेत. एका अधिकाऱ्याचे निलंबन केले व पुन्हा जॉईन करुन घेतले. ही बाब गंभीर आहे. शासकीय अधिकारी एकतर्फी बाजू किंवा केवळ आर्थिक व्यवहारातून शेतकऱ्यांवर अन्याय करीत आहेत.आज शेतकरी पात्र असून सुध्दा त्यांना अद्याप पैसे मिळत नाहीत. माझा प्रश्न आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून त्यांच्या निकटवर्ती व्यक्तीकडून चेकने पैसे घेतले असून त्याचे पुरावे आहेत, ऑडीओ क्लिप आहे. असे गंभीर आरोप असताना देखील अधिकाऱ्याला निलंबन संपून जॉईन करुन घेतले आहे. अक्कलकोट मतदारसंघातील जेवढे रस्ते प्रलंबित आहेत ते किती दिवसात पूर्ण केले जातील, चुकीच्या पद्धतीने शेतकऱ्यांना पेमेंट दिलेले आहेत या बाबत टास्कद्वारे चौकशी केली जाईल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेत सांगितले होते की, २ पैकी एका शेतकऱ्याला मोजणी न करता पैसे दिले. २२ तक्रारी आलेल्या आहेत. ४ प्रस्ताव जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवणे, संमती विना रक्कम अदा करणे, भूसंपादन मोबदला रक्कम देण्यास अडवणूक करणे, भूसंपादनाकरिता शेतकऱ्यांकडे रकमेची मागणी करणे अशा तक्रारी होत्या. सन्माननीय सदस्यांकडून तक्रार आल्यानंतर एक पेन ड्राईव्ह दिला होता, तो मी विभागीय आयुक्त यांच्याकडे

श्री. बाळासाहेब थोरात ....

पाठवला. या नंतर सदर अधिकाऱ्याचे निलंबन केले आहे. निलंबनानंतरची प्रक्रिया असते. नि:पक्ष चौकशीकरिता संबंधित अधिकाऱ्याला निलंबित केले आहे.ि विभागीय आयुक्त यांनी प्राथमिक चौकशी करुन दोषारोप निश्चित केले, शिस्त व अपील नियम ८ नुसार, विभागीय चौकशी प्रस्तावित केली. तक्रारीच्या चौकशीमध्ये त्यांचा हस्तक्षेप नसावा या करिता निलंबित केले जाते. निलंबन ही तशी शिक्षा नसते. या गोष्टी आपण समजून घेतल्या पाहिजे. ३ महिन्यात निलंबित अधिकाऱ्याची चौकशी सुरु करणे आवश्यक असते. दोषारोप पत्र बजावणे व ३ महिन्यात निलंबनाचा फेर आढावा घ्यावा लागतो. सर्वोच्च न्यायालयाने या बाबत काही निर्णय दिले आहे. निलंबन कायमस्वरुपी ठेवता येणार नाही. चौकशी सुरु करताना त्यांना पुन्हा रिइन्सटेट करुन चौकशी सुरु करता येईल, त्या कालावधीत त्यांना दूर ठेवावे. त्या नुसार आपण त्यांना दूरच्या ठिकाणी पद दिलेले आहे. या सर्व बाबींची चौकशी होणार आहे. सन्माननीय सदस्यांचे दुसरे म्हणणे आहे की, भूसंपादनामध्ये गोंधळाची अवस्था निर्माण झाली आहे. यात काही चुका असतील, येथे नवीन अधिकारी आला असेल. जिल्हाधिकारी यांना मी लक्ष देण्यास सांगेन. कोणकोणत्या गोष्टी घडल्या आहेत त्या दुरुस्त कराव्या लागतील. काही गोष्टी दुरुस्त करण्याकरिता व्यक्तीश: लक्ष देण्यास सांगेन. या गोष्टी देखील दुरुस्त होतील.

श्री. सचिन कल्याणशेट्टी : अध्यक्ष महोदय मंत्री महोदयांनी लेखी उत्तरात असे सांगितले आहे की, एकाच गटात दोन नावे, सर्व्हे नंबर असणे, असे कोणतेही प्रकरण प्रलंबित नाही. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपल्याला चुकीचे ब्रिफींग झाले आहे, माझ्याकडे लेखी पुरावे आहेत. लेखी तक्रार देऊनही मोजणी न करता एकाच व्यक्तीला पेमेंट दिले आहे. हा गंभीर विषय आहे. शेतकऱ्यांकडून निकटवर्तीयांनी चेकने पैसे घेतले आहेत. अधिकाऱ्याचे निलंबन झाले हे ठीक आहे,

श्री. सचिन कल्याणशेट्टी .....

ती प्रोसेस होत राहील. मात्र शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने ही पेन्डन्सी किती दिवसात क्लिअर होईल या करिता वेगळी चौकशी समिती नेमून चौकशी केली जाईल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, याकरिता वेगळया चौकशी समितीची आवश्यकता नाही. चौकशी होईल व कारवाई होईल. दोषी आढळून आल्यानंतर पुढील शिक्षा होत असते. आपण प्रोसीजर समजून घेतली तर बऱ्याचशा गोष्टी क्लिअर होतील. एका ७/१२ वर दोन शेतकरी आहेत. एकाला रक्कम मिळाली व दुसऱ्याला मिळाली नाही. आपल्याकडे जी २२ निवेदने आलीत त्यामध्ये असे स्पेसिफिक नव्हते यामुळे त्याचा उल्लेख केला नाही. आपण जे दोष दिले आहेत त्याची नोंद घेतली आहे. आपले जे म्हणणे आहे ते लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांना लक्ष घालण्यास मी सांगतो. तसेच चौकशी समितीकडे देखील देण्यात येईल.

---------

असुधारित प्रत

**पृ. शी.** : कोकणामध्ये आंबा, काजू, नारळ, सुपारी, चिकू ही बागायती पिके असूनदेखील त्यांना वेगळी वीजबिल आकारणी केली जाणे

**मु. शी. :** कोकणामध्ये आंबा, काजू, नारळ, सुपारी, चिकू ही बागायती पिके असूनदेखील त्यांना वेगळी वीजबिल आकारणी केली जाणे या संबंधी श्री. शेखर निकम, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. शेखर निकम ( चिपळूण ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कोकणामध्ये मुख्यत्वे: करुन आंबा, काजू, नारळ, सुपारी, चिकू इ. फळपिके घेतली जाणे, सदर पिकांसाठी महावितरण कंपनीकडून कृषी पंपाची कनेक्शने दिली जाणे, परंतु महावितरण कंपनीच्या परिपत्रक क्र.२४३, दिनांक ३ जुलै, २०१५ नुसार नारळ, सुपारी, आंबा, चिकू या बागांना कृषी सदरात गणना करुन सदर शेतकऱ्यांकडून कृषी व्यतिरिक्त प्रमाणे सन २०१५ पासून आकारणी करुन बीले अदा केली जाणे व बागायती पिकांसाठी वेगळा दर आकारण्याचा दृष्टीकोन दिसून येणे, बागायती पिकांमध्ये ऊस, केळी, संत्री, द्राक्ष ही सुध्दा बागायती पिके असणे, आंबा, काजू, नारळ, सुपारी, चिकू व नर्सरी ही बागायती पिके असूनदेखील यांना वेगळी वीजबील आकारणी केली जाणे, कोकणातील शेती पंपांना महावितरण कंपनीने शेती कृषी व्यतिरिक्त विभागात केलेल्या कोकणातील शेतकऱ्यांना शेती असे वर्गीकरण होणेसंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. प्राजक्त तनपुरे( ऊर्जा राज्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. शेखर निकम : अध्यक्ष महोदय, कोकणामध्ये आंबा, काजू, नारळ, सुपारी, चिकू इ. फळांची बागायती शेती केली जाते. महावितरण कंपनीकडून हॉर्टीकल्चरच्या लागवडीकरिता जे कनेक्शन दिले जाते, त्याचे वीज बिल प्रचंड येत असते. हाच निकष इतर राज्यात लागू का केला जात नाही ? आम्ही वेळेत वीज बिल भरतो, चोरी करीत नाही म्हणून कोकणातील फळपिकावर हा अन्याय केला जात आहे काय ? या बाबत तातडीने निर्णय घ्यावा. कोकणातील फळपिकांना शेतीच्या संवर्गात वीज बिल देण्याची व्यवस्था तातडीने करावी. मी जो प्रश्न विचारला आहे तीच माहिती लेखी उत्तरात दिली आहे. जर संपूर्ण राज्यात द्राक्ष, डाळिंब बागायती, ऊस लागवड किंवा अन्य फळपिकांना एजी मध्येच केले जाते. तर कोकणातच हा अन्याय का केला जातो ? सन २०१५ मध्ये सुधारित जीआर आला होता. परिपत्रक २४३ नुसार ही कारवाई केवळ कोकणात केली जाते. हा आमच्यावर अन्याय आहे. तातडीने हा अन्याय दूर केला पाहिजे. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे. या राज्याचे नेतृत्व महाविकास आघाडी शासनाकडून माननीय मुख्यमंत्री करीत आहे. माननीय मंत्री श्री. बाळासाहेब थोरात, माननीय उप मुख्यमंत्री या शासनात आहेत. हे शेतकऱ्यांचे सरकार आहे. आमच्यावर होणारा दुजाभाव तातडीने दूर करावा, अशी मी विनंती करतो.

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. शेखर निकम यांनी योग्य मुद्यावर लक्ष वेधले आहे. सन २०१५ मध्ये वीज नियामक आयोगाच्या आदेशाने महावितरणने परिपत्रक जारी केले आहे. एजी टॅरिफ सर्वसाधारण शेतकऱ्यांना लावला जातो. आणखी एक टॅरिफ निर्माण करुन वाढीव दराने या टॅरिफ नुसार आकारणी केली जाते.

यानंतर श्रीमती गिरप...

श्री.प्राजक्त तनपुरे ...

तसे पाहिले तर फलोत्पादनासाठी हा टॅरिफ आहे. सन्माननीय सदस्यांनी जी मागणी केलेली आहे, ती प्रथमदर्शनी रास्त दिसत आहे. मागच्या सरकारच्या काळात खरे कोकणातल्याच नाही तर राज्यातील सर्वच फलोत्पादनाकरिता हा रेट आहे. मागच्या सरकारच्या काळात खरे अशा प्रकारची ऑर्डर निर्गमित झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.शेखर निकम यांना मी सांगू इच्छितो की, अधिवेशन संपल्या-संपल्या महावितरणच्या अधिकाऱ्यांची एक बैठक घेऊन यावर अत्यंत सकारात्मकपणे विचार करुन पुढील प्रक्रिया राबवून आपल्याला दिलासा देण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

श्री.शेखर निकम : अध्यक्ष महोदय, माननीय कृषी मंत्री श्री.दादाजी भुसे सभागृहात उपस्थित आहेत. हा खूप अन्यायकारक निर्णय आहे. याबाबत सकारात्मक विचाराचे उत्तर मंत्री महोदयांनी दिलेले असले तरी पूर्ण महाराष्ट्रात हा नियम लागू न होता केवळ कोकणात याची अंमलबजावणी तातडीने केली जात आहे. त्याला आपण तातडीने स्थगिती देणार काय, हा महत्वाचा प्रश्न आहे. माननीय श्री.पवार साहेबांनी रोजगार हमी योजनेमध्ये ..... आज कोकणामध्ये शेतकरी फलोत्पादनाची लागवड मोठ्या प्रमाणात करीत आहेत. हे असे करीत असताना जेथे प्रामाणिकपणाने काम केले जाते तेथील बाबतीत निर्णय तरी घ्यावा किंवा हे पूर्ण महाराष्ट्रात लागू करावे. जेणेकरुन सर्वच २८८ सन्माननीय सदस्यांना ते काय आहे हे समजेल. याबाबत खूप गांभीर्याने विचार करावा, अशी विनंती आहे.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, मी आधीच सांगितलेले आहे की, हे अधिवेशन संपल्या-संपल्या महावितरणच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन यावर निश्चितपणे ... शेतकरी कोकणातील असो किंवा वरच्या भागातील असो शेतकरी हा शेवटी शेतकरीच असतो. शेतकऱ्यांचा विचार करणारे आमचे शासन आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.शेखर निकम यांना मी आश्वस्त करु इच्छितो की, अधिवेशन संपल्यावर यावर निश्चितपणे सकारात्मकपणे विचार करुन पुढची पावले उचलण्यात येतील.

श्री. सचिन कल्याण-शेट्टी : अध्यक्ष महोदय, ...

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य आपल्याला या लक्षवेधी सूचनेवर बोलावयाचे आहे काय?

श्री. सचिन कल्याण-शेट्टी : होय अध्यक्ष महोदय. माझा प्रश्न या लक्षवेधी सूचनेच्या विषयाच्या स्कोपच्या थोडा बाहेरचा आहे.

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य आपण या लक्षवेधी सूचनेच्या विषयाच्या स्कोपच्या बाहेरचा प्रश्न विचारुच नये.

श्री. सचिन कल्याण-शेट्टी : अध्यक्ष महोदय, माझा विषय महत्वाचा आहे.

**उपाध्यक्ष** : ठीक आहे.

श्री. सचिन कल्याण-शेट्टी : अध्यक्ष महोदय, मागील महिन्यापर्यंत अक्कलकोट तालुक्यातून जिल्ह्यात सर्वात जास्त वीज बिल वसुली झालेली आहे. आता डी.पी. वारंवार जळत आहेत. सर्वात जास्त वीज बिल वसुली अक्कलकोट तालुक्याची आहे. परंतु, न्याय देताना त्या तालुक्याला डी.पी. कमी येतात, जेथे वसुली कमी आहे...

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य आपण प्रश्न विचारावा.

श्री. सचिन कल्याण-शेट्टी : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांना मला हे सांगावयाचे आहे की, अक्कलकोट येथून वीज बिल वसुली जास्त होत असल्याने त्याकडे स्पेसिफिक जास्त लक्ष देऊन डी.पी. असतील किंवा वीज कनेक्शन कट करताना देखील जेथे वीज बसुली जास्त झालेली आहे, तेथे थोडेसे रिलॅक्सेशन आपण द्यावे, अशी विनंती आहे.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांचा विषय या लक्षवेधी सूचनेच्या विषयाच्या स्कोपच्या बाहेरचा असला तरी, असा काही दुजाभाव केला जात नाही. तुमची वसुली जास्त असेल उलट तुम्हाला जास्त सेवा दिली पाहिजे. मी तेथील अधिकाऱ्यांसमवेत चर्चा करतो. तुमचे स्पेसिफिक काय म्हणणे आहे, त्याबाबत वाटल्यास मला एखादे पत्र द्या. तुमचे काही स्पेसिफिक विषय असतील ते मार्गी लावू.

.......

**लक्षवेधी सूचना क्रमांक ५ व लक्षवेधी सूचना क्रमांक २ बाबत**

**उपाध्यक्ष** : आता आपण लक्षवेधी सूचना क्रमांक ५ चर्चेकरिता घेऊ. परंतु, सदरहू लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य श्री.संजय जगताप यांची आहे व ते सभागृहात उपस्थित नाहीत.

लक्षवेधी सूचना क्रमांक २ ला उत्तर देणारे मंत्री महोदय रात्री उशिरापर्यंत सभागृहात होते. ते येत आहेत. ते आल्यानंतर आपण लक्षवेधी सूचना क्रमांक २ चर्चेकरिता घेऊ.

.........

असुधारित प्रत

**पृ. शी. :** मुंबई मधील सायन कोळीवाडा मतदार संघात वडाळा ट्रक टर्मिनल, वडाळा येथे पुष्कळ आर.एम.सी (RMC) प्लांट असणे

**मु. शी. :** मुंबई मधील सायन कोळीवाडा मतदार संघात वडाळा ट्रक टर्मिनल, वडाळा येथे पुष्कळ आर.एम.सी (RMC) प्लांट असणे या संबंधी कॅप्टन आर. तमिल सेल्वन, श्री. अबू आजमी, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

कॅप्टन आर. तमिल सेल्वन (सायन-कोळिवाडा) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई मधील सायन कोळीवाडा मतदार संघात वडाळा ट्रक टर्मिनल, वडाळा येथे पुष्कळ आर.एम.सी (RMC) प्लांट असणे, सदर आर.एम.सी (RMC) प्लांट हे एम.एम.आर.डी.ए.च्या भूखंडावर असणे, या आर.एम.सी (RMC) प्लांटमुळे सदर जागी मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याचे निदर्शनास येणे, या प्लॉट भोवती वडाळा आर.टी.ओ, स्थानिक पोलीस स्टेशन यासारखे सरकारी कार्यालय असणे, तेथील कार्यरत कर्मचारी व स्थानिक नागरिक यांना प्रदूषणामुळे त्रास होणे, येथील आर.एम.सी (RMC) प्लांट पैकी मे. ईगल इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीने एम.एम.आर.डी.ए. ची अतिरिक्त जागा अनधिकृतपणे बळकवल्याचे निदर्शनात येणे, कुठलीही प्रशासकीय परवानगी न घेता स्थानिक रहिवाशी यांचा ये-जा करण्याचा मार्ग (रस्ता) बंद करणे, शासनाने नेमून दिलेल्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या नियमांना पायदळी तुडवून मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असणे, सदर भूखंड हा मेट्रो रेलच्या कामासाठी दिलेला असणे, तरी सदर जागेचा वापर मे. ईगल

कॅप्टन आर. तमिल सेल्वन....

इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीकडून अनधिकृतपणे खाजगी कामाकरिता होत असणे, या व्यतिरिक्त अशोका या कंपनीचा आर.एम.सी. (RMC) प्लांट हा भक्ती पार्क येथील निवासी जागेत असणे, यामुळे स्थानिक नागरिकांना होत असलेला त्रास रोखण्याकरिता शासनाने गंभिर दखल घेऊन करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.प्राजक्त तनपुरे ( नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

.............

असुधारित प्रत

कॅप्टन आर.तमिल सेल्वन : अध्यक्ष महोदय, मेरे सायन-कोलिवाडा विभाग में मेट्रो के कितने प्रोजेक्ट है ? कॉस्टींग यार्ड और बिम बनाने का जो विषय है वह ८-९ साल पहले शुरु हुआ है. उस समय वहां पर निवासी क्षेत्र कम था. अब वहां पर कम से कम ६ हजार परिवार रहते है. वह एरिया निवासी क्षेत्र हो गया है. पोलूशन कंट्रोल बोर्ड का कानून है कि १०० मीटर के बाहर कास्टींग यार्ड होना चाहिए. ये कॉस्टींग यार्ड ५० मीटर के अंदर ही है. पोलूशन कंट्रोल बोर्ड के अनुसार वहां पर कॉस्टींग यार्ड नहीं होना चाहिए. कॉस्टींग यार्ड के बारे में पहले ही किसी को टेंडर दिया है. एनसीसी कंपनी, आईटीटी कंपनी, लार्सन टुब्रो कंपनी, एचसीसी कंपनी, अशोका ईगल कंपनी, ऐसी कई कंपनियां है. टेंडर रद्द करके कई साल होने के बाद भी उसी जगह पर इनका काम शुरु है. ये सरकार का काम नहीं कर रहे है. प्राईव्हेट बिल्डर को रेडीमिक्स कॉंक्रीट बेचती है. ये कानून में है ही नहीं. प्राईव्हेट बिल्डर को रेडीमिक्स कॉंक्रीट बेचना का जो विषय है वह रद्द होना चाहिए. कानून के अनुसार ये गलत काम कर रहे है. जितनी कंपनियों को एमएमआरडीए ने ऑर्डर दिया है, उनका डेट ऑफ स्टार्ट क्या है, डेट ऑफ कम्प्लीशन क्या है, कितने समय के लिए दिया है, कितना एरिया दिया है ? इस बारे में मैंने श्री श्रीनिवासन साहब और श्री सोनार साहब को पत्र दिया है. उनका जवाब नहीं आ रहा है. सरकार की जमीन, जनता की जमीन का मिसयुज किया जा रहा है. एक एकड़ जमीन के लिए एमएमआरडीए ने परमिशन दी है. लेकिन वह पांच एकड़ जमीन का इस्तेमाल कर रहे है. वे इस जमीन का इस्तेमाल कैसे कर रहे है? इसका जवाब मिलना चाहिए. उनका टेंडर रद्द होने के बाद भी उसी विभाग में बैठकर रेडीमिक्स कॉंक्रीट प्राईव्हेट बिल्डर को बेचा जाता है. यह रद्द होना चाहिए.

अध्यक्ष महोदय, मैंने उसी विभाग में एमएमआरडीए की जगह स्कूल के लिए मांगी. सन २०१६ में भूतपूर्व मुख्यमंत्री सम्माननीय श्री देवेंद्र फडणवीस साहब ने इसके मिनिट्स पास किए है. सायन-कोलिवाड़ा एरिया में स्कूल के गरीब बच्चे डेढ़ किलोमीटर दूर पैदल चलकर जाते है. उस विभाग में स्कूल नहीं है. इसके लिए मैं ६ साल से प्रयास कर रहा हूं. एमएमआरडीए के श्री मदान साहब ने अभी तक स्कूल के लिए जगह नहीं दी है. स्कूल और हॉस्पिटल की जगह का, रिजर्वेशन का यह विषय है. स्कूल और हॉस्पिटल को रिजर्वेशन दिया. रिजर्वेशन देने के बाद सरकार बदल गई.

कॅप्टन आर.तमिल सेल्वन....

उसके बाद मैं माननीय मंत्री श्री एकनाथ शिंदे जी को ३-४ बार मिला. पिछले अधिवेशन में मैंने भूख हड़ताल की है. उस समय आश्वासन दिया कि स्कूल के लिए जगह मिल जाएगी. लेकिन अभी तक स्कूल के लिए जगह नहीं मिली है. उस एरिया के गरीब बच्चे डेढ़ किलोमीटर दूर पैदल चलकर स्कूल जाते है. मैं दो बार विधायक बनने के बाद भी एक छोटासा स्कूल मैं नहीं बना सकता हूं, तो फिर मैं विधायक बनकर क्या फायदा? गरीब लोगों के लिए जगह नहीं मिलती है और प्राईव्हेट कंपनी रेडीमिक्स कॉंक्रीट का धंधा कर रही है. मेरे एरिया में स्कूल के लिए जगह मिलना चाहिए. यह बहुत महत्वपूर्ण विषय है. मेरा कहना इतना ही है कि स्कूल के लिए जगह मिलनी चाहिए. इस बारे में जवाब देना चाहिए. जो रेडीमिक्स कॉंक्रीट बेचा गया है, उसके चालान की प्रत मेरे पास है, उसका प्रूफ मेरे पास है. इसमें कंपनी का नाम है, किसने दिया और किसको भेजा है, उसकी जानकारी चालान में है. चालान की प्रत मेरे पास है.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी शाळेचा विषय सांगितलेला आहे. त्याबाबत त्यांनी वेगळी लक्षवेधी सूचना विचारलेली आहे. तो या लक्षवेधी सूचनेच्या विषयाच्या स्कोपच्या बाहेरचा विषय आहे. मला रात्री आधी वाटले की, ते त्याच लक्षवेधी सूचनेवर बोलत आहेत. परंतु, ही लक्षवेधी सूचना वेगळ्या विषयावरील आहे. शाळेच्या विषयाबाबत सन्माननीय सदस्यांनी वेगळी लक्षवेधी सूचना विचारलेली आहे. त्यामध्ये वेगळी चर्चा होईल. सन्माननीय सदस्यांनी एवढा मोठी पार्श्वभूमी सांगितली की, त्यांचा नेमका स्पेसिफिक प्रश्न काय आहे, हे माझ्या लक्षात आले नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी त्यांचे नेमके प्रश्न काय आहेत ते एकदा सांगितले तर मी उत्तर देईन.

कॅप्टन आर. तमिल सेल्वन : अध्यक्ष महोदय, मेरा प्रश्न यह है कि रेडीमिक्स कॉंक्रीट यार्ड निवासी क्षेत्र से १०० मीटर से आगे होना चाहिए, लेकिन ये अंदर की बाजु में है. प्राईव्हेट कंपनी को रेडीमिक्स कॉंक्रीट के काम के लिए जमीन नहीं दी है. सरकार के कामों लिए, मेट्रो प्रोजेक्ट के काम लिए जमीन दी गई है. कितना एरिया दिया गया है, कंपनी कितने एरिया का इस्तेमाल कर रही है? कमिश्नर श्री श्रीनिवास

कॅप्टन आर.तमिल सेल्वन....

साहब और श्री सोनार साहब मेरे पत्र का जवाब नहीं देते है. यह एरिया कितने दिनों के लिए दिया है, कितने सालों से इसका इस्तेमाल कर रहे है, टेंडर रद्द होने के बाद भी ऐसा क्यों हो रहा है? इसका जवाब दिया जाना चाहिए.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी तारखा वगैरे विचारलेल्या आहेत. ते सर्व तसे नियमामध्येच आहे. कोणाकोणाला दिलेले आहे, काही रेडीमिक्स कॉंक्रीट प्लॅंट तेथे आहेत. ते कधी दिलेले आहेत, किती तारखेपर्यंत त्याला एमपीसीबीची मान्यता आहे, करार कसे आहेत, त्याची सर्व माहिती सन्माननीय सदस्यांना दिली जाईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य सांगत आहेत त्याप्रमाणे खाजगी कंपनीला वगैरे नाही. मुंबई मेट्रोच्या कामाकरिता मुंबई मेट्रो ६ साठी दिल्ली मेट्रो कार्पोरेशन ही कंपनी आहे. त्यांना ही सर्व जागा एमएमआरडीएने मेट्रोच्या कामाकरिता दिलेली आहे. तेथे कास्टिंग यार्ड असतील, RMC प्लांट्स आहेत, त्या अनुषंगाने हे सर्व RMC प्लांट्स केवळ कॅप्टिव्ह कन्झम्पशन करीता आहेत. फक्त मेट्रोच्या कामाकरिता जवळपास ७ प्लॅंट्स आहेत. ते मेट्रोच्या कामाकरिता युज होणारे आहेत. दोन प्लॅंट्स हे एमएमआरडीएच्या जागेत नाहीत मात्र सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघातील परिसरात आहेत. ते मात्र प्रायव्हेट आहेत. हे सर्व नियमानुसार परवानगी... एमएमआरडीएची जागेची सर्व ॲप्रुव्हल घेऊन केलेले आहे. एमपीसीबी पोल्यूशन कंट्रोल बोर्डाची देखील त्यांना "Consent to Establish, Consent to Operate" दिलेली आहे. काही काही ठिकाणी काही लोकांनी थोड्याशा काही चुका केल्या होत्या.

नंतर श्री.शिंदे ....

श्री.प्राजक्त तनपुरे...

त्यांच्यावर प्रदूषण नियंत्रण मंडळाने कारवाया केल्या आहेत. प्रदूषण नियंत्रण मंडळाने कळविले आहे की, आरएमसी प्लँट हे रहिवास क्षेत्रापासून १०० व ५० मीटर अधिक अंतरावर असल्याने अधिक प्रदूषण होणार नाही. तसेच प्रदूषण टाळण्यासाठी काही साहित्यांचा वापर करुन प्रदूषण टाळण्यासंदर्भात काळजी घेण्यात येत आहे. त्यांना सदरहू प्लँटला भेटी द्याव्या लागतात त्या देण्यात येत आहेत. या प्रकरणी कोणतीही अनियमितता झाल्याचे दिसून येत नाही.

कॅप्टन आर. तमिल सेल्वन : अध्यक्ष महोदय, उस एरिया में कॅन्सर और अस्थमा के पेशंट्स की संख्या बढ़ रही है. रेडीमिक्स कॉंक्रीट प्राईव्हेट कंपनी बेचने के कारण तीन साल में तीन एक्सिडेंट हो गए है, ६ लोगों का निधन मेरे विभाग में हो गया है. इसलिए यह रद्द होगा या नहीं ? इसका जवाब दिया जाना चाहिए.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी सदरहू भागातील लोकांना अस्थमा व कॅन्सरचा त्रास होत असल्याबाबत सांगितले आहे. या प्रकरणी सर्व प्लँटला भेट देऊन प्रदूषण टाळण्यासाठी आवश्यक साहित्यांचा वापर करण्यात येत आहे काय, हे तपासण्याकरिता मी पुन्हा प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना सूचना देतो. त्यांना काही चुकीच्या बाबी आढळून आल्यास त्यामध्ये दुरुस्ती करुन घेण्यात येईल. ७ आरएमसी प्लँट मुंबई मेट्रोच्या कामासाठी कॅप्टीव्ह परवानगी दिली आहे. ते बाहेर काही विक्री करु शकत नाही. तसे काही घडले असेल तर ते तपासण्यासाठी एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांना सूचना देतो.

------------

असुधारित प्रत

**पृ. शी.** : पुणे महानगरपालिका हद्दीत सन २०१७ पासून समाविष्ट झालेल्या गावांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे व कर पूर्वीप्रमाणे आकारणी करणे

**मु. शी. :** पुणे महानगरपालिका हद्दीत सन २०१७ पासून समाविष्ट झालेल्या गावांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे व कर पूर्वीप्रमाणे आकारणी करणे या संबंधी श्री. संजय जगताप, वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. संजय जगताप (पुरंदर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

“पुणे महानगरपालिका हद्दीत सन २०१७ पासून समाविष्ट झालेल्या गावातील मिळकत धारकांना पूर्वी ग्रामपंचायत हद्दीत असताना बांधलेल्या क्षेत्रावर सर्वसाधारण कर, सर्वसाधारण पाणीपट्टी, विशेष पाणीपट्टी, आरोग्य, सार्वजनिक वीज वापर कर मिळून एकत्रित आकारणी होत असणे, परंतु महानगरपालिकेने रस्ते, पाणी पुरवठा, दिवाबत्ती (स्ट्रीट लाईट), कचरा संकलन, ड्रेनेज लाईन, फुटपाथ इ. असलेल्या सोयी सुविधा या अत्यंत अपुऱ्या असणे, अनेक वर्ष मनपा हद्दीत समाविष्ट झाल्यावरही मूलभूत पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात पुणे मनपा अपयशी असणे, मनपा हद्दीत समावेश झाल्यावर रेडिरेकनर नुसार सर्वसाधारण कर, पाणीपट्टी, सफाई कर, अग्निशमन कर, वृक्ष संवर्धन कर, जल लाभ कर, मलनिस्सारण कर, पथ कर, विशेष सफाई कर, मनपा शिक्षण उपकर व राज्य शासनाचा शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठ्या निवासी जागेवरील करांची आकारणी करत असल्याने महापालिकेत समावेश झाल्यावर ग्रामस्थांच्या पूर्वी आकारणी होत असलेल्या करात अनेकपटींनी वाढ

असुधारित प्रत

श्री. संजय जगताप...

झाल्याने नागरीकांत निर्माण झालेले असंतोषाचे व रोषाचे वातावरण, परिणामी पायाभूत सुविधांचे जाळे मुख्य शहराच्या तुलनेत समाविष्ट गावांमध्ये निर्माण केल्याशिवाय मनपा प्रचलित दराने कर भरण्यास स्थानिक नागरिकांनी केलेला विरोध, सन २०२४ पर्यंत सदर समाविष्ट गावांना मुलभूत सुविधा देण्याबाबत नियोजित करण्यात आले असल्याने सन २०२४ पर्यंत ग्रामपंचायतीप्रमाणे कर आकारणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.प्राजक्त तनपुरे (नगर विकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष**: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. संजय जगताप (पुरंदर) : अध्यक्ष महोदय, पुणे महानगरपालिकेमध्ये सन २०१७ पासून समाविष्ट करण्यात आलेल्या गावातील मिळकतधारकांच्या कराच्या संदर्भात लक्ष वेधू इच्छित आहे.

अध्यक्ष महोदय, सन २०१७ मध्ये पुणे महानगरपालिकेमध्ये काही गावांचा समावेश करण्यात आला आहे. आता सन २०२२ सुरु असून अद्यापपर्यंत त्यांना महानगरपालिकेच्या माध्यमातून पाणी, रस्ते, नाल्या, वीज, स्ट्रीट लाईट, स्वच्छता इत्यादी मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत, तेथे त्यांची वाणवा आहे. सदरहू ठिकाणी ग्रामपंचायत असताना कचरा उचलण्यासाठी ग्रामपंचायतीची गाडी येत होती. आता हा भाग महानगरपालिकेत समाविष्ट झाल्यानंतर सदरहू ठिकाणच्या सदनिकाधारकांना कचरा उचलून घेऊन जाण्याकरिता खाजगी कंत्राटदारास ५० ते १०० रुपये अतिरिक्त रक्कम द्यावी लागते. सदरहू भाग पुण्याच्या वाढीव हद्दीतील असून तेथील एका सदनिकेची किंमत ५० ते ७० लाख रुपये आहे. परंतु त्या सदनिकाधारकांना पाण्यासाठी सकाळी रांग लावावी लागत आहे, ७ व्या व ८ व्या मजल्यापर्यंत राहणाऱ्या लोकांना हातामध्ये पाण्याच्या दोन बादल्या घेऊन जावे लागत आहे. अशी उक्त गावांची अवस्था आहे. मागील ६ महिन्यांपूर्वी नगरविकास मंत्री महोदयांसमवेत व्हीडीओ कॉन्फरन्स घेण्यात आली होती. त्यावेळी महानगरपालिका आयुक्त व सर्व अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी उक्त प्रश्नांच्या संदर्भात विचार करुन महानगरपालिकेने कळवावे, असे मंत्री महोदयांनी आदेश दिले होते. यासंदर्भात कालही चर्चा करण्यात आली होती. त्यावेळी मुंबई व पुणे परिसराच्या संदर्भात अकृषिक कराचा निर्णय घेण्यात आला आहे.

अध्यक्ष महोदय, स्थानिक स्वराज्य संस्था ड्रेनेज, स्वच्छता व इतर मुलभूत सुविधांसाठी कर आकारतात. परंतु त्यांचेकडून उक्त सुविधा पुरविण्यात येत नसतील

तर त्यांना कर आकारण्याचा अधिकार नाही, असे मला वाटते. सदरहू गावांना ड्रेनेज, पाणी, रस्ते इत्यादी मुलभूत सुविधा देण्याकरिता महानगरपालिकेने नियोजन केले

श्री. संजय जगताप...

आहे, असे आजही सांगण्यात येत आहे. परंतु उक्त सुविधा मिळण्यासाठी सन २०२४ उजाडणार आहे. तोपर्यंत महानगरपालिका क्षेत्रातील उक्त गावांतील मालमत्ताधारकांकडून सन २०१७ पुर्वी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून जेवढा कर आकारण्यात येत होता तेवढा कर आकारण्यात यावा. कारण त्यांना ग्रामपंचायत ज्या सुविधा देत होती त्या सुविधा देखील पुणे महानगरपालिका देत नाही. ज्यावेळी सर्व मुलभूत सुविधा उक्त भागातील मालमत्ताधारकांना उपलब्ध करुन देण्यात येतील त्यावेळपासून महानगरपालिकेचा कर लागू करण्यात यावा.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन २०१७ मध्ये पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेल्या गावांना मुलभूत सुविधा मिळत नसल्याने तीव्र खंत व्यक्त करुन त्यांच्याकडून पूर्वीच्या ग्रामपंचायतीप्रमाणे कर आकारणी करण्यात यावी व त्यांना सुविधा उपलब्ध करुन देण्याची मागणी केली आहे.

अध्यक्ष महोदय, सन २०१७ मध्ये ग्रामपंचायतीमधील गावांचा महानगरपालिका क्षेत्रात समावेश करण्यात आल्यानंतर त्यांच्याकडून तातडीने महानगरपालिकेप्रमाणे कर आकारणी करण्यात आली नसून ती टप्प्याटप्प्याने वाढविण्यात आली आहे. सदरहू गावांना काही सुविधा न देता त्यांच्याकडून एवढा कर आकारण्यात येत आहे, याबाबत मी महानगरपालिका अधिकाऱ्यांना विचारणा केली. त्यावेळी त्यांनी महानगरपालिकेडून सदरहू गावांना दिलेल्या सुविधांचा तपशील दिला आहे. उक्त सुविधा परिपूर्ण नसतील.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी सांगितले आहे की, सदरहू भागातील ७ व्या व ८ व्या मजल्यापर्यंत राहणाऱ्या सदनिकाधारकांना रांग लावून

पाणी घेऊन जावे लागत आहे, पाणी मिळत नाही किंवा त्यासाठी वणवण करावी लागते. उक्त वस्तुस्थिती काही प्रमाणात आहे, ती नाकारुन चालणार नाही. याप्रकरणी

श्री.प्राजक्त तनपुरे...

महानगरपालिकेने लवकर कार्यवाही करणे अपेक्षित आहे. उक्त भागातील कर कमी करण्याची मागणी सन्माननीय सदस्य यांनी केली आहे. महानगरपालिकेने उक्त गावांमध्ये बऱ्याप्रमाणात खर्च केला आहे. तेथील भूमीगत गटारांसाठी सन २०१८ मध्ये स्थायी समितीने ठराव केला व ११ गावांसाठी मलनि:स्सारण प्रकल्पाचा मास्टर प्लॅन तयार करण्याकरिता सल्लगाराची नेमणूक केली आहे. सदरहू कार्यवाही २०१८ पासून सुरु केली आहे. उक्त गावांसाठी महानगरपालिकेने काहीच केले नाही असे नाही. तांत्रिक छाननी समितीने दिनांक २० जून, २०१८ रोजी उक्त प्रकल्पास मान्यता दिली आहे व शासनाची मदत न घेता महानगरपालिकेच्या निधीतून ३९२ कोटी रुपये खर्च करुन मलनि:स्सार प्रकल्प उभारण्याचे निश्चित केले आहे. त्यासाठी आवश्यक कार्यवाही केली आहे व निविदा प्रक्रिया राबवून कामाचा कार्यारंभ आदेशही देण्यात आला आहे. अद्ययावत मलनि:स्सारण प्रकल्प उभारण्यासाठी डीपीआरवर खर्च करण्यात येत आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी उक्त ठिकाणच्या कचरा संकलनाच्या संदर्भात भावना व्यक्त केली आहे. कचरा संकलनासाठी पूर्वीच्या ग्रामपंचायतीचीच वाहने वापरण्यात येत आहेत, त्यामध्ये वाढ करण्यात आलेली नाही. यासंदर्भात मी महानगरपालिका अधिकाऱ्यांना खडसावून विचारणा केली. त्यांनी सांगितले की, ग्रामपंचातच्या मालकीची ६२ वाहने होती व आणखी ३२ वाहने उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. सदरहू भागामध्ये महानगरपालिकेचे १०७ व ३०० कंत्राटी सेवक कार्यरत आहेत. त्यांच्या वेतनावरील खर्च महानगरपालिका करीत आहे.

अध्यक्ष महोदय, सदरहू भागातील लोकांना कचरा संकलनासाठी खाजगी कंत्राटदारास पैसे द्यावे लागतात, असे सन्माननीय सदस्य यांनी सांगितले आहे. सदरहू बाब गंभीर असून त्याबाबत महानगरपालिकेला सूचना देण्यात येतील. सदरहू

श्री.प्राजक्त तनपुरे...

भागामध्ये महानगरपालिकेने काहीच काम केले नाही असे म्हटले असले तरी त्यांनी अधिकचे काम केल्याचे दिसून येत आहे.

अध्यक्ष महोदय, सदरहू गावांचा समावेश महानगरपालिकेमध्ये होण्यापूर्वी त्यांना महानगरपालिकेकडून बल्क पद्धतीने पाणी देण्यात येत होते व त्याची विभागणी करुन वाटप त्यावेळच्या ग्रामपंचायतीच्या माध्यमातून करण्यात येत होते. सदरहू गावांसाठी पाणी पुरवठ्याकरिता दरवर्षी ६-७ कोटी रुपये खर्च केल्याची माहिती महानगरपालिकेने दिली असून उक्त बाबीसाठी आता डीपीआर तयार करण्यात आला आहे. पुणे महानगरपालिका हद्दीच्या तुलनेत उक्त भागामध्ये पाणी पट्टी कमी आकारण्यात येत आहे, असे ही सांगण्यात आले आहे. शहराच्या पाणी पट्टीच्या केवळ २० टक्के पाणी पट्टी लोहगाव येथे आकारण्यात येत आहे.

यानंतर श्री.तेंग...

असुधारित प्रत

श्री.प्राजक्त तनपुरे......

मुंढवा, साडेसतरानळी, फुरसुंगी, ऊरोली देवाची या गावांमध्ये इतर शहरांच्या तुलनेमध्ये फक्त ६० टक्के पाणी पट्टी आकरली जात आहे. धायरी व आंबेगाव (ब्रु) या गावांना फक्त २० टक्के पाणी पट्टी आकारली जात आहे. शिवने या गावाला पाणी पट्टी माफ करण्यात आलेली आहे. महानगरपालिकेने अनेक गावांना पाणी पट्टीमध्ये चांगली सवलत दिलेली आहे.

अध्यक्ष महोदय, रस्त्यांच्या कामासाठी सन २०१८-१९ मध्ये ८ कोटी, २०१९-२० मध्ये १६.५० कोटी, सन २०२०-२१ मध्ये २० कोटी, सन २०२१-२२ मध्ये १८.२६ कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत आणि सन २०२२-२३ मध्ये ३० कोटी रुपये प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. पुणे महानगरपालिकेने रस्त्यांच्या कामासाठी यावर्षासह आतापर्यंत ९२ कोटी रुपये उपलब्ध करुन दिलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, पुणे महानगरपालिकेने मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्याच नाहीत, असे म्हणता येणार नाही. तरी देखील सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये माहिती देतात, याचा अर्थ यामध्ये काही तरी तथ्य आहे, असे समजून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, कचरा संकलनाच्या कामामध्ये सुधारणा करण्याचे निदेश महानगरपालिकेला देण्यात येतील. अन्य सुविधा लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याच्या सूचना देखील देण्यात येतील.

श्री.संजयमामा शिंदे : अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागातील काही ग्रामपंचायतीना नगरपंचायतीचा दर्जा दिलेला आहे. तसेच काही नगरपंचायतीच्या दर्जामध्ये बदल केलेला आहे. अशा ठिकाणी देखील अशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत सरकारचा विचार आहे काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, महानगरपालिकेचा ॲक्ट वेगळा आहे. नवीन नगरपंचायतीसाठी नगरविकास विभागामार्फत विशेष निधी उपलब्ध करुन

असुधारित प्रत

श्री.प्राजक्त तनपुरे......

दिला जातो. आपण कोणत्या नगरपंचायतीबाबत प्रश्न उपस्थित केला आहे, हे मला माहिती नाही. नवीन नगरपंचायतीला व नगरपालिकेच्या वाढीव हद्दीतील गावांचा विकास करण्यासाठी नगरविकास विभागामार्फत निधी उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे. उक्त प्रश्नांच्या संदर्भात आपण मला निवेदन द्यावे, त्या अनुषंगाने निश्चितपणे योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री.संजय जगताप : अध्यक्ष महोदय, महानगरपालिकेने दिलेल्या माहितीच्या आधारे मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. ज्यावेळी पुणे महानगरपालिकेमध्ये सदर गावांचा समावेश करण्यात आला होता तेव्हा म्हणजे सन २०१४-१५, सन २०१५-१६, सन २०१६-१७, सन २०१७-१८ व सन २०१८-१९ असे अनुक्रमे २०, ४०, ६०, ८० व १०० टक्के अशा प्रकारची कर रचना करण्यात आली होती.

अध्यक्ष महोदय, सन २०१८ मधील निर्णयानुसार ४० टक्के कर सवलत बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यामुळे सदर गावावर मोठ्या प्रमाणावर कराचा भार आलेला आहे.

अध्यक्ष महोदय, काल लोकमत वर्तमानपत्रामध्ये एक बातमी छापून आलेली आहे. ती बातमी येथून दाखविली तर ते आपणास दिसणार नाही. त्यामुळे सदर वर्तमानपत्र मी आपणाकडे सादर करतो. या वर्तमानपत्रामध्ये टँकरच्या भोवती जवळपास २००० लोकांचा घोळका असल्याची बातमी छापून आलेली आहे. अशी सर्व गांवामध्ये परिस्थिती आहे. पुणे महानगरपालिकेला आपणास काय माहिती देत आहे, यापेक्षा प्रत्यक्ष त्या गांवामध्ये काय परिस्थिती आहे, हे खूप महत्त्वाचे आहे. सद्य:स्थितीत टँकरच्या माध्यमातून पाणी पुरवठा केला जात आहे.

अध्यक्ष महोदय, सदर गावांमध्ये सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी कर्मचारी अंतर्भूत केले आहेत, असे मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे. परंतु सदर कर्मचाऱ्याच्या माध्यमातून काय सुविधा दिल्या जात आहेत, हे पाहणे खूप महत्त्वाचे आहे.

श्री.संजय जगताप.......

अध्यक्ष महोदय, मूलभूत सुविधा देण्यासाठी सर्व स्थानिक स्वराज्य संस्था कर घेतात. सन २०१८ मध्ये निविदा काढण्यात आली होती. त्यानंतर उक्त कामासाठी सल्लागाराची नेमणूक केली. आता पुन्हा निविदा काढली तर सदर प्रक्रियेस बराच वेळ लागू शकतो. सन २०२४ पर्यंत तेथील नागरिकांना सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध होऊ शकतील. त्यामुळे सन २०२४ पर्यंत तरी तेथील नागरिकांकडून ग्रामपंचायतीच्या करानुसार कराची आकारणी करावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, महानगरपालिकेने कोणकोणत्या सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत, त्याचे विवेचन मी केलेले आहे. काही सुविधा उपलब्ध नाहीत त्या भविष्यामध्ये उपलब्ध करुन दिल्या जातील. परंतु आतापर्यंत महानगरपालिकेने बराच पैसा खर्च केलेला आहे. तसेच वाढीव मनुष्यबळ, गाड्या, साफसफाईसाठी काही माणसांची नेमणूक अशा प्रकारच्या अनेक सुविधा देण्याचा प्रयत्न केलेला आहे. महानगरपालिकेने कोणतीही सुविधा उपलब्ध करुन दिली नाही, असे म्हणता येणार नाही. परंतु आणखी सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे, ही बाब खरी आहे. तेथील कर कमी करावा, असे सन्माननीय सदस्याचे म्हणणे आहे. परंतु इतर शहरांच्या तुलनेमध्ये त्या गांवाना पाणी पट्टी कर कमी आकारला जातो. त्या गावांमध्ये महानगरपालिकेमार्फत २०० ते २५० टँकरने मोफत पाणी पुरवठा केला जातो. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रामणे याबाबतचे नियोजन अजून चांगल्या प्रकारे करणे अपेक्षित आहे. या सर्व बाबीसंदर्भात महानगरपालिकेच्या सर्व अधिकाऱ्यांसह सन्माननीय सदस्यांसोबत बैठक घेतली जाईल व योग्य ते निर्णय घेण्यात येईल.

श्री.भिमराव (आण्णा) तापकीर : अध्यक्ष महोदय, पुणे महानगरपालिकेमध्ये प्रथम ११ गावांचा समावेश करण्यात आला होता. लगेच एका वर्षानंतर पुन्हा २३ गावांचा समावेश करण्यात आला आहे. सदर गावे पुणे महानगरपालिकेमध्ये आल्यानंतर त्या गावांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन न देता इतर शहरांप्रमाणे पुणे महानगरपालिका कर आकरणी करीत आहे. आता अंशत: का होईना

श्री.भिमराव (आण्णा) तापकीर.......

महानगरपालिका सोयी-सुविधा उपलब्ध करुन देत आहे. सन १९९७ मध्ये पुणे महानगरपालिकेमध्ये २३ गावे आली होती. त्या गावाप्रमाणे या गावांना देखील सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच त्या गावांना तीन वर्षांनंतर टप्प्या-टप्प्याने कर आकारणी करण्यात आली होती. परंतु आता सरसकट सर्व ठिकाणी कर आकारणी केली जात आहे. सन १९९७ मध्ये समाविष्ट झालेल्या गावांप्रमाणे आपण कर आकरणी करणार आहात काय? सदर गावांमध्ये पाण्याची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता आहे. तसेच तेथील सफाई कर्मचाऱ्यांची अत्यंत कमतरता भासत आहे. त्यामुळे आवश्यक कामगार भरती करणे अपेक्षित आहे ती भरती आपण करणार आहात काय?

श्री.प्राजक्त तनपुरे : सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न स्कोपच्या बाहेरचा असला तरी त्याबाबत मी सांगू इच्छितो की, जेव्हा एखादी ग्रामपंचायत महानगरपालिकेमध्ये समाविष्ट केली जाते तेव्हा महानगरपालिका ॲक्टनुसार त्या गावांना कर आकारला जातो. सदर ॲक्टच्या बाहेर जाणून कोणत्याही प्रकारची सूट देता येत नाही. त्यामुळे महानगरपालिका ॲक्टनुसारच सदर गावांना कर आकारला जात आहे. सुरुवातीच्या काळामध्ये ग्रामपंचायतीचा जो कर होता त्या कराप्रमाणे कर वसूल केला जातो. त्यानंतर टप्प्या-टप्प्याने त्या करामध्ये वाढ केली जाते.

अध्यक्ष महोदय, महानगरपालिका चांगल्या सुविधा उपलब्ध करुन देत आहे, असे काही सन्माननीय सदस्यांनी म्हटले आहे. परंतु अनेक सन्माननीय सदस्य सुविधा दिल्या जात नाहीत, अशी माहिती देत आहेत. त्यामुळे महानगरपालिका कोठे तरी सुविधा देण्यास कमी पडत आहे, असे दिसून येत आहे. त्यामुळे या सर्व विषयावर सविस्तर चर्चा करण्यासाठी संबंधित सर्व अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेण्यात येईल.

श्री.चेतन तुपे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय अतिशय सविस्तर उत्तर देत आहेत आणि संबंधित अधिकारी व सन्माननीय सदस्यांसोबत बैठक घेण्यात येईल, असे आवश्वासन देखील दिलेले आहे.

असुधारित प्रत

श्री.चेतन तुपे........

अध्यक्ष महोदय, आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना माझे फक्त दोनच स्पेसिफिक प्रश्न आहेत.

यानंतर श्री.कुलकर्णी......

असुधारित प्रत

श्री. चेतन तुपे....

पहिला प्रश्न असा आहे की, पुणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातील एकूण लोकसंख्या आणि भौगोलिक परिस्थिती पाहता ३४ गावांसाठी पुरेसा निधी पुणे महानगरपालिकेने द्यावा, असे निदेश पुणे महानगरपालिकेला राज्य सरकारकडून दिले जाणार आहेत काय ? मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, आतापर्यंत ६३ कोटी रुपये खर्च करण्यात आले असून यावर्षी ३० कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या सदर ३४ गावांचे क्षेत्रफळ हे पुणे शहराच्या एकूण क्षेत्रफळाच्या एक तृतियांश आहे. यावर्षी पुणे महानगरपालिकेने जवळपास ८ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिकचा अर्थसंकल्प सादर केला आहे. त्यामुळे या प्रमाणात तेथील नागरिकांकरिता पैसे मिळणार काय ? याचे कारण असे की, मध्य पुण्याचा विकास झाला असून उपनगरांचा विकास झालेला नाही. दुसरे असे की, माझ्या मतदारसंघातील साडेसतरा नळी, केशव नगर, मांजरी अशी अनेक गावे या २३ व ११ गावांमध्ये समाविष्ट झाली आहेत. सन्माननीय सदस्य श्री. संजय जगताप यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबत सांगण्यात आले की, टप्प्याटप्याने कर वाढविला जाणार आहे. ही बाब आम्हालाही मान्य असून मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर समाधानकारक आहे. परंतु या दोन गावांच्या कर लावण्याच्या टप्प्यामध्ये १५ ते २३ टक्क्यांचा फरक आहे. हा फरक दुरुस्त केला जाणार आहे काय ? पूर्वी समाविष्ट झालेल्या ११ गावातील नागरिकांना वेगळ्या टप्प्याने कर आकारला जात आहे आणि २३ गावातील नागरिकांना वेगळ्या टप्प्यातील कर आकारला जात आहे. हा फरक दूर करण्यात येणार काय ?

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, लोकसंख्या आणि भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन तेथील गावांना निधी दिला जाणार काय, असा सन्माननीय सदस्यांचा पहिला प्रश्न आहे. मी सांगू इच्छितो की, महानगरपालिकेने त्यांचा निधी कशा प्रकारे खर्च करावा, यासाठी स्वायत्तता देण्यात आलेली आहे. याबाबत महानगरपालिकेला अधिकार असतो. तेथे नगरसेवक निवडून येतात आणि त्यांच्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव होत असतो. त्यामुळे हे अधिकार महानगरपालिकेचे

श्री. प्राजक्त तनपुरे ....

आहेत. पुणे महानगरपालिकेने या गावांकडे अधिक लक्ष देऊन त्यांना निधी देणे अभिप्रेत आहे. राज्य सरकारच्या कायद्यामध्ये महानगरपालिकेला निर्देश देण्याची तरतूद असले तर तशा प्रकारचे प्रयत्न करण्यात येतील. परंतु हा महागनरपालिकेचा अधिकार असून त्यांना स्वायत्तता देण्यात आलेली आहे. दुसरे असे की, करामध्ये तफावत असल्याबाबत सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. मी सांगू इच्छितो की, त्यांनी याबाबत माझ्याकडे लेखी पत्र द्यावे. चुकीचे काही असेल तर त्याबाबत तपासणी करता येईल.

**उपाध्यक्ष :** आता लक्षवेधी क्रमांक सात चर्चेला घेण्यात येईल.

श्री. धनंजय मुंडे : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेचे उत्तर देण्यासाठी माननीय मंत्री सभागृहात यावयाचे आहेत. तोपर्यंत आपण पुढील लक्षवेधी सचूना घ्यावी, अशी मी विनंती करतो.

**उपाध्यक्ष :** ठीक आहे. लक्षवेधी सूचना क्रमांक ७ व ८ बाबत मंत्री महोदयांनी पत्र दिले आहे की, सदर लक्षवेधी सूचना थोडी उशिराने घ्यावी. त्यामुळे आता लक्षवेधी सूचना क्रमांक ९ चर्चेला घेण्यात येईल. परंतु सन्माननीय सदस्य श्री. रत्नाकर गुट्टे सभागृहात उपस्थित नसल्याने लक्षवेधी सूचना क्रमांक १० चर्चेला घेण्यात येईल.

-------

**पृ.शी. :** अकोले तालुक्यातील तळे, विहिर, शिंदे या गावातील पिण्याच्या पाण्याच्या गंभीर समस्येबाबत करावयाची कार्यवाही

**मु.शी. :** अकोले तालुक्यातील तळे, विहिर, शिंदे या गावातील पिण्याच्या पाण्याच्या गंभीर समस्येबाबत करावयाची कार्यवाही यासंबंधी सन्माननीय सदस्य डॉ. किरण लहामटे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

डॉ. किरण लहामटे (अकोले) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, तळे, विहिर, शिंदे (ता.अकोले, जि.अहमदनगर) या गावांना पिण्याच्या पाण्याची योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून १० ते १२ वर्षापासून मंजूर होणे, परंतु या कामाचा दर्जा चांगला नसल्यामुळे तळे, विहिर, शिंदे गावांना पिण्याचे पाणी न मिळणे, तयार करण्यात आलेल्या विहिरीमध्ये देखील केवळ २ ते ३ महिने पुरेल इतकेच पाणी असणे, गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण होणे, त्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होणे, याबाबत संबंधित ठेकेदार, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन या गावांना तातडीने पाणी पुरवठा मिळण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

श्री. गुलाबराव पाटील (पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**(प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

डॉ. किरण लहामटे : अध्यक्ष महोदय, अकोले तालुक्यातील तळे, विहिर, शिंदे या गावांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून १० ते १२ वर्षापूर्वी पिण्याच्या पाण्याची योजना मंजूर झाली होती. त्या योजनेचे काम धिम्या गतीने आणि सदोष पद्धतीने सुरु झाले. त्या गावांना १२ वर्षे झालेली आहे. असे असतानाही त्या गावांना आजही पिण्याचे पाणी मिळत नाही. आदिवासी वाडे, पाडे येथील लोकांना दूर अंतरावरुन पाणी आणावे लागत आहे. मी मंत्री महोदयांना या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने स्पेसिफिक प्रश्न विचारु इच्छितो. या गावांना किती दिवसामध्ये पाणी दिले जाणार आहे ? तसेच याकरिता मोठ्या प्रमाणात दिरंगाई करणाऱ्या अधिकारी आणि कंत्राटदाराविरुद्ध किती दिवसात कारवाई केली जाणार आहे ?

**उपाध्यक्ष :** मी माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, या लक्षवेधी सूचनेचे निवेदन सभागृहाला मिळालेले नाही.

श्री. गुलाबराव पाटील : तळे, विहिर, शिंदे, ता. अकोले या गावच्या ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिनांक ३ डिसेंबर, २००६ ला ५९ लाख रुपयांची निविदा प्रसिद्ध केली होती. सन २००९ साली जे.जे. फड या एजन्सीला कार्यारंभ आदेश देऊन हे काम सुरु करण्यात आले होते. सन्माननीय सदस्य हे या काळात जिल्हा परिषद सदस्य होते. त्यांनी सांगितल्यानुसार या गावांमध्ये मार्च, एप्रिल, मे या शेवटच्या तीन महिन्यामध्ये पाण्याचे दूर्भिक्ष होते. ही बाब खरी आहे. देशात जल जीवन मिशन योजना सुरु आहे. यात केंद्र सरकार व राज्य सरकार प्रत्येकी ५०-५० टक्के निधी देते व यात १० टक्के लोकवर्गणी केली जाते. येथील गावे आदिवासी पाडे, वस्तीमधील असल्यामुळे या गावांकडे सहानुभूतीपूर्वक पाहण्याची शासनाची जबाबदारी आहे. मी सन्माननीय सदस्यांना आश्वस्थ करु इच्छितो की, या गावांचा तात्काळ डीपीआरमध्ये समावेश केला जाईल. मागील काळात काय झाले, हे सांगण्यापेक्षा या वर्षाच्या आत पाणी देण्यात येईल. सदरहू गावे ही नदीकाठावरील आहेत. मागील काळात खोदण्यात आलेल्या विहिरीत पाणी कमी पडले होते. आता येणारा उद्भव डीपीआरच्या माध्यमातून घेण्यात यावा. मी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेला (जीएसडीए) सांगितले आहे की,

श्री. गुलाबराव पाटील ....

नदीपात्रामधून थेट पाणी घेण्यात यावे. जेणेकरुन या गावांना पाणी देता येईल. मी सन्माननीय सदस्यांना खात्रीपूर्वक सांगू इच्छितो की, डीपीआरमध्ये या गावांचा समावेश करण्यात येईल. तसेच ही योजना ५ कोटी रुपयांच्या आतील असल्यामुळे याबाबतच्या मान्यतेचे अधिकार जिल्हा परिषदेला दिलेले आहेत. त्यामुळे या गावांना पूर्णपणे न्याय दिला जाईल.

डॉ. किरण लहामटे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, या वर्षाच्या आत या गावांना पाणी दिले जाईल. याबाबत मी मंत्री महोदयांचे आभार मानतो. मी अडीच वर्षे तेथील जिल्हा परिषदेचा सदस्य होतो. तेथे तयार करण्यात आलेली योजना सदोष होती. माझ्या माहितीनुसार त्या काळात ही योजना कंत्राटदारांच्या फायद्याकरिता तयार करण्यात आली होती. या योजनेमुळे केवळ तीन महिने तेथील गावांना पाणी मिळाले होते. त्यापूर्वी आणि त्यानंतर त्या गावांना पाणी मिळालेले नाही. त्यामुळे या विषयाचे गांभीर्य मंत्री महोदयांनी समजून घ्यावे व या प्रश्नातून तेथील गावांना दिलासा द्यावा, अशी मी विनंती करतो.

श्री. गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, सदरहू योजना सन २०१६ मधील आहे. ही योजना करीत असताना पाण्याचा उद्भव घेण्यात आला होता. तेथे काळा दगड असल्यामुळे तीन महिने त्या गावांना पाणी दिले गेले नाही, ही बाब खरी आहे. सन्माननीय सदस्यांनी ही बाब माझ्या निदर्शनास आणून दिली असल्यामुळे मी सांगू इच्छितो की, योगायोगाने तेथे जवळच पाण्याचा उद्भव आहे. यामुळे काही फुटापर्यंत पाईपलाईन पुढे टाकावी लागणार आहे. हे केले तर एजीएममध्ये नवीन एस्टीमेट केल्यामुळे आणि ५५ एलपीडीसीप्रमाणे तेथे पाणी देता येईल. वर्षभरात या गावांना पाणी देण्यात येईल, याची मी जबाबदारी घेतो. हा प्रश्न सोडविण्यात येईल, अशी मी सन्माननीय सदस्यांना खात्री देतो.

डॉ. देवराव होळी : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न अकोले तालुक्यातील आहे. परंतु माझ्या गडचिरोली जिल्ह्यातील अनेक पाणी पुरवठा योजना मागील १० ते १५ वर्षापासून बंद आहेत. जल जीवन मिशन योजनेचाही यात समावेश आहे. परंतु

डॉ. देवराव होळी ....

अद्यापपर्यंत जल जीवन मिशन योजनेचे पैसे संबंधित जिल्हा परिषदेला पाठविलेले नाहीत. मी मंत्री महोदयांना या निमित्ताने प्रश्न विचारु इच्छितो की, जल जीवन मिशन योजनेत ज्या योजना मंजूर झाल्या आहेत, त्यांच्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे काय ?

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

श्री.गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न लक्षवेधी सूचनेतील विषयापेक्षा वेगळा आहे. परंतु गडचिरोली सारख्या दुर्गम भागातील हा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, ५ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे डी.पी.आर. एमजेपी मार्फत मंजूर केले जातात तर त्यापेक्षा कमी किमतीचे डी.पी.आर. जिल्हा परिषदेमार्फत मंजूर केले जातात. डी.पी.आर. तयार करण्यामध्ये गडचिरोली जिल्हयाचा पहिला क्रमांक लागतो. यासाठी निधीची कमतरता नाही. तरीही सन्माननीय सदस्यांचे काही प्रश्न असतील तर त्यांनी ही लक्षेवधी सूचना संपल्यानंतर माझ्या दालनात यावे. मी त्यांचा प्रश्न मार्गी लावतो. पूर्वी २ कोटी रुपयांपर्यंतचे अधिकार खालच्या पातळीवर होते परंतु आता आपण ५ कोटी रुपयांपर्यंतचे अधिकार दिलेले आहेत. जेणेकरुन तेवढयासाठी सरपंच, जिल्हा परिषद सदस्य आणि आमदारांना आमच्याकडे येण्याची वेळ येऊ नये. गडचिरोली जिल्हयामध्ये एमजेपी च्या केवळ दोन-तीन योजना असतील, असे मला वाटते. इतर सर्व योजना जिल्हा परिषदेच्या आहेत. मी यासंदर्भात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी बोलतो. निधीची कमतरता नाही परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती सत्य मानून मी या प्रकरणाची माहिती घेतो.

**उपाध्यक्ष :** ठीक आहे. आता आपण लक्षवेधी सूचना क्रमांक ११ घेऊ.

---------

असुधारित प्रत

**लक्षवेधी सूचना क्रमांक-११ बाबत**

श्री.संग्राम थोपटे : अध्यक्ष महोदय, सदर लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने मंत्री महोदयांनी अद्याप लेखी उत्तर दिलेले नाही.

श्री.धनंजय मुंडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे की, सदर लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती अद्याप वितरित केलेल्या नाहीत. परंतु माझ्याकडे लक्षवेधी सूचनेचे उत्तर आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केल्यास उत्तरे देण्यात येतील.

**उपाध्यक्ष :** लक्षवेधी सूचने संबंधीचे निवेदन वितरित झालेले नाही. परंतु मंत्री महोदय उत्तर देण्यास तयार आहेत. सन्माननीय सदस्यांची तयारी असल्यास आपण लक्षेवधी सूचना चर्चेला घेऊ.

श्री.संग्राम थोपटे : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीचे निवेदन वितरित झाले नसल्याचे मंत्री महोदयांनी मान्य केले आहे. याचा अर्थ त्यांनी दिलेले उत्तरच अद्याप आम्हाला माहिती नाही. त्यामुळे आम्ही प्रश्न कशाच्या आधारे विचारणार, हा माझा मुद्दा आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, अगोदर आम्हाला लेखी निवेदन द्यावे. ते आम्ही वाचतो. त्यानंतर १० मिनिटांनी लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात यावी.

श्री.धनंजय मुंडे : लक्षवेधी सूचना उपस्थित करणाऱ्यांपैकी बरेच सन्माननीय सदस्य या ठिकाणी उपस्थित आहेत. तसेच सरकारच्या वतीने उत्तर देण्यासाठी मी देखील उपस्थित आहे. ही लक्षवेधी सूचना कार्यक्रम पत्रिकेवर असल्याचे आम्हाला रात्री उशिरा माहिती झाल्यामुळे कदाचित सन्माननीय सदस्यांच्या पिजन बॉक्समध्ये उत्तराचे निवेदन उपलब्ध झाले नसेल. परंतु सन्माननीय सदस्यांच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्याची माझी तयारी आहे.

श्री.संग्राम थोपटे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय उत्तरे देण्याबाबत सकारात्मक आहेत. परंतु प्रश्न काय विचारायचे यासाठी आम्हाला मंत्री महोदयांचे निवेदन वाचावे लागेल.

श्री.गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचना कार्यक्रम पत्रिकेवर असल्याची माहिती आम्हा सर्वांनाच रात्री उशिरा मिळाली. त्यामुळे सर्वच मंत्री महोदयांची ही अडचण झाली आहे.

**उपाध्यक्ष :** ठीक आहे. लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना वितरित करेपर्यंत ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे. सन्माननीय सदस्यांना निवेदनाच्या प्रती प्राप्त होताच ही लक्षवेधी सूचना घेण्यात येईल. आता आपण लक्षवेधी सूचना क्रमांक-१२ चर्चेला घेऊ.

श्री.धनंजय मुंडे : ठीक आहे.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** पुणे शहरातील कचऱ्याच्या प्रश्नाबाबत.

**मु.शी.:** पुणे शहरातील कचऱ्याच्या प्रश्नाबाबत श्री. चेतन तुपे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.चेतन तुपे (हडपसर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे शहरातील कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट न लावल्यामुळे कचऱ्यातील घाण द्रव जमिनीत झिरपून प्रदूषित होणारे जलस्त्रोत, त्यामुळे होणारी पर्यावरणाची हानी, कचऱ्याने हवेतील प्रदूषण वाढल्यामुळे बालके आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये बळावलेले श्वसनाचे विकार, काही वेळा कचरा डेपोना आगी लागून निर्माण होणाऱ्या प्रदूषित धुरामुळे पर्यावरणाची होणारी हानी, शहराच्या एकाच भागात एकवटलेले कचरा डेपो, त्यामुळे त्या ठराविक भागातील प्रदूषणात पडणारी भर, हवेतील प्राणवायूची घसरलेली गुणवत्ता, औद्योगिक वसाहती आणि लगतच्या रहिवाशी क्षेत्रातील नागरिकांना होणारा प्रदूषणाचा त्रास, शहराच्या एकाच भागात कचरा डेपो केल्यामुळे लांबवर करावी लागणारी वाहतूक, वाहतूक ठेके प्रकरणी मोठ्या प्रमाणात झालेले आर्थिक गैरव्यवहार, विशिष्ट ठेकेदारांना नजरेसमोर ठेवून दिलेले कचरा प्रकल्पाचे ठेके, याकामी झालेले आर्थिक गैरव्यवहार, ठेकेदार वापरत असलेले कालबाह्य तंत्रज्ञान, त्यांच्याकडे अद्यावत यंत्र सामुग्रीचा अभाव, त्यामुळे वाढलेले पर्यावरणीय प्रदूषण, शहरालगतच्या नव्याने समाविष्ट भागात कचरा टाकताना त्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे निर्माण झालेल्या प्रदूषणाने परिसरात होणारी पर्यावरण हानी परिणामी त्या भागात कचरा टाकण्यास स्थानिकांचा होणारा तीव्र विरोध, नगरवासीय आणि ग्रामवासीय यांच्यात वारंवार होणारा तीव्र संघर्ष, पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात होणारी हानी रोखण्यासाठी तातडीने प्रभावी

असुधारित प्रत

श्री.चेतन तुपे.....

कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.संजय बनसोडे (पर्यावरण व वातावरणीय बदल राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री.चेतन तुपे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सदर लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये दिलेली माहिती अतिशय अपूर्ण आहे. मंत्री महोदयांना करण्यात आलेले ब्रिफिंग अतिशय अयोग्य व अपूर्ण आहे, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, पुणे शहराचा कचऱ्याचा प्रश्न दिवसेंदिवस जटील आणि गंभीर बनत चालला आहे. शहराच्या पूर्व आणि दक्षिण भागामध्ये सर्व कचरा प्रकल्प आहेत. मी आपल्या माध्यमातून सभागृहाच्या आणि मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, पुणे शहरामध्ये दररोज २२०० ते २३०० टन कचरा तयार होतो. दिवाळी, गणपती अशा सण-उत्सवांच्या काळात यामध्ये आणखी १०० ते २०० टनांची भर पडते. त्यापैकी १२०० ते १३०० टन कचरा सुका व ९०० ते १ हजार टन ओला कचरा असतो. परंतु १ हजार टन ओल्या कचऱ्यापैकी केवळ ३५० टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते. कारण पुणे शहरामध्ये ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या यंत्रणेची एकूण क्षमता ५०० टनांपेक्षा जास्त नाही. परंतु प्रत्यक्षात केवळ ३०० ते ३५० टन कचऱ्यावरच प्रक्रिया होते. म्हणजेच दररोज ६०० ते ६५० टन कचरा इतस्तत: फेकून दिला जातो. त्यामुळे पुणे शहरामध्ये पर्यावरणाचे मोठे प्रश्न निर्माण होत आहेत. शहरातील एकाच बाजूला कचरा डेपो निर्माण केल्यामुळे ही अडचण येत आहे.

अध्यक्ष महोदय, मी आता सुक्या कचऱ्याबाबत माहिती देतो. शहरामध्ये दररोज १२०० ते १३०० टन सुका कचरा निर्माण होतो. परंतु त्यापैकी केवळ ४०० ते ५०० टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते. ओल्या व सुक्या कचऱ्याचा एकत्रित विचार करता पुणे शहरामध्ये दररोज सुमारे २२०० ते २३०० टन कचरा निर्माण होतो व त्यापैकी केवळ १००० टन कचऱ्यावरच प्रक्रिया केली जाते. उर्वरित सर्व कचरा इतस्तत: पडून राहतो.

अध्यक्ष महोदय, पुणे शहरामध्ये ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणारे एकूण १६ प्रकल्प आहेत. त्यापैकी १३ प्रकल्प बायोगॅसचे आहे. त्यांची क्षमता प्रतिदिन अवघी ५ टन एवढी आहे. हे सर्व प्रकल्प केवळ कागदावरील व ठेकेदारांचे हित जपणारे प्रकल्प आहेत. ठेकेदार कचऱ्यावर काहीही प्रक्रिया करीत नाहीत.

श्री.चेतन तुपे.....

त्यांनी केवळ कागदावर प्रक्रिया प्रकल्प दाखविलेले आहेत. पुणेकरांचा घामाचा, कष्टाचा पैसा ठेकेदार जळवा चिकटल्याप्रमाणे ठेकेदार शोषून घेत आहेत. ६ कचरा प्रकल्पांपैकी रोकेल प्रकल्प हा ७०० टन क्षमतेचा आहे. परंतु हा प्रकल्प बंद करावा लागला आहे. कारण एन.जी.टी. ने सांगितले आहे की, या प्रकल्पामध्ये योग्य पध्दतीने काम होत नाही. दुसरा कचरा प्रकल्प ७५० टन क्षमतेचा बायो एनर्जी प्रकल्प आहे. परंतु प्रत्यक्षात केवळ २०० टन क्षमतेने हा प्रकल्प सुरु आहे. तसेच २०० टन क्षमतेचा आदर्श भारत प्रकल्प आहे. या प्रकल्पात प्रत्यक्षात शून्य टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जात आहे. माझा प्रश्न असा आहे की, ही सर्व आकडेवारी केवळ कागदावरच दाखविली जाणार आहे का ? तसेच पुणेकरांचे आरोग्य आणि पर्यावरण धोक्यात टाकले जाणार आहे का ?

अध्यक्ष महोदय, कचरा वाहतुकीची देखील अशीच गंमत आहे. पुणे महानगरपालिकेचे ब्रीदवाक्य आता 'ठेकेदार हिताय' झाले आहे, असा आमचा आरोप आहे. कात्रज ते फुरसुंगी पर्यंतचे कचरा वाहतुकीचे टेंडर काढण्यात आले. सरळ रस्त्याने गेले तर हे अंतर ९ किमी. आहे. परंतु वाहतुकीचे पैसे किलोमीटरवर द्यायचे असल्याने महापालिकेने कात्रज ते फुरसुंगी असे टेंडरमध्ये नमूद न करता कात्रज-गुलटेकडी-हडपसर-फुरसुंगी असा फिरवून मार्ग नमूद करण्यात आला. हे सर्व कोणाच्या हितासाठी चालले आहे, हा या निमित्ताने आमचा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, कचरा वाहतूक करणारी १५ वर्षांपेक्षा जुनी झालेली ३०० वाहने आणखी सेवेमध्ये आहे. ही वाहने व त्यांचे तंत्रज्ञान कालबाहय झाले आहे. परिवहन विभागाच्या नियमानुसार १५ वर्षांनंतर वाहनांचे फिटनेस सर्टिफिकेट मिळत नाही. अशा स्थितीतील ही कचरा वाहणारी वाहने रस्ताभर कचरा सांडत जात असतात. कारण कचरा डेपो पूर्व आणि दक्षिण पुणे भागात आहेत व कचरा पूर्ण शहरातून येतो.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. चेतन तुपे...

त्यामुळे त्याचे प्रदुषण होते. श्वसनाचे विकार वाढले आहेत. बालके आणि ज्येष्ठ नागरिकांना श्वसनाचा त्रास होतो, सुध्दा मान्य करण्यात आले आहे. तेथे सगळ्या डॉक्टरांचे रिपोर्ट आहेत. म्हणून या बाबतीत मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, हे कालबाह्य झालेले तंत्रज्ञान बदलून आपण पर्यावरणाचे रक्षण करणार आहात काय? दुसरा प्रश्न म्हणजे आपण नेमकी कोणती प्रक्रिया करता, कचऱ्यावर प्रक्रिया करताना कायदा असे सांगतो की, आपण ओपन डम्पिंग करायचे नाही. त्यावर प्रक्रिया केलीच पाहिजे. पण आमची पुणे महानगरपालिका कागदावरच प्रक्रिया करते. प्रक्रिया करणे म्हणजे नक्की काय असते, आपण त्यातून गॅस बनवितो, वीज बनवितो काही बायोप्रॅडक्ट करतो. पण पुणे महानगरपालिका काही करीत नाही. आमच्या येथे प्रक्रिया म्हणजे काय केले जाते तर आलेला कचरा बारीक करुन दळायचा, कुटायचा आणि याला प्रक्रिया म्हणायचे. त्याचे ढीग लावून पुणेकरांचे पैसे ठेकेदारांच्या खिशात घालायचे, याला जर प्रक्रिया म्हणायचे काय ? म्हणून मंत्री महोदयांना माझा थेट प्रश्न आहे की, हे सुधारण्यासाठी आपण कोणती उपाययोजना राबविणार आहात. आपण त्या सर्व कचरा प्रकल्पांची अचानक भेट देऊन पाहणी करणार आहात का, हा माझा प्रश्न आहे. दुसरे म्हणजे पर्यावरण अतिशय संवेदनशील झाले आहे. मुंबईमध्ये सुध्दा त्याच्या झळा बसत आहेत. म्हणून शासनाच्या वतीने पर्यावरण मंत्रालयाच्या माध्यमातून शहराच्या चारही कोपऱ्यात समान क्षमतेचे कचरा प्रकल्प उभारण्यासाठी आपण कायद्यामध्ये काही सुधारणा करणार आहात काय, हाही माझा प्रश्न आहे. तिसरा व शेवटचा प्रश्न असा आहे की, हा संपूर्ण पुणे शहराचा कचरा माझ्या मतदार संघातील हडपसरच्या नागरिकांच्या माथी मारला जातो आहे, त्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून पुण्यातील कचरा कमी करण्यासाठी आणि माझ्या नागरिकांची कचराकुंडीतून सोडवणूक करण्यासाठी शासन कालबध्द कार्यक्रम आखणार आहे काय ?

श्री. संजय बनसोडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चेतन तुपे यांनी पुणे शहराविषयी काही मुद्दे उपस्थित करुन शासनाचे लक्ष वेधले आहे.

श्री. संजय बनसोडे..

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांना मुद्देसूद उत्तर देण्याचा प्रयत्न करणार आहे. पुणे शहराची लोकसंख्या ४५ ते ५० लाख आहे आणि या शहराचे क्षेत्रफळ ५०० चौरस किलोमिटर आहे. पुणे शहरातून निर्माण होणारा घनकचरा २२०० मेट्रिक टन प्रतिदिन निर्माण होतो असे त्यांनी त्यांच्या लक्षवेधीच्या सूचनेत नमूद केले आहे. मी सांगू इच्छितो की, यासाठी एकूण ५० घनकचरा प्रक्रिया प्रकल्प तेथे कार्यरत आहेत. त्या प्रकल्पांची एकूण क्षमता २०९६ मेट्रिक टन प्रतिदिन इतकी आहे. त्या ठिकाणी ओला कचरा ८९६ मेट्रिक टन गोळा केला जातो तर सुका कचरा १२०० मेट्रिक टन प्रतिदिन गोळा होत असतो. सद्य:स्थितीत १७९६ मेट्रिक टन प्रतिदिन इतक्या घनकचऱ्यावर प्रक्रिया केली जाते. प्रक्रियेविना असलेला घनकचरा ३०० मेट्रिक टन प्रतिदिन इतका आहे. त्यामुळे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिनांक ३१.१२.२०२१ रोजी नोटीस दिली आहे. लेगसी वेस्ट प्रक्रिया १००० मेट्रिक टन प्रतिदिन होते. सद्य:स्थितीत लेगसी वेस्ट प्रक्रिया २० एकर क्षेत्रावर ९ लाख मेट्रिक टन इतकी झाली आहे. उर्वरित १५ एकर क्षेत्रावर ८ लाख मेट्रिक टन लेगसी वेस्ट कचरा असून फेस टू अंतर्गत सदर कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येणार आहे. सांडप्रक्रिया प्रकल्पाची क्षमता १०० घनमिटर प्रतिदिन आहे. आमच्या प्रदुषण नियंत्रण मंडळाने पुणे महानगरपालिकेला दिलेल्या प्राधिकार पत्राची वैधता तपासण्यात आली आहे. त्या ठिकाणी ती वैधता असल्याचे आढळून आले आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, वातावरणातील हवेच्या गुणवत्तेचे मुल्यमापन केले असता हवेतील धुळीकणांचे प्रमाण जास्त दिसून आले आहेत. त्यांचे हे म्हणणे खरे आहे. म्हणून आम्ही सहायक आरोग्य अधिकारी, पुणे यांना हे नागरिकांना प्रदुषणामुळे काही त्रास होतो काय किंवा श्वसनाचे विकार तेथे होत आहेत काय याबाबत तपासणी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. याबाबत त्यांनी दिनांक २२.३.२०२२ रोजी शासनास अहवाल दिलेला असून त्या अहवालानुसार तेथे असे काही आढळून आलेले नाही.

श्री. संजय बनसोडे...

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी पुढे असेही सांगितले की, ठेकेदारांना ठेका देणे किंवा त्यांची देयके अदा करणे... ही बाब पुणे महानगरपालिकेच्या अखत्यारित येते. याबाबत अनियमितता झाली नसल्याचे पुणे महानगरपालिकेने शासनाला कळविले आहे. तथापि, सन्माननीय सदस्य सांगतात म्हणून पुणे महानगरपालिका व प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची एखादी बैठक घेतली जाईल. तेथे जी काही अनियमितता झाल्याचे आढळून येईल त्याची विभागामार्फत सविस्तर चौकशी केली जाईल.

श्री. चेतन तुपे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी आत्ताच सविस्तर उत्तर दिले आहे. त्यांनी समाधानकारक उत्तर दिले आहे. पण दुर्दैव असे आहे की, अधिकाऱ्यांनी मंत्री महोदयांकडे चुकीची माहिती पाठविली आहे. कारण २२०० ते २३०० मेट्रिक टन प्रतिदिन घनकचरा निर्माण होतो हे त्यांनी त्यांना अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीवरुन उत्तरातून सांगितले आहे. त्यापैकी १७०० मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया आम्ही करतो असेच त्यांचे उत्तर आहे. याचा अर्थ ५०० ते ६०० मेट्रिक टन कचरा प्रतिदिन प्रक्रियेशिवाय तसाच पडून राहतो. मी आपल्याला आज सकाळचे माझ्या मतदार संघातील फोटो या आयपॅडवरुन दाखवितो.

(आयपॅडवरुन फोटो दाखविण्यात येतात.)

ही कचऱ्याची परिस्थिती आहे. अनेक ठिकाणी कचरा पडलेला असतो. सर्व जलसंपदा विभागाचे कॅनॉल हे कचरा कुंड्या झाल्या आहेत. हे ओपन डम्पिंग नाही तर काय आहे. कारण येथील कचरा उचललाच जात नाही. पुणे शहरामध्ये अशा पध्दतीने काम सुरू आहे. म्हणून माझी विनंती होती की, माझ्या मतदार संघातील नागरिकांची या कचरा कुंडीतून सुटका होणार की नाही. हा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. आम्ही हे किती दिवस सहन करायचे. मला या ठिकाणी बुजगावणे म्हणून माझ्या नागरिकांनी निवडून पाठविले नाही. न बोलणारा आमदार म्हणून नाही तर माझ्या नागरिकांनी त्यांच्या हक्काचे काम करणारा आमदार म्हणून मला येथे पाठविले आहे. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, आमची यामधून कधी सुटका होईल.

श्री. संजय बनसोडे : अध्यक्ष महोदय, मी आत्ताच उत्तरामध्ये सांगितले आहे की, २२०० मेट्रिक टन प्रतिदिन कचरा गोळा केला जातो आणि जवळपास १७९६ मेट्रिक टन कचऱ्यावर प्रतिदिन प्रक्रिया होते. सुमारे ३०० मेट्रिक टन कचऱ्यावर प्रतिदिन प्रक्रिया केली जात नाही. म्हणून प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून त्यांना नोटीस दिली आहे. कचऱ्यावर प्रक्रिया करुन खत निर्मिती केली जाते. सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन प्लॅस्टिक तयार केले जाते आणि दररोज तेथील कचरा उचलला जातो. त्यामुळे विनाप्रक्रिया जो घनकचरा पडून असतो त्यावर प्रक्रिया करण्याबाबत पुणे महानगरपालिकेला सूचना देण्यात येतील.

श्री. सुनील टिंगरे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी आत्ताच सांगितले आहे की, पुणे महानगरपालिकेकडून शहरातील २२०० मेट्रिक टन इतका कचरा जमा केला जातो आणि त्यापैकी १७०० मेट्रिक टन इतक्या कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, २२०० मेट्रिक टन इतका कचरा जमा केला जात असेल तर उरलेल्या कचऱ्याच्या बाबतीत.... कारण आता पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये २३ किंवा ११ गावांचा समावेश झाला आहे. त्या गावांमध्ये कुठेही रस्ते विकसित झालेले नाहीत तर तेथे झाडूकाम केले जाते काय, तसेच तेथील रस्त्यांच्या कडेला आम्हाला ढीग का दिसतात. आम्ही जेव्हा फिरतो आणि आम्हाला जो कचरा दिसतो तो दररोजचा आहे काय, पण असे कुठेही नाही. खरं तर पुणे महापालिकेच्या घनकचरा विभागाची कार्यपध्दती संशयास्पद आणि भ्रष्ट आहे. या ठिकाणी फक्त कागदावर २२०० मेट्रिक टन इतका कचरा जमा केला जातो असे दाखविले जाते. त्याचे कारण असे आहे की, खाजगी ठेकेदारांना हे कचरा उचलण्याचे जे काम दिले आहे त्यांच्याकडून जेवढा कचरा उचलला जातो त्यापेक्षा तो जास्त उचलला गेला असे दाखविले जाते, अशी माझी शंका आहे. कारण जो ठेकेदार कॅन्टोनमेंट बोर्डामध्ये स्वत:च्या खर्चाचे प्रकल्प उभा करतो, त्याचे वीज बिल स्वत:च्या खर्चाने भरतो आणि रिजेक्टेड मटेरियलची विल्हेवाट लावतो. कॅन्टोनमेंट बोर्डाचा कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा २६५ रुपये प्रति मेट्रिक टन इतका दर आहे. तो ठेकेदार ज्यावेळी महापालिकेत काम करतो त्यावेळी प्रकल्प उभा करणे, वीज बिल भरणे आणि रिजेक्टेड माल वाहून नेण्याच्या खर्चाचे काम महापालिका करते.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. सुनिल टिंगरे....

त्याच ठेकेदाराला महानगरपालिकेमध्ये ४६५ रुपये पर मॅट्रीक टन एवढा दर दिला जातो. मग यामध्ये परत त्यांना १५ वर्षात ५ टक्के वाढ सुद्धा देण्यात येणार आहे. एकाच शहरात कॅन्टोनमेंट बोर्डात आणि इतर ठिकाणी ही तफावत का करण्यात येते. यामध्ये काहीतरी गोडबंगाल आहे काय, याची निश्चितपणे चौकशी व्हावी. प्रशासकीय अधिकारी, डेपो येथे कचरा प्रकिया न करता उरळी येथील भागात बऱ्याचवेळी असे झाले की, तिथे कचरा मोठया प्रमाणात आग लावून पेटवला गेला आहे. अनेकवेळा वृत्तपपत्रामध्ये असे आले आहे की, उरळी येथील लोकांना श्वसनाचे त्रास होत असल्यामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आहे. आजपर्यंत कुठेही अशा प्रकारची तक्रार आली नाही, अशी माननीय मंत्र्यांना चुकीची माहिती देण्यात आली आहे. मग वृत्तपत्रामध्ये काय खोटी माहिती दिलेली आहे काय, याची माहिती माननीय मंत्र्यांनी द्यावी.

अध्यक्ष महोदय, विना प्रक्रिया करता कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी न्यायालयाची मनाई असतानाही रामटेकडी येथील प्रकल्पामध्ये ९०० रुपये दराने कार्यादेश देण्यात आलेला आहे. ठेकेदाराचा कचरा जवळच्या गावात टाकण्यात आला, हे खरे आहे. कारण हे सुद्धा वर्तमानपत्रामध्ये आलेले आहे. ४६५ रुपयांनी कचऱ्याची प्रक्रिया केली जाते. मग ९०० रुपये म्हणजे हा खर्च कशासाठी आला आहे. याबद्दल चौकशी करण्यात यावी. पुणे महानगरपालिकचे घनकचरा व्यवस्थापन जवळपास ठेकेदार, वाहतूक करणारे किवा स्वच्छ संस्था असतील तर यांच्याकडून घरोघरी जाऊन कचरा जमा केला जातो त्याचेही वेगळे पैसे जमा केले जातात. झाडू कामवाले ज्यावेळी सोसायटयांची कचरा जमा करतात त्यावेळी एका सोसायटी कडून बेकायदेशीर ५ हजार रुपये घेतले जातात. हे कायदेशीर आहे काय ? या प्रक्रियेची पूर्ण चौकशी करण्यात येऊन या विभागसाठी एक आयएएस दर्जाचे अधिकारी नेमण्यात येतील काय ?

श्री. संजय बनसोडे : अध्यक्ष महोदय, मी सविस्तर उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. चेतन तुपे आणि सन्माननीय सदस्य श्री. सुनिल टिंगरे यांनी

श्री. संजय बनसोडे...

काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत तर त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, त्या ठिकाणच्या सन्माननीय सदस्यांसह मी तिथे प्रत्यक्षात पाहणी करण्यासाठी जाऊन त्याबाबत योग्य त्या सुधारणा करण्यासाठी महानगरपालिकेला सूचना देण्यात येतील. मी स्वत: तिथे भेट देणार आहे. या संदर्भात माननीय नगरविकास मंत्री आणि माननीय पर्यावरण मंत्री यांच्यासोबत बैठक आयोजित करु.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांनी सदर लक्षवेधी सूचनेसंबंधी उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री. चेतन तुपे आपल्याला सारखा एकच प्रश्न विचारत होते. तिथ २२०० मेट्रीक टन कचरा जमा होत असताना आपल्याकडे १७०० मेट्रीक टन कचऱ्याची प्रक्रिया आहे. मग ५०० मेट्रीक टन कचऱ्याचे काय करण्यात येते हा त्यांचा प्रश्न आहे. आपण उत्तारामध्ये सारखे सांगत आहात की, ३००-३५० मेट्रीक टन ओला कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येत नाही. असे उत्तरामध्ये देखील लिहिले आहे. मग २०० मेट्रीक टन सुक्या कचऱ्याचे काय झाले आहे ? हा त्यांचा प्रश्न आहे. यावर आपल्याकडून उत्तर अपोक्षित आहे ते आलेले नाही.

अध्यक्ष महोदय, सदरची लक्षवेधी सूचना ही अतिशय महत्त्वाची आहे. सन्माननीय सदस्य त्यांच्या मतदारंसघातील प्रश्न मांडत आहेत आणि ते मांडण्याचा त्यांना अधिकार आहे आणि ते योग्यही आहे. त्यांनी चौकशीची मागणी केली किंवा नाही हे सुरुवातीला ऐकले नाही. सन्माननीय सदस्य श्री. चेतन तुपे यांनी आपण तिथे भेट कराल काय असा प्रश्न उपस्थित केला आणि त्यांनी काही आरोप केले. तसे आरोप करण्याचा त्यांचा अधिकार आहे त्यावर आमचे काही म्हणणे नाही माननीय मंत्र्यांनी पहिल्याच उत्तरामध्ये सांगितले की, " मी तिथे चौकशी करेल." मग त्यानंतर आता काय राहिले आहे. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, मी स्वत: तिथे भेट देईल, चौकशी करेल असे सांगितले. तरी देखील प्रश्न विचारण्याचा सन्माननीय सदस्यांचा अधिकार आहे. सन्माननीय सदस्य श्री. चेतन तुपे यांचा एक प्रश्न असा आहे की, गुणवत्ता, प्रदुषण या सर्व विषयामध्ये सुधारणा करण्यासाठी सरकार काही कार्यक्रम

असुधारित प्रत

ॲड. आशिष शेलार...

करणार आहे काय ? त्यांनी त्यांच्या मतदारसंघापुरता हा प्रश्न मांडलेला आहे. परंतु त्याचे उत्तर आलेले नाही. अध्यक्ष महोदय, या विषयाची व्याप्ती मोठी आहे कारण पर्यावरण म्हणजे काही पुण्यावरुन आलेली हवा आणि मुंबईची हवा असे वेगळे काही नाही. त्यांनी मुंबईचा देखील उल्लेख केला आहे. ३००-५०० मेट्रीक टन कचऱ्यावर प्रक्रिया झाली नाही म्हणून आपण चौकशी करणार असाल तर माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, मुंबईमध्ये ४५०० मेट्रीक टन कचऱ्यावर प्रक्रिया होत नाही. त्याची देखील आपण चौकशी करणार आहात काय ?

श्री. संजय बनसोडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी उपस्थित केलेला प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. परंतु तो प्रश्न लक्षवेधी सूचनेच्या बाहेरच्या असल्यामुळे त्या संबंधीची माहिती घेऊन सन्माननीय सदस्यांना कळविले जाईल.

**उपाध्यक्ष** : सदरची लक्षवेधी सूचना खूप महत्त्वाची आहे आणि माननीय मंत्र्यांनी सुद्धा ते तेवढेच गांर्भीयाने घेतलेले आहे. माननीय मंत्री तिथे स्वत: येऊन भेट देऊन बैठक घेणार आहेत.

श्री. संजय जगताप : अध्यक्ष महोदय, उरळी येथल कचरा डेपो माझ्या मतदारसंघामध्ये येतो. त्याच्या रेडिअसमध्ये १.५ लाख लोक रहिवाशी आहेत. हा लोकांच्या जिवनमानाचा प्रश्न आहे. माननीय मंत्र्यांनी ब्रिफिंग घेताना त्यांनी असे सांगितले की, तिथे धुळीकणामध्ये काही अडचण नाही. परंतु तिथे सर्व परिवारांमध्ये आरोग्याचा प्रश्न मोठया प्रमाणावर आहे. तेथील १.५ लाख लोकांचे आरोग्य महत्त्वाचे आहे त्यामुळे माननीय मंत्र्यांनी त्वरीत उरळी येथील कचरा डेपो बंद करावा, अशी माझी विंनती आहे. आपण तो बंद करणार काय ? कारण १.५ लाख लोकांचे आरोग्य महत्त्वाचे आहे की तो कचऱ्याचा प्रश्न महत्त्वाचा आहे ?

श्री. संजय बनसोडे : अध्यक्ष महोदय, मी आताच सविस्तर उत्तर दिलेले आहे. त्या ठिकाणी मी भेट देण्यासाठी जाणार आहे, असे देखील सांगितले आहे. तेथील सर्व सन्माननीय सदस्यांना घेऊन भेट देऊन त्या पाहणीमध्ये काही आढळले तर तिथे योग्य ती कार्यवाही केली जाईल.

--------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** राज्यातील निराधार व्यक्तींना आधार म्हणून शासनातर्फे देण्यात येणाऱ्या योजनेतील पेन्शन रक्कम वाढवणे

**मु.शी.:** राज्यातील निराधार व्यक्तींना आधार म्हणून शासनातर्फे देण्यात येणाऱ्या योजनेतील पेन्शन रक्कम वाढवणे या संबंधी श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री नानाभाऊ पटोले, सुरेश वरपुडकर, पृथ्वीराज चव्हाण, श्रीमती सुलभा खोडके, श्री. चंद्रकांत नवघरे, डॉ. राहूल पाटील, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय सामाजिक न्याय (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र राज्यातील निराधार व्यक्तींना आधार म्हणून राज्य शासनातर्फे संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी निराधार पेन्शन, श्रावणबाळ पेन्शन अशा एकुण ५ प्रकारच्या योजनेतून पेन्शन दिल्या जात असणे, सदर योजनेच्या माध्यमातून निराधार व्यक्तिला फक्त १००० रुपये व त्या महिलेला मूल असेल तर १०० रुपये जास्त पेन्शन दिले जात असणे, सदर पेन्शनची रक्कम ही वाढत्या महागाईच्या काळात तूटपुंजी असणे, आजच्या महागाईच्या काळात पेन्शनच्या रक्कमेत वाढ करुन ती किमान दरमहा ३००० रुपये करण्याची आवश्यकता, तसेच शासकीय कर्मचा-यांना ज्याप्रमाणे महागाई भत्ता दिला जातो त्याप्रमाणे दरवर्षी या पेन्शनमध्ये २० टक्के वाढ करण्याची आवश्यकता, तसेच निराधार योजनेच्या पेन्शनचा लाभ मिळण्यासाठी उत्पन्नाची अट २१ हजार रुपये असणे, म्हणजे दिवसाला केवळ ५८ रुपये उत्पन्न असणाऱ्या व्यक्तिलाच ही पेन्शन योजना लागू होत असणे, परिणामी अनेक निराधार व्यक्ती या योजनेपासून वंचित असणे, जुन्या काळातील लावलेली ही

श्रीमती प्रतिभा धानोरकर....

उत्पन्नाची अट बदलून ६० हजार रुपये करण्याची आवश्यकता, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

श्री. धनंजय मुंडे (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्रीमती प्रतिभा धानोरकर : अध्यक्ष महोदय, सदरची लक्षवेधी सूचना ही अतिशय महत्त्वाची आहे. आपल्याला माहीत आहे की, ग्रामीण भागात काम करताना संजय गांधी निराधार योजना किंवा श्रावणबाळ पेन्शन योजना अशा महत्त्वपूर्ण योजना राज्य शासनाच्या माध्यमातून राबविल्या जातात. पण हे करीत असताना लाभार्थ्यांना अल्प प्रमाणात मानधन देण्यात येते. त्यामुळे या मानधनात वाढ झाली पाहिजे आणि लाभार्थ्यांच्या अकाऊंटला जमा होणारे पैसे देताना तहसिलमार्फत जरी चेक बँकेत जमा झाले तर साधारणत: २० दिवस पेन्शन अकाऊंटला जमा होत नाहीत.

अध्यक्ष महोदय, या योजनेद्वारे देण्यात येणाऱ्या मानधनात आपण वाढ करणार काय, लाभार्थ्यांना देण्यात येणारे मानधन किमान ५ तारखेच्या आत त्यांच्या अकाऊंटमध्ये जमा करणार काय आणि उत्पन्नाची मर्यादा २० हजार रुपयांवरुन ६० हजार रुपये करणार काय असे माननीय मंत्र्यांना माझे तीनच प्रश्न आहेत.

श्री. धनंजय मुंडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्त्वाची लक्षवेधी सूचना सभागृहामध्ये उपस्थित केली आहे. या लक्षवेधी सूचनेसंबधी एकूण पाच योजना आहेत. त्या योजनेच्या माध्यमातून निराधारांना लाभ देण्यात येतो. राज्य पुरस्कृत योजनेमध्ये संजय गांधी निराधार योजनेचे एकूण लाभार्थी १३ लाख ३३ हजार आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती योजनेची २४ लाख ६० हजार लाभार्थी आहेत. केंद्र पुरस्कृत योजनेमध्ये इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजनेचे लाभार्थी १२ लाख ४१ हजार, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजनेचे लाभार्थी ८५ हजार ९३९ आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती योजनेचे लाभार्थी १० हजार ३११आहेत. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, या लाभार्थ्यांची २१ हजार रुपये उत्पन्नाची मर्यादा राज्य शासनाने घातलेली आहे. केंद्र शासनाची उत्पन्नाची मर्यादा नाही परंतु त्यांच्याकडून येणारी रक्कम अतिशय तुटपंजी म्हणजे ३०० रुपये आणि राज्य शासन पूर्ण ७०० रुपये देते.

यानंतर श्रीमती करंदीकर.....

श्री. धनंजय मुंडे ....

उत्पन्नाची मर्यादा २१ हजार रु. वरुन ६० हजार रु. करा असे म्हटले तर शासनावर आर्थिक भार येणार आहे. २१ हजार रु. वार्षिक उत्पन्नाची मर्यादा व हजार रु वरुन ३ हजार रुपये मानधन केले तर ९ हजार कोटी रुपयांची वाढ होत आहे. २१ हजार रु.वरुन ५० हजार रु. उत्पन्नाची मर्यादा वाढवली व एक हजार रु. मासिक मानधन दिले तर २ हजार ६२२ कोटी रुपयांपर्यंत वाढ जात आहे. उत्पन्नामध्ये वार्षिक २१ हजार रु. वरुन ५० हजार रु. वाढ केली व ३ हजार रुपये मासिक मानधन दिले तर जवळजवळ ७ लाख लाभार्थी वाढणार आहेत व खर्च १० हजार ४८८ कोटी रुपयांपर्यत वाढणार आहे. सन्माननीय सदस्यांनी मांडलेले प्रश्न हे स्थानिक पातळीवर त्यांच्या समोर आले आहेत. ही मागणी स्थानिक पातळीवरुन होत आहे याची मला जाणीव आहे. या सर्व विषयामध्ये जवळजवळ ५ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक भार वाढणार असल्यामुळे माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री यांच्या सोबत या विषयाची सविस्तर चर्चा करु. या संबंधी राज्य शासन सकारात्मक निर्णय येणाऱ्या काळात घेतला जाईल.

डॉ. राहुल पाटील : अध्यक्ष महोदय, ही लक्षवेधी सूचना अत्यंत महत्त्वाची आहे. मंत्री महोदय बऱ्याच मोठया संघर्षातून येथ पर्यंत पोहचले आहेत. सर्वसामान्यांना न्याय देण्याकरिता ही लक्षवेधी सूचना आहे. आताच मंत्री महोदयांनी सांगितले की, २१ हजार रुपयांची वार्षिक उत्पन्न मर्यादा आहे. मी विचारु इच्छितो की, ही मर्यादा कोठून आणली, त्याला कोणते पॅरामिटर लावले आहेत ? मंत्री महोदय सांगत आहे की, शासनाच्या तिजोरीवर भार पडत आहे. शासन कोणासाठी आहे ? शासन दीनदलित, गोरगरिबांसाठीच आहे. एखादा रस्ता बांधण्याकरिता १० हजार कोटी रु. दिले जातात. या संबंधी मी संपूर्ण भारत देशातील माहिती आणली आहे. आसाममध्ये ३ लाख रुपयांची मर्यादा आहे. दिल्लीत १ लाख रु. मर्यादा आहे. उत्तर प्रदेशमध्ये ७० हजार रु. मर्यादा आहे. आपण महाराष्ट्राला पुरोगामी म्हणतो, छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराने पुढे चालतो. दबंग मंत्री म्हणून आपल्या मंत्री

डॉ. राहुल पाटील ....

महोदयांची ख्याती आहे. मी मंत्री महोदयांना विनंती करतो. माननीय स्व. आर आर पाटील यांनी डान्स बार बंदी केली होती.

**उपाध्यक्ष :** थोडक्यात प्रश्न विचारावा.

डॉ. राहुल पाटील : अध्यक्ष महोदय, २१ हजार रुपयांची वार्षिक उत्पन्नाची अट शिथिल करणार काय ? ही अट कोणत्याच पॅरामिटरमध्ये बसत नाही. सदनात या बाबत न्याय झालाच पाहिजे अशी माझी विनंती आहे. एक लाख रु. पर्यंत उत्पन्नाची मर्यादा वाढवली पाहिजे. आपण केवळ १ हजार रु. मानधन देतो. आपल्याकडे मिनिमम वेजेस ॲक्ट आहे. यापेक्षा कमी रुपये जर दिले जात असेल तर आपल्यापेक्षा अधिक दुर्दैवी कोणी नाही. २१ हजार रु. अट आजच्या आज शिथिल करावी व कमीत कमी ३ हजार रु. अनुदान वाढवून देण्यात यावे.

श्री. धनंजय मुंडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. राहुल पाटील व सदनातील अनेक सदस्यांनी विशेष सहाय्य योजनेत फार काळापासून लाभार्थ्यांना लाभ देण्याकरिता प्रयत्न करीत आहेत. २१ हजार रु ची उत्पन्नाची अट रद्द करण्याची मागणी केली आहे. ही अट राज्य शासनाची आहे. केंद्र शासनाकडून बीपीएलकरिता निधी येतो. २१ हजार रु. उत्पन्नाच्या अटीच्या योजनेकरिता येत नाहीत. केंद्र शासनाच्या बीपीएलमध्ये केवळ १३ लाख लाभार्थ्यांना लाभ दिला जातो. २१ हजार रु ची अट आहे... ( अडथळा ) एखादा तहसीलदार जर मदत देत नसेल तर या बाबत आपण सांगितले तर नक्कीच तहसीलदाराची त्या तालुक्यात चौकशी लावू. रु २१ हजार उत्पन्नाची अट असून यामुळे राज्यातील जवळजवळ २४ लाख लाभार्थ्यांना लाभ दिला जात आहे. २१ हजार रु ची अट ६० हजार रु पर्यंत करावी किंवा मानधनामध्ये वाढ करावी अशी मागणी आहे. इतर राज्यांमध्ये काय आहे हे जर सदनात सांगायचे तर ते देखील सांगता येईल. इतर राज्यांमध्ये केंद्र पुरस्कृत योजना आहे. काही आसाम सारखी राज्ये आहेत ज्यामध्ये राज्य शासन स्वत:चा हिस्सा देते. केंद्र पुरस्कृत योजनेत दिल्लीमध्ये २ हजार रु, केरळमध्ये ३ हजार रु, तामिळनाडू येथे

श्री. धनंजय मुंडे ....

केवळ ३ हजार रु. मानधन आहे. आपल्या राज्यात बीपीएल सोबत २१ हजाराची अट ठेवल्यामुळे अधिकचे २४ लाख लाभार्थ्यांना लाभ दिला जातो. सदनाची भावना लक्षात घेता २१ हजार रु ची अट ६० हजार रु. केली पाहिजे. या करिता आर्थिक भार जास्त येणार आहे. सर्व सन्माननीय सदस्यांच्या सोबत चर्चा करु. आज येथे महत्त्वाची चर्चा झाली असून ती माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांच्या सोबत बसून त्यांना सांगू. हा आर्थिक भार ५ हजार कोटी रु. पेक्षा जास्त असल्यामुळे या बाबत माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांना सकारात्मक विचार करण्यास सांगू.

श्री. सुरेश वरपुडकर : अध्यक्ष महोदय, राज्याच्या निराधार व्यक्तींच्या संबंधी हा महत्त्वाचा प्रश्न आहे. संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ पेन्शन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय निवृत्ती योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती योजना, इंदिरा गांधी निराधान पेन्शन योजना या ५ योजनांकरिता ५० हजार रुपयांची सवलत दिली आहे ती कोणाला दिलेली आहे ? श्रावण बाळ योजना व संजय गांधी निराधार योजनेमध्ये जे दिव्यांग आहेत त्यांनाच ५० हजार रु.च्या उत्पन्नची अट शिथिल केली आहे. २१ हजार रु वरुन ५० हजार रु. केली आहे. महाराष्ट्राचे सरासरी दरडोई उत्पन्न मी सांगतो. सन २०१९-२० मध्ये मुंबईचे सरासरी दरडोई उत्पन्न ३ लाख ३९ हजार ७५१ रु. आहे. राज्यातील सर्वात कमी सरासरी दरडोई उत्पन्न वाशिम जिल्ह्यातील असून ते ९१ हजार ५४८ रु. एवढे आहे. वार्षिक २१ हजार रुपये उत्पन्न असणाऱ्यांना मदत देण्यास आपण वेगळा विचार करतो. दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना काही अडचण येत नाही. ज्याचे नावे दारिद्र्य रेषेखाली नसेल व ज्याचे उत्पन्न २१ हजार पेक्षा कमी असेल त्याला अडचण येते. त्याचा समावेश दारिद्र्य रेषेच्या खाली तरी करावा. मात्र हे होत नाही. तहसीलदार २१ हजार रु. उत्पन्नाचा दाखला देत नाहीत. ही महत्त्वाची अट शिथिल करण्याची आवश्यता आहे.

असुधारित प्रत

श्री. सुरेश वरपुडकर.....

अध्यक्ष महोदय, दुसरी गोष्ट महत्त्वाची आहे. कुटुंब विभक्त होते. ज्याचे १८वर्षे वय झाले त्याला वेगळा ७/१२ केला जातो. त्याचे कुटुंब वेगळे धरतो. त्याचे रेशन कार्ड वेगळे होते. एखादी व्यक्ती गरीब असेल व तिचा मुलगा जर १८ ते २१ वर्षाचा झाल्यानंतर त्याचे नाव योजनेतून डिलीट होते. मग त्या व्यक्तीला मुलगाही सांभाळत नाही व योजनेतून अनुदानही मिळत नाही अशी परिस्थिती आहे. मुलगा कमावता झाला की त्या व्यक्तीचे नाव वगळले जाते, हे आपण रद्द केले पाहिजे.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.सुरेश वरपुडकर ...

अध्यक्ष महोदय, या सर्व गोष्टींचा विचार करण्याकरिता आमच्या समितीची एक बैठक सर्व अधिकाऱ्यांसमवेत घ्यावी. ज्या ज्या छोट्या गोष्टी आहेत त्या पूर्णपणे डिलीट करण्याचे काम आपण केले पाहिजे. मंत्री महोदय आपण ज्या भागातून येता त्या भागातील मराठवाड्यातील परिस्थिती आपल्याला सर्वांना माहिती आहे. अशी अनेक कुटुंबे आहेत की, जेथे मुले पालकांना सांभाळत नाहीत. वृध्दांना काही देत नाहीत, अशी परिस्थिती आहे. आपण याचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन एक बैठक घ्यावी आणि हा जी.आर. ... कमी करण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करावा, अशी मी विनंती करतो.

श्री.धनंजय मुंडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुरेश वरपुडकर यांनी या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून अतिशय महत्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. ही वस्तुस्थिती आहे की, २१ हजारांची अट ५० हजारांपर्यंत संजय गांधी निराधार योजनेमध्ये जे दिव्यांग लोक आहेत ... केंद्र सरकारची इंदिरा गांधी निराधार पेन्शन योजना ... त्यामध्ये ती अट ५० हजारांची केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, आपण एक मुद्दा देखील लक्षात घेतला पाहिजे की, केंद्र सरकारच्या नियमानुसार ८० टक्के दिव्यंगत्व असले तरच त्यांना लाभ मिळतो. परंतु, महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असल्याने केंद्र शासनाने दिव्यंगत्वाबाबत जरी ८० टक्क्यांची अट केलेली असली तरी राज्य सरकारने असे सांगितले आहे की, ४० टक्के दिव्यंगत्व असले तरी आम्ही त्यांना या योजनेंतर्गत फायदा देऊ. यामध्ये इतर ठिकाणची परिस्थिती पाहून देखील महाराष्ट्र सरकारने... आता देखील आपण अधिकच्या काही गोष्टी करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, ही बाब खरी आहे की, मुलगा कमावता झाला की, त्याचे नाव डिलिट करुन त्याच्या ठिकाणी त्याच्या आईवडिलांना या योजनेचा लाभ मिळाला पाहिजे. एवढेच नाही तर, आम्ही प्रयत्न करीत आहोत. ज्येष्ठ नागरिकांच्या बाबतीत आपण धोरण अवलंबिले आहे. सर्व गोष्टी केल्या आहेत. परंतु, ज्येष्ठ नागरिकांच्या बाबतीत मुले नोकरीला लागल्यानंतर त्यांच्याकडे कोणी पाहत नाही,

असुधारित प्रत

श्री.धनंजय मुंडे ...

ही माहिती देखील आपल्या समोर आलेली आहे. त्याबाबतीत देखील येणाऱ्या काळात या सदनामध्ये काही कायदे करावे लागणार आहेत, अशी परिस्थिती समोर आलेली आहे. एवढेच नाही तर ज्येष्ठ नागरिकांच्या बाबतीत या पाचही योजनांच्या पलीकडे जाऊन काही गोष्टी करणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, उदाहरणादाखल सांगावयाचे झाले तर, आज आपण अनेक योजनांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील १२-१३ कोटी जनतेपैकी कोणालाही मोफत उपचार देतो. परंतु, उपचाराच्या आधी काही तपासण्या कराव्या लागतात, एखाद्या आजारावर उपचार करण्यापूर्वी ज्या काही तपासण्या कराव्या लागतात त्याकरिता मात्र कोणतीही योजना नाही. अशा योजना देखील आपल्याला येणाऱ्या काळात आणावयाच्या आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुरेश वरपुडकर यांच्या प्रश्नांच्या अनुषंगाने मी हे सांगू इच्छितो की, यामध्ये काम करणारे जे सन्माननीय सदस्य आहेत, या अगोदर देखील सन्माननीय सदस्य डॉ.राहुल पाटील यांनी सांगितले, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष जैस्वाल आता सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांचे देखील अनेक प्रयत्न असतात. सन्माननीय सदस्य श्री.सुरेश वरपुडकर यांनी सांगितले, सन्माननीय सदस्या श्रीमती प्रतिभा धानोरकर यांनी सांगितले. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत नवघरे यांनी सांगितले, या सर्व सन्माननीय सदस्यांनी याबाबत सांगितले. सर्व सन्माननीय सदस्यांना एकत्रित ... सर्व पक्षाचे एक-एक सन्माननीय सदस्य घेऊन या संदर्भात एक एकत्रित बैठक घेऊन, त्यामध्ये तहसीलदारांपासूनच्या ... लाभ, यादी, यादी करताना निवड किती दिवसांत होते, महिन्याला होते की नाही होत, पाच तारखेला काही ठिकाणी पगार होत नसेल, या सर्व बाबींवर मार्ग तर काढूच परंतु, येणाऱ्या काळात या सर्व योजनेची व्याप्ती कशी वाढेल, यावर देखील आपण चर्चा करु.

श्रीमती मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, निराधारांना आधार देण्यासाठी संजय गांधी निराधार योजना आहे. मंत्री महोदयांना मी विचारु इच्छिते की, आघाडी सरकार

असुधारित प्रत

श्रीमती मनिषा चौधरी ...

येऊन अडीच वर्षे झाली परंतु, अडीच वर्षापासून बोरिवली तालुक्यात संजय गांधी निराधार अनुदान योजनेसाठी अद्याप कमिटी स्थापन झालेली नाही, ती का झाली नाही, त्याचे कारण काय? विरोधातील आमदार जास्त आहेत म्हणून... ग्रामीण भागात ज्या इतर योजना लागू आहेत त्या शहरी भागात लागू नाहीत. शहरामध्ये फक्त संजय गांधी निराधार योजना आहे. आपण लवकरात लवकर याची कमिटी करणार काय?

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी खूप सकारात्मक उत्तर दिलेले आहे. परंतु, खरोखर शहरामध्ये २१ हजार रुपये उत्पन्नाची अट लागू होते काय? शहरामध्ये विजेचे बिल कमीत कमी १२०० रुपये येते. त्यामुळे त्या महिलांना न्याय कसा मिळणार? त्यामुळे किमान मुंबई भागात आपण माझ्या अशा निराधार मातांना न्याय देण्याकरिता ६० हजार रुपयांच्या उत्पन्नाची अट लागू करणार काय, त्याकरिता आपल्याला जे काही करावे लागणार आहे त्याकरिता विरोधी पक्ष म्हणूनसुध्दा आपल्याला त्यांचे सहकार्य मिळेल. यामध्ये ज्या अटी आहेत की, त्या निराधार महिलेच्या ....

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्या सभागृहाच्या विशेष बैठकीची वेळ संपलेली आहे. आपण आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्रीमती मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, त्या महिलेच्या रेशन कार्डवर समजा तिचा २१ वर्षांपेक्षा मोठा मुलगा असेल, २५ वर्षांचा मुलगा असेल मात्र तो तिला सांभाळत नसेल तर अशा महिलांबाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे? सर्वात महत्वाचे म्हणजे ....

**उपाध्यक्ष** : सभागृहाच्या विशेष बैठकीची वेळ संपलेली आहे. आपण सभागृहाच्या विशेष बैठकीची वेळ सकाळी १०.५० पर्यंत वाढवत आहोत. सन्माननीय सदस्या आपण आपले म्हणणे थोडक्यात मांडावे. पुढची एक लक्षवेधी सूचना महत्वाची आहे.

श्रीमती मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, मी मंत्री महोदयांकडे या संदर्भात बराच पत्रव्यवहार देखील केलेला आहे. मी स्वत: जाऊन त्यांना भेटले आहे. ज्यांना जन्मदाती आईसुध्दा सांभाळत नाही ...

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्या आपण प्रश्न विचारावा व मंत्री महोदयांकडून उत्तर घ्यावे.

श्रीमती मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, तृतीय पंथीयांना संजय गांधी निराधार योजनेंतर्गत पेन्शन सुरु करणार काय?

श्री.धनंजय मुंडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांच्या ६० हजार रुपयांच्या उत्पन्न वाढीच्या प्रश्नाचे उत्तर मी या अगोदर दिले आहे. सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, बोरिवली येथे संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांच्या निवडीची समिती स्थापन झालेली नाही. परंतु, आपण प्रत्येक तालुक्यात ती समिती नेमतो. तेथे जर ती झाली नसेल किंवा महाराष्ट्रात काही ठिकाणी या समित्या राहिल्या असतील तर, मी आपल्या समोर सांगतो की, एक महिन्याच्या आत महाराष्ट्रातील या सर्व समित्या गठित होतील. यामध्ये एकच म्हणणे आहे त्यांनी उत्पन्न मर्यादेत वाढ करण्याच्या संदर्भामध्ये सांगितले आहे. एकूण ६० हजारांची मर्यादा असेल, २१ हजारांची असेल मी स्पेसिफिक उत्तर दिले आहे की, यामध्ये आपल्या सर्वांची एकत्रित बैठक घेऊन हा विषय माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांना सागू.

श्री.चंद्रकांत नवघरे : अध्यक्ष महोदय, संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ पेन्शन योजनेबाबत माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. एखादी महिला रोजाने काम करण्यास जात असेल तर तिला रोज १०० रुपये रोजंदारी मिळते. तिचे वर्षाचे उत्पन्न ३६ हजार रुपये होते. आपली अट २१ हजार रुपयांची आहे. एखादा माणूस २०० रुपये रोजाने काम करतो, त्याचे वार्षिक उत्पन्न ७० हजार रुपये होते. आपण २१ हजार रुपयांची अट ठेवणार असाल तर मंत्री महोदयांना मला स्पेसिफिक प्रश्न विचारावयाचा आहे की, आपण ही उत्पन्नाची अट ६५ हजार रुपये करणार काय?

श्री.चंद्रकांत नवघरे ...

अध्यक्ष महोदय, दुसरा विषय असा आहे की, त्याचा मुलगा कमावता झाला की, त्याचा पगार बंद होतो. आपण बीड जिल्ह्यातील आहात. आपण परभणीचे पालक मंत्री आहात. बाजूला माझा हिंगोली जिल्हा आहे. मुलगा २०-२१ वर्षाचा झाला की, तो एक बॅग पाठीवर लटकवून पुण्याला कामाला जातो. त्याचे आईवडिल वृध्द असतात. ते त्यांचा उदरनिर्वाह कसा करणार, त्यामुळे ती अट देखील आपण रद्द करावी.

अध्यक्ष महोदय, मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, २१ वर्षांचा कमावता मुलगा झाला की, त्या लोकांचे पगार आपोआप बंद होतात. ते पगार चालू राहतील काय? मी माझ्या तालुक्यामध्ये जनकल्याण योजनेच्या माध्यमातून ५ हजार लोकांचे फॉर्म भरून घेतले. त्यातील फक्त ५०० लोकांचा पगार सुरु झालेला आहे. मागच्या अडीच वर्षांपासून आपले सरकार आलेले आहे. माझ्या जिल्ह्यातील एकाही तालुक्यात अजून संजय गांधी निराधार योजनेबाबतची कमिटी झालेली नाही, त्याकरिता देखील आपण प्रयत्न करणार काय?

श्री.धनंजय मुंडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत नवघरे यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. मी या अगोदरच उत्तरामध्ये सांगितले आहे की, उत्पन्नाची जी २१ हजारांची अट आहे, त्यामध्ये वाढ करण्याबाबत सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांची इच्छा आहे. त्यामध्ये वाढ करण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांची एक समिती गठीत करुन माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांच्या समवेत चर्चा करुन यामध्ये नक्कीच वाढ केली जाईल.

अध्यक्ष महोदय, मघाशी सन्माननीय सदस्या श्रीमती मनिषा चौधरी यांच्या एका प्रश्नाचे उत्तर देण्याचे राहून गेले कारण त्यावेळेस आपण सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत नवघरे यांना बोलण्याची संधी दिली होती. त्यांच्या प्रश्नाच्या संदर्भात मी हे सांगू इच्छितो की, तृतीय पंथीयांना अगोदरच संजय गांधी निराधार योजनेतून ६०० रुपयांचे मानधन दिले जाते. आता आपण तृतीय पंथीयांकरिता बोर्ड तयार केले आहे.

श्री.धनंजय मुंडे ...

त्या बोर्डाचे फॉर्मेशन झाले आहे. फार मोठ्या वेगवेगळ्या योजना देखील आपण तृतीय पंथीयांकरिता आणत आहोत. त्यांना मानधन मिळत आहे.

..........

असुधारित प्रत

**पृ. शी. :** सांगली – सातारा - सोलापूर जिल्हयातील कायम दुष्काळी तालुक्यासाठी वरदान असणारी टेंभू उपसा सिंचन योजनेचे काम मागील २५ वर्षापासून सुरु असणे

**मु. शी. :** सांगली – सातारा - सोलापूर जिल्हयातील कायम दुष्काळी तालुक्यासाठी वरदान असणारी टेंभू उपसा सिंचन योजनेचे काम मागील २५ वर्षापासून सुरु असणे या संबंधी श्री. अनिल बाबर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

असुधारित प्रत

श्री. अनिल बाबर (खानापूर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय जलसंपदा मंत्र्याचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सांगली-सातारा-सोलापूर जिल्हयातील कायम दुष्काळी तालुक्यासाठी वरदान असणारी टेंभू उपसा सिंचन योजनेचे काम मागील २५ वर्षापासून सुरु असणे, सदर दुष्काळी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिण्याच्या तसेच शेतीच्या पाण्याचा प्रश्न अद्यापी प्रलंबित असणे, सदर योजनेचे काम तातडीने केल्यास या योजनेअंतर्गत तीन जिल्हयातील सात तालुक्यांमधील २१७ गावांना फायदा होणे, त्यामुळे या गावातील पिण्याच्या पाण्याची तसेच शेतीच्या पाण्याची अडचण दूर होणे, शेतीमालाचे उत्पादन वाढून त्याचा दर्जा वाढणे, बेरोजगार तरुणांना रोजगार मिळेल, सदर योजनेमध्ये खानापूर-आटपाडी-तासगांव तालुक्यातील वंचित गावांचा समावेश करण्याची होत असलेली मागणी, यासाठी टेंभू उपसा सिंचन योजनेमध्ये वंचित गावांचा समावेश

श्री.अनिल बाबर ....

करुन ६ टप्पा नियोजित असणे, याबाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दिनांक २४ जानेवारी, २०२० रोजी बैठक होऊन तीन महिन्यांमध्ये वंचित गावांचा समावेश करण्याचा आदेश दिलेला असणे, तसेच दिनांक २७ ऑक्टोबर, २०२० रोजी मा. प्रधान सचिव, जलसंपदा यांचेकडे पाण्याच्या फेरनियोजनाबाबत बैठक होऊनही अदयापही निर्णय न होणे, मा. जलसंपदा मंत्री यांचेकडे वारंवार निवेदने देऊनही अदयापही निर्णय न होणे, परिणामी दुष्काळी तालुक्यातील वंचित गावांमधील जनतेमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने लक्ष घालून उपरोक्त वंचित गावांचा लवकर समावेश करुन दुष्काळी तालुक्यातील जनतेला पिण्यासाठी व शेतीला पाणी देण्याकरीता तातडीने शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

श्री.जयंत पाटील (जलसंपदा मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

.............

यानंतर श्री.शिंदे ....

**उपाध्यक्ष** : सभागृहाच्या कामकाजाची वेळ सकाळी १०.५५ वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.अनिल बाबर : अध्यक्ष महोदय, सदर लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये टेंभू योजना कशा पद्धतीने सुरु आहे व सद्य:स्थिती काय आहे, याबाबत नमूद करण्यात आले आहे. खानापूर, आठपाडी, सांगोला या तालुक्यातील वंचित गावांसाठी माननीय जलसंपदा मंत्री यांचे समवेत मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक २४ जानेवारी, २०२० रोजी बैठक घेण्यात आली होती. त्यावेळी सदरहू योजनेचा प्रस्ताव एक महिन्यात तयार करावा व ३ महिन्यात निविदेची कार्यवाही करण्याचे निश्चित करण्यात आले होते. यास आता २ वर्षे कालावधी झाला आहे. माझ्या माहितीनुसार उक्त निविदा प्रक्रिया पार पाडली नाही व के-१ व के -५ मधील पाण्याचे फेर नियोजन अद्याप केले नाही. या प्रकरणी सचिव, जलसंपदा यांचे अध्यक्षतेखाली एक समिती असते. या विभागाचे मागील दीड वर्षांच्या कालावधीत ३ सचिव बदलून गेले परंतु कोणाच्याही अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली नाही. वंचित गावांसाठी पाण्याच्या फेर नियोजनाची कार्यवाही १ महिन्याच्या कालावधीत करण्यात येईल काय व माहे मे अखेरपर्यंत योजनेच्या निविदा काढण्यात येतील काय ?

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, पाण्याच्या फेर नियोजनाचे काम अंतिम टप्प्यात आणले आहे. याप्रकरणी बरेच काम करावे लागले आहे. या प्रकरणाला कृष्णा लवादाची पार्श्वभूमी असल्याने उक्त लवादाच्या संदर्भात माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या वकीलांचा सल्ला घेतला तो थोडासा वेगळा आला आहे. त्यामुळे पुन्हा बरेच पेपरवर्क करावे लागले. यामुळे या प्रकरणी दिरंगाई झाली आहे, ती जाणीवर्पूक केली नाही. सदरहू कार्यवाही जवळपास अंतिम टप्पयात आली असून कृष्णा महामंडळाकडून राज्य सरकारला प्रस्ताव प्राप्त झाला असून त्यावर कार्यवाही सुरु आहे. ती लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य यांनी १ महिन्याच्या आत पाण्याचे फेर नियोजन करण्याची विनंती केली आहे. उक्त कालावधीत अंतिम निर्णय निश्चितपणे जाहीर करण्यात येईल. उक्त लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये कृष्णा खोरे महामंडळाने वर्कआऊट केलेली परिस्थिती नमूद केली

आहे. त्यानुसार निर्णय घेतल्यानंतर उर्वरित गावांना पाणी पोहोचविण्यासाठी आवश्यक असलेले डिझाईन बऱ्याच प्रमाणात तयार करण्यात आले आहे. ते पूर्ण झाल्यानंतर निविदा काढून त्या भागातील वंचित गावांना पाणी उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था लवकर करण्यात येईल.

श्री.अनिल बाबर : अध्यक्ष महोदय, कृष्णा लवादाचा अभ्यास करुन कार्यवाही केले पाहिजे, हे मंत्री महोदयांचे उत्तर मला मान्य आहे. परंतु प्रस्तावला लवादाचा निर्णय परिशिष्ट-अ मध्ये जोडण्यात आला आहे. आता वेळ कमी असल्याने इतर बाबी रेकॉर्डवर आणणे आवश्यक नाही. या प्रकरणी मंत्री महोदयांनी अधिवेशन संपल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन त्यांना कालावधी निश्चित करुन दिला तर माहे जूनपर्यंत निविदा निघतील अशी मला खात्री आहे. मंत्री महोदय देखील याच जिल्ह्यातील आहेत व ते स्वत: अभियंता आहे. त्यांनी या प्रकरणी लक्ष घातले तर दिनांक ३१ मे पूर्वी निविदा निघतील. सदरहू गावांच्या शेजारील गावात पाणी आहे पण त्यांना पाणी नाही, अशी स्थिती खानापूर, आठपाडी, सांगोला तालुक्यातील काही गावांची आहे. त्यामुळे मंत्री महोदयांनी याप्रकरणी लक्ष घातले तर दिनांक १५ मेपूर्वी निविदा निघू शकतील.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी सांगितल्यानुसार लक्ष घालण्यात येईल. या विषयाच्या संदर्भात लवकरात लवकर निर्णय करुन सन्माननीय सदस्यांना पुन्हा हा प्रश्न सभागृहात उपस्थित करावा लागणार नाही, अशी व्यवस्था करण्यात येईल.

**उपाध्यक्ष** : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित करण्यात येत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता भरेल.

(सभागृहाची बैठक सकाळी १०.५४ ते ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----------

**(स्थगितीनंतर)**

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.संजय शिरसाट)**

**पृ.शी /मु.शी :** तोंडी उत्तरे

**उस्मानाबाद जिल्हयात अवैधरित्या गर्भलिंग निदान करण्यात येत असल्याबाबत**

**(१) * ४३७६४ डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयात मुलांच्या संख्येच्या प्रमाणांत मुलींच्या संख्येचे प्रमाण अचानक कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील सीमावर्ती असलेल्या काही तालूक्यात एका फिरती व्हॅनमध्ये गरोदर महिलांचे अवैधरित्या गर्भलिंग निदान केले जात असून मुलगी असल्यास शेजारच्या जिल्हयात जाऊन त्या गरोदर महिलेचा गर्भपात करण्यात येत असल्याची बाब गर्भलिंग निदान प्रतिबंद कायद्या अंतर्गत काम करणाऱ्या राज्य पर्यवेक्षिका डॉ. आशा मिरगे यांनी माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आणून दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या घटनांची माहिती वेळेत मिळालेली असून देखिल मागील दोन वर्षापासून प्रशासन कोविडच्या उपचारात व्यस्त असल्याने दोषीवर कारवाई होऊ शकली नाही असे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या गंभीर स्वरुपाच्या घटनेबाबत जिल्हा प्रशासनाने निष्काळजीपणा केला असल्याचे निदर्शनास आले असल्याने सदर प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषी असणाऱ्या संबंधितावर कारवाई करणेसह अशा घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबनाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे :** (१) नाही, हे खरे नाही.

नागरी नोंदणी प्रणालीच्या अहवालानुसार उस्मानाबाद जिल्हयाचे जन्माच्य

ता.प्र.क्र. ४३७६४.........

श्री.राजेश टोपे........

वेळीचे लिंग गुणोत्तर प्रमाण हे सन २०१६ मध्ये १ हजार मुलांच्या जन्मामागे ८७४ मुली इतके होते. त्यात ३९ अंकांनी वाढ होऊन सन २०१९ मध्ये १ हजार मुलांच्या जन्मामागे ९१३ मुली इतके झालेले आहे

(२) गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ सुधारित २००३ अंतर्गत पुनर्गठीत करण्यात आलेल्या राज्य पर्यवेक्षकीय मंडळाच्या सदस्या श्रीमती डॉ. आशाताई मिरगे व श्रीमती वैशाली मोटे यांनी दिनांक १५/०२/२०२२ रोजी पीसीपीएनडीटी कायदा अंमलबजावणीबाबत जिल्हा उस्मानाबाद येथे भेट दिली होती. सदर भेटीदरम्यान श्रीमती डॉ. आशाताई मिरगे यांनी उस्मानाबाद जिल्हयाच्या सीमावर्ती तालुक्यामध्ये फिरत्या व्हॅनमधून अप्रशिक्षित व्यक्तीकडून अवैधरित्या गर्भलिंग निदान करण्याच्या घटना आढळून येत आहेत असे त्यांनी ऐकीव माहितीच्या आधारे पत्रकार परिषदेमध्ये सांगितले आहे. तथापि याबाबत पुष्टी केलेली नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

सदर बाबीची सत्यता पडताळून पाहण्यासाठी पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना पोलीस यंत्रणेमार्फत सदर बाबीचा तात्काळ शोध घेण्याबाबत कळविले आहे. वैद्यकीय अधिक्षक, भूम, परांडा व कळंब यांनी संबंधीत पोलीस निरिक्षकांना पत्रान्वये सदर बाबीचा शोध घेण्यास कळविले आहे. संबंधीत पोलीस निरिक्षकांकडून प्राप्त अहवालानुसार सीमावर्ती भागात अवैधरित्या गर्भलिंगनिदान करणारी कोणतीही फिरती व्हॅन आढळून आलेले नाही. प्रकरणाचे गांभिर्य विचारात घेवून जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पीसीपीएनडीटी जिल्हा कार्यबल गटाची बैठकही आयोजित करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.भारती लव्हेकर : अध्यक्ष महोदय, उस्मानाबाद जिल्ह्यासंदर्भात हा प्रश्न आहे. या जिल्ह्यामध्ये अचानकच मुलींचा जन्म दर कमी झाल्याचे दिसून येत आहे. या जिल्ह्यामध्ये अवैधरीत्या गर्भलिंग निदान केले जात आहे, त्यावर शासनाने काय कारवाई केलेली आहे?

अध्यक्ष महोदय, हा केवळ उस्मानाबाद जिल्ह्याचा प्रश्न नाही. या राज्यामध्ये

ता.प्र.क्र. ४३७६४........

डॉ.भारती लव्हेकर.......

मुलांच्या तुलनेमध्ये मुलींची संख्या कमी होत आहे. भारतामध्ये एक हजार मुलांच्या जन्मामागे एक हजार वीस इतकी मुलींची संख्या झालेली आहे. राज्यमध्ये मात्र एक हजार मुलांच्या जन्मामागे एक नऊशे वीस इतकी मुलींची संख्या झालेली आहे. राज्यातील मुलींची संख्या कमी का होत आहे, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, पी.सी.पी.एन.डी.टी. ॲक्टची अंमलबजावणी करण्यामध्ये राज्य शासन कोठे कमी पडत आहे? सन २०२०-२१ मध्ये अवैध गर्भपात झालेल्या किती सोनोग्राफी सेंटर्सवर राज्य शासनाने कारवाई केलेली आहे, तसेच मुलींच्या संख्येमध्ये वाढ करण्यासाठी राज्य शासन काय प्रयत्न करीत आहे?

अध्यक्ष महोदय, मध्यंतरीच्या काळामध्ये आर्वीमध्ये मोठ्या प्रमाणावर गर्भपात केल्याचे निदर्शनास आले होते. तसेच त्या दवाखान्याच्या आवारामध्ये हाडे आणि कवट्या देखील सापडलेल्या आहेत. त्या दवाखान्यातील संबंधित डॉक्टर्सवर राज्य शासनाने काय कारवाई केली, याबाबतची माहिती सभागृहाला देण्यात यावी, अशी मी विनंती करते.

श्री.राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, या राज्यातील मुलींची संख्या कमी होत आहे, असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. परंतु राज्यातील मुलींची संख्या कमी होत नाही. सन २०१५-१६ पासून मुलींची आकडेवारी पाहिली तर आपल्या लक्षात येईल की, सन २०१५ मध्ये एक हजार मुलांच्या जन्मामागे मुलींची संख्या ९०७ इतकी होती. सन २०१६ मध्ये ९०४, सन २०१७ मध्ये ९१३, सन २०१८ मध्ये ९१६, सन २०१९ मध्ये ९१९ आणि सन २०२० मधील आकडेवारी अजून प्राप्त झाली नाही. परंतु काही दिवसांमध्ये ती आकडेवारी प्राप्त होईल. दरवर्षी मुलींची संख्या कमी झाली, असे नाही तर त्या संख्येमध्ये थोड्या प्रमाणात का होईना वाढ होत आहे.

अध्यक्ष महोदय, भारतातील मुलींच्या संख्येबरोबर येण्यासाठी पी.सी.पी.एन.डी.टी. ॲक्टची कडक अंमलबजावणी केली जात आहे. तसेच जिल्हा स्तरावर देखील कार्यबल गट कार्यरत आहे. कायदे खूप कडक आहेत आणि त्या कायद्यांची अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात राज्य शासन पूर्ण क्षमतेने कार्यरत आहे. स्टेट सुपरवायझरी बोर्ड देखील सातत्याने सोनोग्राफी सेंटरला भेट देत आहेत.

अध्यक्ष महोदय, राज्यामध्ये किती प्रकरणावर कारवाई करण्यात आली आहे,

ता.प्र.क्र. ४३७६४........

श्री.राजेश टोपे.......

असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, दिनांक २० जानेवारी ते २८ फेब्रुवारी, २०२२ या काळात १० हजार ३७२ सोनोग्राफी सेंटरची तपासणी केली. त्यापैकी १८१ सोनोग्राफी सेंटरमध्ये कायद्यातील तरतुदींचे व्हायलेशनस आढळून आलेले आहे. त्या सोनोग्राफी सेंटर चालकास कारणे दाखवा नोटीस दिलेल्या आहेत. तसेच ३ सोनोग्राफी सेंटर सील करण्यात आलेले आहेत. तसेच ५ हजार ९२७ एम.टी.पी. सेंटरची तपासणी करण्यात आलेली आहे. त्यामध्ये ७३ सेंटर्समध्ये एम.टी.पी. ॲक्टच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले आहे, त्यांना नोटिस देण्यात आलेल्या आहेत. तसेच १५ सेंटर्स डिसअॅप्रुव्ह देखील केलेले आहेत. अशा प्रकारची कारवाई करण्यात आलेली आहे.

अध्यक्ष महोदय, आर्वी येथील प्रश्न वेगळा आहे. तो प्रश्न या प्रश्नाशी संबंधित नाही. आर्वी प्रकरणामध्ये निश्चितपणे कारवाई करण्यात आलेली आहे. डॉ.निरज कदम आणि डॉ. मिसेस कदम या दाम्पत्यावर अटकेची कारवाई केलेली आहे. उक्त प्रकरणी माननीय न्यायालयामध्ये चार्जशीट देखील सादर करण्यात आलेली आहे. उक्त प्रकरणी अतिशय स्ट्राँग कारवाई करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणानंतर स्टेट सुपरवायझरी बोर्डाने देखील त्या ठिकाणी भेट दिलेली आहे. उक्त प्रकरणी ज्या ज्या कारवाया करणे अपेक्षित आहेत, त्या सर्व कारवाया पूर्ण करण्यात आलेल्या आहेत.

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, आजच्या यादीतील ६ क्रमांकाचा प्रश्न देखील याच विषयाशी संबंधित आहे. चंद्रपूर जिल्ह्यात मुलींचा जन्मदर वाढविण्याबाबत करावयाच्या उपाययोजना, या प्रश्नाला महिला व बालविकास मंत्री महोदया उत्तर देणार आहेत. तो प्रश्न देखील आरोग्य विभागाशी निगडित असल्यामुळे दोन्ही प्रश्नांवर एकत्रित दोन्ही मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, उत्तरामध्ये सांगितले आहे की, १ हजार मुलांच्या जन्मामागे ९१३ मुली आहेत. अवैध गर्भनिदान केंद्रासंदर्भात प्रत्येक जिल्ह्यामध्ये व तालुक्यांमध्ये समित्या आहेत, असे आपण सांगितले आहे. परंतु या सर्व समित्यांवर नियंत्रण ठेवणारी टीम राज्य शासनाकडे नाही. डॉक्टर-डॉक्टरांची लींक असते. या लींकमुळे अशा प्रकारची गडबड होते.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यामध्ये मुलींची संख्या कमी

ता.प्र.क्र. ४३७६४........

श्री.नाना पटोले.......

असणे हे बरोबर नाही. सहा क्रमांच्या प्रश्नामध्ये यावरील उपाययोजना सांगितलेल्या आहेत. परंतु अवैध गर्भ तपासणी केंद्रावर आळा घालण्यासाठी या पलीकडे जाऊन शासन काय उपाययोजना करीत आहे?

श्री.राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, राज्य स्तरावर पी.सी.पी.एन.डी.टी. कायदा आहे. या कायद्यातील तरतुदीच्या अनुषंगाने स्टेट सुपरवायझरी बोर्ड चांगल्या प्रकारे काम करीत आहे. तसेच तालुका व जिल्हा स्तरावर अनेक एनजीओ काम करीत आहेत. या स्टेट सुपरवायझरी बोर्डामध्ये सर्व स्तरातील लोकांचा समावेश करण्यात आलेला आहे. ते वेळोवेळी बैठका घेऊन सर्व सेंटर्सवर नियंत्रण ठेवतात. जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा कार्यबल गटाची स्थापना करण्यात आलेली आहे. समुच्चित प्राधिकारी यांची नियुक्ती केलेली आहे. तसेच जिल्हा सल्लागार समिती देखील आहे. तसेच जिल्हा स्तरावर पी.सी.पी.एन.डी.टी.चा कक्ष आहे. यासंदर्भात जिल्हा स्तरावर दर तीन महिन्याला बैठक घेणे बंधनकारक आहे. तसेच दर दोन महिन्याला जिल्हा सल्लागार समितीची बैठक होणे बंधनकारक आहे. राज्य स्तरावर आम्ही देखील बैठका घेत आहोत.

अध्यक्ष महोदय, माझ्या मते एक हजार मुलांमागे एक हजार मुलींची संख्या असणे आवश्यकच आहे. यामध्ये सर्वात मोठा विषय हा मानसिकतेचा आहे. आज समाजामध्ये अशी मानसिकाता आहे की, मुलगी ही खर्चाचे कारण, मुलगा हा वंशाचा दिवा. हा पुरुषप्रधान संस्कृतीचा एक भाग आहे. यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. तसेच यासंदर्भात मोठ्या प्रमाणावर प्रबोधन करण्याची आवश्यकता आहे. याबाबतचे कायदे अत्यंत कडक आहेत आणि त्या कायद्यांची अंमलबजावणी देखील अतिशय कडक केली जात आहे. अशा प्रकरणामध्ये कोणाचेही गय केली जात नाही. अवैध गर्भनिदान करणाऱ्या सोनोग्राफी सेंटरवर कठोरातील काठोर कारवाई केली जाईल, असे मी सभागृहाला आश्वासित करु इच्छितो.

श्री.राम सातपुते : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी या प्रश्नाचे उत्तर अतिशय शासकीय भाषेमध्ये दिलेले आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

ता.प्र.क्र.४३७६४.....

श्री. राम सातपुते....

गर्भलिंग निदान करुन गर्भाला मारले जाते. त्यानंतर त्या नवजात शिशुला कुत्रे, मांजरी यांनी खाल्ल्याचे प्रकार या पुरोगामी राज्यात घडले आहेत. यात बीड व इतरही अनेक ठिकाणची प्रकरणे आहेत. अशा डॉक्टरांवर कलम ३०२ अन्वये गुन्हे दाखल करुन त्यांना जामीन मिळू नये. अनेकदा न्यायालयात चौकशी अधिकारी (आय.ओ.) स्टे देत नाहीत. डॉक्टर गर्भलिंग निदान करीत असतात. त्याबाबतचा अहवाल देतात. अनेक डॉक्टर यात मॅनेज होत असतात. अशी अनेक प्रकरणे आहेत. मी मंत्री महोदयांना यानिमित्ताने प्रश्न विचारु इच्छितो की, सील करण्यात आलेले सोनोग्राफी मशिन तात्काळ जप्त केले जाणार काय ? दुसरे असे की, जे डॉक्टर अशा प्रकारे गर्भलिंग निदान करुन गर्भपात करतात त्या डॉक्टरचे वैद्यकीय परवाने कायमस्वरुपी रद्द केले जाणार काय ?

श्री. राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, या विषयाबाबत शासन अतिशय संवेदनशील आणि गंभीर आहे. यात कोणाचीही गय केली जाणार नाही. सन्माननीय सदस्यांनी परवाने रद्द करणे, सोनोग्राफी मशिन जप्त करणे, याबाबत प्रश्न विचारले आहेत. मी सांगू इच्छितो की, पीसीपीएनडीटी कायद्यामध्ये अतिशय कडक आणि चांगल्या तरतुदी आहेत. या तरतुदींचा अवलंब करुन या कायद्याची दहशत तयार केली जाईल. मी मुद्दाम दहशत हा शब्द वापरत आहे. याचे कारण असे की, यात कोणीही चुकीचे काम करता कामा नये.

श्री. हरिभाऊ बागडे : अध्यक्ष महोदय, राज्यातील मुले आणि मुलींच्या लिंग गुणोत्तरामध्ये फरक आहे. तो कमी,जास्त होत होता. काही वेळेस यात वाढ झाली होती. मी मध्यंतरी देशात मुलींची संख्या वाढल्याची बातमी वाचली होती. देशाच्या गुणोत्तरात आणि राज्याच्या गुणोत्तरात किती फरक आहे ? तसेच देशातील कोणत्या राज्यात मुलींची संख्या अधिक आहे ? व त्याचे नेमके कारण काय आहे ? हे शोधण्याची आवश्यकता आहे. त्यानुसार राज्य सरकारने उपाययोजना केली पाहिजे. दुसरे असे की, मुलीच्या लग्नाचा खर्च गरीब कुटुंबाना परवडत नाही. त्यामुळे त्यांना

ता.प्र.क्र.४३७६४.....

श्री. हरिभाऊ बागडे....

मुलगी नको असते. मुलीचा जन्म झाल्यानंतर तिच्या लग्नासाठी शासन ठोस आर्थिक मदत करणार आहे काय ? अशी व्यवस्था केली तर गरीब कुटुंबाला याचा उपयोग होईल व मुलगी जन्मली तरी हरकत नाही, असा तो विचार करेल. तिसरे असे की, नैसर्गिकदृष्ट्या एक अपत्य जन्मले व दुसऱ्या प्रयत्नात कदाचित मुलगी जन्माला येते. असे अनेक जोडपे असतात. त्यामुळे अशा जोडप्यांकरिता सार्वजनिक आरोग्य विभागाकडून कोणते प्रयत्न करण्यात येणार आहेत ? नैसर्गिकदृष्ट्या एक अपत्य जन्मल्यानंतर दुसऱ्या अपत्यासाठी काही उपाययोजना करण्यात येणार आहेत काय ? कदाचित दुसऱ्या वेळेस त्यांना मुलगी होऊ शकते. म्हणून अशा लोकांसाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडून कोणते प्रयत्न केले जाणार आहेत ?

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. हरिभाऊ बागडे यांनी विचारलेला तिसरा प्रश्न समजला नाही. पहिले अपत्य आहे. परंतु दुसऱ्या अपत्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात येणार, याचा अर्थ काय आहे ?

श्री. राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आणि माजी विधानसभा अध्यक्ष श्री. हरिभाऊ बागडे यांनी अतिशय चांगल्या सूचना केल्या आहेत. पहिल्या दोन सूचना अतिशय चांगल्या आहेत. इतर राज्यामध्ये जिथे मुलींचे प्रमाण कोणत्या कारणामुळे अधिक आहे, याचा अभ्यास करावा. असे त्यांनी सुचविले आहे. मी सांगू इच्छितो की, ही सजेशन फॉर ॲक्शन सूचना आहे. या सूचनेचा निश्चितपणे अभ्यास केला जाईल. देशातील सर्व राज्याची माहिती घेऊन जेथे उत्तम काम सुरु आहे, त्या राज्याचे अनुकरण करण्यात येईल. त्यांनी मुलगी जन्मल्यानंतर आर्थिक मदत करण्यासंदर्भातील सूचना केली आहे. देशातील काही राज्यात मुलींचा जन्म झाल्यानंतर तिच्या विवाहापर्यंतची सर्व व्यवस्था काही रुपये फिक्स्ड डिपॉझिटमध्ये ठेवून केली जाते. आपल्याही राज्यात मुलींकरिता चांगले धोरण राबविले आहे. याही सुचनेसंदर्भात सजेशन फॉर ॲक्शन असे उत्तर देता येईल.

ता.प्र.क्र.४३७६४.....

श्री. राजेश टोपे.....

या सूचनेचा निश्चितपणे विचार केला जाईल. याबाबतच्या सूचना महिला व बाल कल्याण विभागालाही देण्यात येतील.

अध्यक्ष महोदय, तिसऱ्या प्रश्नाबाबत मला थोडे आश्चर्य वाटते. सन्माननीय सदस्य श्री. हरिभाऊ बागडे यांना दोन मुली आहेत. आदरणीय श्री. शरद पवार यांनाही एक मुलगी आहे. हे सर्वजण समाधानी आहेत. त्यामुळे तिसरे अपत्य मुलगा असला पाहिजे. मुलगी नको, असे म्हणण्याचे कारण काय आहे ? एक अपत्य हे मुलगा किंवा मुलगी असेल व दुसरे अपत्य देखील मुलगा किंवा मुलगी असल्यास भेदभाव करु नये. एकच अपत्य असेल तर त्यावर त्यांनी समाधानी रहावे किंवा हम दो हमारे दो....

श्री. हरिभाऊ बागडे : अध्यक्ष महोदय, दुसऱ्या वेळेसही मुलगी होईल, असेही होऊ शकते.

श्री. राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, अशा वेळेस त्यांनी थांबले पाहिजे.

श्री. हरिभाऊ बागडे : अध्यक्ष महोदय, मोठमोठ्या दवाखान्यांमध्ये गरीब माणसे प्रयत्न करीत असतात. त्या रुग्णालयाचा खर्च त्यांना परवडत नाही. शासनाच्या वतीने काही....

श्री. राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनाही एकच मुलगी आहे.

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, लिंगभेद आणि गर्भपातचे कायदे कितीही कडक केले तरी कोणताही अधिकारी किंवा कोणतेही राज्य सरकार ही बाब मान्य करणार नाहीत. याबाबत आणखी एक सूचना करण्याची आवश्यकता आहे. जेव्हा एखाद्या स्त्रीला गर्भधारणा होते तेव्हापासून प्रत्येक महिन्याला त्या गर्भाचे सोनोग्राफी करुन मॉनिटरींग केले जाणार काय ? असे केले तरच त्या स्त्रीला रुग्णालयात प्रसुती करण्याची परवानगी मिळेल. जिल्हाधिकारी किंवा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा

ता.प्र.क्र.४३७६४.....

श्री. योगेश सागर....

आरोग्य संचालक यांना याबाबत पनवानगी द्यावी. परंतु गर्भधारणा झाल्यापासून प्रसुती होईपर्यंत प्रत्येक महिन्याला त्याचे रजिस्ट्रेशन करुन सोनेग्राफीच्या माध्यमातून मॉनिटरींग केले जाणार काय ?

श्री. राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या अनेक योजना आहेत. प्रधानमंत्री सुकन्या समृद्धी योजना आहे. तसेच मी सांगू इच्छितो की, इन्फ्रास्ट्रक्चरच्या संदर्भात जिल्हा स्तरावर स्त्री रुग्णालय असते. प्रत्येक जिल्ह्यात Mother and Child Care Hospital असते. सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले आहे त्या गोष्टी केल्या जात आहेत. त्या आणखी काळजीपूर्वक करण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्रीमती मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, मी मंत्री महोदयांना दोन प्रश्न विचारणार आहे. महाराष्ट्रात मुलींच्या जन्माचे प्रमाण कमी होत आहे. यासाठी मुलींच्या जन्माला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकार कोणती योजना लागू करणार आहे ? उत्तर प्रदेश राज्य सरकार प्रत्येक मुलीच्या लग्नाकरिता एक लाख रुपये देत असते. त्यामुळे त्या मुलीच्या आई-वडिलांना मुलीच्या लग्नाची काळजी वाटत नाही. आपल्या राज्यातही मुलींचा जन्म झाल्यानंतर त्यांच्या लग्नासाठी आणि मुलीच्या जन्माकरिता प्रोत्साहन मिळण्याकरिता अशी योजना लागू करण्यात येणार आहे काय ? याबाबतचा प्रस्ताव माननीय वित्तमंत्री श्री. अजित पवार यांच्याकडे पाठविला जाणार आहे काय ? केंद्र सरकारने सुकन्या समृद्धी योजना सुरु केली आहे. या योजनेच्या धर्तीवर मुलींच्या जन्माला प्रोत्साहन मिळावे, याकरिता राज्य सरकार स्वतंत्र योजना लागू करणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, ही सूचना अतिशय चांगली आहे. सजेशन फॉर ॲक्शन.

-------

असुधारित प्रत

## मौ.पौड (ता.मुळशी, जि.पुणे) येथील ग्रामीण रुग्णालयाचे दर्जोन्नती करणेबाबत

(२) * ४१२०४ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) : सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.पौड (ता.मुळशी, जि.पुणे) येथील ग्रामीण रुग्णालयाचे ३० खाटांवरुन ५० खाटांच्या रुग्णालयात दर्जोन्नती करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीं दिनांक २५ जानेवारी, २०२१ रोजी पासून वारंवार करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील वाढते नागरीकीकरण लक्षात घेता याठिकाणी सुसज्ज रुग्णालयाची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यावर शासनाने निर्णय घेवून व निधीची तरतूद करुन येथील ३० खाटांवरुन ५० खाटांच्या रुग्णालयात दर्जोन्नती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे : (१), (२) व (३) मौजे.पौड (ता.मुळशी,जि.पुणे) येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित असून त्याद्वारे आरोग्य सेवा दिली जाते. सदरील ग्रामीण रुग्णालयाच्या श्रेणीवर्धनाची आवश्यकता निकषाप्रमाणे तपासून उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४१२०४ ......

श्री. संग्राम थोपटे : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री. राजेश टोपे यांनी कोरोना काळात आणि आताही राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाची जबाबदारी अतिशय सक्षमपणे सांभाळली आहे. त्यांनी अतिशय चांगले काम केले आहे. या प्रश्नाचे मंत्री महोदय सकारात्मक उत्तर देतील, अशी मला अपेक्षा होती. या प्रश्नाच्या उत्तरामध्ये सांगण्यात आले की, श्रेणीवर्धनाची आवश्यकता निकषाप्रमाणे तपासून उचित कार्यवाही केली जाईल. हे अतिशय छोटे उत्तर आहे. हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. मी या विषयाबाबत मंत्री महोदयांकडे अनेकदा निवेदने दिली आहेत. तसेच याविषयाबाबत बैठक आयोजित करण्याची विनंती केली आहे. माझ्या मतदारसंघातील भोर, वेल्ला आणि मुळशीमध्ये जेथे ५० खाटांचे रुग्णालय असेल तेथे १०० खाटांचे रुग्णालय आणि जिथे ३० खाटांचे रुग्णालय असेल तेथे ५० खाटांचे रुग्णालय करुन त्या रुग्णालयाची तात्काळ श्रेणीवाढ जाहीर केली जाणार काय ?

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.४१२०४.....

श्री.राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे तात्काळ घोषणा करण्यास मलाही आवडेल. परंतु श्रेणीवर्धनासाठी काही निकष निश्चित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार तालुक्याच्या मुख्यालयी ग्रामीण रुग्णालय असावे. तसेच तालुक्याच्या मुख्यालयाची लोकसंख्या ५० हजारांपेक्षा जास्त असेल व प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या ५ पेक्षा जास्त असल्यास त्या ठिकाणी दुसरे ग्रामीण रुग्णालय मंजूर केले जाते किंवा अगोदरच्या रुग्णालयाचे श्रेणीवर्धन केले जाते. तसेच Bed occupancy rate पाहिला जातो. एखाद्या रुग्णालयामध्ये ३० खाटा असतील व तेथे दाखल असणाऱ्या रुग्णांची संख्या सातत्याने ४०-५० एवढी असेल तर अशा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन नक्कीच केले पाहिजे. रुग्णालयामध्ये दररोज येणाऱ्या बाहय रुग्णांची आकडेवारी देखील पाहिली जाते. या सर्व बाबींचा विचार करुन श्रेणीवर्धनाबाबत निर्णय घेतला जातो.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संग्राम थोपटे यांनी केलेल्या विनंतीनुसार उद्या मी त्यांच्या मतदारसंघातील आरोग्य विषयक बाबींच्या संदर्भात बैठक घेणार आहे. त्यामध्ये भोर, वेल्हे, मुळशी तालुक्यातील पौड येथील रुग्णालयांच्या श्रेणीवर्धनाच्या मुद्दयावर चर्चा करण्यात येईल. उपरोक्त नमूद पहिल्या दोन ठिकाणचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे. मुळशी येथील प्रस्ताव उप संचालकांकडे आहे. मी आताच त्यांच्याशी चर्चा केली आहे व त्यांना सांगितले आहे की, लवकरात लवकर आमच्याकडे सदर प्रस्ताव पाठवावा. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करता येईल. सन्माननीय सदस्यांचा मतदारसंघ डोंगरी व दुष्काळी असल्यामुळे विशेष बाब करणे आवश्यक असल्यास त्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांची मंजुरी घ्यावी लागेल. सन्माननीय सदस्य श्री.संग्राम थोपटे हे ज्येष्ठ सदस्य आहेत. त्यांनी केलेल्या मागणीचा आपण निश्चितपणे विचार करु.

श्री.संग्राम थोपटे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी अतिशय सकारात्मक उत्तर दिले आहे त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

ता.प्र.क्र.४१२०४.....

श्री.संग्राम थोपटे.....

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी श्रेणीवाढीसाठीचे काही निकष आता सांगितले. त्यामध्ये दररोज रुग्णालयात येणाऱ्या बाहयरुग्णांची आकडेवारी, Bed occupancy rate, इत्यादी बाबींचा समावेश आहे. परंतु सदर रुग्णालयांमधील सुविधा अपूर्ण असल्यामुळे तेथे रुग्ण उपचारांसाठी येत नसतील व तरीही आपण या निकषांचा विचार करुनच श्रेणीवाढ करणार असाल तर ते चुकीचे होईल. कोरोना काळात देखील या रुग्णालयांमधील खाटांची संख्या वाढविण्याची आम्ही मागणी केली होती. कोरोना काळात ३० खाटांच्या रुग्णालयांमध्ये आम्ही ३५ खाटा केल्या, ऑक्सिजन प्लांट सुरु केला. शासनाचे श्रेणीवाढीसाठी काही निकष असले तरीही खास बाब म्हणून आपण या प्रकरणांना मान्यता देणार का हा माझा प्रश्न आहे.

श्री.राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, उद्या यासंदर्भात बैठक आयोजित केली जाणार आहे. सदर बैठकीमध्ये निश्चितपणे सकारात्मक निर्णय घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्रीमती नमिता मुंदडा : अध्यक्ष महोदय, प्रत्येक अधिवेशनामध्ये पुरवणी मागण्या असोत वा कोणतेही आयुध असो मी हा मुद्दा उपस्थित करीत आहे की, केज तालुक्यातील अडस, विडा आणि बन्सरोला या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. मंत्री महोदयांनी आता श्रेणीवर्धनासाठी आवश्यक असलेल्या लोकसंख्या आणि Bed occupancy rate च्या निकषांबाबत उल्लेख केला. मी त्यांना सांगू इच्छिते की, मी नमूद केलेले प्राथमिक आरोग्य केंद्रे गेल्या दोन-तीन वर्षांपासून आपण सांगितलेल्या निकषांमध्ये बसत आहेत. त्यामुळे या रुग्णालयांचे ग्रामीण रुग्णालयांमध्ये श्रेणीवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. मी वारंवार याबाबत पाठपुरावा करीत आहे. तरी याबाबत कधीपर्यंत कार्यवाही होईल हे मंत्री महोदयांनी सांगावे.

ता.प्र.क्र.४१२०४.....

श्री.राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, कै.विमलताई मुंदडा यांनी केज तालुका आणि परिसरामध्ये आरोग्याच्या अत्यंत चांगल्या सुविधा निर्माण केलेल्या आहेत, हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांच्या मतदारसंघातील प्राथमिक आरोग्य केंद्रे श्रेणीवर्धनाचे निकष पूर्ण करीत असतील तर तसे करण्यात काहीही अडचण नाही. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रांचे श्रेणीवर्धन करण्याबाबत सकारात्मक कार्यवाही केली जाईल.

श्री.सुरेश वरपुडकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संग्राम थोपटे यांनी ग्रामीण रुग्णालयांच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित केला आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रातील ज्या-ज्या रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करण्याबाबतचे प्रस्ताव सरकारकडे आले आहेत त्यांना प्रशासकीय मान्यता देऊन सरकार त्यांच्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करणार आहे का ? विशेषत: परभणी जिल्हयातील मानवत येथील प्रस्तावाबाबत मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

श्री.राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, निकषात बसत असल्यास १०० टक्के श्रेणीवर्धन करण्यात येईल.

श्री.अभिमन्यू पवार : अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील औसा शहरामधून दोन राष्ट्रीय महामार्ग जातात. तेथे ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याबाबतचा प्रस्ताव उप संचालकांमार्फत मंत्री महोदयांकडे सदर करण्यात आलेला आहे. तसेच औसा शहराचा कॅचमेंट सुमारे १०० गावांचा असतानाही तेथे केवळ ३० खाटांचे रुग्णालय आहे. या ग्रामीण रुग्णालयाचे उप जिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबत मी मंत्री महोदयांना विनंती केलेली आहे. त्यांनी ते तत्त्वत: मान्य देखील केले आहे. परंतु याला अंतिम स्वरुप कधी मिळेल याबाबत मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

श्री.राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अभिमन्यू पवार यांनी औसा शहरातील रुग्णालयाची श्रेणीवाढ करण्याबाबत आणि तेथे ट्रॉमा केअर सेंटर

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.४१२०४.....

श्री.राजेश टोपे.....

उभारण्याबाबत मुद्दा मांडला. त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, आम्ही त्यांच्याकडून याबाबतचा प्रस्ताव मागितलेला आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी देखील यासंदर्भात शिफारस केलेली आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यासाठी निश्चितपणे सकारात्मक प्रयत्न करण्यात येतील.

श्रीमती सुलभा खोडके : अध्यक्ष महोदय, अमरावती जिल्हयातील ग्रामीण रुग्णालयांच्या संदर्भातील ९ तालुक्यांचे प्रस्ताव मंत्री महोदयांकडे पाठविण्यात आलेले आहेत. सन २०११ च्या जनगणनेनुसार २०१७ मध्ये हे प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत. चार वर्षे उलटूनही या रुग्णालयांच्या श्रेणीवाढीसाठी मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे मंत्री महोदयांना माझा प्रश्न आहे की, किती दिवसांमध्ये सदर रुग्णालयांच्या श्रेणीवर्धनास मान्यता देण्यात येईल ?

श्री.राजेश टोपे : अध्यक्ष महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, मी यासंदर्भात संपूर्ण आढावा घेऊन जे-जे प्रस्ताव निकषात बसत असतील त्यांना मान्यता देण्यात येईल. कारण आरोग्य सेवेमध्ये कुठल्याही प्रकारचे पक्षीय मतभेद आडवे आणले जाणार नाहीत. निकषात बसत असल्यास निश्चितपणे मदत केली जाईल.

---------

असुधारित प्रत

## गंगाखेड, पालम व पुर्णा (जि. परभणी) तालुक्यातील रस्ते व पुलांची अतिवृष्टीमुळे झालेली दुरवस्था

**(३) * ३९४४६ श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगाखेड, पालम व पुर्णा (जि. परभणी) तालुक्यातील बहुतांश रस्ते व पुल अतिवृष्टी / पुरहाणीमुळे वाहून गेल्याने दळणवळणाचा प्रश्न गंभीर झाला असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या रस्ते व पुल दुरुस्तीकरीता शासनाने तात्काळ निधी मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.ग्रामविकास मंत्री, तसेच सचिव, रस्ते यांना दिनांक १५ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीनुसार नुकसानग्रस्त झालेले रस्ते व पुल दुरुस्तीकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) असल्यास, येथील दळणवळणाचा समस्या दूर करण्यासह रस्ते व पुल दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार, श्री. हसन मुश्रीफ यांच्याकरिता :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम योजने अंतर्गत सन २०१९-२० आणि २०२०-२१ या अर्थिक वर्षामध्ये जिल्हा परिषद परभणी करीता अनुक्रमे रु.११०७.०८ व रु.१६८३.५५ लक्ष एवढया निधीची कामे मंजूर करण्यात आली आहेत. तसेच परभणी जिल्ह्यातील पुर्णा, पालम व गंगाखेड या तालुक्यातील रस्त्यांसाठी जिल्हा परिषदेकडे ग्रामीण रस्ते सुधारणा (SRF ३०५४-१५३९-३१) अंतर्गत रु. ६०४ लक्ष निधी मंजूर असून कामे प्रगतीपथावर आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

ता.प्र.क्र.३९४४६.....

श्री.रत्नाकर गुट्टे : अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत गंगापूर मतदारसंघातील पालम, पुर्णा व गंगाखेड तालुक्यात सन २०१५-१६ ते २०१९-२० दरम्यान ११९ कोटींची ५६ कामे मंजूर होती. त्यापैकी १३ कामे पूर्ण झाली असून आतापर्यंत सर्व चालू व पूर्ण कामांवर ५८ कोटी रुपये खर्च झाले आहेत. तसेच ४० कोटी रुपयांची देयके निधीअभावी प्रलंबित आहेत. सदर निधी कधी देण्यात येईल, हा माझा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, अतिवृष्टीने दुरावस्था झालेल्या रस्ते व पुलांच्या दुरुस्तीकरिता कधी निधी देण्यात येणार आहे ? बिले न मिळाल्यामुळे कंत्राटदाराने उखळून ठेवलेल्या रस्ते व पुलांची कामे अर्धवट सोडली आहेत. ती कामे पूर्णत्वास नेण्यासाठी शासन काय उपाययोजना करील व त्यासाठी कधीपर्यंत निधी उपलब्ध करुन देण्यात येईल ?

अध्यक्ष महोदय, अतिवृष्टी झाल्यानंतर झालेल्या नुकसानीचे फोटोज् काढण्यात आले. त्यानंतर विभागाने त्याचे अंदाजपत्रक तयार केले. माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय मंत्री, माननीय राज्यमंत्री, सचिव, मुख्य अभियंता अशा सर्वांना हे फोटोज् पाठविले आहेत. मी ही माहिती आपल्याकडे देखील देतो. माझी विनंती आहे की, माझ्या प्रश्नांच्या अनुषंगाने मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री.अब्दुल सत्तार : अध्यक्ष महोदय, परभणी जिल्हयातील गंगाखेड, पालम व पूर्णा या तालुक्यांमध्ये अतिवृष्टीमुळे व पुरहाणीमुळे बहुतांश रस्ते व पुल वाहून जाऊन दळणवळणाचा प्रश्न गंभीर झाल्याबाबतचा मुद्दा या ठिकाणी मांडला आहे. अध्यक्ष महोदय, अतिवृष्टी होऊन रस्ते खराब झाले आहेत यामध्ये शंका नाही.

अध्यक्ष महोदय, आपण जिल्हा परिषदेला रस्ते दुरुस्तीसाठी ११ कोटी ७ लक्ष रुपये दिले आहेत.

ता.प्र.क्र.३९४४६.....

श्री.अब्दुल सत्तार.....

तसेच दुसऱ्या एका प्रस्तावाच्या अनुषंगाने १६ कोटी ८३ लक्ष रुपये निधी दिला आहे... (अडथळा...) माझ्याकडील माहिती मी देत आहे. सन्माननीय सदस्यांच्या मूळ प्रश्नाच्या अनुषंगाने मी उत्तर देत आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३९४४६...

श्री. अब्दुल सत्तार...

सन्माननीय सदस्यांचा मूळ प्रश्न मी आपल्याला पुन्हा वाचून दाखवितो. आपले समाधान झाल्यानंतर आपण पुढे बोलावे. प्रश्न असा आहे की,

"गंगाखेड, पालम व पुर्णा (जि. परभणी) तालुक्यातील बहुतांश रस्ते व पुल अतिवृष्टी / पुरहाणीमुळे वाहून गेल्याने" असा त्यांचा मूळ प्रश्न आहे. त्या प्रश्नात त्यांनी मुख्यमंत्री सडक योजनेचा उल्लेख केला आहे. याबाबत मी सनमननीय सदस्यांना माहिती देईल. परंतु सन्माननीय सदस्य श्री. हरीष पिंपळे यांना मी सांगू इच्छितो की, आपण त्यांचा मूळ प्रश्न पाहिला नाही.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. संजय शिरसाट) :** मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, त्यांच्याशी वाद घालत बसण्यापेक्षा आपण कृपया उत्तर द्यावे.

श्री. अब्दुल सत्तार : अध्यक्ष महोदय, मी वाद घालत नाही. तेच वाद घालत आहेत. मी सांगू इच्छितो की, परभणी जिल्हा परिषदेला सन २०१९-२० मध्ये ११ कोटी रुपये दिले आहेत तर २०२०-२१ या वित्तीय वर्षात १६ कोटी ८३ लाख रुपये दिले आहेत. त्यानंतर सीआरएफमधून ३०५४ च्या माध्यमातून ६ कोटी ४ लाख रुपये दिले आहेत. त्यामुळे ही सर्व कामे प्रगतीपथावर आहेत. त्या कामांना सुरूवात झालेली आहे. आपल्याला माहिती आहे की, गेल्या वर्षी कोरोनाच्या संकटामुळे आमच्या विभागाची मूळ मागणी ३१८ कोटींची होती आणि पुरवणी मागणी २१८ कोटींची मिळून एकूण ५२८ कोटी रुपयांची मागणी केली होती. त्यापैकी आतापर्यंत ३८८ कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. आता १३० कोटी रुपये मिळावेत म्हणून आम्ही वित्तमंत्री महोदयांना विनंती केली आहे. त्यांनी तो निधी वितरित केल्यानंतर तात्काळ ही कामे प्राधान्याने केली जातील.

श्री. शेखर निकम : अध्यक्ष महोदय, रत्नागिरी जिल्ह्यात देखील अतिवृष्टीमुळे बरेचसे साकव आणि रस्ते वाहून गेले आहेत.

ता.प्र.क्र.३९४४६...

श्री. रत्नागर गुट्टे : अध्यक्ष महोदय, माझ्या मतदार संघामध्ये फक्त ६ कोटी रुपये दिले आहेत. याबाबत मी आता आपल्याकडे पुरावे दिले आहेत आणि ते पुरावे बघितल्यानंतर ४० कोटी रुपयांचा निधी लागणार आहे आणि पूर्वीचे ४० कोटी रुपये देणे शिल्लक आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेने दिलेल्या ६ कोटी रुपयांमधून किती कामे होणार आहेत, या ६ कोटी रुपयांमधून कोणती कामे झाली त्याची आपण स्वत: चौकशी करावी, तसे केले तर आपल्याला समजेल. कारण त्या ठिकाणी कोणतीही कामे झालेली नाहीत, हे मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो.

श्री. अब्दुल सत्तार : अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्यांना तेथील कामे सुरू आहेत, प्रगतीपथावर आहेत असे उत्तर दिले आहे आणि तसा अहवाल आमच्याकडे आलेला आहे. या उत्तरामध्ये कदाचित काही चूक असेल तर आपण त्याची चौकशी करु.

**तालिका सभाध्यक्ष :** मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी आपल्याकडे जी कागदपत्रे सादर केली आहेत त्याच कागदपत्रांच्या प्रती माझ्याकडेही सादर केल्या आहेत. त्यामुळे आपल्याला विनंती आहे की, त्यांनी सर्व पुरावे दिलेले आहेत. म्हणून त्या विषयासंदर्भात एक बैठक आपल्या दालनात बोलवावी आणि त्यासंबंधी समाधानकारक तोडगा काढावा.

श्री. अब्दुल सत्तार : अध्यक्ष महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

श्री. शेखर निकम : अध्यक्ष महोदय, रत्नागिरी जिल्ह्यात देखील अतिवृष्टीमुळे बरेचसे साकव आणि रस्ते वाहून गेले आहेत. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, रत्नागिरी जिल्ह्यासाठी खास बाब म्हणून साकव कार्यक्रम आपण राबविणार आहात काय, तसा उपक्रम आपण राबवावा. लोकांची दळणवळणाची खूप मोठी अडचण निर्माण झाली आहे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३९४४६...

श्री. अब्दुल सत्तार : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, हा प्रश्न परभणी, गंगाखेड, पालम आणि पूर्णा या तालुक्यापुरता प्रश्न आहे. आपण त्याच्या बाहेर जाऊन....

अध्यक्ष महोदय, याबाबत आपणच निर्णय द्यावा.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** ठीक आहे. शासन याबाबत विचार करील.

श्री. हरीष पिंपळे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रत्नाकर गुट्टे यांनी असा प्रश्न विचारला आहे की, परभणी, गंगाखेड, पालम आणि पूर्णा या त्यांच्या मतदार संघातील तालुक्यामधील जे रस्ते अतिवृष्टीमुळे खराब झाले, त्यांच्यासाठी आपण दिलेला निधी अपुरा आहे. ज्यावेळी या मतदार संघामध्ये प्रथम दर्शनी अतिवृष्टीमुळे किती रस्त्यांचे नुकसान झाले व त्यासाठी आपण किती रकमेचा निधी वितरित केला आहे... आपण ६ कोटी रुपये दिले असले तरी ज्या जिल्ह्यामधील ५० कोटी रुपयांपर्यंत रस्ते खराब झालेले असताना तो निधी शासनाने अद्याप वितरित केलेला नाही. आता बजेट सत्र सुरू आहे. तरी देखील त्यांना तो निधी अद्याप मिळालेला नाही. म्हणून आपण तो निधी कधी देणार आहात आणि तेथील उर्वरित रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी जो निधी लागेल त्याची तरतूद आपण कधी करणार आहात तसेच सन्माननीय सदस्यांनी विचारलेले रस्ते या वर्षी दुरुस्तीसाठी घेणार आहात काय, हा माझा प्रश्न आहे.

श्री. अब्दुल सत्तार : अध्यक्ष महोदय, जो मूळ निधी आपण त्यांच्या मतदार संघासाठी दिला आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेने त्यांच्या ज्या तालुक्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झाले असेल त्यासाठी २०१९-२० आणि २०२०-२१ मध्ये अनुक्रमे ११ कोटी व १६ कोटी रुपये दिले आहेत. जिल्हा परिषदेने तो निधी कसा वापरायचा तो जिल्हा परिषदेचा अधिकार आहे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३९४४६...

श्री. हरीष पिंपळे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी परभणी जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे रस्ते खराब झाल्याबाबत जो प्रश्न विचारला आहे त्यात असे म्हटले आहे की, "गंगाखेड, पालम व पुर्णा (जि. परभणी) तालुक्यातील बहुतांश रस्ते व पुल अतिवृष्टी / पुरहाणीमुळे वाहून गेल्याने" असे म्हटले आहे. त्यामुळे परभणी जिल्ह्यात किती रस्त्यांची नाशधूस झाली व त्या खर्चाचा आकडा आपल्याकडे आला तो किती कोटींचा आहे आणि त्यानुसार आपण त्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी किती तरतूद केली तसेच राहिलेल्या रस्त्यांच्या बाबतीत आपण किती रकमेची तरतूद केली आहे काय आणि केली नसेल तर आपण ती करणार आहात काय, असा माझा आपल्याला साधा व सोपा प्रश्न आहे.

श्री. अब्दुल सत्तार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना तपासून घेतल्या जातील आणि त्यानुसार....

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

---------

## नागपूर येथील शासकीय मेडिकल रुग्णालयाच्या परिसरात कॅन्सर रुग्णालयासाठी प्राप्त झालेला निधी राखून ठेवण्याबाबत

**(४) * ४३५९७ श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय मेडिकल रुग्णालयाच्या परिसरात कॅन्सर रुग्णालय उभारण्यासाठी मंजुरी तत्कालीन शासनाने दिली असून त्याकरिता यंत्र खरेदीसाठी २३.२० कोटी रुपये मंजूर केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयाच्या बांधकामासाठी रुपये १०० कोटी इतका निधी अपेक्षित असून शासनाने अर्थसंकल्पात तरतूदच केली नसल्याने हा निधी प्राप्त होऊ शकला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कॅन्सर रुग्णालयात यंत्रसामुग्री खरेदीकरिता सामाजिक न्याय विभागाने २० कोटी रुपये व आदिवासी विभागाकडून ३ कोटी असे २३ कोटी रूपये वैद्यकीय विभागाला दिले होते तथापि रुग्णालयाचे बांधकाम झाले नसल्याने यंत्रसामग्रीसाठी मिळालेला २३ कोटींचा निधी हाफकिन महामंडळाने परत पाठवण्याचे प्रस्तावित केले आहे,हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कॅन्सर विभागासाठी आलेल्या २३ कोटी रुपयातून यंत्र खरेदी न करता हा निधी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रादेशिक कर्करोग रुग्णालयाला देण्याचे निर्देश विभागीय आयुक्त यांनी दिले असल्याचे निदर्शनास आले आहे तथापि कॅन्सर हॉस्पिटल इमारतीच्या बांधकामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन मार्चपासून प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात होण्याची शक्यता असतानाही हा निधी इतर ठिकाणी वळविण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, या रुग्णालयाच्या इमारतीच्या बांधकामास निधीची आवश्यकता असल्याने सदर निधी परत न पाठवता किंवा इतर ठिकाणी न वळविता जिल्हाधिकारी

ता.प्र.क्र.३४३५९७...

श्री. अमित देशमुख...

किंवा हाफकिन महामंडळाकडे राखून ठेवण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून शासनास प्राप्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) व (५) हे खरे नाही.
(६) प्रश्न उदभवत नाही.

श्री. समीर मेघे : अध्यक्ष महोदय, मार्च २०१८ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी २३ कोटी २० लाख रुपये नागपूर येथील शासकीय रुग्णालयासाठी लिनिअर एक्सीलिटरसाठी उपलब्ध करुन दिले होते. आज त्या घटनेला ४ वर्षे झाली आहेत. माझा प्रश्न असा आहे की, आपण ती उपकरणे विकत घेतली आहेत काय आणि नसतील तर त्याची कारणे कोणती तसेच अद्याप विकत घेतली नसतील तर ती केव्हा विकत घेतली जातील?

श्री. अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, नागपूर जीएमसीमध्ये कर्करोग विभागाचे श्रेणीवर्धन करुन तेथे रेडिओथेरपीचे एक रुग्णालय उभे करायचे आहे. त्यासाठी २०१८ मध्ये यंत्रसामग्रीसाठी निधी मंजूर झाला आहे. परंतु त्यावर अद्याप कार्यवाही झाली नाही हे खरे आहे. परंतु त्याची कारणे अशी आहेत की, जर रेडिओथेरपी सेंटर किंवा रेडिओथेरपी रुग्णालय आपल्याला उभारायचे असेल तर पहिल्यांदा आपल्याला यंत्रसामग्री निश्चित करावी लागते. ती निश्चित झाल्यानंतर बांधकामाचा आराखडा तयार केला जातो आणि तो आराखडा तयार झाल्यानंतर

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३४३५९७...

श्री. अमित देशमुख...

जेव्हा आपल्याला ती यंत्रसामग्री बसवायची असते त्यावेळी ती बसविली जाते. या प्रकरणात असे घडले आहे की, आपण २०१८ मध्ये आपण मंजुरी दिली आणि त्यानंतर २०१९ मध्ये बांधकाम आराखड्याला मंजुरी मिळाली आणि २०२० साली कोरोनाची महामारी आपल्यावर ओढावली.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.४३५१७.....

श्री. अमित देशमुख....

सन २०२० ते सन २०२२ या दरम्यान राज्य शासनाने बांधकाम या विषयाला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे ही कामे त्या काळात स्थगित करण्यात आली. हे काम नागपूरच्या एनआयटी कडे आहे. आता या कामाची स्थिती अशी आहे की, एनआयटीने त्या बांधकामाच्या निविदा प्रसिद्ध केल्या आणि त्याची टेक्निकल इलिजिबीटी पाहण्यात आली. तसेच त्यांनी फायनान्शियल बिड ओपन केले. आज त्यांनी एल १ कंत्राटदार निश्चित केलेला आहे. येणाऱ्या काही कालावधीमध्ये म्हणजे १ ते २ महिन्यात ते बांधकाम सुरु होईल. हाफकिन इन्स्टिटयुटला आपण यंत्र सामुग्रीसाठी २३ कोटी रुपयांचा निधी आला आहे. त्यासाठी तीन ते चार वेळा निविदा काढण्यात आल्या. साधारणत: हाफकिन इन्स्टिटयुटला विचारणा केल्यानंतर असे समजले की, ज्या कंपन्या या निविदा भरतात त्यांनी असे सांगितले की, बांधकाम झालेले नाही त्यामुळे आम्हाला तिथे जाऊन त्या साईटची पाहणी करता येत नाही किंवा आम्हाला कोट करता येत नाही. अशी एक तांत्रिक अडचण त्यांनी मांडली आहे. सन्माननीय सदस्यांना आणि सभागृहाला मी हे सांगू इच्छितो की,आपण तिथे जे रेडीओथेरेपी सेंटर उभे करीत आहोते ते अतिशय महत्त्वाचे आहे. ते सेंटर आता सुरु होण्याच्या स्थितीमध्ये आलेले आहे. एकदा हे काम सुरु झाल्यानंतर यंत्रसामुग्रीच्या निविदा सुद्धा पुन्हा प्रसिद्ध करुन त्या तातडीने मंजूर करण्याची कार्यवाही आपण करु.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, विदर्भाचा सर्व भाग हा विशेषत: तंबाखुच्या सेवनामुळे दुर्दैवाने कॅन्सर कॅपिटलसारखा झाला आहे. महाराष्ट्रातील सरासरी बघितली आणि कोल्हापूर जिल्हा सोडला तर तिथे कॅन्सर पेशंट मोठया प्रमाणात आहेत. त्यावेळी आपण याचा विचार करुन तिथे एक श्रेणीवर्धन करुन पूर्ण विभाग उभा करण्याचा प्रयत्न केला आहे. पहिल्यांदा हे २३ कोटी रुपये ताबडतोब देण्यात आले कारण आता आपल्याकडे रेडीओथेरपीचे सेंटर आहे. पण तिथे आपली जुनी कोबाल्ट मशीन जात आहे. त्याचा सोर्स सारखा संपते त्यामुळे ती मशीन चार-

ता.प्र.क्र.४३५१७.....

श्री. देवेंद्र फडणवीस...

चार महिने बंद असते. अशा परिस्थितीमध्ये विदर्भातील गरीब पेशंटला कोणत्याही प्रकारची रेडीओथेरपी मिळत नाही. त्यामुळे तो अडचणीत येतो. त्या मागचा उद्देश असा होता की, हे २३ कोटी रुपये देऊन आता असणारी एक्झिसटींग मशीन रिप्लेस करायची आणि नवीन बांधकाम झाल्यानंतर हा सर्व युनिट तिथे शिफ्ट करायचा. मी स्वत: कॅन्सर रुग्णालयाशी जोडलेलो असल्यामुळे मला त्याची पूर्ण कल्पना आहे. त्या ठिकाणी आम्ही ६ ते८ लिनिअर एक्सीलेटर आम्ही चालवतो. त्यामुळे त्याचे बांधकाम कसे केले पाहिजे याची मला कल्पना आहे आणि हे सर्व शक्य होते म्हणूनच अतिशय घाईने आपण ते पैसे दिले व सांगितले की, आता आपण ही मशीन बसवा आणि दरम्यानच्या काळात आपण नवीन साईट तयार करु आणि पूर्ण १०० खाटांची व्यवस्था उभी करु. दुर्दैवाने आता हाफकिन इन्स्टिटयुटने सांगितले ते चुकीचे आहे. याचे कारण ती साईट ठरलेले आहे. आता रेडीओथेरेपीची जी जागा आहे त्याच ठिकाणी कोबाल्ट मशीन बदलून तिथे लिनिअर एक्सीलेटर लावायचे,असा तो निर्णय होता.त्यामुळे आपण बांधकामापूर्वी ते पैसे दिले होते म्हणून माझी विनंती आहे की, हे समर्पित केलेले पैसे तात्काळ द्यावे. बांधकामासाठी २ वर्ष लागणार आहेत. आताही अक्षरश: डोळयात पाणी येते कारण ते लोक दोन ते तीन दिवस बाहेर फुटपाथवर उभे असतात. कारण तेथील सोर्स संपलेले असतात. आता कोबाल्ट कोणी वापरत नाही त्यामुळे सोर्स मिळत नाहीत. त्यामुळे हाफकिन इन्स्टिटयुट किंवा इतर कोणच्याही मार्फत करा परंतु तात्काळ लिनिअर एक्सिलेटर बदलवले पाहिजे. आता आपण सांगितले की, कोरोनाच्या काळात बांधकामाला स्थगिती होती ते आपण मान्य करु. परंतु कोरोनाच्या काळात बांधकाम बऱ्याच ठिकाणी सुरु होते. मात्र आताच्या बजेटमध्येही त्यासाठी एकही नवीन पैसा दिलेला नाही.आपण सन २०१९ सालीच आराखडे मंजूर केले आहेत. त्यानंतर मंत्री महोदय मला आठवते की, डिसेंबर महिन्याच्या अधिवेशनात आपण नवीन मंत्री झाले होते तेव्हा आश्वासन दिले की, दोन वर्षामध्ये पूर्ण १०० खाटांची ही संकल्पना पूर्ण करु. त्याच वेळेस आपण

ता.प्र.क्र.४३५१७.....

श्री. देवेंद्र फडणवीस...

सांगितले की, प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे त्यामुळे आता बांधकामच सुरु करायचे आहे. या ही वर्षीच्या बजेटमध्ये यासाठी एक ही नवा पैसा दिलेला नाही. २३ कोटी रुपये समर्पित केले आहेत आणि बांधकामासाठी एक ही नवीन पैसा नाही. त्यामुळे यातील काहीच काम पूर्ण होऊ शकत नाही. त्यासाठी माझी आपल्याला विनंती आहे की, यामध्ये जी ॲडजस्टमेंट करायची आहे ती करुन लिनिअर एक्सीलेटरचे २३ कोटी रुपये तात्काळ देऊन आतची कोबोल्ट युनिट बदलले पाहिजे. दुसरे असे की, आता पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून किंवा इतर कोणता निधी वळवता येईल काय ते बघून तशा प्रकारचा प्रयत्ना करावा. या १०० खाटांच्या रुग्णालयाचे बांधकाम आपण तात्काळ सुरु करण्यासाठी काहीतरी निधी एनआयटीला द्यावा किंवा त्याचा पर्याय म्हणून आपण एनआयटीला स्वनिधीतून बांधकाम करण्यासा सांगावे आणि मग सरकार तेवढे पैसे रिप्लेस करुन देईल. असे काहीतरी केले तर पुढच्या १.५ ते २ वर्षात आपण कॅन्सर रुग्णांना दिलासा देऊ शकू. या संदर्भात आपण निर्णय घेणार काय ?

श्री. अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, हे खरे आहे की, ते राज्याचे माननीय मुख्यमंत्री असताना त्या काळात हा निर्णय झालेला आहे आणि त्यांनी याची विस्तृत माहिती मला आणि सभागृहाला दिलेली आहे. मी आपल्याला आणि सभागृहाला सांगू इच्छितो की, कोबाल्ट युनिटच्या ठिकाणी यंत्र सामुग्री बसविण्याचा निर्णय त्या काळात झाला असेल आणि तशा सूचना दिल्या असतील तर निश्चितच त्याची अधिक माहिती घेऊन तातडीने त्यांनी हाफकिन इन्स्टिटयुटला जो निधी समर्पित केला आहे तो निधी वर्ग करुन जुन्या जागेत यंत्र सामुग्री बसविण्याच्या सूचना देऊ. रुग्णालय उभे करण्यासाठी जो १०० कोटी रुपयांचा निधी लागणार आहेत. यासाठी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी काही पर्याय सुचविलेले आहेत. शासनाने अर्थसंकल्पामध्ये राज्यातील विविध बांधकामासाठी ५५० कोटी रुपये हे नियतव्यय

ता.प्र.क्र.४३५१७.....

श्री. अमित देशमुख...

दिलेले आहेत. त्यामुळे त्या निधीतून सुद्धा या बांधकामासाठी पैसे देता येतील. बांधकामासाठी कोणतीही अडचण येणार नाही. एवढेच नव्हे तर केंद्र शासनाने कर्करोगासाठी हाल्फ ॲन्ड स्मोक रुग्णालयाची योजना सुरु केलेली आहे. त्यामध्ये आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग आहे. महाराष्ट्रामध्ये प्रत्येक १०० मीटरला असे सॅटेलाईट कॅन्सर रुग्णालय सुरु करण्याची योजना देशभर राबविली जात आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आहेत ऑंकॉलॉजी विभाग आहे त्याला जोडून नागपूर मध्ये करीत आहोत तसेच प्रत्येक ठिकाणी केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमानाने काही करता येते काय याची देखील चर्चा कॅन्सर रुग्णालयासोबत झालेल आहे. पहिल्यांदा आपण हे नागपूर मध्ये करु आणि नंतर विदर्भात आणि महाराष्ट्रात करु.

ॲड राहूल ढिकले : अध्यक्ष महोदय, माझ्या नाशिक पूर्व मतदारसंघात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन वैद्यकीय महाविद्यालय व त्याच संलग्नित ४३० खाटांचे रुग्णालय स्थापन करण्यासाठी दिनांक १० फेब्रुवारी २०२१ रोजीच्या कॅबिनेट मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली. आमच्या नंतर उस्मानाबाद व रायगड जिल्हयात नवीन महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय झाला व त्यांना आवश्यक ती मंजूरी मिळून निधी देखील उपलब्ध करुन देण्यात आला आहे. प्रत्यक्षात सदरील महाविद्यालयाचे काम सुरुही झाले आहे. परंतु नाशिक जिल्ह्यासाठी अजूनही निधी उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे माननीय मंत्र्यांना माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, नाशिक वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी निधी कधी उपलब्ध करुन देण्यात येईल व वैद्यकीय महाविद्यालयाचे काम कधीपर्यंत सुरु करण्यात येणार आहे ?

श्री. अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी नाशिकमध्ये महाराष्ट्र आरोगय विज्ञान विद्यापीठांतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय उभे कण्यासाठीचा प्रश्न उपस्थित केला आहे. कल्पना अशी आहे की, हे

ता.प्र.क्र.४३५१७.....

श्री. अमित देशमुख....

विद्यापीठ असून तिथे शिक्षण व संशोधन होत नाही. त्यामुळे वैद्यकीय शिक्षण विभागाने आणि महाराष्ट्र शासनाने असा निर्णय केला की, जिथे विद्यापीठ आणि तिथे रुग्णालय व महाविद्यालय तसेच संशोधन केंद्र सुद्धा असावे. त्यासाठी वैद्यकीय शिक्षण विभाग व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने संयुक्तपणे ही व्यवस्था तिथे उभी करायची आहे. यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केलेली आहे. त्यांनी त्याची अंतिम रुपरेषा निश्चित करण्याचे ठरवले आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाऐवजी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ हे लीड करणार आहे. तिथे आता नवीन कुलगुरु आलेल्या आहेत. त्यांनी इंटिग्रेटेड मेडिसिन ही एक नाविन्यपूर्ण कल्पना पुढे आणलेली आहे. देशातील पहिले इंटिग्रेटेड मेडिसिन रुग्णालय आणि कॉलेज नाशिकमध्ये आपल्याला उभे करायचे आहे. मी आपल्याला एवढीच खात्री देऊ इच्छितो की, यावर आम्ही काही ठोस पाऊले उचलली आहेत. तसेच निधीची सुद्धा तरतूद पहिल्यांदा विद्यापीठ करणार आहे. त्यानंतर महाराष्ट्र शासन आणि केंद्र शासन करेल त्यामुळे कामामध्ये कोणतीही अडचण येणार नाही. मी आपल्याला एवढेच सांगू इच्छितो की, पुढच्या अधिवेशनाच्या आत त्याप्रकल्पाचे भूमिपूजन आपल्या साक्षीने करण्यात येईल

यानंतर श्रीमती करंदीकर.....

## गेवराई (जि.बीड) तालुक्यातील पाझर तलावांच्या दुरुस्तीबाबत

**(५)** * **३८७६५ श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेवराई तालुक्यातील (जि.बीड) येथील ऑगस्ट-सप्टेंबर २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे जवळपास ७ पाझर तलाव फुटले व ८ पाझर तलावांना धोका सदृष्य स्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आगामी पावसाळयापूर्वी सदर पाझर तलावांची दुरुस्ती होणे आवश्यक असताना अद्यापी याबाबत प्रशासनाकडून कोणतीच कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पहाणी केली आहे काय, पहाणीच्या अनुषंगाने काय आढळून आले, सदर पाझर तलावांची दुरुस्ती तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. शंकरराव गडाख :** (१) होय.हे अंशत: खरे आहे.
ऑगस्ट-सप्टेंबर २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीने बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील मृद व जलसंधारण विभागांतर्गत असलेले २ व जिल्हा परिषद बीड विभागाचे ५ पाझर तलाव फुटले आहेत. तसेच जिल्हा परिषद बीड विभागाचे १६ पाझर तलाव धोक्यात आले आहेत व इतर यंत्रणेचे २ पाझर तलाव क्षतिग्रस्त झालेले आहेत.
(२) व (३) हे खरे नाही. अतिवृष्टीने फुटलेल्या व क्षतिग्रस्त झालेल्या तसेच धोका सदृश्य स्थितीत असलेल्या योजनांची दुरुस्ती मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेतंर्गत प्रस्तावित करण्यात आली असून एकुण २५ पैकी २३ दुरुस्ती कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली असून निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. पावसाळ्यापुर्वी दुरुस्तीची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ॲड राहुल कुल : अध्यक्ष महोदय, .....

श्री. शंकरराव गडाख : अध्यक्ष महोदय, या उत्तरामध्ये लहानशी दुरुस्ती आहे. ' एकूण २५ पैकी २३ दुरुस्ती' असे उत्तरात दिले आहे. या ऐवजी ' एकूण २५ पैकी २५ ' असे वाचावे.

ता.प्र.क्र. ३८७६५.....

ॲड राहुल कुल : अध्यक्ष महोदय, तलावांच्या दुरुस्तीकरिता एकूण रक्कम किती, निविदा अंतिम कधी होणार आहे ? राज्यात बऱ्याच ठिकाणी वन विभागाच्या हद्दीत चांगल्या साईट्स आहेत. जलसंधारण विभागाची कोणतीही व्यवस्था नसल्याने एफसीआरए क्लिअरन्स होत नाही. या करिता विशेष व्यवस्था करणार काय ?

श्री. शंकरराव गडाख : अध्यक्ष महोदय, बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात अतिवृष्टीमुळे काही योजना नादुरुस्त झाल्या, फुटल्या या बाबत हा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे जवळजवळ ७ पाझर तलाव अतिवृष्टीमुळे फुटले होते. १६ पाझर तलाव व २ कोल्हापुरी बंधारे धोकादायक झाले होते. या सर्व गोष्टींचा सर्व्हे करण्यात आला. या पैकी ७ जे धोकादायक होते व २३ पाझर तलाव असे एकूण २३ पाझर तलाव व २ कोल्हापुरी बंधारे यांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्याची किंमत १० कोटी ७ लाख रु. आहे. कार्यारंभ आदेश दि. ३१ मार्च रोजी देण्यात येणार असून निविदा प्रक्रीया सुरु झाली आहे. येणाऱ्या पावसाळ्यापूर्वी सर्व कामे पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

श्री.रमेश बोरनारे : अध्यक्ष महोदय, आताच माननीय जलसंधारण मंत्री यांनी अतिवृष्टीबाबत उत्तर दिले आहे. मी त्यांना धन्यवाद देऊ इच्छितो. सन २०२१ मध्ये अतिवृष्टी झाली. यामुळे माझ्या वैजापूर, गंगापूर मतदारसंघात शिवना परिसरात केटीवेअर नादुरूस्त झाले, वाहून गेले. त्या १० पैकी ४ केटीवेअरला त्यांनी मान्यता दिली. वैजापूर हा भाग जोडून असल्यामुळे माननीय मंत्री अतिवृष्टीनंतर स्वत: आले. मी आपल्याला विनंती करणार आहे. गंगापूर तालुक्यातील शिरसगाव मालुंजा, झोडेगाव व भालगाव येथे शिवना येथे ३ केटीवेअर नादुरुस्त झाले आहेत, यांच्या दुरुस्तीकरिता निधी दिला जाणार आहे काय ?

श्री. शंकरराव गडाख : अध्यक्ष महोदय, ० ते ६०० हेक्टर करिता जलसंधारण विभागाकडे प्रकल्प येत आहेत. अनेक वर्षापासून एक लाख प्रकल्प असे आहेत की, त्यांची दुरुस्ती झालेली नव्हती. तेव्हा शासनाने मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ३८७६५.....

श्री. शंकरराव गडाख ....

आणली. या योजनेच्या माध्यमातून १० वर्षापूर्वीचे जुने नादुरुस्त असे ७ हजार ९०० ते ८ हजार प्रकल्प नोटीफाय केले आहेत. या करिता १४०० कोटी रु. चा पहिला आराखडा तयार केला आहे. यामध्ये जे धोकादायक प्रकल्प आहेत ते सर्व घेतले असून टप्प्याटप्प्याने त्यांची दुरुस्ती केली जाणार आहे.

श्रीमती मेघना साकोरे – बोर्डीकर :अध्यक्ष महोदय, माझा जिंतूर हा तालुका डोंगराळ आहे. येथे गाव तलाव,पाझर तलाव हे शेती व पिण्याच्या पाण्यासाठी मुख्य स्त्रोत आहे. जिंतूर तालुक्यात २२ पाझर तलाव आहेत. सन २०२१ मधील अतिवृष्टीमुळे त्यांची दुर्दशा झाली आहे. या पाझर तलावांची दुरुस्ती करण्यासाठी निधी देणार काय ?

श्री. शंकरराव गडाख : अध्यक्ष महोदय, सुमारे ८ हजार प्रकल्प जे धोकादायक, नादुरुस्त आहेत ते नोटीफाय केले आहेत अशा प्रकल्पामध्ये जिंतूर तालुक्यातील प्रकल्प असतील तर त्याला मान्यता, प्रशासकीय मान्यता देऊन लवकरात लवकर दुरुस्त करण्यात येतील.

श्री. राजेश पाटील : अध्यक्ष महोदय, हा मूळ प्रश्न सन्माननीय सदस्य श्री लक्ष्मण पवार यांच्या गेवराई मतदारसंघातील असून त्यांनी मला यावर उपप्रश्न विचारण्याबाबत निरोप दिला आहे. हा प्रश्न मागील हिवाळी अधिवेशनातही सन्माननीय सदसयांनी उपस्थित केला होता त्यावेळी आपण असे उत्तर दिले होते की, मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेतून प्रस्तावित करण्याची कार्यवाही क्षेत्रीय कार्यालयाकडून करण्यात येत आहे. आजही या ठिकाणी असे उत्तर दिले आहे की, पावसाळयापूर्वी दुरुस्तीचे काम करण्याचे नियोजन आहे. या ६ महिन्याच्या काळात या संबंधी कोणतीही कार्यवाही झाली नाही. त्यासाठी क्षेत्रीय कार्यालयाकडून

ता.प्र.क्र. ३८७६५.....

श्री.राजेश पाटील...

निष्काळजी झाली असेल तर त्याबाबत कारवाई केली जाणार काय ? आता नियोजन करण्यात येत आहे असे सांगितले आहे. मात्र आता पावसाळ्याला दोनच महिने शिल्लक आहेत. काम पूर्ण करण्याची स्पेसिफिक तारीख देणार काय ? या वेळेच्या पूर्वी तलावाच्या दुरुस्तीचे काम झाले नाही तर संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणार काय ? या सरकारच्या कार्यकाळात तारीख पे तारीख, लवकरात लवकर करु, तपासून बघू असेच सांगितले जात आहे. हे बंद झाले पाहिजे. या बाबत स्पेसिफिक उत्तर द्यावे.

श्री. शंकरराव गडाख : अध्यक्ष महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर मी दिले आहे की, प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. कार्यारंभ आदेश दि. ३१ मार्च रोजी देण्यात येणार आहे. पावसाळ्याच्या पूर्वी २५ चे २५ प्रकल्प पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. दुसरा प्रश्न होता की, उशीर कशामुळे झाला. उशीर कशामुळे झाला या बाबत चौकशी करुन जो कोणी दोषी असेल त्यावर कारवाई केली जाईल.

श्री. बाबासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, सर्व प्रथम मंत्री महोदयांचे मी अभिनंदन करतो. त्यांनी माझ्याही मतदारसंघात व राज्यात चांगला निधी दिला. २०वर्षांपासून धरणाच्या दुरुस्तीला निधी मिळत नव्हता, आता तो दिलेला आहे. मात्र आणखी काही राहिले आहेत त्यांच्या दुरुस्तीकरिता लवकरात लवकर निधी दिला जाणार आहे काय ?

श्री. शंकरराव गडाख : अध्यक्ष महोदय, होय.

श्री. उदयसिंग राजपूत : अध्यक्ष महोदय, मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. आमच्या कन्नड मतदारसंघात १६९ मि.मी. पाऊस पडला. येथे ढगफुटी झाली. पाझर तलावांचे सांडवे फुटले, नुकसान झाले. या करिता भरघोस निधी दिल्याबद्दल मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. काही पाझर तलाव राहिले आहेत त्यांना निधी देणार काय ?

ता.प्र.क्र. ३८७६५.....

श्री. शंकरराव गडाख : अध्यक्ष महोदय, होय.

श्री. नारायण कुचे : अध्यक्ष महोदय, मराठवाड्यातील गेवराई तालुक्यातील प्रश्न आहे. मराठवाड्यात सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी झाली. भोकरदन तालुक्यातील पूर्णा, गिरणा नद्या व बदनापूर तालुक्यातील कोल्हापूर बंधारे वाहून गेले. यामुळे शेतकऱ्यांची एक ते दोन एकर शेती वाहून गेली. या दुरुस्तीकरिता निधी देणार काय, तसेच त्याचा सर्व्हे करणार काय ?

श्री. शंकरराव गडाख : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, बदनापूर तालुक्यातील केटीवेअर अतिवृष्टीमुळे वाहून गेले आहेत. या सर्व प्रकल्पांची मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेच्या माध्यमातून दुरुस्ती केली जाईल.

डॉ. संजय रायमुलकर : माझ्या मतदारसंघात ६८ बंधाऱ्यांना मान्यता दिली असून त्याचे टेंडरही झाले होते. काहींना वर्क ऑर्डर दिली व काहींचे काम थांबवले. या नंतर सर्वच कामे थांबवली गेली. या कामांना मंजुरी देऊन कामे सुरु करण्याची प्रोसेस करणार काय ?

श्री. शंकरराव गडाख : अध्यक्ष महोदय, अनेक प्रकल्पांना विभागाकडून मंजुरी दिली होती. मात्र कोव्हिडमध्ये आर्थिक परिस्थिती अडचणीची झाल्यामुळे वित्त विभागाकडे निधीची कमतरता असल्याने निर्बंध लावले होते. आता निर्बंध उठले आहेत. जे प्रस्ताव मंजूर झाले आहेत त्या करिता लवकरात लवकर निधी देऊन ते पूर्ण करण्यात येतील.

श्री. हिरामण खोसकर : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी अधिकाधिक निधी दिला. माझ्या भागात ५ साठवण तलाव मंजूर आहेत.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. संजय शिरसाट )** : आता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

------

असुधारित प्रत

## माहितीचा मुद्दा

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, मी मागच्या वेळेस देखील एक मुद्दा उपस्थित केला होता. वकिलांवर व गावातील पत्रकारांवरील अजूनही हल्ले सुरु आहेत. काल वर्धा या ठिकाणी वर्धा न्यायालयामध्ये एका महिला वकिलावर माननीय न्यायाधीशांसमोर चाकुने हल्ला करण्यात आला.

अध्यक्ष महोदय, शासनाला एवढेच विनंतीपूर्वक विचारावयाचे आहे की, वकील व छोट्या पत्रकांरावर हल्ले होतात. त्यांना सुरक्षा देण्याबाबत सरकारकडून काही कारवाई होणार आहे काय? महिला वकिलांवर हल्ला होणे तो देखील माननीय न्यायाधीशांसमोर हल्ला होणे, ही गंभीर बाब आहे. त्यामुळे शासनाने यावर निवेदन करावे, अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करीत आहे. अध्यक्ष महोदय शासन यावर काही बोलतच नाही....

**तालिका सभाध्यक्ष (श्री.संजय शिरसाट)** : सन्माननीय सदस्य आपले बोलणे आताच संपले आहे. आपण शासनाला बोलण्याकरिता संधी द्यावी. आपले बोलणे संपल्यानंतरच शासन बोलेल. आपण बसावे मंत्री महोदय यावर उत्तर देतील.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले यांनी या सभागृहात जी माहिती दिली आहे, त्या माहितीच्या संदर्भात संबंधितांकडून रिपोर्ट घेऊन त्यावर आवश्यक ती कारवाई केली जाईल. वकिलांवर, पत्रकारांवर होणारे हल्ले हा विषय अनेक दिवसांपासून चर्चेला येत आहे. त्यावर काय उपाययोजना करता येईल, या संदर्भात निश्चित प्रकारे एक धोरणात्मक निर्णय घेतला जाईल.

...........

## सभागृहाच्या कार्यपध्दतीबाबतचा मुद्दा

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, माझा सभागृहाच्या कार्यपध्दतीबाबतचा एक मुद्दा आहे. आपण या सभागृहात अनेक वर्षे आहोत. ज्यावेळेस मागण्यांवर चर्चा होते, एखाद्या मुद्दयावर चर्चा होते त्यावेळेस आपण एक सायटेशन वाचता. ते सायटेशन असे असते की, चर्चेकरिता एवढा वेळ राखून ठेवला आहे. त्यातील ५० टक्के वेळ विरोधी पक्षाला व ५० टक्के वेळ सत्तारुढ पक्षाला मंत्री महोदयांच्या उत्तरासहित असेल.

अध्यक्ष महोदय, अनेकवेळा विरोधी पक्ष नेता एक-दीड तास बोलतात, मग मंत्री महोदय देखील एक-दीड तास बोलतात. अनेक वर्षे आपल्या सभागृहात प्रथा आहे की, एक सत्तारुढ पक्षाचा व एक विरोधी पक्षाचा सदस्य बोलेल. त्यातून शेवटी सर्व बॅलन्स तयार होतो. आता या ४ दिवसांमध्ये अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा झाली. या चारही दिवसांमध्ये ही सर्व पध्दत बदलण्यात आली. ३ सदस्य तिकडून व १ सदस्य इकडून असे केल्याने याचा परिणाम काय झाला ते मी कालच्या चर्चेबाबत आपल्याला सांगतो. शिवसेनेला १ तास ३ मिनिटे, राष्ट्रवादीला ५७ मिनिटे, काँग्रेसला १ तास, १३ मिनिटे, बहुजन विकास आघाडीला ४ मिनिटे, समाजवादीला ७ मिनिटे इतका वेळ मिळाला. मंत्री महोदयांचे उत्तर १ तास ४२ मिनिटे इतका वेळ होते.

अध्यक्ष महोदय, याचा अर्थ सत्तारुढ पक्षाला एकूण ५ तास ६ मिनिटे मिळाली. विरोधी पक्षाला किती वेळ मिळाला तर, भारतीय जनता पार्टीला २ तास ३ मिनिटे, राष्ट्रीय समाज पक्षाला ४ मिनिटे इतका म्हणजे २ तास ७ वेळ मिनिटे इतका वेळ मिळाला. ही चर्चा ७ तास झाली तर नियमानुसार साडेतीन तास आम्हाला मिळाले पाहिजेत व साडेतीन तास सत्तारुढ पक्षाला मिळाले पाहिजेत. परंतु, असे न होता सत्तारुढ पक्षाला ५ तास ६ मिनिटे व विरोधी पक्षाला २ लास ७ मिनिटे इतका वेळ मिळाला आहे.

अध्यक्ष महोदय, अनेक वर्षे सातत्याने या संदर्भात या सभागृहाचा नियम आहे. आमची संख्या १०६ आहे. परंतु, मागच्या काळात विरोधी पक्षाच्या सन्माननीय

श्री.देवेंद्र फडणवीस ....

सदस्यांची संख्या ८४ होती, त्या आधी ९६ इतकी होती, अशा प्रत्येक वेळी ही पध्दत या सभागृहामध्ये होती. त्यामुळे माझी विनंती आहे.... (अडथळा)... आपण जरा थांबा. माझे बोलणे अजून पूर्ण व्हायचे आहे. आपण आपले म्हणणे नंतर मांडावे. मी सभागृहाच्या कार्यपध्दतीबाबतच्या मुद्दयावर बोलत आहे. सभागृहाच्या कार्यपध्दतीबाबतच्या मुद्दयावर बोलत असताना हरकत घेता येत नाही.

अध्यक्ष महोदय, या संदर्भात आम्ही आज माननीय उपाध्यक्ष यांची देखील भेट घेतली. त्यांच्याही लक्षात आणून दिले. माननीय उप मुख्यमंत्री यांच्या लक्षात आणून दिले. जी पध्दत वर्षानुवर्षे या सभागृहाने पाळली आहे, त्याच पध्दतीने कारवाई झाली, पाहिजे अशी आमची आपल्याला विनंती आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : माननीय विरोधी पक्ष नेते आपण जो चर्चेला वेळ देतो, दरवेळेस ... (अडथळा)...

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, माझे एक सबमिशन आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी कोणत्या पक्षाचे सन्माननीय सदस्य किती वेळ बोलले त्याबाबत सांगितले आहे. काँग्रेस पक्षाला १ तास इतका वेळ मिळाल्याचे त्यांनी सांगितले. परंतु, काँग्रेस पक्षाचे सन्माननीय सदस्य १ तास बोललेच नाहीत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी ही आकडेवारी कोठून आणली, त्याची माहिती आम्हाला दिली पाहिजे. त्यांच्याकडे हे चुकीचे रेकॉर्ड कोठून आले? अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो विषय मांडला तो आपणच दिला, असे रेकॉर्ड ... आम्ही एक तास बोललो नाही. आम्हाला याबाबतची माहिती दिली पाहिजे.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, आपण हा कालावधी मोजून घ्यावा, माझी हरकत नाही. प्रश्न एवढाच आहे की, ५० टक्के सत्तारुढ पक्ष व ५० टक्के विरोधी पक्ष एवढा वेळ मंत्री महोदयांच्या उत्तरासहित आहे. मंत्री महोदयांचे उत्तर जर १ तास ४० मिनिटे चालणार असेल व अन्य पक्षाचे सन्माननीय सदस्य ३ तास बोलणार

श्री.देवेंद्र फडणवीस ...

असतील तर, आम्हाला अर्धा वेळ मिळालाच पाहिजे. या सभागृहात वर्षानुवर्षे असे झालेले आहे.  अध्यक्ष महोदय, आपण प्रथम माझ्या मुद्दयावर उत्तर द्यावे.

**तालिका सभाध्यक्ष** : माननीय विरोधी पक्ष नेते मी आपल्याच मुद्दयावर उत्तर देत आहे. ठरल्याप्रमाणे दरवेळेस निम्मा वेळ विरोधी पक्षाला व निम्मा वेळ सत्तारुढ पक्षाला असतो हे सत्य आहे. आपण शक्य तो त्या पध्दतीनेच कामकाज चालविण्याचा प्रयत्न करतो. परवा आपण कदाचित सभागृहात उपस्थित नव्हता परंतु, माननीय उप मुख्यमंत्री यांनी मला व सभागृहाला देखील सांगितले की, आजचा चर्चेचा वेळ वाढवून द्या. तो वेळ इतका वाढवला की, जवळपास ६...(अडथळा)...

माननीय विरोधी पक्ष नेते चर्चेकरिता ३ तासांचा वेळ होता मात्र आपण जवळपास सहा ते साडेसहा तास चर्चा घेतली. या सभागृहामध्ये जे नवीन सन्माननीय सदस्य येतात त्या प्रत्येकांची अशी मागणी असते की, या अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये आमचा काही तरी सहभाग असावा, आम्हाला बोलण्याची अनुमती द्यावी. त्यामुळे कदाचित वेळ थोडा कमी-जास्त होतो, त्यामुळे गैरसमज होतो. यापुढे सुध्दा विरोधी पक्षाला त्यांचा पूर्ण वेळ वेळ दिला जाईल. यामध्ये पुन्हा भेदभाव केला जाणार नाही. आपले म्हणणे आता आम्ही नोंद केलेले आहे. धन्यवाद.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, आभारी आहे. परंतु, मी आपल्या निदर्शनास आणून देतो की, प्रश्न एवढाच आहे की, एक सन्माननीय सदस्य इकडचे व एक सन्माननीय सदस्य तिकडे अशी पध्दत ठेवली तरच ते फॉलो होऊ शकते.

**तालिका सभाध्यक्ष** : याची निश्चितपणे नोंद घेतली जाईल.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, मी जाणीवपूर्वक आपल्या निदर्शनास आणून देतो. मी विरोधी पक्ष नेता आहे परंतु, जास्तीत जास्त सन्माननीय सदस्यांना बोलण्यास मिळावे याकरिता मी एकही दिवस मागण्यांवर बोललो नाही. असे कधी होत नाही. विरोधी पक्ष नेते मागण्यांवर बोलतात. परंतु, मी एकही दिवस बोललो नाही व आज देखील बोलणार नाही.

श्री.देवेंद्र फडणवीस ...

अध्यक्ष महोदय, २ वर्षे सन्माननीय सदस्यांना बोलण्याकरिता मिळालेले नाही. त्यामुळे मी विरोधी पक्ष नेता म्हणून हा निर्णय घेतला की, सदस्य बोलतील. मी एकही दिवस मागण्यांवर बोललो नाही. आपण याची नोंद घ्यावी. मंत्री महोदय जे म्हणत आहेत... हो काल आम्ही ठरविले होते. काल आम्ही 'द कश्मिर फाईल्स' सिनेमा पाहण्याकरिता गेलो होतो. आपल्याला काही अडचण आहे का?

**तालिका सभाध्यक्ष** : माननीय विरोधी पक्ष नेते आम्हाला देखील घेऊन जायचे होते.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, काल आम्ही आम्ही 'द कश्मिर फाईल्स' सिनेमा पाहण्याकरिता गेलो होतो. आपल्याला काही अडचण असेल तर तुम्ही बाहेर मांडा. आम्ही गेलो होतो, डंक्याच्या चोटवर गेलो होतो.

**तालिका सभाध्यक्ष** : माननीय विरोधी पक्ष नेते आम्हाला देखील घेऊन जायचे होते. त्यात अडचण काय आहे?

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, 'द कश्मिर फाईल्स' हा सिनेमा मध्यंतरानंतर फार बोअरिंग आहे. तो काही फार इंटरेस्टींग नाही. बघा तुम्हाला माहिती आहे. 'द कश्मिर फाईल्स' सिनेमाचे एवढे कौतुक असेल तर जेवढा म्हणून त्याचा फायदा म्हणजे तो सिनेमा १७ कोटीचा आहे. त्याला १५० कोटी रुपये मिळाले आहेत. तेवढे सर्व काश्मिरी पंडितांची घरे बांधण्याकरिता दान करण्यास त्या सिनेमाच्या प्रोड्युसरना सांगावे. .... (अडथळा)... मूळ मुद्दा हा आहे की, काल माननीय विरोधी पक्ष नेते .... (अडथळा)... आपण बसावे. आपण माझ्यानंतर बोलावे. अध्यक्ष महोदय मला संरक्षण द्यावे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांना लक्षात आणून दिले पाहिजे की, प्रथम सहा ठरले, नंतर साडेसहा ठरले, त्यानंतर साडेसात पर्यंत वेळ वाढवून द्यावा असे मीच येथे उभे राहून सांगितले, प्रस्तावित केले. .... (अडथळा)... आपण माझे म्हणणे ऐकावे. प्रत्येक वेळेस उभे राहून बोलले पाहिजे, ही काय पध्दत आहे, आम्ही

श्री.जयंत पाटील ...

ते उभे राहिल्यावर बोलतो का कधी, ही काय पध्दत आहे, प्रत्येक वेळेस खाली बसून बोलले जाते, आपण खाली बसून बोलत जाऊ नका.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष (श्री.संजय शिरसाट) :** सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर यांनी खाली बसून बोलू नये.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेता बोलत असताना सत्तधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य खाली बसून बोलत नाहीत. सन्माननीय सदस्य यांना माननीय विरोधी पक्ष नेता यांनी समज द्यावी. विरोधी पक्षाच्या खाली बसून बोलणाऱ्या सन्माननीय सदस्यांना प्रोत्साहन देऊ नये, यामुळे सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य देखील खाली बसून बोलतील व त्यामुळे भाषणांमध्ये अडथळा निर्माण होईल. खाली बसून बोलण्याची पद्धत योग्य नाही, ती बंद करावी.

अध्यक्ष महोदय, काल अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेची वेळ वाढवत जात असताना शेवटी विरोधी पक्षाच्या आसनावर सन्माननीय सदस्य उपस्थित नव्हते. सर्व सन्माननीय सदस्य यांची भाषणे झाल्यानंतर काही सन्माननीय सदस्य सभागृहात आले त्यांनाही बोलण्याची संधी देण्यात आली होती. उक्त चर्चेत शक्य तेवढ्या अधिक सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देण्यात आली होती. मी ही माहिती रेकॉर्डवर चुकीचे राहू नये, यासाठी सांगत आहे. काल सभागृहात उपस्थित असणाऱ्या सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे झाल्यानंतर मंत्री महोदयांच्या उत्तरास परवानगी देण्यात आली होती. यासंदर्भात माननीय विरोधी पक्ष नेता यांनी गैरसमज करुन घेऊ नये.

--------

असुधारित प्रत

**प्रशासकीय यंत्रणेमाध्यमातून करण्यात येणाऱ्या वसुलीबाबत**

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले यांनी सभागृहाचे लक्ष एका गंभीर विषयाकडे वेधून माहिती दिली. मी देखील एका गंभीर विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छित आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यात प्रशासकीय यंत्रणेमध्ये षड्‌यंत्र शिजत आहे काय, याबाबत मला शंका आहे. प्रशासकीय यंत्रणेमध्ये षड्‌यंत्र शिजणार असतील तर ही बाब राज्यासाठी सोयीची नाही. श्री.सौरभ त्रिपाठी, उप पोलीस अधीक्षक, यांना निलंबित करण्यात आले, हे योग्य झाले. मंत्री महोदयांच्या या भूमिकेस आमचे समर्थन आहे, कारण ते प्रकरण तसे होते.

अध्यक्ष महोदय, भुलेश्वर येथील पोफळीवाडीतील अंगडीयांना धमी देण्याचा आरोप श्री.सौरभ त्रिपाठी यांचेवर होता. आयकर विभागाच्या धाडी पडतील, ते कारवाई करतील, अशा धमक्या आयकर विभागाचे नाव वापरुन पोलीस अधिकारी लोकांकडून खंडणी घेत असतील तर यामध्ये केंद्र सरकारच्या यंत्रणेस बदनाम करण्याचे षड्‌यंत्र प्रशासकीय यंत्रणेत कोणाच्या आशीर्वादाने शिजत आहे काय ? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. श्री.त्रिपाठी बेपत्ता झाले होते, त्यानंतर त्यांनी अंगडीयांवर दबाव आणला होता. ते समोर न आल्यामुळे त्यांच्यावर मंत्री महोदयांनी शिस्तभंगाची कारवाई केली. केंद्रीय यंत्रणांच्या नावाखाली वसुली करण्याचा कार्यक्रम पोलीस विभागाच्या माध्यमातून सुरु आहे काय, यामधून केंद्रीय यंत्रणांना बदनाम करण्यात येत आहे काय ? ही बाब या राज्याला व देशाला शोभणारी नाही. अशा पद्धतीने आणखी काही राज्य शासनाच्या सेवेतील अधिकारी केंद्रीय यंत्रणांच्या नावाखाली वसुली करीत आहेत, अशी आम्हाला शंका आहे. या प्रकरणी गृह मंत्री महोदय माहिती घेतील व आवश्यकता असेल तर चौकशी करतील. अशा पद्धतीने आयकर विभागाच्या नावाखाली आणखी किती अधिकाऱ्यांनी किती कोटी रुपयांची वसूली केली, किती प्रकरणे दबली आहेत, किती जीएसटीच्या अधिकाऱ्यांच्या नावाने

ॲड.आशिष शेलार...

वसूली केली आहे, याबाबतची माहिती सभागृहाला व राज्याला समजली पाहिजे. याची नोंद घेऊन आवश्यकता असेल तर माहिती घेऊन निवेदन करावे, अशी माझी गृह मंत्री महोदयांना विनंती आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी उपस्थित केलेल्य मुद्याची नोंद मी घेतली आहे. त्यासंदर्भात माहिती घेण्यात येईल व काही सत्य आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

------------

असुधारित प्रत

## पृ.शी./ मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.जयंत पाटील (जलसंपदा मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने-विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा एकवीसावा वार्षिक वित्तीय अहवाल

आणि

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष :** वार्षिक वित्तीय व लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत. सदरहू अहवाल विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील.

----------

श्री.संजय बनसोडे (पर्यावरण व वातावरणीय बदल राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा सन २०२०-२०२१ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष :** अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. सदरहू अहवाल विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

----------------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी. :** स्थगन प्रस्तावाच्या सूचना

**तालिका सभाध्यक्ष :** आज बुधवार, दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी स्थगन प्रस्तावाच्या एकूण ३ सूचना प्राप्त झाल्या आहेत. परंतु आज सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान (चौथा व शेवटचा दिवस) व चर्चारोध (गिलोटीन) असल्यामुळे म.वि.स.नियम २५१ (२) अन्वये स्थगन प्रस्ताव घेता येणार नाहीत. सबब, सदर सर्व सूचनांना मी दालनात अनुमती नाकारीत आहे.

------------

असुधारित प्रत

**पृ.शी. /मु.शी. :** अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

श्रीमती.प्रणिती शिंदे (समिती प्रमुख) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करते.

अध्यक्ष महोदय, अनुसूचित जाती कल्याण समितीने दिनांक २३ ते २५ जानेवारी, २०१८ या कालावधीत नागपूर जिल्ह्याचा व दिनांक १३ ते १७ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत पुणे जिल्ह्याचा दौरा करुन अनुसूचित जाती प्रवर्गासाठीच्या विविध योजना व कल्याणकारी प्रकल्पांना प्रत्यक्ष भेटी देऊन त्यासंदर्भात जिल्हा पातळीवरील संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन चर्चा केली. तद्नंतर उक्त दौऱ्याच्या अनुषंगाने समितीने दिनांक १७ फेब्रुवारी, २०२१ रोजी विधान भवन, मुंबई येथे संबंधित विभागांच्या प्रधान सचिवांची साक्ष घेतली. यासंदर्भाने समितीस प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने सखोल छाननी व विचार विनिमय करुन शासनास काही महत्त्वाच्या शिफारशी केल्या असून त्या प्रस्तूत अहवालात समाविष्ट केल्या आहेत. समितीचा अभिप्राय व शिफारशींनुसार शासन स्तरावर कृपया त्वरेने कार्यवाही करण्यात यावी.

**तालिका सभाध्यक्ष :** अनुसूचित जाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---------

**पृ.शी. /मु.शी. :** अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

श्री.दौलत दरोडा (समिती प्रमुख) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पहिला अहवाल १२ शिफारशींसह सभागृहाला सादर करतो.

अध्यक्ष महोदय, मी उक्त अहवालातील एक शिफारस वाचून दाखवू इच्छित आहे. आदिवासी उपयोजना व बाह्य योजना क्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या रस्त्यांची दुरुस्ती व परिरक्षण हा कार्यक्रम ३०५४ या लेखाशीर्षांतर्गत निधीसह सन २०१२ पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्फत राबविण्यात येत होता. सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षापासून सदर कार्यक्रम ३०५४ या लेखाशीर्षांतर्गत निधीसह ग्रामविकास विभागास हस्तांतरित करण्यात आल्यामुळे जिल्ह्यातील रस्ते दुरुस्तीच्या कामांच्या गुणवत्तेचा दर्जा कमी झाला आहे. तसेच या कामांसाठी निधीची मागणी, मान्यता व उपलब्धतेसाठी जिल्हा परिषदेकडून बराच कालावधी लागत आहे. तसेच रस्त्यांची कामे विहीत वेळेत पूर्ण न झाल्याने जिल्ह्यातील विकास कामांवर परिणाम होतो. त्यामुळे ३०५४ लेखाशीर्षांतर्गत या योजनेवर होणाऱ्या खर्चाच्या निधीसह रस्त्यांचा दर्जा सुधारणे तसेच विहीत वेळेत ही कामे पूर्ण होण्याकरिता ग्रामविकास विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित करुन सदर कामे पूर्वीप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाकडूनच करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस सादर करावी. अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी. /मु.शी. :** रोजगार हमी योजना समितीचा अहवाल
सादर करणे

श्री.मनोहर चंद्रिकापुरे (समिती प्रमुख) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा पहिला अनुपालन अहवाल सभागृहाला सादर करतो.

**तालिका सभाध्यक्ष :** रोजगार हमी योजना समितीचा पहिला अनुपालन अहवाल सभागृहाला सादर झाला आहे. समिती प्रमुख यांना भाषण करावयाचे असेल तर ते त्यांनी पटलावर ठेवावे.

---------

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

## लक्षवेधी सूचना क्रमांक-१ बाबत

**तालिका सभाध्यक्ष :** लक्षवेधी सूचना क्रमांक-१ पुढे ढकलण्याबाबत संबंधित मंत्री महोदयांनी पत्रान्वये विनंती केलेली आहे. लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याची विनंती मान्य करण्यात येत आहे.

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक-१ पुढे ढकलण्याबाबत कोणत्या मंत्री महोदयांनी विनंती केली आहे, याबाबतची माहिती देण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

श्री.दिलीपराव वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक-१ मधील अनेक मुद्दे कामगार विभागाशी संबंधित आहेत. त्यामुळे उक्त लक्षवेधी सूचनेला उत्तर कामगार मंत्री महोदयांनी देणे योग्य होईल. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना कामगार विभागाकडे हस्तांतरित करण्यात आलेली आहे. उक्त लक्षवेधी सूचनेवर उत्तर देण्याचे कामगार मंत्री महोदयांनी मान्य देखील केलेले आहे.

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, ACTADCD चे ज्येष्ठ सभासद श्री.राजेंद्र सापते यांच्यावर अत्याचार करुन त्यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त केलेले आहे. या प्रकरणामध्ये मोठ्या प्रमाणावर दबाव आणून गुंडगिरी करण्यात आलेली आहे. या लक्षवेधी सूचनेला कोणी उत्तर द्यावे, हा प्रश्न नाही. परंतु ही गंभीर बाब आहे. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना उद्या किंवा परवा घेण्यात येईल, असे आम्हाला आश्वासन देण्यात यावे. ही लक्षवेधी सूचना उद्या चर्चेला घेण्यात येणार असेल तर उद्या माननीय कामगार मंत्री उपलब्ध नाहीत. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी चर्चेला घेण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

**तालिका सभाध्यक्ष :** ठीक आहे. लक्षवेधी सूचना क्रामांक-१ दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी चर्चेला घेण्यात येईल.

---------

**पृ.शी.:** खडकवासला (जि.पुणे) येथे मागील काही महिन्यांपासून गुन्हेगारी व अवैध धंद्यामध्ये झालेली वाढ याबाबत

**मु.शी.:** खडकवासला (जि.पुणे) येथे मागील काही महिन्यांपासून गुन्हेगारी व अवैध धंद्यामध्ये झालेली वाढ या संबंधी श्री. भिमराव (आण्णा) तापकीर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.भिमराव (आण्णा) तापकीर (खडकवासला) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"खडकवासला (जि.पुणे) येथे मागील काही महिन्यांपासून गुन्हेगारी मध्ये लक्षणीय वाढ होणे, गुन्हेगारांवर पोलीसांचा वचक राहिलेला नसणे, नागरिकांमध्ये विशेषतः लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरीक यांच्यामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होणे, अल्पवयीन मुलींवर बलात्कार करुन ठार मारल्याच्या घटना, अवैध धंदे, लॉटरी, रोमिओ, लुटमार, खून, दरोडे, हॉटेल लॉजिंगच्या माध्यमातून अवैध धंदे, भर दिवसा रस्त्यालगत सुरु असलेला देह व्यापार, वाढता सायबर क्राईम या सारख्या घटना सहकार नगर, भारती विद्यापीठ, सिंहगड रोड, आणि हवेली पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये घडणे, त्याचबरोबर सहकारनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये धनकवडी गावठाण परिसरात अवैध धंदे, वाहनांची जाळपोळ, चोऱ्या, गंभीर स्वरूपाचे गुन्हे सर्रास घडत असणे, सोसायट्या, वस्ती भागात पोलिसांकडून पेट्रोलिंग देखील होत नसणे, पोलीस ठाण्याच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून लोकप्रतिनिधींशी कुठल्याही प्रकारे समन्वय नसणे, केलेल्या सूचना, तक्रारींवर तक्रार दाखल करावयास गेलेल्या नागरिकास मिळणाऱ्या वागणुकीमुळे व मनमानी कारभारामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण होणे, याबाबत संबंधित पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ठ झालेल्या गावांचे कार्यक्षेत्र भौगोलिक दृष्टया सोयीच्या दृष्टीने पुणे शहर

असुधारित प्रत

श्री.भिमराव (आण्णा) तापकीर.......

पोलीस आयुक्तालयास जोडण्याची आवश्यकता असणे, जि. पुणे येथील भोर विभाग-राजगड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील हवेली तालुक्यात समाविष्ट असलेली गावे कमी करून त्या गावांचा समावेश हवेली ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत करण्याचा निर्णय प्रलंबित असल्यामुळे हवेली तालुक्यातील खडकवासला विभागात येणारी मोरदरी, कल्याण, कोंढणपूर, रहाटवडे, आर्वी, शिवापूर, खेड शिवापूर, श्रीरामनगर, गाउडदरा ही गावे सध्या भोर विभाग अंतर्गत राजगड पोलीस स्टेशनच्या अंतर्गत येत असल्याचे निदर्शनास येणे, संबंधित गावे ही हवेली ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीमधील गावांना लागून असतांना त्या गावातील नागरिकांना कोणत्याही छोट्या-मोठ्या तक्रारीसाठी अथवा इतर प्रशासकीय कामांसाठी हवेली ग्रामीण पोलीस स्टेशन नजीकच्या अंतरावर असतांना २६ किमी अंतरावर असणाऱ्या राजगड पोलीस स्टेशनला जावे लागणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

श्री.दिलीपराव वळसे-पाटील (गृह मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

श्री.भिमराव (आण्णा) तापकीर : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेला विस्तृत लेखी उत्तर देण्यात आलेले आहे. परंतु नेमके आणि अपेक्षित उत्तर, जसे मला हवे होते तसे उत्तर देण्यात आलेले नाही. या उत्तरामध्ये खडकवासला मतदारसंघ हा ग्रामीण आणि शहरी भागात येतो. यामध्ये सहकार नगर, बिबेवाडी, भारती विद्यापीठ, वारजे, उत्तम नगर, माळवाडी हा शहरी पोलीस स्टेशनचा भाग माझ्या मतदारसंघामध्ये येतो. तसेच कोथरूड पोलीस स्टेशन देखील माझ्या मतदारसंघाच्या कार्यक्षेत्रामध्ये येते. तसेच दोन ग्रामीण भागातील पोलीस स्टेशन देखील येतात. एकंदरित आठ पोलीस स्टेशन हे खडकवासला मतदारसंघामध्ये येतात. काही पोलीस स्टेशनचा पूर्ण भाग तर काही पोलीस स्टेशन अंशत: भाग खडकवासला मतदारसंघाच्या कार्यक्षेत्रामध्ये येतो.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये अवैध धंदे, वाहनांची जाळपोळ, चोऱ्या, गंभीर स्वरूपाचे गुन्हे सर्रास घडत असल्यामुळे मी ही लक्षवेधी सूचना मांडलेली आहे.

अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या लेखी उत्तरामध्ये "भारती विद्यापीठ, सेंट्रल रोड पोलीस स्टेशन व सहकार नगर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील धनकवडी गाव परिसरात अवैध दारू विक्री, गुटखा विक्री, लॉटरी, बेकायदा सट्टे, देहव्यापार, जुगार या स्वरूपाच्या गुन्ह्यात वाढ झालेली नसून याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास अशा ठिकाणांची माहिती काढून अवैध धंदे चालत असल्याची खात्री झाल्यास त्यावर योग्य ती कार्यवाही केली जात आहे." असे नमूद केले आहे.

अध्यक्ष महोदय, मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे की, त्या भागामध्ये, त्या परिसरामध्ये एकही अवैध दारूचा धंदा, लॉटरी सेंटर, जुगार अड्डे नाहीत का ?

अध्यक्ष महोदय, लोकप्रतिनिधींनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी सदर ठिकाणी दारूच्या अड्ड्यावर, लॉटरी सेंटरवर जाणार आणि त्यांना सांगणार की तुमच्या संदर्भामध्ये आमदार महोदयांनी प्रश्न उपस्थित केला आहे. त्यामुळे आम्हाला तुमच्यावर कारवाई करावयाची आहे, असे सांगितले जात आहे. मी मांडलेल्या लक्षेवेधी सूचनेला अपेक्षित उत्तर मिळेल,

असुधारित प्रत

श्री.भिमराव (आण्णा) तापकीर.......

अशी मला अपेक्षित होते. माझ्या गावामध्ये मी ज्या ठिकाणी राहतो, त्या गावाच्या बाजूला, माझ्या घराच्या बाजूला ५०० मीटर अंतरावर अशा प्रकारचे प्रकर घडत आहेत.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यानी नेमका प्रश्न विचारावा. आपण काय अपेक्षित आहे, त्या अनुषंगाने प्रश्न उपस्थित करावा.

श्री.भिमराव (आण्णा) तापकीर : अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील कोणत्या भागामध्ये कोणते अवैध धंदे सुरु आहेत, याबाबतची मी माहिती देतो. सदर माहिती असत्य स्वरुपाची वाटत असेल तर आपण त्याबाबतची खात्री करु शकता.

अध्यक्ष महोदय, वारजे भागामध्ये ओव्हल नेस्ट, गोकुळनगर पठार, अमृतवेल सोसायटी, रामनगर झोपडपट्टी वस्ती, कुलकर्णी हॉस्पिटलचा परिसर, कर्वे नगर हद्द, त्याचप्रमाणे माझ्या धनकवडी भागामध्ये सहकार पोलीस स्टेशन अंतर्गत मोहन नगर, बोकसे नगर, बालाजी नगर, आंबेगाव फाटा, दाहिरी परिसरामध्ये DSK रोड, अंबामाता मंदिर, खंडोबा मंदिर, कारे चौक, पोकळे वस्ती, खडकवासला गावामध्ये असणाऱ्या बाजूच्या वस्तीमध्ये, तसेच नांदेड या भागामध्ये अवैधपणे दारूचे धंदे आजही चालत आहेत. सदर ठिकाणी अवैध धंदे चालत नाहीत असे जर आपणास कोणी माहिती दिली असेल तर मी सदर ठिकाणाचे CCTV फुटेज आपल्याकडे सादर करतो. जे अवैध व्यवसाय चालतात ते लोकवस्तीमध्ये चालतात. काही ठिकाणी सोसायट्यांचा भाग आहे. सोसायट्यांचा भाग असल्यामुळे सदर ठिकाणी CCTV कॅमेरे लावलेले असतात.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये लॉटरी सेंटर कोठे कोठे चालतात या विषयी सांगणार आहे. माझ्या स्वत:च्या गावामध्ये मुख्य रस्त्यावर लॉटरी सेंटर चालतात. लॉटरी चालविण्यासाठी परवानगी आहे किंवा नाही याबाबत मला माहिती नाही. राजरोसपणे धनकवडी गावाच्या मुख्य रस्त्यावर बालाजी नगर

श्री.भिमराव (आण्णा) तापकीर.......

श्री.भिमराव (आण्णा) तापकीर.......

भागामध्ये, त्याच प्रमाणे कात्रजच्या दत्तनगर या भागामध्ये, शिवने, कोपरे आणि वारजे.....

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यानी प्रश्न विचारावा. सदर माहिती देण्यामध्ये सभागृहाचा वेळ वाया जात आहे.

श्री.भिमराव (आण्णा) तापकीर : अध्यक्ष महोदय, या भागांमध्ये चालू असलेले अवैध दारूचे धंदे केव्हा बंद होतील? तसेच माझ्या मतदारसंघाच्या भागामध्ये अवैध पद्धतीने महिला देहविक्रीचा व्यवसाय करत होत्या, भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन अंतर्गत सदर प्रकार घडत होता. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी धाड टाकल्यानंतर तो व्यवसाय बंद केला. याबाबत मला एकच विचारावयाचे आहे की, अवैध व्यवसाय सुरू असताना संबंधित पोलीस स्टेशनचे अधिकारी काय करीत होते ? संबंधित महिलांकडून हप्ते गोळा करण्याचे काम करीत होते काय असा माझा प्रश्न आहे. अशा प्रकारचे अवैध धंदे बंद होतील काय ?

अध्यक्ष महोदय, एखाद्या दिवाणी बाबीमध्ये पोलीस यंत्रणा गुंडगिरी करणाऱ्यांना सहकार्य करीत असतील तर ती गंभीर बाब आहे. एखादी व्यक्ती एखाद्याच्या मालकी जागेमध्ये जाऊन हस्तक्षेप करीत असेल तर पोलीस संबंधित गुंडांवरही कारवाई करीत नाहीत व चुकीचा निर्णय घेतला त्याच्यावरही कारवाई करीत नाहीत. अशा प्रकारची बाब निदर्शनास आणून देणे ही आमची चूक आहे काय ?

श्री.दिलीपराव वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भिमराव (आण्णा) तापकीर यांनी आपल्या खडकवासला मतदारसंघामध्ये होत असलेल्या अवैध धंद्याच्या संदर्भामध्ये तीन प्रश्न उपस्थित केलेले आहेत. पोलीस स्टेशनच्या हद्दीतील काही गावे या हद्दीतून त्या हद्दीत समाविष्ट करावीत याबाबतचा त्यांचा प्रश्न आहे. सदर प्रश्न लक्षवेधी सूचनेमध्ये आहे.

श्री.दिलीपराव वळसे-पाटील........

याबाबत मी आपल्याला एवढेच सांगतो की, नांदेड, क्रिकेटवाडी, नांदुसी व खडकवासला या चार गावांचा समावेश पुणे महानगरपालिकेत झालेला आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी........

असुधारित प्रत

श्री. दिलीपराव वळसे-पाटील....

त्यामुळे जी गावे आज हवेली पोलीस स्टेशनच्या हद्दीत आहेत, त्या हवेली पोलीस स्टेशनचे विभाजन करुन प्रस्तावित नांदेड सिटी पोलीस स्टेशन निर्माण केले जात आहे. या पोलीस स्टेशन हद्दीमध्ये या गावांचा समावेश केला जाईल. दुसरा मुद्दा हा रायगड पोलीस स्टेशन हद्दीतील काही गावांसंदर्भाचा आहे. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, ही गावे पोलीस आयुक्त कार्यालयास जोडावीत. परंतु भौगोलिकदृष्टया विचार केला तर सिंहगड किल्याच्या अलीकडील जी गावे आहेत ती राजगड पोलीस स्टेशनच्या हद्दीत आहेत आणि पलिकडची गावे हवेली पोलीस स्टेशनच्या हद्दीत समाविष्ट करण्यात आली आहेत. भविष्यात राजगड पोलीस स्टेशन हे चेलाडी फाटा-नरसापूर-पुणे-सातारा महामार्गालगत स्थलांतरीत होणार आहे. त्यामुळे या गावांकरिता अधिक सुविधा उपलब्ध होतील. त्या भागातील ग्रामपंचायतींची मागणी आहे की, या गावांचा समावेश सध्या आहे तेथेच राहू द्यावा. यात बदल करु नये. याबाबतचे पत्र तेथील सरपंचानी दिले आहे. दुसरे असे की, सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघात काही अवैध धंदे सुरु आहेत. प्रत्येक पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात अशा प्रकारचे व्यवसाय सुरु राहणार नाहीत, याची काळजी घेतली पाहिजे. सन्माननीय सदस्यांकडून मी याबाबत अधिकची माहिती घेईन. यासंदर्भात संबंधितांना ताबडतोब सूचना देऊन अवैध धंदे बंद होण्यासंदर्भात निर्णय घेतला जाईल. सन्माननीय सदस्यांच्या मागणीप्रमाणे संबंधितांसोबत एक बैठक आयोजित केली जाईल.

श्री. सिद्धार्थ शिरोळे : अध्यक्ष महोदय, मागील काही दिवसात घडलेल्या पाच घटना माननीय गृह मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी पुणे येथील दत्तवाडी परिसरात एका गुंडाने १२ वर्षाच्या मुलीला फरफटत नेऊन जनता वसाहतीत तिच्यावर बलात्कार केला आहे. दिनांक १८ मार्च, २०२२ रोजी पाषाण टेकडीवर एका तरुण-तरुणीला तीन लोकांनी शिवीगाळ करुन मोबाईल ॲपद्वारे स्वत:च्या खात्यात ७६ हजार रुपये वर्ग करुन घेतले आहेत. तसेच १० दिवसांपूर्वी येरवाडा भागामध्ये जवळपास २० ते ३० दुचाकी व चारचाकी

श्री. सिद्धार्थ शिरोळे ....

वाहनांची काही गुंडांनी नासधूस केली आहे. याबाबतचे सीसीटीव्ही फुटेज आहे. मी मंत्री महोदयांना पत्र दिल्यानुसार बोपोडी आणि खडकी येथेही मोठ्या प्रमाणात अशा घटना घडल्या आहेत. बोपोडी पोलीस चौकीजवळ चार ते पाच जणांनी एका युवकाचा धारदार शस्त्राने खून केला आहे. तसेच दिनांक २५ फेब्रुवारी, रोजी काही दुकानामध्ये दरोडाही टाकण्यात आला आहे. मी मंत्री महोदयांना स्पेसिफिक प्रश्न विचारु इच्छितो की, या सर्व घटनांबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे ? असे प्रकार पुन्हा होऊ नयेत, यासाठी शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत ?

श्री. दिलीपराव वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, यासंदर्भात पुणे शहरातील सर्व सन्माननीय सदस्यांना एकत्र बोलावून पोलीस अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात येईल व याबाबत कायमस्वरुपी व्यवस्था करण्यासाठी कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या जातील. तसेच अवैध धंदे बंद होण्याकडे लक्ष दिले जाईल.

श्री. चेतन तुपे : अध्यक्ष महोदय, मी सभागृहाच्या माध्यमातून माननीय गृह मंत्र्यांना प्रश्न विचारु इच्छितो. पुणे शहरात बाल गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. सुनिल टिंगरे यांनी दोन दिवसापूर्वी केला होता. एका शाळकरी मुलीवर चाकू हल्ला झाला आहे. या बाल गुन्हेगारीकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. याकरिता कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत ? दुसरे असे की, पोलिसांची गस्त आणि पोलीस चौक्यांच्या संख्येत वाढ झाली पाहिजे, अशी स्थानिक नागरिकांची मागणी आहे. माझ्या मतदारसंघाकरिता माननीय गृह मंत्र्यांनी दोन पोलीस स्टेशन मंजूर केले आहेत. हे पोलीस स्टेशन काळेबोराटे नगर, काळेपडळ येथे आहे आणि दुसरे पोलीस स्टेशन फुरसुंगी येथे आहे. या दोन पोलीस स्टेशनमुळे नागरिकांना सुविधा उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे या दोन पोलीस स्टेशनचे काम कधीपर्यंत होणार आहे ? दुसरे असे की, शहरी भागात अंमलीपदार्थ नियंत्रण विभाग अधिक सक्षम करण्याची आवश्यकता आहे. शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी किंवा समाजातील इतर घटक हे मोठ्या प्रमाणात

असुधारित प्रत

श्री. चेतन तुपे .....

व्यसनाच्या आहारी गेले आहे. त्यामुळे ए.सी.पी. नार्कोटीक्स, पी.आय., नार्कोटीक्स अशी पदे शासन निर्माण करेल काय ? जेणेकरुन या प्रश्नाला न्याय देता येईल. आज शाळा, महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी केमिकल्सच्या गोळ्या घेतात आणि अंमलीपदार्थांचे इंजेक्शन स्वत: टोचून व्यसन करीत असतात. त्यामुळे त्यांच्या जिवाला धोका निर्माण होत आहे. म्हणून अंमलीपदार्थ नियंत्रण विभाग अधिक सक्षम करण्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात येणार आहे ?

श्री. दिलीपराव वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सदरहू लक्षवेधी सचूना ही खडकवासला मतदारसंघाच्या तक्रारीसंदर्भातील आहे. सन्माननीय सदस्य श्री. चेतन तुपे यांनी या लक्षवेधी स्कोपच्या बाहेरील प्रश्न उपस्थित केले आहेत. मी यासंदर्भात सुरुवातीलाच उत्तर दिले आहे. पुणे शहरातील सर्व सन्माननीय सदस्यांची एक बैठक घेऊन या अडचणींबाबत चर्चा करुन निर्णय घेतला जाईल. हडपसर येथे दोन पोलीस स्टेशन मंजूर करण्यात आले आहे. हे पोलीस स्टेशन लवकरात लवकर सुरु करण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात जागा उपलब्ध करुन दिली तर ते लगेच सुरु करण्यात येतील. तसेच अंमलीपदर्थाबाबतचाही विषय अतिशय महत्त्वाचा आहे. मी राज्यातील काही जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर अंमलीपदार्थ नियंत्रणाबाबत मोहिम राबविण्यासाठी पोलीस स्टेशनसंदर्भात व्यवस्था करण्यास सांगितले आहे. पुढील काळात संपूर्ण राज्यात ही व्यवस्था करण्यात येणार आहे.

-------

**पृ.शी. :** मानखुर्द-शिवाजीनगर येथील अनधिकृत गाळे हटविण्याबाबत

**मु.शी. :** मानखुर्द-शिवाजीनगर येथील अनधिकृत गाळे हटविणे यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. अबु आजमी, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. अबु आजमी (मानखुर्द) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मानखुर्द – शिवाजीनगर येथील घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड, एकता नगर, मंडाळा, टी-जंक्शन, मानखुर्द येथील अवैध गाळे शासनातर्फे हटविण्यात येणे, परंतु, तेथे पुन्हा अवैधरीत्या गाळे बांधण्यात आले असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ वा त्यासुमारास निदर्शनास येणे, अवैध व्यावसायिक गाळे हटविण्याबाबत वारंवार संबंधित विभागांकडे मागणी करूनही अद्यापपर्यंत अवैध गाळे हटविण्यात न येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

डॉ. जितेंद्र आव्हाड (गृहनिर्माण मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**(प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

श्री अबू आजमी : अध्यक्ष महोदय, मानखुर्द-शिवाजीनगर में टी-जंक्शन पर एक फाईव्ह स्टार शौचालय बनाने के लिए मैंने परमिशन मांगी, तो मुझे जवाब आया कि यह नो डेव्हलपमेंट झोन है, यहां पर परमिशन नहीं मिलेगी. वहां पर बड़े बड़े ६ गाले बन गए. जब मैंने इसकी शिकायत की तो ६ गाले तोड़ दिए गए. एक सप्ताह में फिर से ८ गाले बन गए. इस बारे में मैंने फिर शिकायत की, तो ५ गाले तोड़ दिए गए. अधिकारियों ने जानबुझकर ३ गाले नहीं तोड़े. वे इंतजार करते रहे, चाय पीते रहे, ४.०० बजे तक समय निकालते रहे. शाम को ४.०० बजे कोर्ट का स्टे आ गया. अगली तारीख पर सेशन कोर्ट ने स्टे खारिज कर दिया. उसके बाद इन लोगों ने मुंबई उपनगर के अतिरिक्त जिलाधिकारी (अतिक्रमण) से फिर स्टे ले लिया. स्टे फौरन मिल गया. वह स्टे भी दो हिअरिंग में खारिज हो गया. फिर इन लोगों ने जीआरसी कमिटी से, ॲडिशनल कलेक्टर से सम्पर्क किया और उन्होंने अगली तारीख पर हिअरिंग लगायी, उसके बाद उन्होंने फिर इसे खारिज कर दिया. ये लोग फिर से हाई कोर्ट गए. हाई कोर्ट से फिर स्टे मिल गया. बार बार स्टे खारिज हुआ. इस बारे में मुझे वहां के जो भूमाफिया है, वे मुझे एक बड़ी रकम देने के लिए आएं. मैंने उनको भगा दिया. वहां के अधिकारी और पुलिस की मिलीभगत से जानबुझकर ये स्टे दिया गया है. हमने बार बार जिला कलेक्टर और मुलुंड के तहसीलदार को इस बारे में बताया. कलेक्टर ने तहसीलदार से कहा कि आप मानखुर्द पुलिस स्टेशन में एक एफआईआर डाल दीजिए. तहसीलदार ने पत्र दिया. लेकिन आज तक कोई एफआईआर नहीं हुआ.

अध्यक्ष महोदय, इसका सीधा सीधा मतलब यह है कि इस बारे में पुलिस और अधिकारियों की मिलीभगत से बड़ी बड़ी जमीन पर कब्जा हो रहा है. मेरी मांग है कि वहां पर कोई सीनियर ए.जी.पी. नियुक्त किया जाए. जिन लोगों ये बनाया है, उनके नाम सब जानते है. वे भूमाफिया है. उन पर एमआरटीपी कानून के तहत केस दर्ज होना चाहिए और इसको तोड़ने के लिए सरकार का जितना खर्चा हो रहा है, क्या वह सारा खर्च उनसे वसूल किया जाएगा?

अध्यक्ष महोदय, मेरा दूसरा प्रश्न यह है कि हमारे यहाँ कुर्ला स्क्रैप है. ३० साल के लिए जमीन लिज पर दी गई थी. वह लिज सन २००७ में खत्म हो गई.

श्री अबू आजमी.....

उन पर ३७ करोड़ रुपये का बकाया है. जितनी जगह उनको दी गई थी, उससे कई गुना ज्यादा जगह वे इस्तेमाल कर रहे है, ऐसा कलेक्टर ने लिखा है. वहां पर इल्लीगल काम होता है. साबून, तेल और स्क्रैप का इल्लीगल काम होता है. इसके कारण वहां पर हर साल आग लगती है. उससे जान और माल का नुकसान होता है. वहां पर स्लम की बड़ी आबादी है. वहां पर लोग परेशान होते है. इस बारे में कई बार बात की गई है, लेकिन आज तक उस पर कुछ भी काम नहीं हुआ. मेरी मांग है कि कुर्ला स्क्रैप की जगह तुरंत खाली करायी जाए और जो पैसे बाकी है, वह पैसे उनसे वसूल किए जाए. ये सारे इल्लीगल धंधे बंद किए जाने चाहिए. वह जगह किसी अच्छे काम में लायी जानी चाहिए. क्या मंत्री महोदय इस बारे में कोई कार्रवाई करेंगे? वहां पर बाऊंड्री बनायी जानी चाहिए.

अध्यक्ष महोदय, शंकरा कॉलोनी में स्लम लॉर्ड ने बहुत सारी जगह पर कब्जा कर लिया और बड़े बड़े शेड्स बनाए है. मैंने सम्माननीय पालक मंत्री जी को फाईल और फोटो भी दिए थे. उनको ७-८ लाख रुपये महीने का भाड़ा आता है. उनके गुंडे वहां पर बैठते है. उस पैसे से गुंडागर्दी, दादागिरी होती है, वहां कोई जा नहीं सकता. मैंने शिकायत की, कलेक्टर ने वहां आदमी भेजा, विजिट हुई, लेकिन आज तक कोई भी कदम नहीं उठाया गया. इनके हौसले बुलंद है. इन सब का डिमॉलिशन तुरंत होना चाहिए. क्या सरकार इस बारे में कोई बंदोबस्त करेगी? जो लोग इस तरह से कब्जा करके गाले बना रहे है, तो पुलिस को बुलाकर उन पर कानूनी कार्रवाई करने के लिए कहा जाना चाहिए. जितना भी सरकारी खर्च डिमॉलिशन के लिए होता है, क्या वह उनसे वसूल किया जाएगा ?

डॉ.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, ही गोष्ट खरी आहे की सदर ठिकाणी ६ गाळे होते. त्यापैकी ४ गाळे पाडून २ बाकी ठेवण्यात आले. २ गाळे का बाकी ठेवण्यात आले हा खरा प्रश्न आहे. कारण गाळे पाडायचे काम फार मोठे नसते केवळ १५ मिनिटांमध्ये हे सर्व गाळे पाडून झाले असते. त्यामुळे या सर्व बाबी संशयास्पद आहेत. त्याला स्टे घेण्यास वेळ देणे, पोलिसांनी बंदोबस्त न देणे, इत्यादी.

डॉ.जितेंद्र आव्हाड.....

अशा रितीनेच मुंबई शहरामध्ये इलिगल स्ट्रक्चर्स वाढत आहेत. इस कार्रवाई में जो भी अधिकारी था, उसने ये धीमेपना क्यों किया ? इसकी जांच की जाएगी. उसकी जिम्मेदारी फिक्स की जाएगी और कानून के तहत उस पर कार्रवाई की जाएगी.

अध्यक्ष महोदय, सदर ६ गाळे अत्यंत महत्त्वाच्या जागेवर आहेत. तेथे गाळे नसावेत कारण त्याच्या सर्व आजुबाजूने रस्ते जात आहेत. हे गाळे बांधताना पुढे व मागे असा दोन्ही बाजूंनी फ्रंटेज घेण्यात आलेला आहे. या प्रकरणी ए.जी. स्वत: उच्च न्यायालयात शासनाच्या बाजूने उभे राहतील, अशी व्यवस्था करण्यात येईल. ये जो गाले है वह तुरंत तोड़े जाएंगे. इनको बक्शा नहीं जाएगा.

श्री अबू आजमी : अध्यक्ष महोदय, कुर्ला स्क्रैप और शंकरा कॉलोनी का मामला है...

डॉ.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, सम्माननीय सदस्य श्री अबू आजमी जी, आपने जो लक्षवेधी डाली है, उसमें कुर्ला स्क्रैप और शंकरा कॉलोनी का कोई उल्लेख नहीं है. वह अगर नाजायज है, इल्लीगल है, तो उसकी जानकारी एक लेटर हेड पर मुझे दीजिए. मैं उस पर "तुरंत कार्रवाई करो", ऐसा लिखकर डिपार्टमेंट को भेजुंगा और मैं खुद पीछे लगकर उस पर कार्रवाई करुंगा.

---------

असुधारित प्रत

## पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशनबाबत

कॅप्टन आर. तमिल सेल्वन : अध्यक्ष महोदय, मेरा पॉईंट ऑफ इन्फोर्मेशन है. कल रात को दो नगरसेवक और उनके साथियों ने मिलकर भारतीय जनता पार्टी के वॉर्ड अध्यक्ष श्री दत्ता केलुस्कर को मारा गया. मारने के बाद दोनों नगरसेवकों को ट्रक टर्मिनल पुलिस स्टेशन में लेकर गए. उनको चाय-पानी दिया गया. जिसने मार खाया, उस व्यक्ति की वैद्यकीय जांच के बाद, मेडिकल सर्टीफिकेट के बाद, प्रोसिजर के अनुसार उसको छोड़ना चाहिए. मेडिकल सर्टीफिकेट आने के पहले ही इन दोनों नगरसेवकों को ट्रक टर्मिनल पुलिस स्टेशन ने छोड़ दिया. सम्माननीय मंत्री श्री पाटील साहब सदन में बैठे है. उन्होंने दो दिन पहले ही जवाब दिया था. नगरसेवक हो, विधायक हो, मंत्री हो या कोई भी हो, उनको छुट नहीं है. पुलिस की कार्रवाई सब के साथ एक जैसी होगी. कल रात को भारतीय जनता पार्टी के वॉर्ड अध्यक्ष के साथ अन्याय हुआ है. इस बारे में किसी पर भी एफआईआर दर्ज नहीं हुआ है.

अध्यक्ष महोदय, सन २०२० में भारतीय जनता पार्टी का श्री धिवारी नामक एक व्यक्ति है.....

**तालिका सभाध्यक्ष (श्री संजय सिरसाठ)** : अभी की घटना के बारे में आपका जो पॉईंट ऑफ इन्फोर्मेशन है, उस पर आप बोलिए.

कॅप्टन आर. तमिल सेल्वन : अध्यक्ष महोदय, ये बहुत महत्व का विषय है. भारतीय जनता पार्टी....

**तालिका सभाध्यक्ष (श्री संजय सिरसाठ)** : इसमें पार्टी का सवाल नहीं है. अभी आपका पॉईंट ऑफ इन्फोर्मेशन क्या है वह बताईए.

कॅप्टन आर. तमिल सेल्वन : अध्यक्ष महोदय, इस बारे में एफआईआर दर्ज नहीं हो रहा है. पुलिस बात नहीं सुन रही है.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशनद्वारे वॉर्ड क्रमांक १७३ चे वॉर्ड अध्यक्ष श्री.दत्ता केळुस्कर यांच्यावरील हल्ल्याबाबतची माहिती विचारली आहे. मंत्री महोदयांनी याबाबत माहिती घेऊन निवेदन केल्यास बरे होईल.

श्री.दिलीपराव वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, ठीक आहे.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** मुंबई महापालिका हद्दीतील पी/उत्तर विभागाचे पी/पूर्व आणि पी/पश्चिम असे विभाजन करण्याबाबत.

**मु.शी.:** मुंबई महापालिका हद्दीतील पी/उत्तर विभागाचे पी/पूर्व आणि पी/पश्चिम असे विभाजन करण्याबाबत सर्वश्री सुनिल प्रभू, अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई उपनगररातील मुंबई महानगरपालिकेच्या मालाड पूर्व-पश्चिम येथील नागरिकांना, मुलभूत नागरी सेवा-सुविधा उपलब्ध व्हावी याकरिता दिंडोशीच्या स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्रव्यवहार करुन केलेल्या पाठपुराव्यानुसार शासन तथा मुंबई महापालिकेने पी/उत्तर विभागाच्या विभाजनास सन २०१९ मध्ये मान्यता देऊनही अद्याप पी/पूर्व आणि पी/पश्चिम अशी महापालिकेची स्वतंत्र प्रभाग कार्यालये सुरु न झाल्याची बाब दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२ रोजी निदर्शनास येणे, यामुळे मालाड पुर्व-पश्चिम भागातील नागरिकांची प्रशासकीय कामे आणि नागरिंकाना मुलभूत, सेवा-सुविधा प्राप्त करण्यास अद्यापही अडचणीचे होऊन त्रासदायक ठरत असणे, पी/उत्तर विभागाचे पी/पूर्व आणि पी/पश्चिम असे विभाजन करुन, दोन स्वतंत्र कार्यालयाकरिता दोन इमारती, आवश्यक अधिकारी व कर्मचाऱ्यांची नवीन पदे निर्मिती करुन व त्याकरिता आवश्यक निधीची पालिकेच्या बजेटमध्ये तरतूद, कार्यालय सुरु करणेबाबतचा प्रस्ताव सादर होऊनही अद्याप स्थापत्य समिती (उपनगरे)/विधी समिती यांची मान्यता मिळु न शकल्याने सदरहु प्रभाग कार्यालय विभाजनाचे दोन वर्षेपासुन प्रलंबित असल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, विभाग कार्यालयाच्या इमारतीची व्यवस्था करणेबाबत तसेच इमारतीची जागा उपलब्ध होऊन प्रभाग कार्यालय सुरु करणेबाबत काय कार्यवाही केली आहे,

असुधारित प्रत

श्री.सुनिल प्रभू.....

अद्याप याचा खुलासा शासनाकडून करण्यात न येणे, तसेच वॉर्ड विभाजनासाठी निधीची तरतुद केली नसल्यामुळे मालाड (पूर्व) भागातील नागरीकांना गेल्या दोन वर्षांपासून नवीन वॉर्डपासून वंचित रहावे लागणे, सदरहु विभाजनाचे प्रलंबित प्रस्तावास महापालिकेच्या संबंधीत अधिकारी वर्गाकडून कार्यवाही करण्यास झालेले दुर्लक्ष, यामुळे मालाड पूर्व-पश्चिम भागातील लाखो सर्वसामान्य नागरिकांची झालेली व होत असलेली प्रचंड गैरसोय,याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.प्राजक्त तनपुरे (नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री.सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरालाच माझी हरकत आहे.

अध्यक्ष महोदय, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील पी/उत्तर विभागाचे विभाजन पी/पूर्व आणि पी/पश्चिम करण्यासाठी महानगरपालिकेने दिनांक २७.०१.२०२२ रोजी प्रस्ताव मंजूर केला. मागील पाच वर्षांपासून याबाबतची प्रक्रिया सुरु आहे. प्रक्रिया सुरु करण्यासाठी पत्र देण्यापासून महापालिकेचा प्रस्ताव आल्यानंतर समितीमध्ये मंजूर होणे, त्यावर अभिप्राय येणे, सर्व प्रशासकीय बाबींची पूर्तता होऊन नगरविकास विभागाची मान्यता मिळणे या सर्व बाबींचा यामध्ये समावेश होतो.

अध्यक्ष महोदय, पी/उत्तर विभागाचे दोन विभागांमध्ये विभाजन करण्यामागचे कारण मी या निमित्ताने सांगू इच्छितो. या विभागामध्ये एका बाजूला सन्माननीय सदस्य श्री.अतुल भातखळकर यांचा व दुसऱ्या बाजूला माझा मतदारसंघ आहे. पी/उत्तर विभागाची लोकसंख्या सुमारे ७ लाखांच्या आसपास असून तेथे सुमारे ५ लाख मतदार आहेत. त्यामुळे एवढया मोठया अवाढव्य प्रभागाचे दोन भागांमध्ये विभाजन झाले तर नागरिकांना चांगल्या प्रकारे सेवा-सुविधा देता येतील. आपण देखील संभाजीनगर महानगरपालिकेमध्ये नगरसेवक म्हणून काम केलेले आहे. त्यामुळे नागरिकांच्या अपेक्षा आपण जाणता. ॲसेसमेंटचे बिल, पाणी बिल, दुकाने व आस्थापनांचे परवाने, जन्म-मृत्यू दाखले, इत्यादी सेवा-सुविधा घराच्या जवळ असल्या पाहिजेत, असे नागरिकांना वाटत असते. आज अनेक सुविधा ऑनलाईन झाल्या असल्या तरीही अनेक गोष्टी फिजिकली जाऊन कराव्या लागतात. त्यामुळे वॉर्डची निर्मिती होणे गरजेचे आहे. हा १९ नगरसेवकांचा वॉर्ड आहे. त्यामुळे त्याचे विभाजन झाले पाहिजे, अशी आमची मागणी होती.

अध्यक्ष महोदय, वॉर्डचे विभाजन झाल्यानंतर अर्थसंकल्पीय तरतूद करणे, प्रशासकीय कामकाजासाठी पदनिर्मिती करणे व वॉर्डसाठी जागेची व्यवस्था करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची होती. परंतु प्रशासनाकडून देण्यात आलेल्या उत्तरामध्ये नवीन जागा सुचविण्यात आलेली आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की,

श्री.सुनिल प्रभू.....

"नवीन पी/पूर्व विभागासाठी स्वतंत्र इमारतीची व्यवस्था सीटीएस क्रमांक ५५८/बी ते ५५८/बी-१ ते ४० या बृहन्मुंबई महापालिकेच्या मालमत्तेमध्ये प्रस्तावित झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात करण्याचे प्रस्ताविले आहे."

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. सुनील प्रभू..

याबाबत आनंद आहे. आपण माहिती घ्यावी. माझ्या माहितीप्रमाणे याची माहिती घेतली असेल तर याला ३-४ वर्षे लागतील. पण ३-४ वर्षांनी या वॉर्डचे विभाजन होऊन पुन्हा या सर्व लोकांना मालाड पश्चिममध्ये असलेल्या जुन्या वॉर्ड ऑफिसमध्ये या सर्व कामांसाठी जावे लागले. गेल्या ५ वर्षात लोकप्रतिनिधी आणि नगरसेवक यांनी केलेल्या मेहनतीचा फायदा काय आहे. ही एसआरएची इमारत तयार होऊन आपल्याला ताब्यात मिळण्यासाठी ३ वर्षे लागतील. पण तोपर्यंत प्रशासनाची जबाबदारी अशी आहे की, पी पूर्व हे कार्यालय बजेट तरतूद, प्रशासकीय व्यवस्था आणि जागा किती दिवसामध्ये मिळणार, हे सांगणे आपण गरजेचे होते. परंतु त्याला लांब लांब आणि गोल गोल असे जे उत्तर दिलेले आहे ते हरकत घेण्यासारखे असल्यामुळे मी त्यावर हरकत घेतली होती. सन्माननीय सदस्य श्री. अतुल भातखळकर याला पाठिंबा देतीलच, अशी मला अपेक्षा आहे. म्हणून आपण पीठासनावरुन आदेश द्यावेत की, येणाऱ्या किती दिवसात आपण हे पी पूर्व वॉर्ड कार्यालय आपण महापालिका प्रशासनाच्या वतीने सुरू करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, आज रोजी ते कार्यालय तात्पुरत्या स्वरुपात सुरू करु आणि त्यासाठी जागा कशा पध्दतीने उपलब्ध होतील ते तपासून घेऊ आणि जेव्हा आपल्याला कायम स्वरुपी कार्यालय उपलब्ध होईल तेव्हा हे संपूर्ण कार्यालय तेथे शिफ्ट करु. परंतु आता विभाजन झाल्यानंतर हे कार्यालय किती दिवसात सुरू होणार यासंबंधी नगरविकास मंत्र्यांनी माहिती दिली तरच ही लक्षवेधी या सभागृहात उपस्थित करुन आणि या सभागृहाचा वेळ घेऊन सादर केल्याबद्दल त्याला न्याय मिळेल, असे माझे मत आहे. म्हणून यावर मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, हे खरे आहे की, हा वॉर्ड पूर्व पश्चिम खूप मोठ्या प्रमाणात विस्तारलेला आहे. मधून पश्चिम रेल्वेची लाईन देखील जाते. त्यामुळे मालाडमध्ये पूर्व आणि पश्चिम या दोन भागांमध्ये हा विभागलेला वॉर्ड आहे. एका बाजूला ऑफिस असल्यामुळे दुसऱ्या बाजूच्या नागरिकांना येथे जाण्यासाठी वेळ लागतो, हे सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते खरे आहे. सन्माननीय सदस्यांनी

श्री. प्राजक्त तनपुरे..

ज्या तडफेने आणि तळमळीने त्यांच्या मतदार संघातील नागरिकांची भावना या ठिकाणी व्यक्त केली आहे. त्यामुळे लोकांना येण्या-जाण्यासाठी होणारा त्रास, त्या वॉर्डची मोठी असलेली भौगोलिक रचना, मधून रेल्वे लाईन जाणे या सर्व बाबी विचारात घेता दिनांक २७.१.२०२२ रोजीच्या महापालिकेच्या ठरावानुसार दोन पी पूर्व आणि पू पश्चिम असे दोन वॉर्ड मंजूर झालेले आहेत. परंतु नुसते वॉर्ड मंजूर होऊन उपयोग नाही, ही त्यांची भावना अत्यंत रास्त आहे. त्या दृष्टीने येणाऱ्या कालावधीत पश्चिमेमधील कार्यालयाचे विभाजन होऊन पूर्व भागात एक नवीन कार्यालय व्हावे, अशी त्यांची भावना आहे. त्यामुळे उत्तराला देखील त्यांनी हरकत घेतली आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या माहितीनुसार जर या एसआरए प्रकल्पाला प्रत्यक्षात ३-४ वर्षे लागणार असतील, तशी शक्यताही वाटते. त्यामुळे महापालिका प्रशासनाला आदेश देण्यात येतील की, पी पूर्व भागामध्ये महापालिकेच्या कोणत्या तरी इमारतीत हे चालविणे शक्य आहे काय किंवा महापालिकेला कुठे तरी अमेनिटीची जागा मिळाली असेल तर तेथे हे सुरू करणे शक्य आहे काय, याबाबतच्या सर्व शक्यता येत्या २ महिन्यात तपासून पुन्हा एकदा ज्या सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना मांडली आहे त्या दोन्ही सन्माननीय सदस्यांसमवेत बैठक घेऊन ज्या ज्या शक्यता आहेत त्या एक्सप्लोअर करुन ज्या जागांचे पर्याय समोर येतील ते आपल्या दोघांसमवेत बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल. येत्या २ महिन्यात ही बैठक घेण्यात येईल. इतरही त्या वॉर्डचे जे बजेट अर्थसंकल्पीत झाले असेल त्याचे उचित पध्दतीने विभाजन करणे किंवा पद निर्माण करणे या बाबी येत्या ६ महिन्यात करण्याचे महापालिकेला आदेशित करण्यात येईल.

श्री. अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "ती अर्थसंकल्पीय तरतूद करण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येणार आहे." ही कार्यवाही पी उत्तर/पूर्व विभागासाठी असेल. मूळात २ वर्षापूर्वी मी सदनामध्ये विचारलेल्या प्रश्नाच्या लेखी उत्तरातून पी नॉर्थचे पूर्व आणि पश्चिम असे २ वॉर्ड करणार असे मान्य केले आहे. त्यानंतर बजेटमध्ये तातडीने ५ कोटी रुपयांची

श्री. अतुल भातखळकर..

तरतूद या सर्व कामांकरिता केली होती. या उत्तरामध्ये असेही नमूद आहे की, माननीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे. आता ही समिती कशाकरिता निर्माण केली, हे मला काही कळले नाही. एक नवीन वॉर्ड निर्माण झाला की प्रत्येक वॉर्डसाठी किती प्रकारची पदे असावीत हे महापालिकेमध्ये ठरलेले आहे. त्यात वेगळे काय ठरवायचे आहे. फर्निचर कसे असावे यासाठी महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करायची काय, म्हणून माझे २ स्पेसिफिक प्रश्न आहेत. आता अर्थसंकल्पीय तरतूद झाली आहे. मंत्री महोदयांनी उत्तर सकारात्मक देण्याचा प्रयत्न केला. पण ते म्हणाले की, ही बैठक २ महिन्यात घेऊ. मी त्यांना सांगू इच्छितो की, ही बैठक १५ दिवसात घ्यावी. पद निर्मिती २ महिन्यात झाली पाहिजे. दुसरे म्हणजे आम्ही एसआरएच्या योजनेमधील आम्ही जी जागा प्रस्तावित केली होती ती होईल तेव्हा होईल. पण तोपर्यंत काही जागा तेथील विधानसभा सदस्य म्हणून श्री.सुनील प्रभू आणि लगतच्या विभागातील विधानसभा सदस्य म्हणून मी काही जागा महापालिकेला ऑलरेडी सूचविलेल्या आहेत. त्यामुळे त्या ठिकाणी या वॉर्डचे तात्पुरते कार्यालय सुरू करण्याचा महापालिकेला आपण आदेश देणार आहात काय असे माझे २ स्पेसिफिक प्रश्न आहेत.

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, मी ऑलरेडी या प्रश्नाला उत्तर दिलेले आहे. आपण काही जागा सूचविल्या हे मला माहिती नव्हते. परंतु मी मघाशी सूचविले होते की, लगेच ज्या काही जागा उपलब्ध असतील त्या एक्सप्लोअर करा आणि त्याच्या आढाव्यासाठी म्हणून ही बैठक घेण्याचे ठरविले आहे. म्हणजे आपण ज्या सूचना दिल्या आहेत त्यांचे पालन झाले की नाही याचा आढावा घेण्यासाठी २ महिन्यांनी ही बैठक ठेवली आहे. अधिकाऱ्यांना लगेच सूचना केल्या आहेत की, पूर्व भागामध्ये अजून कोणकोणत्या जागा महापालिकेच्या आहेत किंवा नसतील तर अमेनिटीमधून काही जागा आल्या असतील तर त्या बघा आणि उद्यापासून हे काम सुरू करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्याचा आढावा घेण्याकरिता आपण दोन्ही सन्माननीय सदस्यांच्या उपस्थितीत ही बैठक होईल.

असुधारित प्रत

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, न.भू.क्र. ५५८/बी आणि ५५८/बी-१ ते ४० पर्यंत येथे संपूर्ण एसआरए योजना राबविली जाणार आहे. जेव्हा या ठिकाणच्या झोपड्या खाली करणार आहात तेव्हा एसआरए प्राधिकरणाला सरकार म्हणून तातडीने सूचित करणार आहात काय की जेथे झोपड्या आहेत त्या आधी खाली करण्यात याव्यात की जेथे महापालिकेचे नवीन कार्यालय बांधण्यात येणार आहे. आपण जर ही जागा निश्चित केली असेल तर त्या जागेवरील झोपड्या खाली करण्याबाबत आपण सरकार म्हणून एसआरएला निर्देश देणार आहात काय, हा माझा पहिला प्रश्न आहे. आस्थापना सूची तयार असते. त्याला वेगळे काही करण्याची आवश्यकता नाही. त्याला बजेट तरतूद करा... त्यामुळे न.भू.क्र. ५५८/बी आणि ५५८/बी-१ ते ४० येथे एसआरए योजना राबविली जाणार असल्याने तेथील झोपड्या खाली करुन तेथे नवीन वॉर्ड ऑफिस निर्माण केल्यानंतरच त्या विकासकाला पुढील कामाची सी.सी. मिळेल असे निर्देश आपण एसआरए ॲथॉरिटी आणि सक्षम प्राधिकारी यांना देणार आहात काय ?

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, कदाचित हे शक्य होणार नसेल तर मी आधीच सांगितले की, इतर देखील पर्याय तपासून पहावेत. कागदावर आपल्याला ते कधी कधी शक्य वाटते. आपण सांगितल्यानुसार मी संबंधित एसआरएच्या सी.ओ.ला हे लगेच करण्याचे निर्देश देतो. परंतु हे प्रॅक्टीकली शक्य होणार नसेल तर मी मघाशी उत्तरात सांगितल्यानुसार इतरही पर्याय आपण तपासून पाहणार आहोत.

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय सकारात्मक उत्तर देत आहेत. पण मी त्यांना सांगू इच्छितो की, ही जमीन महापालिकेने प्रस्तावित केली आहे. त्यामुळे तेथील झोपडपट्टी उठविली तरच ते शक्य आहे. इतर तेथे कोणत्याही जागा उपलब्ध नाहीत किंवा अमेनिटीच्या जागा उपलब्ध नाहीत. कारण मी तेथे १९३८ पासून म्हणजे माझ्या जन्मापासून राहतो. त्यामुळे तेथे इतर कोणतीही जागा शिल्लक नाही. त्यामुळे आपण निवेदनात नमूद केलेल्या जमिनीच्या स.नं.वर नवीन वॉर्ड ऑफिस प्रस्तावित असल्याने पहिल्यांदा त्या झोपड्या खाली केल्या जातील, असे निर्देश आपण महापालिकेला देण्यात यावेत.

असुधारित प्रत

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, शासन या बाबतीत अत्यंत सकारात्मक आहे. आम्ही तर तसे निर्देश देऊ. परंतु प्रॅक्टीकली जर तेथे अजून काही अडचणी आल्या तर इतर ऑप्शन आहेत. त्यामुळे जर काही करायचे असेल तर पहिल्यांदा हे करावे, असे निर्देशा देण्यास काही अडचण नाही.

श्री. दिलीप लांडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुनील प्रभू यांनी मंत्री महोदयांचे लक्ष वेधले आहे. त्या अनुषंगाने माझ्या विभागातील एल वॉर्डचे विभाजन करुन एल उत्तर आणि एल दक्षिण असे २ विभाग करण्यात येणार आहेत. मी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंती करतो की, ज्याप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. सुनील प्रभू यांनी सूचना मांडली की गेली अनेक वर्षे शासनाचे आणि महापालिकेचे याकडे दुर्लक्ष आहे. अशाच प्रकारे माझ्या विभागाकडे दुर्लक्ष होऊ नये मंत्री महोदयांनी एल विभागातील एल उत्तर आणि एल दक्षिण असे प्रभाग निर्माण करण्याच्या दृष्टीने तातडीने बैठक घ्यावी. पुढील महिन्यात या विषयासंबंधी बैठक आयोजित करावी, अशी मंत्री महोदयांना माझी विनंती आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

अप्रकाशित प्रत

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय,सदरचा प्रश्न हा लक्षवेधी सूचनेचा विषय नसला तरी देखील सन्माननीय सदस्यांची भावना लक्षात घेऊन यासंबंधी बैठक घेण्यात येईल.

श्री रईस शेख : अध्यक्ष महोदय, सम्माननीय सदस्य और भूतपूर्व महापौर श्री सुनिल प्रभू जी ने जो प्रश्न उठाया है, जब सम्माननीय सदस्य श्री सुनिल प्रभू जी महापौर थे, तब से यह प्रस्ताव चर्चा के लिए है. मेरा प्रश्न यह है कि रिऑर्गनाईजेशन ऑफ वॉर्ड के लिए बीएमसी के अंडर में एक समिति बनी है. क्या यह बात सही है ? सम्माननीय सदस्य श्री दिलीप लांडे जी ने जिस तरह से "एल" वॉर्ड का विषय लिया. उसी तरह "ए,बी,ई" वॉर्ड और तमाम वॉर्ड के इश्यू है. उस समिति की रिपोर्ट को आप क्यों इम्प्लीमेंट नहीं कर रहे है? क्या आप आश्वासन देंगे कि जो रिऑर्गनाईजेशन ऑफ वॉर्ड के अंदर बीएमसी के माध्यम से जिस रिपोर्ट को आयुक्त की मान्यता है, क्या वह पूरी इम्प्लीमेंट होगी ? ताकि "एल, ए, बी, ई और पी" वॉर्ड को भी न्याय मिल सके. क्योंकि ये मुद्दा सम्माननीय सदस्य श्री सुनिल प्रभू जी महापौर थे, तब से ये विषय चर्चा में है.

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, आजचा विषय तसा नाही. कारण हा विषय पी/वॉर्ड पुरताच मर्यादीत आहे. याबाबत बैठक घेण्याची आवश्यकता नाही. तशी समिती स्थापन झाली होती. त्या समितीच्या अहवालावर काय करायचे हा विषय महापालिकेचा आहे.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय,सन्माननीय सदस्य श्री. सुनील प्रभू यांच्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर आलेले नाही. परंतु सन्माननीय सदस्य श्री. योगेश सागर यांचे बोलणे रेकॉर्डवर चुकीचे जाऊ नये यासाठी मी त्यांना विनंती करणार आहे. ते म्हणाले माझा जन्म सन १९३८ पासून आहे. त्यांचे वय ८४ वर्ष आहे.

**तालिका सभाध्यक्ष(श्री. संजय शिरसाट) :** आपण सर्व सन्माननीय सदस्य किती वर्षापासून राहता किंवा जन्म कधीचा आहे हा सर्व विषय काय सुरु आहे? सन्मानीनय सदस्य ॲड. आशिष शेलार आपल्याला यातून नेमके काय ठरवायचे आहे.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, सन्मानीय सदस्य श्री. रईस शेख यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबत माननीय मंत्र्यांनी सांगितले की, हा विषय संबंधीत नाही. हा माझा पी/उत्तर, पूर्व आणि पश्चिमबाबत आहे. परंतु पूर्ण मुंबईचे जोपर्यंत रिवर्कींग होणार नाही तोपर्यंत पी/उत्तर देखील बदलेल. त्यांनी म्हटलेली बाब यासाठी खरी आहे की, डीएमसीच्या अंतर्गत ऑर्गनायझिंग द वॉर्ड जसे ग्रामीण भागात तहसिल कर्यालय नेहमीसाठी आहे. तसेच वॉर्ड कार्यालय मुंबईतील जन प्रतिनिधींसोबतच सामान्य नागरिकांसाठी आहे. पिण्याच्या पाण्याचे बिल, मालमत्ता कर तसेच शॉप ॲन्ड इस्टॅब्लिशमेंटसाठी तसेच जन्माचा दाखला, मृत्युचा दाखला घेण्यासाठी देखील इथेच तिथेच जावे लागते. त्यामुळे हे कार्यालय त्यासाठी आवश्यक असे केंद्र आहे. त्यामुळे आपण पी/उत्तरसाठी कर्यालय देत असले तरी देखील मुंबईतील पूर्ण कार्यालयाची जी रचना झाली आहे ती समानतेच्या आधारावर आहे असे कोणी धाडसाने म्हणू शकणार नाही. कारण ती असमानतेच्या आधारावर झाली आहे.याचा अर्थ आमच्याकडे तहसिल कार्यालयाचे केंद्रे, स्टॅम्प ड्युटीच्या रेडी रेकनरचे सर्कल, पोलीस स्टेशनचा विभाग, ट्राफिक पोलिसांचा विभाग, एरिया ऑफ स्क्वेअर किलोमीटर, लोकसंख्या हे सर्व पॅरामीटर्स आहेत.

अध्यक्ष महोदय, आजचा विषय हा पी/ उत्तरसाठी मर्यादित असल्यामुळे आज ठोस उत्तर देता येणार नाही हे मला मान्य आहे. परंतु या निमित्ताने मुंबईकर नागरिकांना आपल्या माध्यमातून एक दिलासा मिळेल. यासाठी इथे बसलेल्या कोणाचाही हरकत नाही. पूर्ण मुंबईच्या सर्व विभाग कार्यालयांचे सर्व परिमानांचा विचार घेऊन समानतेच्या आधारावर रिऑर्गनायझेशन करण्याचे काम महानगरपालिकेमध्ये सुरु आहे. त्याच्या रिव्हिवची बैठक आपल्याकडे एक महिन्याच्या आत घेण्यात येईल काय ?

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, होय, बैठक घेण्यात येईल.

-------

## लक्षवेधी सूचनेसंबंधी

**तालिका सभाध्यक्ष :** आजच्या कामकाजपत्रिकेत विशेष बैठकीमध्ये दर्शविण्यात आलेल्या क्र. ७ व ८ च्या लक्षवेधी सूचना माननीय मदत व पुनर्वसन मंत्री यांच्या विनंतीवरुन पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

------

असुधारित प्रत

**पृ. शी.:** अनुदानाकरिता मागण्या

**मु. शी.:** सन२०२२-२०२३च्या अनुदानाकरिता मागण्या:

१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

(३) आदिवासी विकास विभाग

(४) इतर मागास बहुजन कल्याण विभाग

**तालिका सभाध्यक्ष** : आता १) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग २) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग ३) आदिवासी विकास विभाग ४) )इतर मागास बहुजन कल्याण विभाग म्हणजे मागण्या क्रमांक एन-२, एन-३, एन-४, एन-५, एन-६, एन-७, एन-८, एस-१, एस-२, एस-३, एस-४, एस-५, टी-२, टी-३, टी-४, टी-५, टी-६, टी-८, टी-९, टी-१०, टी-११, झेडजी-२, झेडजी-३, झेडजी-४, झेडजी-५ चर्चेला घेण्यात येतील. या मागण्यांचा तपशील कार्यक्रमपत्रिकेबरोबर वितरित केला आहे.

( **प्रेस** : येथे सोबत जोडलले मागण्यासंबंधीचे जोडपत्र छापावे )

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष** : आता १) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग २) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग ३) आदिवासी विकास विभाग ४) )इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांच्या मागण्या चर्चेला घेण्यात येतील. विभागांच्या मागण्यांचा तपशील व स्वीकृत कपात सूचनांची यादी सदस्यांना टपालखणाद्वारे वितरित करण्यात आली आहे. कपात सूचना न मांडता मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांची उत्तरे मा. मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने तीस दिवसांच्या कालावधीत सदस्यांना पाठविण्याची प्रथा माहे जुलै, २०१० पासून मान्य झाली असल्यामुळे आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही असे मी गृहीत धरतो. या चर्चेसाठी चर्चारोधापर्यात वेळ देण्यात येईल. त्यापैकी सत्तारुढ पक्षास संबंधित मंत्र्यांच्या उत्तरासह निम्मा वेळ व विरोधी पक्षास निम्मा वेळ देण्यात येईल. सदस्य वेळेचे बंधन पाळून मला सहकार्य करतील, अशी मी अपेक्षा करतो. आता चर्चेला सुरुवात होईल.

असुधारित प्रत

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, आता अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा सुरु करण्यात येत आहे. त्यासंबंधी सन्माननीय सदस्य प्रा.डॉ. अशोक उईके बोलणार आहेत. परंतु सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री, माननीय आदिवासी विकास विभाग मंत्री, माननीय इतर मागास बहुजन कल्याण विभाग मंत्री सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. आज चार विभागांची चर्चा आहे तरी देखील तीन विभागाचे मंत्री उपस्थित नाहीत. मग सन्माननीय सदस्य काय चर्चा करणार आणि कोण मुद्दे लिहून घेणार आहेत. त्यामुळे आपण सभागृह तहकुब करावे. कारण मी कोणत्याही विभागाचे नाव न घेता सांगतो की, एकही माननीय मंत्री हे विषय गांभीर्याने घेत नाहीत. अध्यक्ष महोदय, आपण या खुर्चीवर बसले आहात म्हणजे रामशास्त्री प्रभू या भूमिकेमध्ये बसलेले आहात. त्यामुळे माननीय मंत्र्यांना त्याची समज बसली पाहिजे. आजच्या मागण्यांमध्ये ओबीसीच्या आरक्षणाचा विषय आहे. परंतु त्या विभागाचे माननीय मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. आमच्या समाजातील सर्वात जास्त मदतीची आवश्यकता असणाऱ्या अशा आदिवासींच्या विषयावर चर्चा होत असताना त्या विभागाच्या बाबतीतील चर्चेसाठी कोणीही मंत्री उपस्थित नाहीत. त्यामुळे आपण १० मिनिटांसाठी सभागृह तहकूब करावे,अशी आमची विनंती आहे. माननीय संसदीय कार्यमंत्री सभागृहात उपस्थित झाले आहेत तर आपण त्यांना समज द्यावी. फुले-शाहू-आंबेडकर यांचे नाव घेऊन आपण सामाजिक न्यायाची लढाई लढतो तर सामाजिक न्याय या विषयावरील प्रश्नांना काही महत्त्व आहे किंवा नाही ? कारण सामाजिक न्याय मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. दोन्ही बाजुच्या सन्माननीय सदस्यांच्या मागणीप्रमाणे आपण १० मिनिटांसाठी सभागृह तहकूब करावे. अध्यक्ष महोदय, आपल्याकडून आमची अपेक्षा आहे आपण आम्हाला न्याय द्यावा. माननीय मंत्र्यांना आपण पाठीशी घालू नका.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार आपण सांगता त्याप्रमाणे इथे नियम लागू होत नाही कारण दोन विभागाचे कॅबिनेट मंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. त्यामुळे आपण असा विषय मांडू नका. आणखी काही वेळ लक्षवेधी सूचना चालेल या अपेक्षेने काही माननीय मंत्री बाहेर गेले होते. परंतु आता सर्वांना निरोप देण्यात आले आहेत. सन्माननीय सदस्य प्रा.डॉ. अशोक

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष....**

उईके यांचे ५ मिनिटे बोलणे होईपर्यंत माननीय मंत्री सभागृहात येतील तसेच आता माननीय सामाजिक न्याय मंत्री आलेले आहेत. ५ मिनिटांमध्ये माननीय मंत्री सभागृहात आले नाहीत तर त्यानंतर आपण निर्णय घेऊ.

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, माझा कार्यपद्धतीविषयक मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य प्रा.डॉ अशोक उईके हे आदिवासी विभागाचे मंत्री होते ते या विषयावर बोलतीलच. जिथे १० ते १२ हजार कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा आहे. आदिवासी विभागाच्या मागण्यांच्या बाबत माननीय आदिवासी विकास मंत्र्यांनी नोंद घेतली नाही तर ते उत्तरामध्ये काय सांगणार आहेत. ते म्हणतील की त्यांचे अधिकारी नोंद घेत आहेत. यामुळे सभागृहाची गरिमा खराब होत आहे. अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांना सभागृहातील अर्थसंकल्पावरील मागण्याच्या विषयाच्या बाबतीत गंभीरता नाही तर मग पुढे काय करायचे आहे ? त्यामुळे आपण सभागृह तहकूब करावे, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर...

श्री. राधाकृष्ण विखे – पाटील : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी अनुदानाच्या मागण्यावर चर्चा सुरु होणार आहे. यामध्ये अतिशय महत्त्वाचे विभाग आहेत. ओबीसींच्या आरक्षणाच्या विषयावर या ठिकाणी चर्चा होणार आहे. ओबीसींचे राजकीय आरक्षण आता गेलेले आहे. आरक्षणाबाबतच्या या संपूर्ण प्रक्रियेमध्ये लोकांच्या भावना तीव्र आहेत. या संबंधी सदनामध्ये चर्चा होत असताना संबंधित विभागाचे मंत्री महोदय हजर नाहीत. सरकारला या विषयाचे गांभीर्य नाही. आदिवासी विकास विभगाच्या बाबतीत देखील तेच आहे. तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य या विभागामध्ये देखील असेच होत आहे. या दुर्लक्षित विभागाच्या संदर्भात सरकारला जाग आणण्याकरिता सदस्यांना येथे भावना व्यक्त करायची आहे, भूमिका मांडायची आहे. ओबीसी आरक्षणाबाबत आम्हाला बोलायचे आहे. असे असताना सदनात मंत्री महोदय उपस्थित राहत नाहीत.

अध्यक्ष महोदय, सामुदायिक जबाबदारी म्हणून या ठिकाणी माननीय मंत्री डॉ. नितीन राऊत उपस्थित आहेत. माननीय मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे हे देखील येथे आहेत. असे कोणते कामकाज महत्त्वाचे आहे की, येथे माननीय मंत्री उपस्थित राहू शकत नाहीत ? आमची मागणी आहे की, संबंधित माननीय मंत्री यांना आपण येथे बोलवावे, तोपर्यंत सदनाची बैठक स्थगित करावी.

डॉ. नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राधाकृष्ण विखे पाटील व सन्माननीय सदस्य ॲड आशिष शेलार या दोघांचा मी सन्मान करतो. येथे चर्चा सुरु होण्यापूर्वी सामाजिक न्याय विभागाचे माननीय राज्यमंत्री आले आहेत. आम्ही दोघे कॅबिनेट मंत्री येथे आहोत. संबंधित विभागाच्या माननीय मंत्री यांना निरोप दिला आहे. ते लवकरच येतील. अशी कोठेही प्रथा नाही की, सदनाची बैठक स्थगित करावी. आता आपण चर्चा सुरु करावी, अशी माझी विनंती आहे.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात )

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. संजय शिरसाट )** : सन्माननीय सदस्यांच्या भावना या संपूर्ण सदनाच्या भावना आहेत. मला याची कल्पना आहे. हा केवळ विरोधी पक्ष किंवा सत्ताधारी पक्षाचा हा विषय नाही. येथे महत्त्वाचे विषय असल्यामुळे सन्माननीय सदस्यांची मागणी आहे की, माननीय मंत्री यांनी उपस्थित राहावे. काही माननीय मंत्री यांचे वरील सदनामध्ये काम आहे. ( अडथळा ) आपण माझे म्हणणे एकून घ्यावे. सर्वांचा सन्मान ठेवून, सदनाची बैठक १० मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी १.१३ ते १.२३ वाजेपर्यंत स्थगित झाली )

-----

असुधारित प्रत

**( स्थगितीनंतर )**

**( अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.संजय शिरसाट)**

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, ...

**तालिका सभाध्यक्ष (श्री.संजय शिरसाट)** : सन्माननीय सदस्य आपले काय म्हणणे आहे?

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, आदिवासी विकास विभागाचे मंत्री महोदय आता सभागृहात आलेले आहेत. मंत्री महोदय सभागृहात उशिरा आले आहेत. सभागृहाचे सन्माननीय नेते देखील आलेले आहेत. त्यांना आपण समज द्यावी. आपण त्यांना समज दिली पाहिजे. कारण विषय गंभीर आहे. आदिवासी विकास विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग वगैरे ४ खात्याच्या अनुदानाच्या मागण्यांवर आज चर्चा होणार आहे आणि हे मंत्री महोदय सभागृहात गैरहजर राहत आहेत. किमान माननीय श्री.अजित पवार यांनी त्यांना समज दिली पाहिजे, अशी आमची विनंती आहे.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, आज विधानसभा सभागृहाचे कामकाज सकाळी ९.०० वाजता सुरु झाले. बाकीचे कामकाज देखील होते. एक गोष्ट खरी आहे की, मला देखील सभागृहात सर्व मंत्री महोदय उपस्थित रहावेत असे नेहमीच वाटत असते. परंतु, लक्षवेधी सूचनांवरील चर्चा व प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतरचे वेगवेगळ्या प्रकारचे कामकाज हे दुपारी २.०० वाजेपर्यंत होईल असे काही मंत्री महोदयांना वाटले नाही, त्यामुळे काही मंत्री महोदय उशिरा आले ही, वस्तुस्थिती मी मान्य करतो. परंतु, अशा पध्दतीने पुन्हा घडणार नाही, एवढी ग्वाही मी देतो.

अध्यक्ष महोदय, खरे तर कॅबिनेट मंत्री डॉ.नितीन राऊत सभागृहात उपस्थित होते. आता मी स्वत: देखील येथे आहे. परंतु, मघाशी काही मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नव्हते, त्यामुळे दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना दुखावल्या असतील तर मी दिलगिरी व्यक्त करतो.

..........

**पृ.शी. :** अनुदानाकरिता मागण्या

**मु.शी. :** सन २०२२-२३ च्या अनुदानाकरिता मागण्या

विभाग : (१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

(३) आदिवासी विकास विभाग

(४) इतर मागास बहुजन कल्याण विभाग

( चर्चा पुढे सुरु ...

प्रा.डॉ.अशोक उईके (राळेगाव) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आज सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, आदिवासी विकास विभाग व इतर मागास बहुजन कल्याण या विभागावरील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा होणार आहे. हे अतिशय महत्वाचे विषय आहेत. माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले.... नाही तर येथे सभागृहात ते विषय चर्चेला आले होते.

अध्यक्ष महोदय, आज या सर्व विभागापैकी मी, आदिवासी विकास विभागाच्या मागण्यांवर बोलताना सभागृहाचे लक्ष याकडे वेधू इच्छितो की, आदिवासी विकास विभागाची निर्मिती कशी झाली. सन १९८२-१९८३ पूर्वी आदिवासी विकास महामंडळ होते. आदिवासी विकास महामंडळातून आदिवासी विकास विभागाची निर्मिती झाली. आदिवासी विकास विभागाकरिता एखाद्या वेळेस बजेट प्रोव्हीजन करावयाची असेल तर ती कशी केली पाहिजे, आदिवासी विकास विभागाकरिता निधी कशाप्रकारे दिला पाहिजे, त्या अनुषंगाने एक सुकथनकर समिती गठित करण्यात आली होती.

असुधारित प्रत

प्रा.डॉ.अशोक उईके...

अध्यक्ष महोदय, त्या समिती मार्फत आदिवासी विकास विभागाला किती टक्के निधी दिला गेला पाहिजे, तो लोकसंख्येच्या आधारे दिला गेला पाहिजे, अशा प्रकारची तरतूद करुन १९९२ मध्ये या समितीच्या शिफारशी स्वीकारल्या गेल्या. तेव्हापासून ते आजपर्यंत आदिवासी विकास विभागाला लोकसंख्येच्या आधारे ९ टक्के, ९ टक्यांच्या पलीकडे जाऊन निधी द्यावा लागत असे. तो निधी आदिवासी विकास विभागाला दिल्यानंतर आदिवासी विकास विभागामार्फत जो आदिवासी समाज अतिदुर्गम भागात राहतो त्याला मुख्य प्रवाहात आणण्याच्या अनुषंगाने निधी दिला जात होता.

अध्यक्ष महोदय, महाविकास आघाडीच्या माध्यमातून जे तिसरे बजेट मांडलेले आहे, त्या तिसऱ्या बजेटमध्ये पाहिले तर फक्त ३३ टक्के निधी आपल्या विभागाला दिला. याचा अर्थ ६७ टक्के निधीची कपात केली. जो ३३ टक्के निधी आपल्या विभागाला दिला, त्यापैकी आदिवासी विकास विभागामध्ये ३२ टक्के निधी हा वेतन व अनिवार्य खर्चामध्ये जातो. केवळ १ टक्के निधी आदिवासी समाजाला विकास करण्याच्या अनुषंगाने दिला जातो.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्री श्री.अजित पवार यांना मी कळकळीची विनंती करतो की, ज्या प्रमाणे इतर विभागांचे वेतन व अनिवार्य खर्च सामान्य प्रशासन विभागामार्फत केला जातो. तसेच, आदिवासी विकास विभागातील वेतन व अनिवार्य खर्च देखील सामान्य प्रशासन विभागामार्फत देण्याची तरतूद करावी.

अध्यक्ष महोदय, आज रोजी तेवढा निधी कपात होतो... मला कल्पना आहे की, आदिवासी विकास विभागाचा निधी ३ ठिकाणी डिव्हाईड केला जातो. तो आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून दिला जातो, डीपीडीसीच्या माध्यमातून दिला जातो आणि प्रकल्प कार्यालयाच्या माध्यमातून दिला जातो. या तिनही ठिकाणी तो वेगवेगळ्या पध्दतीने वापरला जातो.

प्रा.डॉ.अशोक उईके ...

अध्यक्ष महोदय, समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून दलित वस्ती सुधार योजनेची अंमलबजावणी केली जाते. परंतु, आमच्या आदिवासी विकास विभागामध्ये एखादा आदिवासी पोळ असो, कोलाम पोळ असो, तांडा असो काही असो जोपर्यंत तेथे आदिवासी समाजाची ५० टक्के लोकसंख्या नसते तोपर्यंत तेथे आदिवासी विकास विभागाचा निधी दिला जात नाही. परंतु, समाज कल्याण विभागात तशी पध्दत नाही. एखाद्या वॉर्ड, एखाद्या गावात, एखाद्या खेड्यात आदिवासींची किंवा दलित समाजाची ५ घरे असली तरी, समाजकल्याण विभागामार्फत त्या ठिकाणी दलित वस्ती सुधार योजनेंतर्गतचा निधी देऊन विकास केला जातो.

अध्यक्ष महोदय, मी विनंती करतो की, सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून ज्या प्रमाणे योजना राबविली जाते त्याच धर्तीवर आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून ही जी ५० टक्क्यांची लोकसंख्येची अट आहे ती शिथिल करावी.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.कालिदास कोळंबकर)**

प्रा.डॉ.अशोक उईके ...

समाज कल्याण विभागाच्या अटी व शर्तींप्रमाणे आदिवासी विकाभागाने नियमात सुधारणा करुन निधी वितरित करावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आदिवासी विभागाच्या माध्यमातून विदेशामध्ये विविध अभ्यासक्रमांचे उच्च शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना पाठविण्यात येते. ही योजना समाज कल्याण विभागाच्या माध्यमातूनही राबविण्यात येते. या योजनेला मागील सरकारमधील तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी अधिक प्राधान्य दिले होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात विद्यार्थी विदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी जाऊ शकले होते. परंतु मागील अडीच वर्षांच्या कालावधीत ही संख्या घटली आहे. आदिवासी पालकांचे उत्पन्न अनुसूचित जाती व इतर मागासवर्ग यांच्या तुलनेत फार कमी आहे. त्यामुळे ही योजना आदिवासी विभागाच्या माध्यमातून राबविताना या योजनेतील पालकांची उत्पन्नाची मर्यादा समाज कल्याण विभागातील योजनेमध्ये नमूद आहे तेवढीच ठेवण्यासाठी सुधारणा करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, ठाकर बप्पा योजना आदिवासी वस्तींचा, पाड्यांचा विकास करण्यासाठी केवळ ७.५ लाख रुपये निधी देण्यात येतो. तो १५ लाख रुपये इतका देण्यात यावा यासाठी सरकारने धोरणात्मक निर्णय घ्यावा. जेणेकरुन उक्त योजनेची अंमलबजावणी प्रभावी होईल व त्यामाध्यमातून अपेक्षित विकास होऊ शकेल. या संदर्भात सरकारने उचित कार्यवाही करावी, ही विनंती.

अध्यक्ष महोदय, आदिवासी आश्रम शाळेत विद्यार्थी शिक्षण घेतात. या शाळांच्या निर्मितीचे उद्दीष्ट्य फार चांगले आहे. नंदूरबार जिल्ह्यातील आदिवासी मंत्री महोदयांच्या मतदारसंघातील तळोदा प्रकल्प कार्यालयांतर्गत असलेल्या मांडवी, तालुका धडगाव येथील आश्रम शाळेतील विद्यार्थीनींना खूप त्रास होत आहे. त्यांची व्यथा अशी आहे की, त्या आश्रम शाळेतील ५२ विद्यार्थीनींना ३२ कि.मी.अंतरावर

प्रा.डॉ.अशोक उईके ...

असलेल्या शाळेत चालत जाऊन शिक्षण घ्यावे लागत आहे. यासंदर्भात प्रकल्प अधिकारी यांना निवेदन दिले असता त्यांनी त्या शाळेस भेट दिली नाही. त्यांची नियुक्ती आदिवासींसाठी झालेली असून त्यांनी त्यांचे कर्तव्य पार पाडावयास पाहिजे होते ते त्यांनी पार पाडले नाही. ही अतिशय वाईट व दुर्दैवी बाब आहे. उक्त प्रकरणी सदरहू प्रकल्प अधिकारी यांना निलंबित करण्यात यावे, अशी माझी आग्रही मागणी आहे. आपण राज्यातील आदिवासी मुलांनी शिक्षण घेतले पाहिजे, ते मुख्य प्रवाहामध्ये आले पाहिजे, याकरिता अनेक वर्षापासून प्रयत्न करीत आहोत. राज्यातील ११ प्रकल्प अधिकारी कार्यालयास आय.ए.एस.अधिकारी उपलब्ध करुन दिले, याची मला कल्पना आहे. तरी देखील या प्रकरणी योग्य निर्णय घेण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आदिवासी आश्रम शाळेत मुलांना कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या ११ वी व १२ वी च्या शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थी प्रवेश का घेत नाहीत, त्यांनी मानसिकता का होत नाही, याचे विभागाने चिंतन केले पाहिजे. अध्ययन व अध्यापन करणारे शिक्षक आश्रम शाळेत असतील तर आदिवासी विद्यार्थ्यांना नामांकित व इंग्रजी माध्यमांच्या शाळेत जाण्याची आवश्यकता भासणार नाही. सदरहू शाळांमध्ये वेळेत पद भरती केली असतील तर त्यांची पट संख्या कमी झाली नसती. सदरहू शाळांमधील विद्यार्थ्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने, चांगले मार्गदर्शन मिळण्याच्या दृष्टीने सर्व विषयांचे शिक्षक व शिक्षण सेवकांच्या रिक्त पदांची पद भरती सरळ सेवेने तातडीने करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, समाज कल्याण, इतर मागासवर्ग व आदिवासी विभाग यांच्या माध्यमातून युपीएससी व एमपीएससी स्पर्धा परीक्षांची तयारी करुन घेण्यात येते. परंतु यासंदर्भात आपणास पाहिजे तसा अद्याप निकाल मिळाला नाही. यामुळे

प्रा.डॉ.अशोक उईके ...

प्रत्येक जिल्ह्यात स्पर्धा परीक्षांची तयार करण्यासाठी अद्ययावत अभ्यासिका व वर्ग खोल्या सुरु केल्या तर त्याचा फायदा आदिवासी विद्यार्थ्यांना निश्चित होईल. उक्त अभ्यासिका प्रत्येक जिल्ह्यात सुरु करण्यात येतील, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, समाज कल्याण विभागाच्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यात एक समाजिक सभागृह उभारण्यात आले आहे व तेथे संपूर्ण जिल्ह्यासाठी यंत्रणा राबविण्यात येते. समाज कल्याण विभागाच्या धर्तीवर प्रत्येक जिल्ह्यात बिरसा भवन किंवा आदिवासी भवन उभारण्यात यावे व त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आदिवासी विभागाचे राज्यात एकूण ३३ प्रकल्प कार्यालये असून त्यामधील अनेक प्रकल्प कार्यालयांना स्वतंत्र प्रशासकीय इमारत नाही. आदिवासी विभागाकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा त्या विभागाच्या कार्यालयाच्या इमारतीवर अवलंबून असतो. उक्त कार्यालयाच्या सुसज्ज इमारती उभारुन तेथे योजनांचे फलक लावले तर लाभार्थींना सहजपणे योजनांची माहिती मिळू शकेल व त्याचा त्यांना फायदा घेता येणे शक्य होईल.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

प्रा.डॉ.अशोक उईके.......

प्रकल्प कार्यालयाला स्वतंत्र इमारत निर्माण करण्याच्या अनुषंगाने आपण पुढाकार घेऊन प्रकल्प कार्यालयाची निर्मिती करावी, अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, देशाचे पंतप्रधान माननीय श्री.नरेंद्र मोदी यांनी सन २०१९ पासून पंतप्रधान वन धन योजनेची सुरूवात केली. कारण आदिवासी युवक आणि युवतींना मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी त्यांच्या कौशल्याचा विकास करुन उद्योग निर्माण करणे आवश्यक आहे. आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून पंतप्रधान वन धन योजनेची कडक अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या योजनेचा उद्देश व उद्दिष्ट काय आहे. ज्या भागामध्ये आदिवासी बांधव राहतात, ज्या परिसरामध्ये उत्खनन निर्माण होते, त्या आधारे लघु आणि सुक्ष्म उद्योग निर्माण करणे व त्या उद्योगाच्या माध्यमातून त्यांच्या परिवाराला आर्थिक सहकार्य करणे हा या योजने मागील उद्देश आहे. त्या अनुषंगाने आपण पंतप्रधान वन धन योजनेवर लक्ष केंद्रित करून सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी एक आकृतिबंध असा कार्यक्रम निर्माण करावा, अशी आपल्याला या विषयाच्या माध्यमातून विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आदिवासी समाजावर अनेक वर्षापासून होत असलेल्या अन्यायाच्या अनुषंगाने सन २००० मध्ये कायदा अस्तित्वात आला आणि त्याची अंमलबजावणी सन २००१ पासून झाली.

अध्यक्ष महोदय, मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, अनेक जिल्ह्यामध्ये अनुसूचित जमाती जात पडताळणी कार्यालये मंजूर आहेत परंतु अजून अजूनही ती कार्यालये कार्यान्वित करण्यात आलेली नाहीत. सन २०१९ मध्ये सात कार्यालयांना मंजुरी दिलेली होती. सदर सातही जिल्ह्यामध्ये अनुसूचित जमाती जात पडताळणी कार्यालये लवकरात लवकर सुरु करणे अत्यंत आवश्यक आहे. आज रोजी ३ हजारांच्या वर जात पडताळणी प्रकरणे प्रलंबित आहेत, त्या प्रकरणांचा निपटारा होऊ शकेल.

प्रा.डॉ.अशोक उईके.......

अध्यक्ष महोदय, जातीचे वैधता प्रमाणपत्र सिद्ध करणे यासाठी जे अधिकारी नियुक्त असतात त्यांना संरक्षण देण्याची गरज आहे. एखाद्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास संबंधित कार्यालयामध्ये काम करणाऱ्या अधिकारी किंवा कर्मचारी यांना कोणताही त्रास होऊ नये म्हणून त्यांच्यासाठी संरक्षणाची व्यवस्था करण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, आज रोजी अनेक आदिवासी बांधवांची जात वैधता प्रमाणपत्र प्रकरणे माननीय न्यायालयामध्ये प्रलंबित आहेत. अशी प्रकरणे प्रलंबित राहू नयेत म्हणून चांगल्या वकिलांची नियुक्ती करण्यात यावी, [***] अशी अपेक्षा व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, आदिवासी बांधवांच्या संबंधित धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी TAC ची निर्मिती करण्यात आलेली आहे. परंतु या समितीची बैठक मागील अडीच वर्षापासून एकदाही झालेली नाही. या समितीचे समिती प्रमुख म्हणून राज्याचे मुख्यमंत्री असतात. या समितीचे सदस्य माननीय खासदार व आमदार यांच्यासह राज्यपाल महोदयांचे एक प्रतिनिधी असतात. १ कोटी ३५ लाख आदिवासी बांधवांना न्याय देण्यासाठी तत्काळ TAC आयोजित करून आदिवासी समाजाबद्दल धोरण, निर्णय कसे करता येईल यासाठी आपण प्रयत्न करावा, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, आदिवासी बांधवांचे उत्पन्न कमी असल्यामुळे तो आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश देऊ शकत नसल्यामुळे नामांकित शाळांची निर्मिती केली गेली. सदर शाळेमध्ये प्रवेशित विद्यार्थी हे आदिवासी आणि गैरआदिवासी असतात. अशा शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थी आणि गैरआदिवासी विद्यार्थ्यांना वेगवेगळया वर्गामध्ये शिकविले जाते. यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना भेदभावाची वागणूक दिली जात असल्याची भावना त्यांच्या मनामध्ये निर्माण होते.

*** आदेशानुसार विलोपित मजकूर

प्रा.डॉ.अशोक उईके.......

त्यामुळे असे प्रकार होणार नाहीत याची मंत्री महोदयांनी दक्षता घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, आदिवासी बांधवांचे ११ जिल्हे प्रभाव क्षेत्रामध्ये आहेत. अनेक जिल्ह्यांमधील आदिवासी बांधवांमध्ये sickle cell anemia चे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे आरोग्य विभाग, आदिवासी विकास विभाग आणि महिला व बाल विकास विभाग या तिनही विभागांनी संयुक्तरीत्या sickle cell anemia असलेल्या विद्यार्थ्यांना योग्य त्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आदिवासी कुटुंबामध्ये एसएसचे प्रमाणे जास्त आहे. त्यामुळे शासनाकडून त्यांना ज्या ज्या सुविधा देणे शक्य आहे, त्या त्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करावे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री.अजित पवार यांना विनंती करतो की, माझ्या आदिवासी समजासाठी एखादी योजना सुरु नाही केली तरी चालेल, आदिवासी भागामध्ये रस्ता झाला नाही तरी चालेल. परंतु त्यांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. कारण आदिवासी समाजामध्ये sickle cell anemia प्रमाण जास्त आहे. त्यामुळे आदिवासी विभाग, आरोग्य विभाग व महिला व बाल कल्याण विकास विभागाने संयुक्तरीत्या मिशनमोडवर काम केले व त्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला तर यामध्ये नक्कीच सुधारणा होईल, अशी मला अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, आम्ही जेव्हा आमच्या मतदारसंघामध्ये फिरतो तेव्हा आम्हाला एसएसचे विद्यार्थी व विद्यार्थींनी असल्याचे आढळून येत आहे. आदिवासी समाजाच्या अनेक समस्या आहेत. त्या समस्यांचे निराकरण करण्याच्या अनुषंगाने युद्धपातळीवर प्रयत्न करावा, अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

प्रा.डॉ. अशोक उइके....

माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री हे माझ्यापेक्षा अनुभवी आहेत. राज्य सरकारकडून आदिवासी विकास विभागाला निधी दिला जातो. तसेच जिल्हा वार्षिक नियोजन आराखड्यातूनही निधी दिला जातो. डीपीडीसीचे प्रमुख हे पालकमंत्री व पदसिद्ध सचिव जिल्हाधिकारी असतात. आदिवासींकरिताचा सर्वाधिक निधी जिल्हा परिषदेकडे वर्ग केला जातो. परिषदेच्या आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा इतर विभागातील अधिकाऱ्यांना आणि प्रकल्प कार्यालयातील अधिकाऱ्यांना आदिवासींच्या प्रकल्पांची, योजनांची कोणतीही माहिती नसते. डीपीडीसीच्या माध्यमातून प्राप्त झालेला निधी बांधकामावर खर्च झाला आहे. प्रकल्प कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारची माहिती नसते. आदिवासी समाजाचे किती व कोणते लाभार्थी आहेत, त्यांना सायकल वाटप केली आहे काय, अशा बाबींची त्यांना माहिती नसते. याकरिता माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी धोरणात्मक निर्णय घ्यावेत. आदिवासी विकास विभागाला निधी दिल्यानंतर कोणत्याही योजनेची अंमलबजावणी, त्यातील लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया याकरिता साचेबद्ध कार्यक्रम तयार केला पाहिजे,अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांद्वारे आदिवासी विकास विभागाला देण्यात आलेल्या निधीबद्दल मी नापसंती दर्शवितो आणि माझे भाषण संपवितो.

धन्यवाद !

-----

असुधारित प्रत

श्री. छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.डॉ. अशोक उइके यांनी अतिशय चांगले भाषण केले आहे. [***] अशी मी विनंती करतो.

**तालिका सभाध्यक्ष :** मी माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ यांना विनंती करतो की, सन्माननीय सदस्यांना आपल्या दालनात बोलावून घेऊन त्यांना समजावून सांगावे. तसेच सन्माननीय सदस्य प्रा. डॉ. अशोक उइके यांनी जे शब्द वापरले आहेत ते सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात येतील.

---

[***] आदेशानुसार विलोपित मजकूर

असुधारित प्रत

श्री. दिलीप लांडे (चांदिवली) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी आपण मला संधी दिल्याबद्दल मी सर्वप्रथम आपले आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, मी सर्वप्रथम सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागासंदर्भात मत मांडणार आहे. समाजाला न्याय देणे आणि समाजाला सहाय्य करण्याचे काम या विभागामार्फत केले जाते. समाजाच्या मागण्या आणि समाजाच्या भावना मी या सभागृहासमोर मांडणार आहे. "माय खाऊ घालत नाही आणि बाप भिक मागू देत नाही," अशी या समाजाची परिस्थिती आहे. पवई येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान आहे. संपूर्ण उपनगरामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा नाही. त्यामुळे तेथे पुतळा झाला पाहिजे, याकरिता समाजाच्या अनेक कार्यकर्त्यांनी मागणी केली होती. मुंबई महानगरपालिकेने सन २००८ मध्ये पुतळा उभारण्यासाठी परवानगी व जागा दिली आहे. परंतु जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून शासनाकडे अनेकदा मागणी करुनही अद्यापपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासाठी परवानगी दिली गेली नाही. यामुळे कार्यकर्त्यांच्या भावना तीव्र झाल्या होत्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारण्यासाठी महानगरपलिकेने जेथे जागा दिली आहे त्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा स्थापन केला. कायद्याने हे चुकीचे आहे. कार्यकर्त्यांनी या भावना व्यक्त करताना त्यांच्यावर गुन्हे दाखल केले आहेत. माजी गृहमंत्री स्व. आर.आर. पाटील यांनी राजकीय कार्यकर्त्यांवरील दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्यात यावेत, याबाबत परिपत्रक निर्गमित केले होते. तसेच यासंदर्भात आताही एक परिपत्रक आहे. मी माननीय गृहमंत्री आणि शासनाला विनंती करणार आहे. समाजाच्या १३ प्रमुख कार्यकर्त्यांवर विविध भागातून गुन्हे दाखल केले आहेत. हे गुन्हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भावनेपोटी घडले आहेत. ते गुन्हे मागे घेण्यात यावेत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिकेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारण्यासाठी जागा दिली आहे. याकरिता समाजाचे प्रतिज्ञापत्रदेखील घेतले आहे. यात शासनाला केवळ परवानगी द्यावयाची आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा

श्री. दिलीप लांडे ....

पुतळा उभारण्यासाठी शासनाला निधी देण्याची आवश्यकता नाही. हा निधी मुंबई महानगरपालिका देईल, असे त्यावेळच्या करारामध्ये ठरले आहे. म्हणून मी मंत्री महोदयांना विंनती करतो की, या विषयासंदर्भात तातडीने दालनात बैठक घ्यावी. माननीय सामाजिक न्यायमंत्री, माननीय नगर विकास मंत्री यांनी समाजाच्या भावनांची तातडीने दखल घ्यावी व याबाबत शासनाने निर्णय घ्यावेत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, समाजासाठी अनेक योजना आहेत. या योजनांकरिता कमी निधी दिला जातो. मुंबई शहरामध्ये मोठ्या प्रमाणात ककैय्या समाज आहे. मी नगरसेवक असताना एक मागणी केली होती. मुंबई शहरामध्ये संत ककैय्या स्मारक उभारले पाहिजे. या स्मारकाकरिता मुंबई शहरामध्ये जागा व निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, राज्याच्या लढ्यामध्ये साहित्यिक आण्णाभाऊ साठे यांचे मोठे योगदान आहे. मागील अनेक वर्षापासून मातंग सामाजाकडे शासनाचे दुर्लक्ष झाले आहे. शासनाने मातंग समाजाकरिता एक समिती गठीत केली होती. त्या समितीने अहवाल तयार केला होता. चिरागनगर, घाटकोपर येथे साहित्यिक आण्णाभाऊ साठे यांची कर्मभूमी आहे. येथे आण्णाभाऊ साठे वास्तव्य करीत होते. ते राहत असलेल्या घराची आज दयनीय परिस्थिती झाली आहे. त्या घरामध्ये आज गटारातील पाणी येत आहे. अशा परिस्थितीत आम्ही तेथे आण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करीत असतो. आपण सर्वजण त्यांचा आदर्श घेता असतो. साहित्यिक आण्णाभाऊ साठे यांच्या घरामध्ये आज गटारातील पाणी जात आहे. हे सर्व होत असताना आम्ही लोकवर्गणीतून त्या घराची दुरुस्ती केली होती. तेव्हा शासन जागे झाले आणि तेथे साहित्यिक आण्णाभाऊ साठे यांचा एक छोटा पुतळा उभारला आहे. तेथे सर्वे करण्यात आला होता. तेथे आण्णाभाऊ साठे यांचे स्मारक उभारण्याचे जाहीर करण्यात आले होते. पूर्वीच्या मंत्री महोदयांनी तेथे जाऊन भुमिपूजन केले. परंतु आजपर्यंत तेथे स्मारकाचे काम झाले नाही. मी या माध्यमातून माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांना विनंती करतो. याकडे त्यांनी

श्री. दिलीप लांडे .....

लक्ष दिले होते. परंतु हे काम अपूर्ण अवस्थेत आहे. म्हणून माझी विनंती आहे की, जेथे आण्णाभाऊ साठे यांचे वास्तव्य होते, जेथून त्यांनी राज्यासाठी लढा दिला, समाजाला एकत्र केले तेथे त्यांचे या सरकारच्या कार्यकाळात स्मारक पूर्ण व्हावे, अशी मी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, समाजासाठी अनेक योजना आहेत. महात्मा ज्योतिबा फुले सुशिक्षित बेरोजगारांकरिता कर्ज देण्याची योजना आहे. परंतु ही योजना केवळ कागदोपत्री आहे. एखादा सुशिक्षित बेरोजगार बँकेत गेल्यानंतर त्याला कर्ज दिले जात नाही.

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

श्री.दिलीप लांडे.....

पूर्वीच्या काही राजकीय लोकांनी चुका केल्या असतील त्यांचे पाप आमच्या माथी मारुन चालणार नाही. आताच्या सुशिक्षित बरोजगारांची यात काहीही चूक नाही.

अध्यक्ष महोदय, अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या माध्यमातून आमच्या समाजातील तरुण पिढीला स्वयंरोजगार निर्माण करुन स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी कर्ज दिले जाते. परंतु या महामंडळाला पुरेसा निधी नसल्यामुळे लोकांचा अपेक्षाभंग झाला आहे. माननीय उप मुख्यमंत्री तथा अर्थ मंत्र्यांना माझी विनंती आहे की, आपण पूर्वी आमच्या मातंग समाजातील तरुण पिढीला स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी, स्वत:चा व्यवसाय करण्यासाठी कर्जरुपाने मोठी मदत केली होती. त्याच धर्तीवर आमची आपल्याकडून अपेक्षा आहे. अर्थात, दरम्यानच्या काळात कोणी काय केले त्याच्या खोलात मी जाणार नाही. परंतु समाजातील तरुण पिढीला स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी, स्वत:चे कुटुंब चालविण्यासाठी शासनाने अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या माध्यमातून कर्ज द्यावे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, आमच्या समाजातील महिलांना छोटा उद्योग करण्यासाठी राज्य व केंद्र शासनातर्फे ५०० रुपये अनुदान दिले जाते. आजमितीस माझ्या विभागातील ७५० महिलांचे चेक तयार आहेत. परंतु प्रत्येक महिलेला केवळ ५०० रुपये अनुदान आहे. सन १९९२ पासून अनुदानाची रक्कम एवढीच आहे. वाढत्या महागाईचा भडका आपल्या नजरेसमोर आहे. त्यामुळे माझी माननीय अर्थमंत्र्यांना विनंती आहे की, या अनुदानामध्ये वाढ करुन ते २ हजार ते ५ हजार रुपये करावे.

अध्यक्ष महोदय, समाजातील तरुण पिढी व महिलांच्या संदर्भातील माझ्या मागण्यांचा विचार करावा. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. आपणास बेल वाजविण्याची संधी न देता मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद. जय हिंद. जय महाराष्ट्र.

---------

श्री.हरिभाऊ बागडे (फुलंब्री) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, आदिवासी विकास विभाग आणि इतर मागास बहुजन कल्याण विभागांवर मी बोलणार आहे.

अध्यक्ष महोदय, मागासवर्गीयांना, अति मागासवर्गीयांना सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची निर्मिती केलेली आहे. केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांच्या माध्यमातून या समाजाला फायदा मिळवून देण्याचे काम या विभागाचे आहे.

अध्यक्ष महोदय, मागासवर्गीयांसाठी पंतप्रधान आवास योजना आहे. आमच्या औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये घरकुलांसाठी ८० हजार अर्ज प्राप्त झाले आहे परंतु अद्यापपर्यंत कोणालाही घरकुल देण्यात आलेले नाही. जागा नसल्याचे कारण त्यासाठी दिले जाते. त्यामुळे एक तर सरकारने घरांसाठी जागा उपलब्ध करुन दिली पाहिजे किंवा ज्या ठिकाणी या लोकांची घरे आहेत, झोपडया आहेत, किंवा २०X३० चा प्लॉट घेऊन घर बांधले असेल तेथेच पक्के घर बांधण्यास परवानगी दिली पाहिजे. आणखी एक पर्याय म्हणजे अनेक सरकारी जागांवर अतिक्रमणे आहेत. ती अतिक्रमणे काढून या मागास समाजाला घरांसाठी जागा उपलब्ध करुन देऊन घरे बांधण्यास परवानगी दिली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, ज्याप्रमाणे ग्रामीण भागामध्ये शेतामध्ये घर बांधण्यास देखील परवानगी दिली जाते त्याप्रमाणे शहरात अशी परवानगी का दिली जात नाही ? त्यामुळे शहरामध्ये देखील घरे बांधण्यास परवानगी देण्यात यावी, अशी या निमित्ताने विनंती आहे. तसेच औरंगाबाद महानगरपालिकेकडे आलेल्या ८० हजार अर्जदारांपैकी पात्र अर्जदारांना घरे मिळवून देण्यासाठी सरकारने प्रयत्न करावेत.

अध्यक्ष महोदय, मा.श्री.चंद्रकांत हंडोरे मंत्री असताना ग्रामीण भागातील अनेक तरुणांना उद्योग उभारणीसाठी सात-सात कोटी रुपये देण्यात आले. त्यातून काहींनी उद्योग उभे केले, काहींनी मशिनरीज आणून ठेवल्या

श्री.हरिभाऊ बागडे.....

तर काहींनी केवळ शेड बांधले. त्यातील काहींचे उद्योग अडचणीत देखील आहेत. या उद्योगांची चौकशी करुन, पाहणी करुन आवश्यक असल्यास तांत्रिक मदत देऊन त्यांना चालना दिली पाहिजे. हे उद्योग पूर्ण क्षमतेने सुरु करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. कारण हे उद्योग सुरु झाले तर त्यातून अनेक तरुणांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल. या उद्योगांच्या रुपाने विभागाचा मोठा निधी ब्लॉक झालेला आहे. हे उद्योग सुरु झाल्यास त्यातून अनेकांच्या हाताला काम मिळून दिलेला निधी सत्कारणी लागेल. त्यामुळे माझी विनंती आहे की, हे उद्योग पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न करावेत. अर्थात, याची आकडेवारी आपल्याकडे असेल असे नाही. एकदा पैसे दिल्यानंतर त्याचे पुढे काय झाले याची माहिती कोणी ठेवत नाही. दिलेला निधी नेमका कशासाठी वापरण्यात आला याकडेही कोणी लक्ष देत नाही. परंतु केवळ निधी देणे हा उद्देश न ठेवता उद्योग उभा राहिला पाहिजे हा उद्देश असला पाहिजे, असे मला वाटते. कदाचित, त्यावेळी असाच उद्देश असेल हे मी नाकारत नाही. परंतु त्याप्रमाणे उद्योग उभे राहिले किंवा कसे याबाबत आपल्या विभागाने चौकशी करावी, असा माझा आग्रह आहे.

अध्यक्ष महोदय, सन २००६-०७ मध्ये निर्णय घेण्यात आला की, तालुक्याच्या ठिकाणी एक निवासी शाळा म्हणजे वसतीगृह + शाळा बांधण्यात येईल. या योजनेंतर्गत १०० निवासी शाळा बांधण्याचा संकल्प करण्यात आला होता. यातील काही शाळांची कामे झाली असतील. त्यातीलच एक शाळा आमच्या फुलंब्री येथे आहे. जिल्हाधिकारी यांनी या शाळेसाठी ५ एकर जागा दिली आहे. दिनांक १ जानेवारी, २०१९ रोजी या जागेचा ७/१२ सामाजिक न्याय विभागाच्या नावावर झाला. या निमित्ताने सामाजिक न्याय विभागाची मालमत्ता देखील वाढली. परंतु सदर ठिकाणी निवासी शाळा उभी करण्यासाठी निधी देण्याची आवश्यकता आहे. तसे झाल्यास ग्रामीण भागातील अनेक मुला-मुलींच्या शिक्षण व वास्तव्याची सोय होईल. दर्जेदार व उत्तम शिक्षणासाठी याची नितांत आवश्यकता आहे. आज आपण अनेक ठिकाणी परीक्षेत कॉपी करताना पकडल्याच्या बातम्या ऐकतो.

यानंतर श्री.धुमाळे.....

श्री. हरिभाऊ बागडे...

सर्टिफिकेट मिळवून नोकऱ्या मिळणार नाहीत. एक काळ असा होता की अशा सर्टिफिकेटला जास्त महत्त्व होते. ज्यामूधन हुंडा जास्त मागला जात होता. परंतु आता त्याचाही उपयोग नाही. कारण पोरीचा बाप आता खूप हुशार झाला आहे आणि तो विचारतो की, हा मुलगा नोकरीत कायम झाला आहे काय ? त्यामुळे गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार शिक्षण याही समाजाला मिळाले पाहिजे. त्यासाठी आपण प्रयत्न करावेत असे मला वाटते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती आपण साजरी केली होती. त्यावेळी आपण निर्णय घेतला होता की, राज्यात मुलींची ५० वसतिगृहे निर्माण करावीत. त्यातील किती सुरू आहेत आणि किती क्षमतेने सुरू आहेत तसेच तेथे कोणकोणत्या व्यवस्था आहेत हे अजूनही फारसे दृष्टीपथात येत नाही. त्याकडे आपण लक्ष देण्याची गरज आहे. त्याचाही आपण उपयोग करुन घेतला पाहिजे, असे मला वाटते. आपण ते करावे, ही आपल्याला नम्र विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आपल्या प्रत्येक विभागामध्ये आता तालुका समन्वयक म्हणून काम काही नव्याने मुले घेतली आहेत. त्यांना हे समन्वयकाचे काम दिले जाते. पण त्यांना आज २-२, ४-४ वर्षे झाली आहेत. पण त्यांना अजूनही आपण नोकरीवर घेतले नाही. त्यांना सेवेत कायम करण्यासंबंधी त्यांच्या मागणीचे अनेकवेळा आपल्याला निवेदन दिले आहे. त्याचाही शासनाने निश्चितपणे विचार केला पाहिजे, असे मला वाटते आणि आपण तो अवश्य करावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आपल्या राज्यात व्हीजेएनटीच्या आश्रमशाळा आहेत. त्यांच्याही अनेक अडचणी आहेत. अत्यंत दुर्गम अशा आदिवासी आणि ग्रामीण भागामध्ये या आश्रमशाळा आहेत. त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी पुरेशी व्यवस्था नाही. त्यांना गणवेश नाही, खेळांचे मैदाने नाहीत. या छोट्या छोट्या गोष्टी आहेत. शाळेचे संकूल एकदा चांगल्या प्रकारे उभे राहिले तर विद्यार्थ्याला शिकण्याचा एकप्रकारे हुरूप येतो आणि शिक्षकांना सुध्दा शिकविण्यात आनंद वाटतो. त्यामुळे शाळांचे संकूल नीट करण्याची आवश्यकता आहे. मुलांना शिक्षणाबद्दल प्रेम वाढले पाहिजे, त्यांना

श्री. हरिभाऊ बागडे...

चांगले शिक्षण मिळाले पाहिजे असे वाटत असेल तर त्यांना पूर्ण सुविधा दिल्या पाहिजेत. आश्रमशाळांचे पगारही आपण वेळेवर दिले पाहिजेत, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये या विभागाशी संबंधित मी फार बोलणार नाही. संबंधित खात्याचे मंत्री सभागृहात उपस्थित होते. पण आता ते दिसत नाहीत. ते आल्यानंतर आपण त्यांना सांगावे की, माननीय पंतप्रधान यांनी एक घोषणा केली होती की, प्रत्येक लोकसभा मतदार संघामध्ये एक वैद्यकीय कॉलेज निर्माण झाले पाहिजे. ज्या मतदार संघात ते नसेल तेथे प्राधान्याने ते करण्याची आवश्यकता आहे. आम्ही वृत्तपत्रातून वाचतो की, तिकडे लडाखला झाले, काश्मीरला झाले, आसाममध्येही काही झालेत. मग आपल्या महाराष्ट्रात ती का होत नाहीत आणि विशेषत: आमच्या जालन्यामध्ये का झाले नाही. जालना हे औद्योगिक शहर आहे. येथे शिक्षण संस्था चांगल्या आहेत. त्यामुळे जालना येथे मेडिकल कॉलेज व्हावे, अशी माझी विनंती आहे. महाराष्ट्राच्या ज्या ज्या लोकसभा मतदार संघामध्ये जेथे जेथे एकही मेडिकल कॉलेज नाही तेथे आपण प्रामुख्याने मेडिकल कॉलेज काढले पाहिजे, असा माझा आपल्याला आग्रह आहे. त्यासाठी केंद्र शासन देखील मदत करण्यास तयार आहे. अशा स्थितीत आपण अशा योजना का करीत नाही. म्हणून लवकरात लवकर अशी योजना आपण राबविली पाहिजे, अशी मला आपल्याला आवर्जून विनंती करायची आहे.

अध्यक्ष महोदय, आदिवासी विकास विभागाच्या बाबतीत बोलायचे झाले तर त्यांचा निवास कुठे असतो. जंगलात, दऱ्याखोऱ्यात, गावाच्या बाहेर ते राहतात. प्रत्येक गावामध्ये थोडे थोडे कुटुंबच त्यांचे असतात. मग त्यामध्ये भिल्ल समजाचा असेल, कोळी समाजाचा असेल, कैकाडी समाजाचा असेल, फासेपारधी समजाचा असेल, वैदू समाजाचा असेल, अशा भटक्या आणि आदिवासी नागरिकांची शासनाने काय व्यवस्था केली आहे ? त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था काय आहे, गावात शाळा असते पण त्या शाळेत यांची मुले जातात की नाहीत, हे कोणी पाहते काय, तर नाही. माझा आपल्याला आग्रह आहे की, आपण आदिवासींच्या

श्री. हरिभाऊ बागडे...

निवासासाठी प्रयत्न केले पाहिजे. दुसरे म्हणजे पंतप्रधान आवासज योजनेचा लाभा सर्व लाभार्थ्यांना मिळतो काय ? जर अशा कुटुंबाची स्वत:ची जागा नसेल तर त्यासाठी केंद्र सरकार एका कुटुंबाला जागा घेण्याकरिता ५० हजार रुपयांचा निधी अनुदान म्हणून देते. त्यानंतर त्या जागेवर घरकुल मंजूर करते. हे कुठे झाले आहे ? काही ठिकाणी अशा योजनेतून घरे बांधली गेली आहेत. आमच्या गणोरी येथील ग्रामपंचायतीमध्ये त्यांनी २० लाख रुपयांना जागा घेतली आहे आणि तेथे घर बांधणे सध्या सुरू आहे. पण अशी एखादीच ग्रामपंचायत असते. मात्र सर्वत्र असे होत नाही. काही आदिवासी वन विभागात राहतात. वर्षानूवर्षे आणि पिढ्यानपिढ्या ते तिथे राहतात. पण तेथे घरकुल बांधता येत नाही. साधे पाण्याचे बोअर घ्यायचे असेल तर तेही तेथे खोदता येत नाही. आजही आमचे आदिवासी लोक त्या गावातील शिवारात राहतात. पण पाण्यासाठी १-१, २-२ किलोमिटर डोक्यावर पाण्याचे भांडे घेऊन जातात. आम्ही सर्वांना पाणी देतो असे म्हणतो. पण अशा ठिकाणी ग्रामपंचायतीचे पाणी देण्याचे काम नाही काय? ग्रामपंचायतींना सरकारने ७-८ वर्षापूर्वी भारत निर्माण नावाची पाणी पुरवठा योजना दिली होती. पण ती योजना कुठेच पूर्ण झाली नाही. सर्व ठिकाणी फक्त पाईपलाईन टाकली. विहिरी अर्धवट खोदल्या गेले आणि त्या भारत निर्माण योजनेचे काम अपूर्ण राहिले. आता नव्याने काही योजना दिल्या आहेत. गावांसाठी या योजना आहेत. पण आदिवासींचे काय, त्यांच्या डोक्यावरील हे भांडे कधी खाली उतरेल ? म्हणून आपण ग्रामपंचायतीला सुध्दा सांगितले पाहिजे की आदिवासी वस्तीमध्ये नळ पाणी पुरवठा योजना गेली पाहिजे आणि तरच तुमची योजना आम्ही मंजूर करतो नाही तर ती मंजूर करणार नाही. असे आपला विभाग का सांगू शकत नाही. पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी असे का बोलत नाहीत. जोपर्यंत आपण हे सांगणार नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने आदिवासींच्या वस्तीमध्ये पाणी जाणार नाही. म्हणून याबाबत विचार करावा, असे मला वाटते.

श्री. हरिभाऊ बागडे...

अध्यक्ष महोदय, आमच्याकडे काही ग्रामपंचायतींनी आदिवासींच्या घरकुलासाठी, भिल्ल समाजाच्या घरकुलासाठी पंचायत समितीला.. आमच्याकडे औरंगाबाद तालुक्यात देमणी नावाचे गाव आहे. तेथे २९ घरे मंजूर झाली आणि त्यातील ११ घरे मिळाली आहेत. पण अजूनही काही प्रस्ताव पाठविले आहेत. मात्र त्या प्रस्तावावर अधिकाऱ्यांच्या सह्याच होत नाहीत. औरंगाबाद तालुक्यात आणखी एक नायगावची ग्रामपंचायत आहे. ही औरंगाबाद शहराला खेटून आहे. तिच्या शिवारामध्ये मोठमोठे बंगले बांधले आहेत. पण त्या ग्रामपंचायतीमध्ये आदिवासी लोक राहतात. त्यांना तेथील ग्रामपंचायतीने लिहून दिले की, त्यांची जागा आहे, त्यांना घरकुल मंजूर झाले, त्याचा पहिला हप्ता मिळाला, त्यानुसार त्याने पायाभरणीचे काम केले आणि आता सरपंचाने पुन्हा लिहून दिले की यांची स्वत:ची जागा नाही. तोच सरपंच असे म्हणतो की, यांचे घरकुल रद्द करावे आणि यांच्याकडून दिलेले पैसे वसूल करावेत. राज्यात काय चालले आहे, अशा सरपंचाची चौकशी होणार आहे काय, त्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाची चौकशी होणार आहे काय ? अशा आदिवासी लोकांची कुठेही ओळख पाळख नसते. दीड दोनशे रुपयांची मजुरी करण्यासाठी तो दिवसभर जातो आणि दिवसभर मजुरी करुन आल्यानंतर या झंझटी करण्यासाठी त्याला वेळ कुठे आहे. त्यामुळे सरकारने अशा योजनांमध्ये निश्चितपणे लक्ष घातले पाहिजे. मी नमुना म्हणून आपल्याला या २ गावांचे उदाहरण दिले आहे. बहूतेक ठिकाणी असाच प्रकार आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. हरिभाऊ बागडे.....

या समाजाला पंतप्रधान उज्ज्वला गॅस योजनेतून सिलेंडर दिले आहेत. सन १९५३ सालापासून आपल्या देशात गॅसवर स्वयंपाक करणे सुरु झाले. त्यापूर्वी गॅसवर स्वयंपाक करण्यात येत नव्हता. सन १९५३ पासून सन २०१६ पर्यंत या देशात १३ कुटुंबांना गॅस मिळाला आहे. पण दिनांक १ मे, २०१६ पासून ते आतापर्यंत ९ कोटी कुटुंबांना नव्याने कनेक्शन दिले आहेत. एवढी गती वाढली तरी देखील आदिवासी समाजातील लोकांकडून दुकानदार कधी जास्त पैसे घेतात किंवा कधी देतच नाही. फुकट गॅस द्यायचा होता तरी दिला नाही. गॅस वितरकाला तर वर्षानुवर्षापासून ते फुकट द्यायला जीवावरच येते. याबाबत आपल्या अधिकाऱ्यांकडून अशा चौकशा होणार आहेत किंवा नाही ?

अध्यक्ष महोदय, जातीच्या प्रमाणपत्राचा एक विषय मी सांगणार आहे. पिढयान पिढया, वर्षानुवर्षापासून त्यांचे मुल सुद्धा भिल समाजाचे आहेत. परंतु त्यांना जातीचे प्रमाणपत्र नाही. त्यांना जातीचे प्रमाणपत्र का दिले जात नाही, असा माझा प्रश्न आहे. त्यांनी शिकू नये, त्यांनी अभ्यास करु, त्यांना नोकरी लागू नये म्हणजे एखाद्या विशिष्ट समाजाला नोकरी लागण्यासाठी आपण असा उद्योग करता काय ? आपल्याला कोणी भागीदार होऊ नये यासाठी एखाद्या समाजाने दुसऱ्या समाजाला प्रमाणपत्र देऊ नये हा उद्योग केला असेल तर आपण हे महापाप करीत आहात. हे पाप आपण कधी फेडणार आहात, त्या लोकांना वर्षानुवर्षे जातीच्या प्रमाणपत्राशिवाय राहावे काय ?खेडयापाडयात तर भिल समाजमाहीतही नाही. शेकडो वर्षापासून राहत असतानाही लोक सांगतात की, हा भिल आहे. त्याच्या टी.सी.वर भिल जात लिहिलेली आहे तरी देखील अधिकारी ऐकत नाहीत. ते म्हणतात तु भिल नाही किंवा कैकाडीच नाही. हे अधिकारी कुठुन तरी आलेले असतात त्यांना हे सर्व कळत नाही. यासाठी जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी किंवा तो भिल आहे किंवा नाही हे सांगण्यासाठी आपल्या विभागाकडे काहीही व्यवस्था नाही. असे असेल तर आपण एकदा सांगा की, आपण कुठेही गेले तरी एखाद्या जातीला बिलकूल जातीचे प्रमाणपत्र मिळणार नाही. त्या माणसांना कशासाठी चकरा

श्री. हरिभाऊ बागडे.....

मारायला लावत आहात ? त्यामुळे जातीच्या प्रमाणपत्राच्या विषयाबाबत आपण लक्ष दिले पाहिजे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, इतर मागास बहुजन कल्याण विभागावर बोलत असताना मला एवढेच सांगायचे आहे की, या विभागाने ओबीसीचे राजकीय आरक्षण कमी करुन जसे काय कल्याणच केले आहे. पूर्वी जिल्हा परिषदेच्या निवडणुका १० ते १५ वर्ष होत नव्हत्या. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांना आठवत असेल परभरणी जिल्ह्याची निवडणूक तर २० वर्ष झाली नाही. कारण ते महाराष्ट्र शासनाच्या हातात होते. परंतु युतीचे सरकार असताना माननीय श्री. मनोहर जोशी जेव्हा मुख्यमंत्री होते त्यावेळेला तेव्हाच्या मंत्रिमंडळाने या निवडणुका निवडणूक आयोगाकडे वर्ग केल्या. मग दर ५ वर्षांनी निवडणुका घ्याव्या लागत होत्या. ज्या शिवसेना पक्षाच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी निवडणूक आयोगाला निवडणुका हस्तांतरित केल्या त्याच पक्षाच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी परत त्या निवडणुका स्वत:कडे घेऊन लांबविण्यासाठी संधी दिली आहे. आता त्या निवडणुका किती वर्ष होणार नाहीत हे देवच जाणे. या बाबतही आपण लवकर निर्णय घ्यावा, एवढीच मी विनंती करतो आणि भाषण संपवितो. धन्यवाद !

--------

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, सायंकाळी ५.३० वाजता गिलोटीन आहे. तसेच आज जवळपास ६ विभागाचे माननीय मंत्री उत्तर देणार आहेत त्यामुळे त्यांचा वेळ लक्षात घेऊन आपल्याला चर्चा थांबवावी लागेल.

श्री. सुनिल भुसारा (विक्रमगड) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी आणि पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून मी सांगू इच्छितो की, माझ्या मतदारसंघातील आणि पालघर जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये फार जुनी वसतीगृहे आहेत तर त्यांची नव्याने निर्मिती व्हावी. तसेच जिल्ह्यच्या मुख्यालयी १००० क्षमतेचे मुलामुलींचे वसतीगृह आपल्या विभागाच्या माध्यमातून निर्माण करावे, अशी मी आपल्याला विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, बाब क्र २ वैद्यकीय शिक्षण च्या माध्यमातून मी सांगू इच्छितो की, माझ्या भागात नर्सिंग कॉलेजची संख्या खूप कमी आहे. ती संख्या वाढवून पालघर जिल्ह्यात जव्हार आणि विक्रमगड येथे नर्सिंग कॉलेजला नव्याने मान्यता द्यावी, अशी मी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय बाब क्र. ४ इतर मागासवर्गीच्या विभाग. ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेऊ नये यामुळे सर्वसामान्य ओबीसी जनतेचा जो हक्क डावलला गेला आहे तो त्यांना मिळावा, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, बाब क्र. ३ आदिवासी विभाग. या विभागाच्या विस्तृत मागण्यासांठी आपण मला वेळ द्याल, अशी मी अपेक्षा करतो. आदिवासी विकास विभागाबाबत बऱ्याच बाबी सांगण्यात आल्या. सन १९८४ च्या नंतर माननीय श्री. शरद पवार यांनी आदिवासी विकास महामंडळाचे रुपांतर आदिवासी विकास विभागामध्ये केले. आधीच्या काळात आदिवासी समाजाचा पेहराव आपण बघितला तर आपल्या लक्षात येईल की, वनातील पालापाचोळयाचे आवरण घेऊन त्या काळात या समाजाची सुरुवात झाली. त्यानंतर तो समाज लंगोटी पासून या काळातील कपडयांपर्यंत आला आहे. अशा काळात सन १९८४ नंतर माननीय श्री. शरद पवार यांनी या विभागाचे संपूर्ण रुप बदलले त्याबाबत मी त्यांना धन्यावाद देतो. आदिवासी समाजाला काय सुविधा लागतात यासाठी गावातील अंगणवाडी, जिल्हा परिषदेची शाळा, आरोग्याचे उपकेंद्र, रस्ता, वीज किंवा पाणी या सर्व बाबींसाठी इतर

श्री. सुनिल भुसारा....

कोणत्याही विभागाकडे जावे लागू नये म्हणून तत्कालीन माननीय मंत्री श्री. मधूकर पिचड यांच्या मागणीनुसार लोकसंख्येच्या प्रमाणावर स्वतंत्र बजेट देण्याचे काम माननीय श्री. शरद पवार यांनी काम सुरु केले. ते आजही सुरु आहे. त्यामुळे आज १० ते १२ हजार कोटी रुपयांचा निधी या वर्षीच्या बजेटमध्ये या विभागाच्या जनतेला दिला आहे. त्याची विभागणी मघाशी सांगण्यात आली की, काही पैसे ही पगारामध्ये जातो ते खरे आहे. परंतु सन २०१६ साली ही प्रथा मोडण्यात आली. मागच्या सरकारने आदिवासीच्या विकासासाठी दिल्या जाणाऱ्या पैशातील काही भाग पगार आणि इतर बाबीवर खर्च करण्यासाठी सुरुवात करुन एक चुकीचा पायंडा त्या निमित्ताने पडला. कोविडच्या काळात हे अधिक निधी देण्यात येतील असे माननीय उप मुख्यंत्र्यांनी कबुल केलेले आहे. तसेच एकूण विकास निधीमध्ये कोणतीही कटछाट न करता पगाराचे पैसे हे सामान्य बजेटमधून द्यावेत अशी मी मागणी करतो. राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे, माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार आणि माननीय आदिवासी विकास मंत्री ॲड. के.सी. पाडवी यांनी अतिशय कठीण अशा कोविडच्या काळामध्ये सुद्धा मागच्या काळात सरकारने केलेली खावटी कर्जाची योजना मागच्या ५ वर्षात बंद केली.

यानंतर श्रीमती करंदीकर....

श्री. सुनील भुसारा.....

जवळजवळ १८ लाख कुटुंबांना वंचित ठेवले आहे. " किसी चीज को अगर तुम दिल से चाहो, तो पूरी कायनात उसे मिलाने में लग जाती है." म्हणजेच अपण जर एखादी गोष्ट मनापासून केली तर ती प्रत्यक्षात येते. माननीय श्री. पवार यांच्या संकल्पनेतून हे महाराष्ट्र राज्याचे सरकार स्थापन झाले. गोरगरिब जनतेच्या मनात ज्या गोष्टी आहेत त्या आपण खावटी योजनेच्या माध्यमातून देऊ केल्या आहे. कोव्हिडच्या काळात ४८० कोटी रुपयांची भरीव तरतूद आदिवासींकरिता केली. सर्वसामान्य माणसाला अपेक्षित असणारी मदत आपण पुन्हा सुरु केली.

अध्यक्ष महोदय, अनेक योजना मागच्या काळात बंद झाल्या होत्या त्या आता आपण पुन्हा सुरु केल्या आहेत. ठक्करबाप्पा योजना, ५०५४, ३०५४ मधील निधी असो, तसेच आमदार निधी देखील सर्व आमदारांना सरसकट दिला आहे, याचा मला सार्थ अभिमान आहे. माझी आदिवासी विकास मंत्री यांना मागणी आहे. राज्यातील २५ विधानसभा व ४ लोकसभा मतदारसंघात राहणाऱ्या तसेच या व्यतिरिक्त जनरल, एस.सी मतदारसंघ व राज्याच्या अनेक भागांमध्ये जे आदिवासी बांधव राहत आहेत, त्यांच्या अडचणी सोडवण्याकरिता या भागातील लोकसंख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन द्यावा.

अध्यक्ष महोदय, आपल्या विभागाच्या माध्यमातून माझ्या मतदारसंघातील काही मागण्या मी करु इच्छितो. मोखाडा तालुक्यातील चास, जव्हार येथील आयना,ओझर, तलावली, वाडा मधील आमगाव या आश्रमशाळांचे काम होणे शिल्लक आहे. या करिता निधी द्यावा, अशी मागणी करतो. राज्यात ३३ प्रकल्प असून ९०० आश्रमशाळा व वसतिगृहे आहेत. या करिता माझी मागणी आहे. आश्रमशाळांमधून सुमारे १० लाख विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात आहे. त्यांच्याकरिता प्रत्येक आश्रमशाळेत एक तरी रुग्णवाहिका ठेवावी. ५ लाख रुपयांपर्यंतच्या गाड्या दिल्या तर ४० ते ५० कोटी रुपयांचा खर्च येईल. ११ हजार

असुधारित प्रत

श्री. सुनील भुसारा.....

२०० कोटी रु. आपण दिले आहेत. यामधून वर्षाला एक जीव जरी आपण वाचवू शकलो तरी या निधीचे सार्थक होईल. दर वर्षी आश्रमशाळांमधील मुलांचे सर्पदंश होऊन किंवा आजारी होऊन मृत्यू होण्याचे प्रमाण फार वाढलेले आहे. कोव्हिडमध्ये शाळा बंद होत्या म्हणून हे प्रमाण कमी होते. मात्र आता ते प्रमाण वाढले आहे. या मुलांना वेळेत उपचार व्हावेत. या करिता प्रत्येक आश्रमशाळेत रुग्णवाहिका दिली तर या निधीचे चीज होईल. आपण राज्यातील सुमारे १० लाख आदिवासी मुलांना सांभाळत आहोत. त्यांचा जीव वाचला तर या निधीचा उपयोग होईल.

अध्यक्ष महोदय, दर वर्षाला १ लाख २५ हजार रुपये विद्यार्थ्यांना दिले जातात. एका –एका शिक्षण संस्थेला अडीच ते तीन कोटी रुपये वर्षाला दिले जातात. मागच्या काळात कार्यकर्त्यांच्या, नेत्यांच्या शाळांना मुले मिळावीत, निधी मिळावा या करिता पाचगण, महाबळेश्वर येथे शाळा तयार करण्यात आल्या. कोंबड्यांच्या खुराड्या प्रमाणे या वसतिगृहाची स्थिती करण्यात आली. ही अतिशय चुकीची गोष्ट झालेली आहे. नामांकित शाळेचा जो हेतू आहे त्याला हरताळ फासून एकाि विशिष्ट पक्षाच्या संस्थेच्या नेत्यांना निधी मिळावा म्हणून या शाळांना विद्यार्थी दिले गेले. एकलव्य रेसिडेन्शियल स्कुलचे अपग्रेडेशन करुन जिल्हावार शाळा सुरु केली तर या नामांकित शाळेच्या मुलांना, मोखाडा येथील मुलांना पाचगणीला जाण्याची गरज राहणार नाही. डहाणू मधील मुलांना महाबळेश्वरला जाण्याची गरज राहणार नाही. दुसरी, पहिलीच्या इयत्तेमधील ज्या मुलांचे वय ५-६ वर्षे आहे, ती मुले आई-वडिलांपासून लांब राहतात. त्यांना आई-वडिलांना भेटण्यासाठी ४०० -५०० किमी लांब, १०-१२ तास बसने प्रवास करावा लागतो. आदिवासी व्यक्तीची एवढी ऐपत नाही, हे आपल्याला माहीत आहे. आपण जाणकार आहात. तालुकानिहाय प्रकल्पनिहाय या शाळा सुरु केल्या तर नंदूरबार येथील मुलाला शिर्डी, शनि शिंगणापूरला पाठवण्याची गरज राहणार नाही. लहान मुलांना आई वडिल मिळाले

श्री. सुनील भुसारा.....

पाहिजेत. आपण आपल्या मुलांना शाळेत पाठवताना हा सर्व विचार करतो. तर आदिवासींचा देखील आपण विचार केला पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, मागच्या काळात ४ हजार कोटी रुपयांची खावटीची योजना होती. ती योजना १० हजार रु. पर्यंत वाढवली पाहिजे. मागील काळ कोव्हिडचा होता, महागाई होती, राज्य अडचणीत होते. अशा काळातही लोकांना ४ हजार रु. अनुदान दिले आहे. ते आता ८ हजार रु करावे, अशी मागणी आहे. या वर्षी देखील खावटी योजनेकरिता विशेष निधी द्यावा. मागील काळात आदिवासी कुटुंबांना वैयक्तिक लाभाच्या योजनेमधून घरकुल, गायी म्हशी दिल्या. त्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्याकरिता प्रयत्न केला गेला. आदिवासींची भात, नागली, वरई इ. पारंपरिक पिकां बरोबरच त्याच्या घरात दुभती जनावरे देखील सन २००९ ते २०१४ या काळात दिली होती. मात्र सन २०१४ नंतर ही योजना बंद झाली आहे. ती योजना आपण सुरु करावी जेणेकरुन माझ्या भागातील आदिवासींचे स्थलांतर थांबू शकेल. एकदा भात,नागलीचे पीक कापले की, त्यांना स्थलांतर करावे लागते. त्यांना हा जोडधंदा दिला तर स्थलांतर करण्याची गरज राहणार नाही व त्यांच्या कुटुंबांची गुजराण होईल. पूर्वी आदिवासींना दुभती जनावरे, पाईप इ. गोष्टी वैयक्तिक लाभाच्या योजनेतून दिल्या जात होत्या. त्या बंद झाल्या असून आता पुन्हा सुरु कराव्यात अशी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, दिंडोरी येथे एमआयडीसी हब मंजूर केले आहे. त्या धर्तीवर आदिवासी बहुल तालुक्यात एमआयडीसीचे प्रकल्प द्यावेत. यामुळे माझ्या भागातील आदिवासींना कामासाठी, रोजगारासाठी स्थलांतरित व्हावे लागणार नाही. रोजगारासाठी स्थलांतर करीत असताना या आदिवासींचे आर्थिक व शारिरीक शोषण होत असते.त्यांचा बळी पडू नये या करिता या बाबत विचार करावा.

अध्यक्ष महोदय, ठक्करबाप्पा वस्ती योजनेत माननीय श्री.पिचड मंत्री असताना एका ग्रामपंचायतीला ३२ लाख रुपयांपर्यंत मर्यादा दिली होती. आता लोकसंख्या वाढत आहे. लोकांच्या गरजा वाढत आहे. यामुळे प्रत्येक

श्री. सुनील भुसारा.....

ग्रामपंचायतीकरिता ठक्करबाप्पा योजनेची व्याप्ती ३२ लाख रुपयांवरुन वाढवून १ कोटी रुपयांपर्यंत करावी.

अध्यक्ष महोदय, आश्रम शाळेत स्त्री अधिक्षीका असे पद आहे. एका वसतिगृहात ५०० ते ७०० मुली राहतात. या मुलींची देखभाल करण्यासाठी हे पद आहे. हे पद जीएनएम मधून भरण्यात यावे. एनएचडब्ल्यू मधून पुरुष अधीक्षक घेतला जातो. त्यांना देखील आरोग्य विभागातून घेतले तर त्याचा फायदा शाळांना होऊ शकेल. सध्या आदिवासी मुलांचा कल एमपीएससी व विविध स्पर्धा परिक्ष्ज्ञांकडे वाढला आहे. सर्वांना मुंबई, नाशिक येथे जाता येणे शक्य नाही. या मुलांची राहण्याची , जेवण्याची व्यवस्था नाही. अशा मुलांकरिता आदिवासी भागात निवासी अभ्यासिका, वसतिगृह निर्माण करावेत किंवा आपली जेथे वसतिगृहे आहेत तेथे त्यांना प्रवेश देऊन अभ्यासिका सुरु कराव्यात, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, आपल्या आदिवासी विकास विभागाचे महामंडळ आहे. शासनाने एकाधिकार धान्य खरेदी बंद केली आहे. केंद्र शासनाची आधारभूत खरेदी केली जात आहे. यावर्षी राज्यात आदिवासी शेतकऱ्यांकडून सर्वाधिक भात घेतला असून त्यांना पैसे दिले जात आहेत. केंद्राची आधारभूत योजनेसोबत एकाधिकार खरेदी योजना सुरु केली तर भाता सोबतच तूर, उडीद, नागली, कुळीथ या ग्रामीण भागातील आदिवासी पिकांना चांगला भाव देता येईल अशी माझी मागणी आहे. यामुळे आदिवासींना न्याय मिळू शकेल. (अडथळा ) अध्यक्ष महोदय, मी माझे भाषण थोडक्यात पूर्ण करतो.

**तालिका सभाध्यक्ष** : मी सन्माननीय सदस्यांना १५ मिनिटांचा अवधी दिलेला आहे. माननीय उपमुख्यमंत्री यांनी सांगितले आहे की, कमीत कमी वेळेत भाषण करावे.

यानंतर श्रीमती गिरप...

श्री.सुनील भुसारा : अध्यक्ष महोदय, प्रत्येक निवडणुकीच्या अजेंड्यामध्ये समान नागरी कायद्याचा विषय येतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाला संविधान दिले. मी केवळ एक कविता वाचतो व थांबतो. समान नागरी कायदा आहे. समान नागरी कायद्याची नेहमी काही ठिकाणी मागणी होत असते.

समान नागरी कायदा,
कुणाकुणाचा फायदा,
नि कुणाचा वायदा,
हे स्पष्टच करा एकदा,

अध्यक्ष महोदय, आमचा कायदा तर फक्त पाचव्या, सहाव्या अनुसूचिमध्ये आहे, ती अगोदर लागू करा. समान नागरी कायदा लागू करा असे म्हणणाऱ्या मूठभर लोकांसाठी सर्व उठाठेव चाललेली आहे.

कायदा आमचा ग्रामसभेचा,
कायदा आमचा समानतेचा,
आम्हाला नाही हो गरज,
या अशा समान नागरी कायद्याची,
आम्हाला गरज आहे,
पाचव्या, सहाव्या अनुसूचिची,
स्वतंत्र राष्ट्र आम्ही मागत नाही,
भारत ही आमचीच भूमी आहे,
आदिवासी आम्ही खरे मालक,
या देशाचे राजे आहोत,

अध्यक्ष महोदय, एवढेच सांगतो आणि थांबतो. धन्यवाद. जय हिंद.जय महाराष्ट्र.

.......

असुधारित प्रत

श्री.टेकचंद सावरकर (कामठी): अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आदिवासी विकास विभागाच्या मागण्यांवर बोलताना मला हे सांगावयाचे आहे की, आदिवासी विद्यार्थ्यांबाबत मोठ्या प्रमाणात दुजाभाव करण्याची भूमिका अधिकारी व राज्य सरकारच्या माध्यमातून दिसून येते. आपल्याला माहीत आहे की, महाराष्ट्रातील शासकीय व अनुदानित शाळांमधून मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. हे शिक्षण देत असताना नामांकित शाळांवर सरकारचा निधी मोठ्या प्रमाणावर खर्च केला जातो.

अध्यक्ष महोदय, आपले जे विद्यार्थी आहेत आपल्या शासकीय शाळा किंवा अनुदानित शाळांचा एकत्रितपणे अभ्यास केला तर निश्चितपणाने आपल्याला दोन्ही ठिकाणी मोठ्या प्रमाणात दुजाभाव होत असल्याचे दिसून येईल. आपल्याला सांगताना दु:ख होते की, आताच सन्माननीय सदस्य प्रा.डॉ.अशोक उइके यांनी सांगितले की, मंत्री महोदयांच्या जिल्ह्यामध्ये ६५ विद्यार्थीनी पायी प्रवास करुन प्रकल्प कार्यालयामध्ये आपले गाऱ्हाणे मांडण्याकरिता गेल्या होत्या. तेथे शिक्षक नव्हते त्यामुळे त्यांना वर्षभर कुठल्याही प्रकारचे शिक्षण मिळाले नाही.

अध्यक्ष महोदय, संपूर्ण राज्यात तासिका तत्वावर १४ हजार रुपये मानधन देण्याची पध्दती आहे. परंतु, शिक्षक उपलब्ध होत नाहीत. परंतु, आपण जर १४ हजार रुपयांऐवजी ९ हजार रुपये शिक्षण सेवक म्हणून दिले तर, निश्चितपणाने कायमस्वरुपी शिक्षकांची नेमणूक होईल व सरकारची आर्थिक बचत देखील होईल व मुलांना शिकविण्याकरिता शिक्षक उपलब्ध होतील. त्यामुळे अशा प्रकारची भूमिका जर शासनाने घेतली तर, निश्चितपणाने आपल्या विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे शिक्षण मिळेल.

अध्यक्ष महोदय, राज्यात आदिवासी आश्रमशाळा संहिता सन २०२० मध्ये लागू करण्यात आलेली होती. आपल्या सरकारने दि. ८ मार्च, २०२० रोजी आश्रमशाळा संहिता नियुक्त केलेली होती. परंतु, अधिकारी स्तरावर त्या ठिकाणी जे

श्री.टेकचंद सावरकर ...

सरकारच्या बाजूचे धोरण असते ते संहितेमध्ये नमूद करतात. जे सरकारच्या बाजूचे धोरण नसेल त्यावर संहितेच्या बाहेर निर्णय लावला जातो. मी एक विषय सांगतो की, ज्या अनुदानित आश्रमशाळा आहेत त्या आश्रमशाळेत वर्गात ३० पेक्षा कमी विद्यार्थी असतील तर एकही रुपयाचे अनुदान त्यांना मिळत नाही. एखाद्या वर्गात जर २९ विद्यार्थी असतील तर त्यांना जेवण देऊ नये अशी भूमिका दिसून येत आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, संहितेप्रमाणे त्या वर्गात जेवढे विद्यार्थी असतील त्या सर्वांची त्या ठिकाणी जेवणाची व्यवस्था झाली पाहिजे, असा निर्णय आदिवासी विकास विभागाने घेतला पाहिजे. या संहितेच्या तरतुदीतील नियम कायद्याला धरुन आहेत. त्यामुळे या नियमानुसार तेथे जेवढे विद्यार्थी असतील, तेवढ्या विद्यार्थ्यांच्या जेवणाकरिताचे अनुदान दिले पाहिजे अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आपल्याला माहीत आहे की, कोरोनाच्या काळात विद्यार्थी घरी होते. ते शाळेत जात नव्हते. त्यावेळेस अनेक विद्यार्थी मृत्युमुखी पडले होते. त्याही परिस्थितीत आदेश काढून १ लक्ष रुपये जबरदस्तीने देण्याबाबत संस्थेला ...(अडथळा) ... कोरोना काळात सर्व विद्यार्थी घरी होते. घरी असताना त्या विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला तर ते त्या संस्थेला देणे शासनाने अनिवार्य केलेले आहे. संस्थेचा कोणताही दोष नसताना, विद्यार्थी घरी असताना त्यांच्याकडून १ लाख रुपये घेण्यास भाग पाडले जात होते. आदिवासी विकास विभागाच्या मंत्री महोदयांना विनंतीपूर्वक सांगावयाचे आहे की, हा जो पालकांचा १ लक्ष रुपयांचा निधी आहे तो शासनाने अदा करावा.

अध्यक्ष महोदय, अनुदानित आश्रमशाळेमध्ये ४०० ते ८०० निवासी विद्यार्थी असतात. त्यांच्या रक्षणाकरिता २४ तास काम करणाऱ्या पहारेकऱ्याला ५०० रुपये मिळतात. दुसरीकडे आपल्या ज्या शासकीय शाळा आहेत, त्या शाळेच्या पहारेकऱ्यांना चतुर्थश्रेणीच्या वेतनश्रेणी प्रमाणे वेतन दिले जाते. या २ संस्थांमध्ये हा जो दुजाभाव आहे, त्याचे देखील निवारण करण्याची भूमिका सरकारने घ्यावी, अशी मी विनंती करतो.

श्री.टेकचंद सावरकर ...

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद. नमस्कार.

.....

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र भूयार (मोर्शी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आपण श्रावणबाळ पेन्शन योजना तसेच संजय गांधी निराधार योजना तालुकास्तरावर राबवतो. त्यामध्ये अपंग लाभार्थ्यांना ही योजना मंजूर करताना अशी अडचण येते की, त्याचा मुलगा २५ वर्षांच्या आतमध्ये असला पाहिजे. अपंग माणूस एकतर शरीराने पूर्ण विकलांग असतो. अशावेळेस जर आपण त्यांच्या मुलांच्या वयाची अट नमूद केली तर, तो पात्र लाभार्थी अपात्र ठरतो. ती अट आपण काढावी, अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आदिवासी समाजाची ४५ हजारपेक्षा जास्त लोकसंख्या माझ्या मुरुड-मोर्शी मतदारसंघात आहे. मी २ वर्षांपासून राज्य सरकारकडे सातत्याने वसतिगृहाची मागणी करीत आहे. मोर्शी व मुरुड येथील दोन वसतिगृहांचे राज्य सरकारकडे आलेले आहेत. शासनाने दखल घेऊन त्या प्रस्तावांना तत्काळ मान्यता द्यावी, अशी मी मागणी या निमित्ताने करतो.

अध्यक्ष महोदय, मुरुडपासून धारणीचे अंतर साधारणत: २०० कि.मी. आहे. यापूर्वीच्या आमदार महोदयांनी तसेच मी देखील पी.ओ. कार्यालय मुरुड किंवा मोर्शीला आले पाहिजे, अशी सातत्याने मागणी केली. परंतु, शासनाने मागचे सरकार असो की, आपले सरकार असो दखल घेतली नाही. मी वारंवार मागणी केल्यानंतर यावेळेस एपीओ कार्यालय मंजूर करुन दिले. परंतु, अधिकार मात्र बहाल केले नाहीत. मी या निमित्ताने माननीय श्री.अजित पवार यांना विनंतीपूर्वक सांगतो की, पीओ कार्यालयाची मागणी वारंवार होत आहे, ते लक्षात घेऊन या वर्षी नवीन प्रकल्प कार्यालय मुरुड मोर्शी तालुक्यात मंजूर करण्यात यावे. ३०५४, ५०५४ या लेखाशीर्षांतर्गत निधी दिला जातो. आता समितीच्या अध्यक्ष महोदयांनी सांगितले की, आपण तो निधी जिल्हा परिषदेला वर्ग करतो.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र भुयार...

जिल्हा परिषद हेकेखोरपणा करुन त्यांच्या मनाप्रमाणे निधीचे तुकडे करते व ज्या कामांना पीसीआय इंडेक्सनुसार निधी देणे गरजेचे असते त्या व्यतिरिक्त इतर कामांना निधी वितरित करण्यात येतो, त्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येते. हा आदिवासी भागांतील लोकांवर अन्याय आहे. राजकीय द्वेषापोटी लोकांना योजनेपासून वंचित ठेवण्यात येत आहे.

अध्यक्ष महोदय, महाविकास आघाडी सरकराने यावर्षी ६० कृषि पंप जोडण्या देण्याचा निर्णय घेतला आहे. महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीकोनातून आदिवासी महिलांना ३० टक्के लाभ देण्यात येत होता. त्यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेऊन ५० टक्के लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मागील २ वर्षापासून सातत्याने कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. यासर्व निर्णयाबद्दल मी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार व महाविकास आघाडी सरकारचे अभिनंदन करतो व आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, वैद्यकीय शिक्षण विभाग - सन २०२१-२०२२ मधील अर्थसंकल्पामध्ये अमरावती जिल्ह्यासह राज्यातील ५ जिल्ह्यांमध्ये नवीन वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला होता. अमरावती जिल्ह्यातील धारणी, चिखलदरा, वरुड मोर्शी सारख्या भागांचा विचार केला तर या जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणे ही काळाची गरज आहे. आता दीड वर्षांचा कालावधी जाऊनही अमरावती वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रस्तावासंदर्भात कार्यवाही करण्यात आली नाही. सदरहू प्रस्तावास मंजूरी देऊन लवकरात लवकर वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यात यावे, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे. धन्यवाद !

-----------

असुधारित प्रत

श्री.राजू आवळे (हातकणंगले) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय विभाग – या विभागाची स्थापना समाजातील दलित, मागासवर्गीय लोकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना त्यांच्या पायावर उभे करण्यासाठी, त्यांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून करण्यात आली आहे.

अध्यक्ष महोदय, समाज कल्याण विभागांतर्गत असलेले महामंडळ सद्य:स्थितीत बंद असून त्यावर अध्यक्ष नियुक्त करुन ते लवकरात लवकर सुरु करण्यात यावे. परिणामी राज्यातील बऱ्याच युवकांच्या हाताला काम मिळेल, रोजगार मिळेल. सदरहू महामंडळ सुरु होईल, या आशेने लोक वाट पाहत आहेत. उक्त महामंडळाचे कामकाज लवकरात लवकर सुरु करावे, अशी माननीय उप मुख्यमंत्री यांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामधील माणगाव हे ऐतिहासिक गाव आहे. येथे दिनांक २१ व २२ मार्च, १९२० रोजी छत्रपती शाहू महाराज यांच्या उपस्थितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली पहिली बहिष्कृत परिषद निर्माण करण्यात आली होती. ती ऐतिहासिक होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिक्षण पूर्ण करुन आले त्यावेळी ही सभा झाली होती. त्यावेळी छत्रपती शाहू महाराज यांनी सांगितले होते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे देशाचे नेते होतील, दलितांचे नेते होतील. त्यानंतर त्यांच्या कार्यास सुरुवात झाली व त्यांच्या कार्याचा पुढील इतिहास आपणा सर्वांना माहिती आहे.

अध्यक्ष महोदय, शासनाने २ वर्षापूर्वी शताब्दी वर्षानिमित्त माणगावसाठी १६९ कोटी रुपये निधी देण्याचे मान्य केले होते. त्यामधील २.५ कोटी रुपये निधीतून लंडन हाऊस स्थापन करण्यात आले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर लंडन हाऊस येथे शिक्षण घेत होते तसेच लंडन हाऊस माणगाव येथे उभारण्यात आले आहे. छत्रपती शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे झाली होती त्याचा

श्री.राजू आवळे...

होलिग्राफी शो थ्रीडी हॉल निर्माण करण्यात आला असून तो उद्घाटनाच्या प्रतिक्षेत आहे. या हॉलचे उद्घाटन २ वर्षापूर्वीच करण्यात येणार होते. परंतु कोरोनाचा प्रादुर्भाव सुरु झाल्याने ते होऊ शकले नाही. उक्त भागातील दलित समाजातील लोकांनी त्यांची ४ एकर जमीन या ठिकाणच्या स्मारकाला देण्याचे काम केले आहे. सदरहू हॉलचे उद्घाटन करण्यात यावे. तसेच उर्वरित निधी उपलब्ध करुन देऊन स्मारकाची सर्व कामे पूर्ण करावीत, अशी माझी उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मागासवर्गीयांसाठी राबविण्यात येणाऱ्या सर्व योजना पुन्हा सुरु करण्यात याव्यात, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे. धन्यवाद !

------------

असुधारित प्रत

डॉ.तुषार राठोड (मुखेड) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय विभाग – लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे सुवर्ण महोत्सवी वर्ष मागील वर्ष साजरे करण्यात आले आहे. राज्यातील सर्व समाज बांधवांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून मातंग समाजाची एक मागणी पुढे आली आहे की, पुणे येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टीट्यूट, बार्टीची स्थापना करण्यात आली त्याच धर्तीवर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टीट्यूट स्थापन करण्यात यावे. त्याच्या माध्यमातून मातंग समाजातील ज्या होतकरु विद्यार्थ्यांना हलाखीच्या परिस्थितीमुळे शिक्षण घेणे शक्य नाही त्यांना भविष्य काळात पुढील शिक्षण देण्यात यावे. या मागणीच्या संदर्भात सामाजिक न्याय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात उल्लेख करावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यातील अनेक जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये मागासवर्गीय वसतिगृहे आहेत. त्यामध्ये अनुसूचित जातीचे अनेक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांच्याकरिता राज्यात कोठेही पब्लिक स्कूलची व्यवस्था नाही. ती प्रत्येक जिल्ह्यात करण्यात यावी व वसतिगृहामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची एन्ट्रन्सच्या माध्यमातून भरती करण्यात यावी, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, वैद्यकीय शिक्षण विभाग – वैद्यकीय महाविद्यालयामध्ये पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र स्टेट मेडिकल टिचर्स असोशिएशनच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात येते. या असोशिएशनच्या संघटनेच्या मागण्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. त्यामुळे उक्त शिक्षक वारंवार आंदोलन करतात. परिणामी वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात बाधा येत आहे. मागील काळात एनपीए व विविध भत्यांची मागणी उक्त असोशिएशन संघटनेने केली होती. वैद्यकीय शिक्षकांना ७ वा वेतन आयोग अद्याप लागू केला नाही, तो लागू करण्यात यावा, सन २००८ मधील शासन निर्णयानुसार खाजगी प्रॅक्टीस करण्याची

डॉ.तुषार राठोड...

मुभा देण्यात यावी, एनपीए ऑप्शनल असावे, या त्यांच्या प्रमुख मागण्या आहेत. तसेच अस्थायी सहायक प्राध्यापकांचे शासकीय सेवेत समावेशन करण्यात यावे, अशीही मागणी आहे. या संघटनेच्या सर्व मागण्या मान्य करण्यात याव्यात, अशी माझी वैद्यकीय शिक्षण मंत्री यांना विनंती आहे.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

डॉ.तुषार राठोड.....

त्यांची दुसरी मागणी अशी आहे की, दिनांक २७.१२.२००१ रोजी कॅबिनेट बैठकीमध्ये घेण्यात आलेला कंत्राटी नियुक्त्यांचा शासन निर्णय मागे घेण्यात यावा. गेली अनेक वर्षे शासन सेवेत इमानेइतबारे काम करणाऱ्या वैद्यकीय शिक्षकांवर सदर शासन निर्णयामुळे अन्याय होत आहे. त्यापेक्षा समावेशन करून घेणे व यापुढे दरवर्षी MPSC च्या माध्यमातून भरती करून त्यांना नियमित करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केलेली आहे. त्यांची ही मागणी देखील मान्य करावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, राज्यामध्ये जेव्हा जेव्हा नवीन वैद्यकीय महाविद्यालये स्थापन होतात, तेव्हा उपलब्ध असलेल्या वैद्यकीय महाविद्यालयातील शिक्षकांना आपण त्या ठिकाणी प्रतिनियुक्तीवर पाठवित असतो. असे न करता त्यांची सेवा भरती करूनच वैद्यकीय महाविद्यालय सुरू करावे, अशी मी विनंती करतो. त्यांनी आपल्या उत्तरामध्ये सदर भाषणामध्ये याबाबतचा उल्लेख करावा, अशी मी त्यांना विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि GMC नांदेड येथे कॅन्सर हॉस्पिटल उभारण्यात यावे, अशी अनेक वर्षांपासून मागणी करीत आहोत. परंतु अद्याप याबाबत शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. रेडिओ थेरपी सेंटरसाठी १५ कोटी रुपये मंजूर केलेले आहेत. परंतु अद्याप ते सेंटर सुरू झालेले नाही.

अध्यक्ष महोदय, मुंबई येथे अस्तित्वात असलेले टाटा कॅन्सर हॉस्पिटल हे त्या पद्धतीचे देशातील एकमेव हॉस्पिटल आहे. सबंध देशातील रुग्णांचा भार या हॉस्पिटलवर आहे. त्यामुळे अनेक रुग्णांना प्रतिक्षेत राहावे लागते. त्यांना योग्य वेळी उपचार मिळत नाहीत किंवा त्यांचे निदान होऊ शकत नाही. त्यामुळे नांदेड या ठिकाणी केवळ रेडिओ थेरपी सेंटर मंजूर न करता औरंगाबादच्या धर्तीवर शासकीय कॅन्सर रुग्णालय सुरू करण्यात यावे, अशी मागणी मी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय अर्थमंत्री यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये घोषणा केली की, भविष्यकाळामध्ये पुणे येथे ३०० एकरमध्ये इंद्रायणी मेडिसिटी

डॉ.तुषार राठोड.....

इंटिग्रेटेड मेडिकल मॅनेजमेंट हे उभे केले जाणार आहे. एक डॉक्टर या नात्याने मी आपल्या या घोषणेचे स्वागत करतो. माझी अशी मागणी आहे की, प्रत्येक विभागामध्ये इंटिग्रेटेड मेडिकल मॅनेजमेंट सेंटर हे भविष्यकाळामध्ये सुरू करण्यात यावे. जेणेकरून भविष्यकाळामध्ये या राज्यात असलेल्या ॲपेक्स ईन्स्टीटयुट वरील भार कमी करता येईल, या अनुषंगाने मी अशी मागणी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, आदिवासी विभागाकडे अत्यंत महत्त्वाची मागणी मला करावयाची आहे. माझ्या मतदारसंघामध्ये आदिवासी कोळी आणि आदिवासी मन्नेरवारलू बांधव मोठ्या प्रमाणावर राहतात. या दोन्ही जमातीच्या विद्यार्थ्यांचे जात पडताळणीची अनेक प्रकरणे ही मागील अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत. औरंगाबाद या ठिकाणी जात पडताळणीचे कार्यालय आहे. या ठिकाणी सहसंचालक पदावर श्री.दिनकर पावरा नावाचे अधिकारी हे मागील पाच वर्षापासून कार्यरत आहेत. प्रत्येक तीन वर्षानंतर संबंधित अधिकाऱ्यांची बदली होणे गरजेचे असताना या समाज बांधवांना जात पडताळणी प्रमाणपत्रापासून वंचित ठेवण्यासाठीच की काय त्यांना सदर पदावर कायम ठेवण्यात आलेले आहे, अशी भावना या समाज बांधवांची झालेली आहे. सदर प्रकरणी माझी मंत्री महोदयांना विनंती राहील की, तत्काळ संबंधित अधिकाऱ्याची बदली करावी. याचे कारण असे आहे की, जे ९ हजार प्रकरणे प्रलंबित आहेत, त्यातील ७ हजार प्रकरणे ही केवळ आदिवासी कोळी आणि मन्नेरवारलू समाजाची आहेत. संबंधित अधिकाऱ्याने अवैध केलेल्या १ हजार २०० प्रकरणांपैकी १ हजार प्रकरण‍े माननीय सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरविलेले आहेत. त्यामुळे मुद्दाम संबंधित अधिकारी उमेदवारांचे जात वैधाता प्रमाणपत्र अवैध ठरवित आहेत, अशी धारणा समाज बांधवांची झालेली असल्यामुळे संबंधित अधिकारी यांची बदली करावी आणि त्या ठिकाणी बिगर आदिवासी अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री.विजय वडेट्टीवार आता सभागृहामध्ये उपस्थित आहेत. आपणास माहिती असेल की, मागच्या युती शासनाच्या काळात

डॉ.तुषार राठोड.....

महाराष्ट्रामध्ये OBC आणि VJNT च्या विद्यार्थ्यांसाठी कमळेवाडी ता. मुखेड जिल्हा नांदेड एक पब्लिक स्कूल सुरू केले होते आणि सध्या ते कार्यरत आहे. त्यावेळेस ते केवळ प्रायोगिक तत्त्वावर सुरू केले गेले होते. परंतु त्यानंतर प्रत्येक जिल्ह्यामध्ये VJNT च्या विद्यार्थ्यांसाठी असे पब्लिक स्कूल सुरू करण्यात येईल, अशी त्यावेळ‍ी घोषणा करण्यात आली होती. उक्त घोषणेनुसार आता प्रत्येक जिल्ह्यात आश्रमशाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी एक VJNT चे पब्लिक स्कूल सुरू करण्यात यावे, अशी मी मागणी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, अशा पब्लिक स्कूलमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शासनाकडून १ हजार ५०० रुपये परिपोषण अनुदान दिले जाते. विभागीय शासकीय पब्लिक स्कूलमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना २ हजार २५० रुपये परिपोषण अनुदान देतो. दोन विद्यार्थ्यांमध्ये अशी तफावत करण्यात येऊ नये, अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करतो. विद्यानिकेतनच्या परिपोषण अनुदानामध्ये वाढ करून २ हजार २५० इतकी वाढ करावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, सन २००४-०५ च्या सुमारास या राज्यामध्ये बंजारा समाजाच्या मागासलेपणासाठी, त्यांच्या विकासासाठी तांडावस्ती ही योजना सुरू केली गेली. सदर योजना जेव्हा सुरू केली गेली तेव्हा प्रामुख्याने या योजनेमध्ये बंजारा समाजाच्या तांड्यांचा उल्लेख होता. त्या ठिकाणी विकास साधला जावा अशी भूमिका होती. परंतु कालांतराने सरकारे बदलली आणि वेगवेगळया विचारांचे मंत्री आले आणि अनेक जातींचा या योजनेमध्ये समावेश केला गेला. इतर जातींचा समावेश केला गेला याबाबत आम्हाला काही म्हणावयाचे नाही आहे. परंतु इतर जातींचा समावेश केल्यामुळे लोकसंख्या वाढलेली आहे. त्या लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये तांडावस्ती निधी सुद्धा वाढविला गेला पाहिजे. त्यामुळे आता शासनाने तांडावस्तीसाठी २०० कोटी रुपये उपलब्ध करुन द्यावेत, अशी मी विनंती करतो.

डॉ.तुषार राठोड.....

अध्यक्ष महोदय, महाज्योती पुणे येथे VJNT चे रिसर्च आणि ट्रेनिंग ईन्स्टीटयुट चालू आहे. त्यासाठी देखील लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी विनंती करतो आणि मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

--------

असुधारित प्रत

श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) : अध्यक्ष महोदय, सन २०२२ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सर्वप्रथम मी माननीय मुख्यमंत्री महोदय आणि माननीय उपमुख्यमंत्री यांचे आणि त्यांच्या नेतृत्वामध्ये काम करणाऱ्या आघाडी सरकारचे अभिनंदन करतो. कोविडमुळे राज्यावर आलेल्या आर्थिक संकटातून मार्ग काढून सर्व विभागांना समाधानकारक निधीची तरतूद केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, मी आता सामाजिक न्याय विभागावर बोलणार आहे. सन २०१८-१९ चा ९ हजार २०८ कोटी रुपयांचा नियतव्यय होता. त्यापैकी फक्त ६ हजार ७९७ कोटी रुपयांचा खर्च झालेला आहे. म्हणजे २ हजार ४११ कोटी रुपये अखर्चित राहिले आहेत. सन २०२०-२१ चा ९ हजार ६६८ कोटी रुपयांचा नियतव्यय होता. त्यापैकी फक्त ६ हजार ४६३ कोटी रुपयांचा खर्च झालेला आहे. जवळपास ३ हजार २०४ कोटी रुपयांचा निधी हा अखर्चित राहिलेला आहे. सन २०२१-२२ चा निधी चा नियतव्यय हा १० हजार ६६५ कोटी रुपयांच◌ा होता. त्यापैकी मागील आठवड्यापर्यंत ५ हजार ५९ कोटी रुपयांचा निधी खर्च झालेला आहे. मार्च अखेरला आता १० ते १५ दिवस शिल्लक आहेत. हे सर्व सांगण्याचे कारण असे की, यावर्षी माननीय श्री.अजित पवार यांनी सामाजिक न्याय विभागाला १२ हजार कोटी रुपयांपर्यंतचा निधी दिलेला आहे. कितीही मोठे नियोजन करून जर खर्च नाही झाला तर त्या विभागाला न्याय मिळू शकेल काय हा माझा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय विभागामध्ये महात्मा फुले महामंडळ, संत रोहिदास महामंडळ, अण्णाभाऊ साठे महामंडळ, वाल्मिकी महामंडळ असे अनेक महामंडळे आहेत. या सर्व महामंडळामधून तरूणांना रोजगारासाठी कर्ज मिळायला पाहिजे, परंतु मागील अनेक वर्षापासून कोणालाही कर्ज मिळत नाही. ज्या लोकांनी यापूर्वी कर्ज घेतले आणि ते परतफेड केली नसेल, कर्ज थकित असतील त्यामुळे नवीन तरुणांना कर्ज दिले जात नाही.

अध्यक्ष महोदय, आपण कृषी विभागाला २० ते २५ हजार कोटी रुपयांचा निधी देऊन सर्व कर्ज माफ केली जात◌े. मोठ्या उद्योगपतींना कर्जमाफी दिली जाते.

असुधारित प्रत

श्री.नरेंद्र भोंडेकर........

ऊर्जा विभागाने देखील माफीची योजना आणलेली आहे. मागासवर्गीय लोकांकडे शासनाने विशेष लक्ष देण्याच्या दृष्टीने माननीय श्री.अजित पवार यांनी या विभागासाठी खूप मोठी तरतूद केलेली आहे. माझ्या माहितीनुसार जास्तीत जास्त ५०० ते १ हजार कोटी रुपयांचे कर्ज थकित असेल. ते सर्व कर्ज एकदा माफ केले तर नवीन मुलांना कर्ज घेण्याचीसाठी संधी प्राप्त होईल, असे मला सांगावयाचे आहे.

अध्यक्ष महोदय, थोड्या वेळापूर्वीच एका सन्माननीय सदस्याने सांगितले की, माननीय श्री.चंद्रकांतजी हंडोरे हे सामाजिक न्याय मंत्री होते. त्यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये अनेक नवनवीन योजना राबविल्या होत्या. परंतु त्यांच्या नंतर एकाही सामाजिक न्याय मंत्री महोदयांनी विशेष असा नवीन उपक्रम आणला किंवा नवीन योजना आणली. समाजाला चांगल्या प्रकारे न्याय देऊ शकेल अशी मागील १०-१५ वर्षामध्ये एकही योजना अंमलात आणली गेली नाही.

यानंतर श्री.कुलकर्णी........

असुधारित प्रत

श्री. नरेंद्र भोंडेकर....

औद्योगिक संस्थेची सात कोटी रुपयांची योजना होती. सात कोटी रुपये नवीन उद्योग निर्मितीकरिता दिले होते. हा एक नवीन प्रयोग होता. काही योजना यशस्वी झाल्या तर काही अयशस्वी झाल्या आहेत. विदर्भामध्ये कमी प्रमाणात उद्योगधंदे होते. तर पश्चिम महाराष्ट्रात उद्योगांची संख्या मोठी होती. तेथे ही योजना देण्यात आली. ज्यावेळेस एखादी योजना प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात येते, तेव्हा त्यात काही उणिवा असतात. काही उणिवांमुळे ती योजना यशस्वी होऊ शकली नाही. मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, या योजनेत नवीन बदल केले पाहिजेत. या योजनेला पाठबळ दिले तर नवीन उद्योग निर्माण होतील व रोजगार निर्मिती येईल. यात बँकेने २५ टक्के कर्ज दिले पाहिजे. परंतु एकाही बँकेने हे कर्ज दिले नाही. मागासवर्गीय जनतेची हालाखीची परिस्थिती असल्यामुळे बँक कर्ज देत नाही. मी विनंती करतो की, या योजनेचे पुनर्गठन करीत असताना शासनाने २५ टक्के निधी उपलब्ध करुन द्यावा.

अध्यक्ष महोदय, मागील सरकारच्या काळात माननीय माजी मंत्री श्री. राजकुमार बडोले यांना ही योजना अपग्रेड करण्याबाबत आम्ही वारंवार विनंती केली होती. परंतु त्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. विभागाचा निधी वाढतो, परंतु कामे होत नाहीत. मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, या औद्योगिक योजनेचे पुनर्गठन करावे. जेणेकरुन या योजनेमुळे रोजगारात वाढ होईल.

अध्यक्ष महोदय, या विभागामार्फत अनेक स्मारके मंजूर केली जातात. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. दिलीप लांडे यांनी आण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाकरिता निधी मागितला आहे. आण्णाभाऊ साठे, क्रांतिवीर लहुजी साळवे, संत रोहिदास, संत वाल्मिकी यांच्याकरिता निधी दिला जात नाही. ही दुर्दैवी बाब आहे. हे सर्व समाज आज मागास आहेत. या समाजाला सोबत घेऊन गेले पाहिजे. परंतु एखाद्या समाजाच्या स्मारकासाठी जागा दिली जाते, निधी दिला जातो. याबाबत आमचे दूमत नाही. परंतु इतरही समाजाच्या स्मारकासाठी निधी व जागा उपलब्ध करुन दिली

असुधारित प्रत

श्री. नरेंद्र भोंडेकर....

पाहिजे. याबाबतचे प्रस्ताव शासनाकडे येत असतात. परंतु त्यावर कोणतीही कार्यवाही होत नाही. मध्यंतरी मराठा समाजाला आरक्षण मिळावे, याकरिता काही आंदोलनकर्ते शहीद झाले आहेत. त्यांना मदत करण्याची घोषणा केली आहे. परंतु मातंग, चर्मकार समाजाचे कार्यकर्ते अ,ब,क,ड करिता मागणी करीत असतात. त्यामध्ये त्यांना बलिदान द्यावे लागले होते. त्यांना कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत केली जात नाही. यानिमित्ताने त्यांच्यासाठी आर्थिक मदतीची घोषणा करावी, अशी मी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या निधीतून समाजाला आधार देण्याची आवश्यकता आहे. यात शाळा, महामंडळे, स्मारके, योजना यांचा लाभ मागासवर्गीयांना झाला पाहिजे. विविध महामंडळाकडे शासनाने लक्ष द्यावे, अशी मी विनंती करतो. इतर मागासवर्ग विभागाबाबत मी काही सूचना करणार आहे. या विभागाला सन २०२०-२१ करिता ३ हजार २०० कोटी रुपये व सन २०२२-२३ करिता ३,४०० कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. राज्यात एकूण लोकसंख्येपैकी जवळपास ५ कोटी लोकसंख्या इतर मागासवर्गातील आहे. म्हणजे ही टक्केवारी ५२ इतकी आहे. असे असताना या समाजाकरिता ३ हजार ४०० कोटी रुपयांचा निधी दिला जात आहे. इतका कमी निधी दिला तर या समाजाचा विकास होणार नाही. आज राज्यात सामाजिक न्याय विभागाचे १,६०० अभ्यासक्रम आहेत. यातील केवळ ६०५ अभ्यासक्रमामध्ये इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांना ५० टक्के शिष्यवृत्ती दिली जाते. सामाजिक न्याय विभागामार्फत १,६०० अभ्यासक्रमाला शिष्यवृत्ती दिली जाते. त्याचप्रकारे इतर मागासवर्ग विद्यार्थ्याच्या सर्व अभ्यासक्रमाला १०० टक्के शिष्यवृत्ती मिळाली पाहिजे. जेणेकरुन त्या समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा दर्जा वाढेल. देशाला महसत्ता बनावयाचे असेल तर इतर मागासवर्ग समाजाला विकासाच्या प्रवाहात आणले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, पंतप्रधान घरकूल आवास योजनेतून ग्रामीण भागास १ लाख २० हजार रुपये आणि शहरी भागाकरिता अडीच लाख रुपयांची मदत केली जाते.

श्री. नरेंद्र भोंडेकर....

यात मोठा फरक आहे. ग्रामीण भागातील लोकांना घराचे बांधकाम करण्याच्या साहित्यात कोणतीही सूट दिली जात नाही. तरीही या योजनेतून कमी रक्कम मिळत असते. तेथेही खर्च लागत असतो. मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, शहरी भाग आणि ग्रामीण भागातील योजनेत एकसमानता असली पाहिजे. इतर मागासवर्ग समाजातील ज्या लोकांकडे घरे नाहीत, जे लोक उघड्यावर राहतात त्यांना या योजनेत प्राधान्य दिले जावे. या योजनेत ऑनलाईन अर्ज केला जातो. ज्यांची पक्के घरे आहेत त्यांचे नाव या योजनेच्या यादीत आले आहे. परंतु गरजू लोकांचे नाव आलेले नाही. या लोकांना प्राधान्य दिले जावे. यात जे कोणी ऑनलाईन अर्जाची छाननी करतात त्यांनी चुकीचे काम केले असेल तर त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. इतर मागासवर्ग समाजाला न्याय द्यावयाचा असेल तर अर्थसंकल्पीय तरतूद वाढवून दिली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आदिवासी विकास विभगााच्या अनेक योजना आहेत. यात ठक्कर बाप्पा योजना, रस्ते विकास योजना आहेत. आदिवासींच्या लोकसंख्येनुसार आर्थिक तरतूद केली पाहिजे. आदिवासी विकास विभागाचा सन २०२०-२१ मधील एकही रुपयाचा निधी आम्हाला मिळाला नाही. माझ्या माहितीनुसार याकरिता २०० कोटी रुपये शिल्लक आहेत. सामाजिक न्याय विभागाकडून या समाजाकरिता काही निधी मिळतो. मी माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांना विनंती करतो की, दलित वस्तीकरिता १० कोटी रुपयांचा निधी द्यावा. आदिवासी मंत्री महोदयांना विनंती करतो की, सदर २०० कोटी रुपये इतरत्र वळविण्यापेक्षा त्याचे वाटप सर्वांच्या मतदारसंघात करावे.

अध्यक्ष महोदय, मी वैद्यकीय शिक्षण विभागाबाबत बोलू इच्छितो. भंडारा जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय झाले पाहिजे, अशी मी सन २००९ पासून मागणी करीत आहे. तेथे मागील वर्षी एक बीएचएमएस महाविद्यालय सुरु झाले आहे. तेथे नर्सिंग कॉलेज आहेत. याबाबत मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. परंतु तेथे वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करावे. कोविड – १९ काळात वैद्यकीय शिक्षण विभागानेही अतिशय चांगले काम केले आहे. याबाबत मी त्यांचे अभिनंदन करतो.

श्री. नरेंद्र भोंडेकर....

या विभागाकडे अत्याधुनिक प्रयोगशाळा होत्या. त्यांनीही त्या काळात हे प्रश्न हाताळले आहेत. मी विनंती करतो की, भंडारा जिल्ह्याकरिता वैद्यकीय महाविद्यालय सुरु करावे.

अध्यक्ष महोदय, औषधी द्रव्ये विभाग केवळ नावापुरता राहिला आहे. या विभागाला कार्यालय नाही. तेथे अधिकारी नाहीत. ते असतील तर केवळ वसुली करीत असतात. त्या विभागाच्या अधिकाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारची औषधांची तपासणी केली जात नाही. दुधाच्या प्रोसेस युनिटमध्ये मोठ्या प्रमाणात केमिकल्सची भेसळ केली जात असते. मी शासनाला यानिमित्ताने सांगू इच्छितो की, औषधी द्रव्ये विभागावरही अधिक लक्ष देऊन त्या विभागाचे बळकटीकरण करणे अतिशय महत्त्वाचे आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

धन्यवाद !

-----

असुधारित प्रत

ॲड.राहूल कुल (दौंड) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्यातील निराधार व्यक्तींना आधार म्हणून राज्य शासनाच्या संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, इत्यादी योजना राबविल्या जातात. परंतु यामध्ये लाभार्थ्याला दिला जाणारा निधी खूप कमी म्हणजे प्रती माह केवळ १ हजार रुपये आहे. यामध्ये वाढ करुन किमान ३ हजार रुपये प्रती माह करण्याची आवश्यकता आहे. या निराधार व्यक्तींनी सरकारकडे येऊन नोंदणी करण्याऐवजी आपण महसूल विभागाला विशेष सूचना देऊन अशा व्यक्तींचा गावांमध्ये शोध घेऊन नोंदणी करुन घेऊन त्यांना लाभ दिला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, इतर मागासवर्ग समाजाच्या संदर्भात या सभागृहामध्ये सातत्याने चर्चा झाली व गावागावामध्ये इम्पेरिकल डेटा पोहचला. परंतु याबाबत तातडीने उपाययोजना करुन या समाजाला अपेक्षित असलेले राजकीय आरक्षण दिले पाहिजे. इतर विषय बाजूला ठेऊन हा विषय अग्रक्रमाने घेतला पाहिजे. इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ३६ वसतीगृहे बांधण्याची घोषणा करण्यात आलेली आहे. त्याचा देखील रोड मॅप तयार करुन तातडीने निधी देऊन लवकरात लवकर कामे सुरु करण्याची आवश्यकता आहे. विधीमंडळाच्या इतर मागासवर्गीय कल्याण समितीने दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजीच्या अहवालामध्ये नमूद केलेल्या आकडेवारीनुसार ओबीसींची अनेक मंजूर पदे भरलेली नाहीत. याबाबत सभागृहामध्ये देखील प्रश्न विचारण्यात आला होता परंतु त्याचेही समाधानकारक उत्तर मिळाले नाही. तरी ही पदे तातडीने भरण्यात यावीत. ओबीसी समाजासाठी ४०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केल्याचे जाहीर करण्यात आले आहे. परंतु त्याचे तातडीने योग्य नियोजन करण्याची आवश्यकता आहे, अशी या चर्चेच्या निमित्ताने मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत देखील वेगवेगळया चर्चा झाल्या.

असुधारित प्रत

ॲड.राहूल कुल.....

खरे तर, मागील सरकारने मराठा समाजाला दिलेले आरक्षण या सरकारला न्यायालयात टिकविता आले नाही ही वस्तुस्थिती आहे. आता किमान ते लवकरात लवकर कसे परत मिळेल यासाठी पावले उचलण्याची आवश्यकता आहे. मराठा विद्यार्थ्यांना ओबीसींप्रमाणे शैक्षणिक सवलती देण्याबाबत घोषणा करण्यात आली परंतु त्या प्रत्यक्षात मिळून या समाजातील विद्यार्थ्यांना काही ना काही आधार मिळेल याची काळजी घ्यावी. विशेषत: मराठा समाजातील गरीब कुटुंबांना या सवलतींची अत्यंत आवश्यकता आहे. मराठा समाजातील मुलांना पूर्वी ३५ अभ्यासक्रमांमध्ये शैक्षणिक सवलत देण्यात येत होती. आता ही सवलत ६०५ अभ्यासक्रमांसाठी करण्यात आली आहे. याबाबत देखील कार्यवाही होण्याची आवश्यकता आहे. तसेच मराठा समाजासाठी प्रत्येक जिल्हयात उभारावयाच्या वसतीगृहांच्या दृष्टीने फारसे काम झालेले नाही. त्याबाबत देखील तातडीने कार्यवाही करण्याची या निमित्ताने मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, धनगर आरक्षणाचा विषय केंद्र सरकारच्या अखत्यारितील असला तरीही राज्य सरकारने याबाबत आग्रही राहण्याची आवश्यकता आहे. धनगर समाज हा सातत्याने उपेक्षित राहिलेला आहे. रानावनांमध्ये फिरणारा हा समाज आरक्षणापासून वंचित आहे. त्यामुळे त्यांना आरक्षण मिळवून देण्यासाठी तातडीने पावले उचलण्याची गरज आहे. किमान या समाजासाठी आतापर्यंत जाहीर करण्यात आलेल्या योजनांची अंमलबजावणी केली तरीही या समाजाला दिलासा मिळू शकेल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हरिभाऊ बागडे यांनी सांगितल्याप्रमाणे भिल्ल, वडारी, डवरी या भटक्या समाजांकडे महसुली व शैक्षणिक पुरावे नाहीत. त्यामुळे जात प्रमाणपत्र मिळविणे हे त्यांच्यासाठी अतिशय कठीण काम आहे. सरकारकडून कोणतेही प्रमाणपत्र देतेवेळी शैक्षणिक आणि महसुली पुरावा मागितला जातो. खरे तर, त्यांचे शिक्षण झालेले नाही आणि महसुली पुरावा यामुळे नाही की त्यांचा कुठेही जमीन-जुमला नसतो.

ॲड.राहूल कुल.....

मागील सरकारने याबाबत एक क्रांतीकारी निर्णय घेतला होता की, अशा प्रकरणी स्थानिक चौकशी करुन प्रमाणपत्र देण्यात यावे. हा निर्णय झाला असला तरीही त्याची परिणामकारक अंमलबजावणी अद्याप होत नाही. शासनाने यामध्ये पुढे येऊन उपेक्षित लोकांना तातडीने जात प्रमाणपत्र देण्याची आवश्यकता आहे. कारण कुठल्याही सवलतीचा लाभ घेण्यासाठी जात प्रमाणपत्र आवश्यक आहे. तरी याबाबत लवकरात लवकर सूचना निर्गमित करण्यात याव्यात, ही विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, दिव्यांग प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया देखील अतिशय क्लिष्ट आहे. दिव्यांग बांधवाला कोणीतरी मदत केली तरच तो प्रमाणपत्र मिळवू शकतो, अशी परिस्थिती आहे. आम्ही यासाठी शिबिरे आयोजित करुन प्रमाणपत्र मिळवून देण्याचा प्रयत्न केला. परंतु मला असे वाटते की, यामध्ये महसूल विभागानेच पुढे येऊन शिबिरे आयोजित केली पाहिजेत. दिव्यांग वर्ग हा अतिशय उपेक्षित आहे. वेगवेगळया योजनांचा ३ टक्के निधी त्यांच्यासाठी खर्च करणे अपेक्षित आहे. परंतु अनेकदा तसे होत नाही. जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती यांना हा निधी खर्च करण्यासाठी आपण प्रवृत्त करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, दलित वस्तीची योजना केवळ कागदावर आहे. बऱ्याच ठिकाणी ही योजना राबविली देखील जात असेल परंतु राबविताना त्यासंदर्भातील नियमावली पुरेपूर विचारात घेऊन त्याप्रमाणे निधीवाटप केला जातो का, हा विचार करण्याची आवश्यकता आहे. काही ठिकाणी सर्व नियम धाब्यावर बसवून नको त्या व चुकीच्या ठिकाणी हा निधी खर्च केला जातो. त्यामुळे मला असे वाटते की, दलित समाजाला न्याय देण्यात आपण कमी पडत आहोत. तरी याबाबतीत देखील सरकारने लक्ष घालावे, अशी माझी सूचना आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या दौंड मतदारसंघातील बुध्द विहाराचे अर्धवट काम निधीअभावी बंद आहे. तरी उर्वरित कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

ॲड.राहूल कुल.....

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.धनंजय मुंडे हे या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, माझ्या मतदारसंघात सन २०१८ मध्ये मागासवर्गीयांची निवासी शाळा सुरु करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. परंतु अद्याप शाळा सुरु झालेली नाही. इमारतीच्या बांधकामाचा विषय तर नंतरचा आहे. परंतु आता किमान उपलब्ध इमारतीमध्ये तातडीने शाळा सुरु करावी. कारण माझ्या मतदारसंघात मोठया प्रमाणात मागासवर्गीय समाज आहे. त्यांच्या शिक्षणासाठी ही शाळा अतिशय महत्त्वाची आहे. तरी मंत्री महोदयांनी याबाबत तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, अवयवदाना संदर्भात मी काही सूचना करणार आहे. ज्याप्रमाणे आपण रक्तदान करतो त्याच धर्तीवर भविष्यात अवयवदानाची चळवळ उभी करण्याची आवश्यकता आहे. काही देशांमध्ये मृतदेह ही राष्ट्रीय संपत्ती म्हणून जाहीर केली जाते. आपला एखादा अवयव दुसऱ्या व्यक्तीच्या कामी येऊन त्यामुळे त्याला जीवनदान मिळत असेल तर त्यासारखे पवित्र दुसरे काहीच काम नाही, असे मी मानतो. त्यादृष्टीने कायद्यामध्ये बदल करुन मृत शरीर हे राष्ट्रीय संपत्ती म्हणून जाहीर करावे व अवयवदानाची प्रक्रिया सोपी करावी. काही चुकीच्या गोष्टी घडल्यामुळे सध्या अवयवदानाची प्रक्रिया अतिशय क्लिष्ट करण्यात आलेली आहे. माझ्या मतदारसंघात आम्ही नेत्रदानाची अतिशय चांगली चळवळ उभी करीत आहोत. शासन याबाबतीत सकारात्मक राहिल्यास अवयवदानाची चळवळ देखील राज्यभर उभी राहू शकते. मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरामध्ये याचा उल्लेख करावा अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------

असुधारित प्रत

श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे. आज दर्शविण्यात आलेल्या सर्व पाचही विभागांचे मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित आहेत त्याबद्दल त्यांचे देखील मनापासून अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या मागण्यांवर मी बोलत आहे. मी ज्या मतदारसंघातून येतो त्या मतदारसंघामध्ये महामहिम क्रांतीसूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची दिक्षाभूमी असल्याचा मला सार्थ अभिमान आहे. दिनांक १४ ऑक्टोबर, १९५६ रोजी नागपूर येथे आणि दिनांक १६ ऑक्टोबर, १९५६ रोजी चंद्रपूर येथे धम्म दिक्षा कार्यक्रम पार पडला. जगामध्ये केवळ दोन ठिकाणी धम्म दिक्षा भूमी आहे. परंतु चंद्रपूरच्या दिक्षाभूमीचा पाहिजे तसा विकास झालेला नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, ज्याप्रमाणे नागपूरच्या दिक्षाभूमीचा विकास झाला तसाच विकास चंद्रपूरच्या दिक्षाभूमीचा देखील व्हावा. त्यासाठी माननीय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांनी १०० कोटी रुपयांचा विशेष निधी द्यावा. त्यासाठी विभागासोबत आमचा पत्रव्यवहार देखील सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, भारतासारख्या एवढया मोठया देशाला चालविण्यासाठी संविधान देणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चंद्रपूर येथे संविधान भवन बांधण्याची देखील माझी विनंती आहे. यासंदर्भात आपल्या विभागाकडून विचारणा झाली होती की, जर संविधान भवन बांधण्यात आले तर त्याची देखभाल कोण करील ? त्याबाबत मी सांगू इच्छितो की, आंबेडकर मेमोरियल सोसायटीने संविधान भवनाची देखभाल करण्याची तयारी दर्शविली आहे. माननीय मंत्री श्री.धनंजय मुंडे यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये या दोन गोष्टींबाबत निर्णय घेऊन कार्यवाही केली तर लोक त्यांना कायम लक्षात ठेवतील.

यानंतर श्री.धुमाळे.....

श्री. किशोर जोरगेवार...

म्हणून चंद्रपूर येथे दिक्षाभूमीकरिता १०० कोटी रुपये आणि संविधान भवन निर्माण करावे अशी मी आपल्याला मागणी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, आदिवासी विकास विभागावर बोलत असताना मी सांगू इच्छितो की, चंद्रपूर जिल्हा हा आदिवासींचा आहे. चंद्रपूरचे राजे आदिवासी होते. गोंडकालीन असा हा जिल्हा आहे. परंतु या ठिकाणी आदिवासींसाठी असे कोणतेही आदिवासी भवन नाही. त्यामुळे त्याची निर्मिती चंद्रपूरला व्हावी, अशी मी मागणी करीत आहे. या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आदिवासी आहेत. परंतु आदिवासींचे जात पडताळणी कार्यालय गडचिरोली आहे. चंद्रपूरपासून तेथे दूरवर जावे लागते. या ठिकाणी मंत्री महोदय बसलेले आहेत आणि त्यांनी घोषणा केली होती की, चंद्रपूरला जात पडताळणी कार्यालय निर्माण केले जाईल, जेणेकरुन चंद्रपूरच्या विद्यार्थ्यांना तेथे जाण्यास अडचण होणार नाही. गडचिरोली येथे स्टाफ राहत नाही. लोकांना हेलपाटे मारावे लागतात. कर्मचारी काम करीत नाहीत. म्हणून आदिवासी विकास मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, आपण जर चंद्रपूरला हे जात पडताळणी कार्यालय निर्माण केले तर आपल्याला चंद्रपूरची देवी "माता महाकाली" आपल्याला आशिर्वाद देईल आणि आपण पुन्हा या पदावर कायम राहाल.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी वैद्यकीय शिक्षण मंत्री बसलेले आहेत. अतिशय सुंदर असे व्यक्तीमत्त्व आहे. जसे ते सुंदर आहेत, तसे ते सुंदर बोलतात आणि त्यांचे कामही सुंदर आहे. आज येथे तो विषय नाही. पण स्वर्गीय विलासरावजी देशमुख यांच्यासारखी कामाची पध्दत त्यांच्या कार्यपध्दतीमधून दिसते.

अध्यक्ष महोदय, आपण चंद्रपूरला आले होतात. त्यानंतर आपण ६३० कोटी रुपये खर्च करुन चंद्रपूर येथे मेडिकल कॉलेजची अतिशय सुंदर व सुसज्ज इमारत आपल्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. परंतु सन २०२० मध्ये जे कॉलेज सुरू होणार होते ते आज २०२२ मध्ये सुध्दा पूर्ण झाले नाही. आपल्या बाजूला आमचे पालकमंत्री श्री. विजय वडेट्टीवार बसलेले आहेत. ते सुध्दा या विषयासाठी आग्रही आहेत. आपण हे मेडिकल कॉलेज आपण लवकरात लवकर सुरू करावे, आणि चंद्रपूर व

श्री. किशोर जोरगेवार...

लगतच्या जिल्ह्यांच्या आरोग्य विषयक समस्या दूर कराव्यात, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, कंत्राटी कामगारांचाही एक मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. यासाठी आमच्या पालकमंत्र्यासमवेत आपण अनेक बैठका सुध्दा घेतल्या आहेत. चंद्रपूर रुग्णालयाकरिता २०१७ च्या आदेशान्वये ४ टप्प्यामध्ये ५०१ पदे बाह्यस्त्रोतामधून कंत्राटी पदे आपण निर्माण केली आहेत. सुरुवातीच्या काळात ही ५०१ पदे निर्माण केली होती. त्यातील मधल्या काळात म्हणजे २०२१-२२ या वर्षात केवळ २०७ पदे भरण्याची आपण मान्यता दिली होती. एकीकडे कोरोनाच्या संकट काळात आरोग्य कर्मचाऱ्यांवर खूप ताण होता. त्यामुळे अनेक कर्मचारी कमी पडत होते. उर्वरित २९४ कंत्राटी कर्मचाऱ्यांना आपण नव्याने नियुक्ती द्यावी आणि तशी घोषणा आपण उत्तराच्या भाषणतून करावी, अशी मी आपल्याला विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मी या महाविकास आघाडी सरकारचे अभिनंदन एवढ्याकरिता करतो की, भारतातील पहिली मेडिकल इंट्रिग्रेटेड सिटी आपण पुण्याला निर्माण करीत आहोत. ३०० एकर परिसरात ती उभारली जाईल. ही अतिशय चांगली गोष्ट आहे. पण तशीच मेडिकल इंट्रिग्रेटेड सिटी आमच्या नागपूर विभागात सुध्दा झाली पाहिजे, जेणेकरुन नागपूर विभागातील आमच्या जनतेला त्याचा लाभ मिळू शकेल, अशीही मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

अध्यक्ष महोदय, अन्न व औषधी द्रव्ये या विभागावर बोलताना मी सांगू इच्छितो की, आता सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र भोंडेकर म्हणाले की, मंत्री महोदय, आपण चांगले आहात आणि आपला स्वभाव शांत आहे. परंतु खरे म्हटले तर सर्वात आधी माणसाच्या जीवनामध्ये सकाळी झोपेतून उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत कोणाचा संबंध येत असेल तर तो अन्न व औषधी द्रवे यांचा विभागाचा येतो. हा विभाग अत्यंत तंदुरुस्त असला पाहिजे. परंतु आपल्याकडे तशी कोणतीही व्यवस्था नाही. त्यांना एखादी तक्रार केली तर ते म्हणतात की, आमच्याकडे कर्मचारी नाही. तक्रारीच्या अनुषंगाने आपण आमच्यासोबत याल तर आम्ही तुमच्यासोबत यायला

श्री. किशोर जोरगेवार...

तयार आहोत. सुगंधी तंबाखुचा व्यापार मोठ्या प्रमाणावर चंद्रपूर आणि संपूर्ण महाराष्ट्रात होतो. त्यावर आपण बंधन घालण्याची आवश्यकता आहे. या विषयाच्या माध्यमातून मी मंत्री महोदयांना जाणीव करुन देतो की, कोरोनाच्या काळामध्ये या विभागाचे महत्त्व समजले. रेमडेशिवीर इंजेक्शन जेव्हा या विभागाच्या माध्यमातून दिले जात होते ते कंपनीतून नागपूरला येत होते, किंवा बंगलोरहून नागपूरला येत होते. जगातून आणि भारताच्या विविध भागातून नागपूरला ते येत होते. परंतु नागपूर ते चंद्रपूर असा प्रवास करण्यासाठी आपल्या विभागाजवळ वाहन नसायचे. नागपूरला २-२ दिवस ते पडून रहायचे. आम्ही आमच्या गाड्या पाठवून ते इंजेक्शन मागवून घेत होतो. म्हणून आपण या विभागाच्या कर्मचाऱ्यांना असे इंजेक्शन टोचा की ते ५० च्या नाही तर १०० च्या गतीने धावले पाहिजेत, अशी मी आपल्याला मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, सुगंधीत तंबाखुचा जो सुळसुळा झालेला आहे त्याबाबत आपण स्पेशल ड्राईव्ह घेत कारवाई करावी, अशी मी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, बहूजन विकास विभागासंबंधी बोलायचे झाले तर मला त्यासाठी कागद लागणार नाही. हा विभाग आमच्या पालकमंत्र्यांकडे आहे. त्याचबरोबर संपूर्ण ओबीसी समजाचे संपूर्ण महाराष्ट्राचे नेतृत्त्व करण्याचे काम आणि ओबीसींचे प्रश्न मांडण्याचे काम माननीय श्री. विजय वडेट्टीवार करतात. ही त्यांची तारीफ आहे. आपण मागास भागातून आलेले आहात. ओबीसी समाजातून आपण आले आहात. आपण ३६ ठिकाणी वसतिगृहे बांधण्याची घोषणा केली आहे. त्या ३६ पैकी सर्वात पहिले वसतिगृह चंद्रपूर येथे बांधावे, अशी मी आपल्याला विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी राज्याचे उपमुख्यमंत्री आणि वित्तमंत्री माननीय श्री. अजित पवार उपस्थित होते. या महाराष्ट्राच्या निर्मितीचा मंगल कलश स्व. यशवंतराव चव्हाण यांनी आणला. त्यांच्या नावाने यशवंतराव चव्हाण घरकुल योजना राबविली जात आहे. पण या घरकुल योजनेसाठी आपण केवळ ५० हजार

श्री. किशोर जोरगेवार...

रुपयांचा निधी दिला आहे. एखाद्या राज्याची घरकुल योजना करायची आणि त्याला फक्त ५० कोटी रुपयांचा निधी द्यायचा, हा अन्याय आहे. म्हणून माझी माननीय वित्तमंत्र्यांना विनंती आहे. पण त्यांनी रेकॉर्डवर घ्यावे की या विभागाला कमीत कमी ५०० कोटी रुपयांचा निधी द्यावा. आमचे पालकमंत्री या ५०० कोटी रुपयांच्या निधीतून अतिशय सुंदर काम या महाराष्ट्राला करुन दाखविल्याशिवाय राहणार नाहीत.

अध्यक्ष महोदय, या महाविकास आघाडी शासनाने सादर केलेल्या अर्थसंकल्पाला माझा पाठिंबा देतो. जयहिंद. जय महाराष्ट्र, जय चंद्रपूर.

------------

असुधारित प्रत

श्री. योगेश कदम (खेड) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. मी अधिक वेळ भाषण न करता मी फक्त काही मुद्दे मांडणार आहे. कारण माझ्या अनेक सहकाऱ्यांना यावर बोलायचे आहे.

अध्यक्ष महोदय, आदिवासी विकास विभागाच्या मागण्यांवर बोलताना या विभागामध्ये अनेक योजना आहेत. त्या सर्वच योजनांच्या बाबतीत बोलण्यासाठी पुरेसा वेळ नाही. परंतु प्रामुख्याने घरकुल ही योजना आदिवासी विकास विभागांतर्गत राबविली जाते, त्याचे काही निकष आहेत.

अध्यक्ष महोदय, शबरी आवास योजनेंतर्गत २०२१-२२ या आर्थिक वर्षात जवळपास १८५४४ घरे बांधण्याचे शासनाचे उद्दिष्ट होते. परंतु ३०० कोटी रुपयांची तरतूद करुनही २०२१-२२ या वित्तीय वर्षात फक्त १७५ कोटी रुपये इतका निधी आपण खर्च करु शकलो. सुमारे ५० टक्के निधी आपण खर्च करु शकलो नाही. याची अनेक कारणे असू शकतील. परंतु माझ्या मतदार संघातील उदाहरण मी आपल्यासमोर ठेवतो. कदाचित ती महाराष्ट्रातही लागू पडतील. सर्वात मोठी अडचण म्हणजे आदिवासी पाड्यांनी अगोदर घेतलेल्या घरकुल योजनेचा लाभ आहे. इंदिरा आवास योजनेचा ३० ते ४० वर्षांपूर्वी जेव्हा १५ ते २० हजार रुपयांचा लाभ घेतला होता आणि त्यावेळी कच्ची घरे बांधली गेली होती. आता त्या कच्च्या घरांच्या बदल्यात पक्की घरे बांधावयाची असतील तर शबरी आवास योजना आहे. परंतु अगोदर म्हणजे ३० वर्षापूर्वी लाभ घेतला म्हणून आता त्यांना लाभ घेता येत नाही. म्हणून मंत्री महोदयांनी विनंती आहे की, ३०-४० वर्षापूर्वी त्या लोकांनी लाभ घेतला असला तरी ती घरे कच्ची आहेत. ती कधीही कोसळू शकतात. म्हणून या योजनेमध्ये त्या घरांचा समावेश करण्यात यावा. माझ्या मतदार संघातील मंडणगड तालुक्यात पणदेरी ही आदिवासी वाडी आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. योगेश कदम.....

परंतु त्याचा उल्लेख करुन मी आपल्याला ते उदाहरण सांगत आहे. दुसरे कारण म्हणजे सरकारी योजनांमध्ये आदिवासी पाडयांतील काही वस्त्या गायरान, गावठाण किंवा देवराहटी आहेत. परंतु या सर्व वस्त्या सरकारी मालकीच्या जागेमध्ये बसलेल्या आहेत. माझे सरकारला एक निवेदन आहे की, आपण महाराष्ट्राचा एक रोडमॅप तयार करावा. आदिवासी पाडयांना घरकुल योजनेचा लाभ देण्यासाठी किती सरकारी जागेमध्ये आदिवासी पाडे वसलेले आहेत ते शासनाने आयडेंटीफाय करावे. काही वाडयांचे तिथे ५० ते ७० वर्षापासून म्हणजे स्वातंत्र्याच्यापूर्वीपासून वास्तव्य आहे. परंतु त्या जागा त्यांच्या नावावर नसल्यामुळे आपण त्यांना त्या योजनेचा लाभ देत नाही. हा त्यांच्यावरील अन्याय आहे. मुंबईसारख्या शहरामध्ये अतिक्रमण झालेल्या गृहस्थांना एसआरएच्या योजनेमध्ये लाभ देतो. त्यामुळे आपण जर मुंबई शहरामध्ये असे करु शकतो तर महाराष्ट्रामध्ये आदिवासी समाजासाठी तसे केले पाहिजे, अशी माझी सूचना आहे. याबाबत माननीय मंत्र्यांनी आणि शासनाने विचार करुन ती स्विकारावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझा दुसरा विषय रत्नागिरी जिल्ह्याचा आहे. माझ्या मतदासंघातील एक उदाहरण मी देतो. या ठिकाणी खेड तालुका येतो तेथील आदिवासी बांधवाला जात पडताळणी प्रमाणपत्र काढायचे असेल तर त्याला पेण येथे म्हणजे  पावणे दोनशे किलोमीटर लांब जावे लागते. आपल्याला माझी विनंती आहे की, पेण येथील कार्यालय तसेच सुरु ठेवून भौगोलिक दृष्टीने विचार करुन चिपळूण येथे रत्नागिरी जिल्ह्यासाठी आदिवासी विभागासाठीची जात पडताळणी कार्यालय उघडावे. कारण चिपळूण तालुका हा रत्नागिरी जिल्ह्याचा मध्यवर्ती भाग आहे.

अध्यक्ष महोदय मंडणगड तालुक्यातील कादवण येथे वसतीगृहाची मागणी आहे. त्याबाबत मी माननीय मंत्र्यांकडे लेखी पत्र देखील दिलेले आहे आपण त्याचा नक्की विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

श्री. योगेश कदम.....

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी इतर मागास बहुजन कल्याण या विभागांच्या बाबतीत उल्लेख केलेला आहे. तांडा वस्ती या योजनेंतर्गत लोकसंख्येच्या आधारीत काही निधी खर्च करायचा असे काही निकष आहेत. सन २०१८ साली काढण्यात आलेला शासन निर्णय माझ्याकडे आहे. त्यामध्ये असे निकष आहेत की, ५० ते १०० लोकसंख्या असलेल्या तांडा किंवा वस्तीच्या ठिकाणी आपण जास्तीत जास्त ४ लाख रुपये निधी खर्च करु शकतो. १०१ ते १५० लोकसंख्येच्या ठिकाणी जास्तीत जास्त ६ लाख रुपये खर्च आणि १५१ पेक्षा जास्त लोकसंख्या असेल तर तिथे आपण १० लाख रुपये खर्च करु शकतो. सन २०१७-१८ साली पंचवार्षिक आराखडा तयार करण्यात आला होता आणि तो आजही लागू आहे. मी त्या ठिकाणी लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आलेलो असताना मला त्या आराखडयाच्या बाहेर काही कामे सूचवायची असतील तर मला तसे करता येत नाही. कारण आज ती कामे होत नाहीत. त्यामुळे माननीय मंत्र्यांना माझी विनंती आहे की, या योजनेंतर्गत पंचवार्षिक आरखडयाबाहेरील कामे देखील स्विकारण्यात यावीत.

अध्यक्ष महोदय, आपण मुंबईत राहत असले तरी देखील आपले गाव कोकणातील आहे. कोकणामध्ये एका वाडीपासून दुसरी वाडीपर्यंतचे अंतर ५ ते ६ किमी लांब असते. या योजनेंतर्गत धनगर समाजाच्या किंवा इतर समाजासाठीच्या वाडया मुख्य रस्त्यापासून ५ ते ६ किमी डोंगरावर आहेत. एका वाडीला डोंगर कटींग,खडीकरण, डांबरीकरण करुन रस्ता पोहोचविण्यासाठीचा कमीत कमी खर्च ५० ते ६० लाख रुपये आहे. कोकणातील कोणत्याही एका वाडीमध्ये १०० पेक्षा जास्त लोकवस्ती नाही. हे निकष फक्त या समाजासाठीच का लावण्यात आलेले आहेत ? समाजकल्याण विभागामध्ये असे कोणत्याही प्रकारचे निकष नाहीत किंवा खुल्या समाजामध्ये सुद्धा असे कोणत्याही प्रकारचे निकष नाहीत. मग तांडा वस्तीमध्ये असलेल्या या स्पेसिफिक समाजासाठीच हे निकष का लावण्यात आले आहेत ? १०० लोकसंख्येसाठी ४ लाख रुपये खर्च करण्यात येत असतील. तर पंचवार्षिक आराखडयानुसार एकदा ही रक्कम खर्च झाल्यानंतर पाच वर्ष पुन्हा

असुधारित प्रत

श्री. योगेश कदम.....

कोणताही खर्च करायचा नाही. या निकषामुळे १०० वर्ष सुद्धा आपण या १०० लोकांसाठी रस्ता तयार करु शकणार नाही. या बाबतीत शासनाने गांभीर्याने विचार करुन तांडा वस्तीचे हे निकष बदलले पाहिजेत. इतरही सन्माननीय सदस्यांनी ही मागणी केलली आहे त्यामुळे शासनाने याचा विचार करुन हे निकष बदलावेत.

अध्यक्ष महोदय, कोकणी भागातील तरूण मुंबई, ठाणे आणि पुणे या शहरामध्ये वसलेले आहेत. कोरोनाच्या महामारीमध्ये हे सर्व तरुण पुन्हा गावाकडे वळले. माझ्या मतदारसंघामध्ये रोजगाराची निर्मिती करण्यासाठी त्यांनी स्वत:हून प्रयत्न केले आणि यासाठी पुढाकार घेतला. अण्णाभाऊ साठे महामंडळांतर्गत असलेली सुशिक्षित बेरोजगांरासाठीच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी खेड तालुक्यामध्ये १५० ते १७५ प्रकरणे, मंडणगड तालुक्यामध्ये जवळपास १०० प्रकरणे आणि दोपोली तालुक्यामध्ये ६५० प्रकरणे तयार केली आहेत. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत जी समिती बसविण्यात येते त्या समितीने ही सर्व प्रकरणे मंजूर केली. परंतु एकाही बँकेने या सर्व प्रकरणांना हातही लावलेला नाही. त्यांचे एकच म्हणणे होते की, कर्ज देत असताना आम्हाला काहीतरी गॅरंटी पाहिजे. आपण जे प्रकरण करु पाहता त्याची जागा गहाण ठेवा किंवा काही पैशाची गॅंरटी ठेवा किंवा काही दागिने गहाण ठेवा. सुशिक्षित बेरोजगारांच्या हातामध्ये काही काम नाही म्हणून आपण त्यांना या योजनेचा लाभ देऊ पाहत आहोत. माननीय उप मुख्यमंत्र्यांना माझी मागणी आहे की, योजनेंतर्गत आपण ज्या कर्जाचा लाभ देतो त्यासाठी सर्व राष्ट्रीयकृत बँकांना आपण एकत्र करुन सक्त द्यावी की, सरकार गॅरंटी राहील असे निकष असताना सुद्धा बँक गॅरंटी मागत असेल तर आपण त्यांना धडा शिकवला पाहिजे. या बँकांची मुजोरी आपण मोडली पाहिजे. सुशिक्षित बेरोजगारांसाठी असलेल्या योजनांचा लाभ त्यांना मिळत नसेल तर मग या योजना कशासाठी आहेत ? हा विषय फक्त माझ्या

श्री. योगेश कदम.....

मतदारसंघाचा नसून पूर्ण महाराष्ट्राचा आहे. या योजनेंतर्गत जेवढयांची प्रकरणे बँकांमध्ये पडून आहेत यता सर्व बँकांना बोलावून आपण ती मंजूर करावीत, अशी माझी मागणी आहे.एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

------

असुधारित प्रत

श्री. दादाराव केचे (आर्वी) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग या विषयावर मी बोलणार आहे. अनुसूचित व नवबौद्धांच्या वस्त्यांच्या सर्वांगीण विकास व्हावा, या उद्देशानेसामाजिक न्याय विभागाच्या ज्या ज्या योजना आहेत त्या योजना प्रत्येक वसाहतीपर्यंत कशा पोहोचविता येतील आणि त्या वसाहतीचा सर्वांगीण विकास कसा साध्य होईल या भूमिकेतूनच सामाजिक न्याय विभागाचे महत्त्व अधिक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीच्या माध्यमातून विविध योजना साकारलेल्या आहेत. बौद्ध वसाहतींचा सर्वांगीण विकास साध्य होण्याच्या दृष्टीने ज्या ठिकाणी गरिबांच्या उत्थनाच्या आणि विकासाच्या दृष्टीने त्यांचे कल्याण व्हावे, त्यांच्या कुटुंबातील कार्य व्हावे या भुमिकेतून भव्यदिव्य असे सामाजिक आंबेडकर भवन किंवा बौद्ध विहार प्रत्येक गावात निर्माण व्हावे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेले वाचनालय निर्माण झाले तर त्या समाजामध्ये निश्चितच नवीन दिशा नवीन विकास होण्यासाठी महत्त्वाचे राहील. या माध्यमातून प्रत्येक गावामध्येरस्त्यांचे जाळे मोठया प्रमाणात निर्माण झाले पाहिजे. नाल्याचे, रस्त्यांचे बांधकाम असे विविध उपक्रम तसेच पाणी, दिवाबत्ती यांची सोय करणे अशा सर्व बाबी बौद्ध वसाहतींचा विकास करण्यासाठी अभिप्रेत आहेत. त्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या बजेटमध्ये मोठया प्रमाणात प्रावधान करण्याची गरज आहे. तरच या सर्व वसाहतींचा उद्धार आणि विकास होऊ शकतो. सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून रस्ते, पाणी किंवा दिवाबत्तीची व्यवस्था महत्त्वाची आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

श्री. दादाराव केचे .....

सध्याची परिस्थिती अशी आहे की, अनेक विद्यार्थी मुंबई, औरंगाबाद, नागपूर अशा मोठया शहरात जाऊन उच्च शिक्षण घेतात. मात्र मोठया शहरात गेल्यानंतर त्यांची निवासाची व्यवस्था नसते. वसतिगृहाची व्यवस्था नसते. अनेकदा या आदिवासी मुलांना गुणवत्तेनुसार न्याय मिळत नाही. त्यांना अशा ठिकाणी प्रवेश मिळत नाही. यामुळे आदिवासी, बौध्द, अनुसूचित जमाती व नवबौध्दांच्या विकासाच्या दृष्टीने त्यांचे हित साध्य करायचे असेल तर नवीन वसतिगृह तयार करणे आवश्यक आहे. या माध्यमातून बजेटमध्ये वसतिगृहां करिता तरतूद करावी अशी मी मागण करतो.

अध्यक्ष महोदय, आदिवासी विकास विभागाचा विषय महत्त्वाचा आहे. आदिवासींचे सर्वांगीण कल्याण करण्यासाठी हा विभाग निर्माण केला आहे. या ठिकाणी आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय विभागाचे माननीय मंत्री आहेत. दोन्ही विभागाच्या माध्यमातून राज्यातील दलित, पिडीत, शोषित खेड्यामध्ये राहणाऱ्या शेवटच्या माणसाचा विकास झाला पाहिजे या करिता काम करतात. हे दोन्ही विभाग महत्त्वाचे आहेत. या दोन्ही विभागांना अर्थसंकल्पात नवीन तरतूद करण्याची गरज आहे. तरच या समाजाचा उद्धार व विकास होऊ शकतो.

अध्यक्ष महोदय, ठक्करबाप्पा योजनेमध्ये कामे करण्यासाठी अंगठा छाप सरपंच ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ठराव करतो. माझ्या गावाला रस्ते, पाण्याची सोय होण्याकरिता तो ठराव मंजूर करतो. या साठी तो प्रकल्प अधिकाऱ्यापर्यंत जातो. प्रकल्प अधिकारी अपर आयुक्तापर्यंत जातो या नंतर निधी प्राप्त होतो. आता शासनाचे धोरण बिघडल्या सारखे दिसत आहे. नवीन धोरणानुसार प्रस्ताव मंत्रालयात येतो. निधी देखील मंत्रालयातून निर्गमित होतो. गरीब गावातील, सरपंच कशाकरिता ५ हजार रुपये खर्च करुन मंत्रालयात येईल ? हे धोरण बदलण्याची आवश्यकताआहे. या साठी अपर आयुक्तांच्या माध्यमातून निधी निर्गमित झाला पाहिजे. तरच खेड्यांचा, आदिवासींचा विकास साध्य होऊ शकेल. अध्यक्ष महोदय, ग्राम विकास विभागातील २५१५ चा निधी सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभागाकडून खर्च

असुधारित प्रत

श्री. दादाराव केचे .....

करता आला तर या दोन्ही विभागांचा विकास होईल. आदिवासींचाि विकास करावयाचा असेल तर ज्या नवीन पाड्या आहेत, त्या गावांपर्यंत जाणारे रस्ते तयार केले पाहिजेत. आदिवासी उपयोजनेच्या माध्यमातून गावापर्यंतचे रस्ते होण्याची गरज आहे. ठक्करबाप्पा योजनेत मोठा निधी अंतर्गत रस्त्यांकरिता उपयुक्त ठरेल. आदिवासी उपयोजनेच्या माध्यमातून गावापर्यंतचा रस्ता अभिप्रेत आहे तरच गावाचा विकास होईल. तसेच मोठे सभागृह होण्याची गरज आहे. आदिवासी विकास विभागाच्या मंत्री महोदयांकडे या करिता प्रस्ताव दिलेला आहे. जोपर्यंत आदिवासींच्या वसाहतीमध्ये मोठमोठे सभागृह होणार नाहीत तोपर्यंत त्यांचा खऱ्या अर्थाने विकास होणार नाही. सामाजिक ज्ञान व शैक्षणिक धोरणाच्या दृष्टीने शिक्षण अभिप्रेत आहे. आदिवासी विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहे, अभ्यासिका निर्माण होण्याची गरज आहे. यादृष्टीने आदिवासी विभागाकडे लक्ष दिले तर आदिवासींचा सर्वांगीण विकास साध्य झाल्याशिवाय राहणार नाही.

अध्यक्ष महोदय, आर्वी, आष्टी, कारंजा हा माझा मतदारसंघ आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाचे माननीय मंत्री श्री. अमित देशमुख येथे आहेत. त्यांना मी विनंती करतो की, माझ्या मतदारसंघात ३ तालुके, ३ नगरपालिका आहेत. हे ३ तालुके मिळून वैद्यकीय शिक्षणाच्या दृष्टीने काहीही सोय नाही. या भागात वैद्यकीय शिक्षण विभागाच्या माध्यमातून महाविद्यालय निर्माण झाले पाहिजे. यासंबंधी माननीय मंत्री उत्तराच्या वेळी सांगतील, अशी मी आशा करतो.

अध्यक्ष महोदय, 'बहुजन हिताय बहुजन सुखाय ' हे आपले ब्रीद वाक्य आहे. राज्यात ९० टक्के बहुजन समाजाच्या वसाहती आहेत. या वसाहतींचा सर्वांगीण विकास करावयाचा असेल, सर्व सोयी युक्त महाराष्ट्र तयार करायचा असेल तर बहुजन हिताय बहुजन सुखाय ' या ब्रीद वाक्यानुसार आपण लक्ष देणे गरजेचे आहे. या बहुजन समाजाचा विकास झाला तर राज्याचा विकास होईल. असे झाले तर

असुधारित प्रत

श्री. दादाराव केचे .....

डॉ. आंबेडकर यांना जो महाराष्ट्र अपेक्षित होता, शिवाजी महाराजांना जो महाराष्ट्र अभिप्रेत आहे त्या दृष्टीने विकास होऊ शकेल. या सर्व गोष्टींकडे शासनाने लक्ष द्यावे. तसेच अधिकचा निधी उपलब्ध करुन देण्याकरिता तरतूद करावी, अशी मी विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो. जय हिंद जय विदर्भ.

---------

असुधारित प्रत

श्री. राजू पारवे ( उमरेड ) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यातील वंचित, उपेक्षित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता गेल्या दोन वर्षात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. डॉ. आंबेडकर यांचे इंदू मिल येथे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारणीच्या कामाचे नियंत्रण सामाजिक न्याय विभागाकडे आहे. या स्मारकाची उंची १०० फूट वाढवली जाणार आहे. हे स्मारक सर्वोत्कृष्ठ व्हावे तसेच हे काम सन २०२४ च्या आधी पूर्ण होईल अशी मी अपेक्षा करतो. तसेच या निमित्ताने महाविकास आघाडी शासनाचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघ आरक्षित आहे. येथील उमरेड व भिवापूर येथे वसतिगृह तयार करण्यात यावे. माझ्या भागात विपश्यना केंद्र नाही. याची मागणी मंत्री महोदयांकडे केलेली आहे. मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, निधी वाटप करताना राज्यातील जे आरक्षित मतदारसंघ आहेत त्यांना अधिकाधिक निधी देण्यात यावा. आमचे सहकारी माननीय आमदार यांनी माननीय श्री. चंद्रकांत हंडोरे यांचा या ठिकाणी उल्लेख केला. आमचे ऊर्जावान मंत्री महोदय या राज्याला लाभले आहेत. त्यांच्या माध्यमातून सामाजिक न्याय विभागाच्या अनेक योजना तयार केल्या जाणार आहेत. सहकारी आमदार म्हणून मला त्यांचा अभिमान आहे.

अध्यक्ष महोदय, या समाजामधील मातंग, कैकाडी, भंगी यांचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास व्हावा तसेच त्यांचा मागासलेपणा दूर व्हावा, या करिता समाजाचा बारकाईने अभ्यास होऊन सद्यस्थिती समोर यावी, या करिता अभ्यास आयोग नेमला आहे. राज्यात खाटिक समाजही मोठया संख्येने आहे. या समाजातील लोक आपली उपजीविका करण्याकरिता उघड्यावर दुकान मांडतात. उन्हातान्हात आपला व्यवसाय करतात. या समाजाचे देखील महामंडळ असावे अशी या समाजाच्या वतीने माननीय मंत्री यांना मागणी करतो. या खाटिक समाजाचे महामंडळ लवकरात लवकर स्थापन व्हावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक

श्री. राजू पारवे .....

विकास योजनेंतर्ग ५०० पेक्षा जास्त अनुसूचित जातीतील लोकवस्ती असणाऱ्या ठिकाणी संविधान सभागृह बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. महाविकास आघाडी सरकारचे मी मनापासून अभिनंदन करतो. जेवढया दलित वस्त्या आहेत तेथे तरुणांना अभ्यासिका, ग्रंथालये उपलब्ध होणार आहेत. या करिता सरकारचे मी अभिनंदन करतो व मला बोलण्याची संधी दिली या करिता धन्यवाद देतो.

----------

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.राजेश पवार (नायगांव): अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी सर्वप्रथम वैद्यकीय शिक्षण विभागाच्या मागण्यांवर बोलणार आहे. माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. माझे सहकारी सन्माननीय सदस्य श्री.किशोर जोरगेवार हे आपल्याबाबत जे बोलले, त्यांनी आपली जी स्तुती केली, मी त्याबाबत त्यांच्याशी सहमत आहे. माझे त्याबाबत एकमत आहे. आपला वाढदिवस होता. मी आपल्याकरिता पुष्पगुच्छ देखील आणला होता. परंतु, आपण तोपर्यंत बाहेर गेला होता.

अध्यक्ष महोदय, माझे काही महत्वाचे विषय आहेत. नांदेड येथे वैद्यकीय महाविद्यालयाचे हॉस्पिटल आहे. तेथे सद्य:स्थितीत ५०० बेड्सची क्षमता आहे. परंतु, त्या ठिकाणी सरासरी ८०० रुग्ण असतात. त्यामुळे तेथील क्षमता आपण लवकरात लवकर डबल करावी, अशी मी आपल्याला विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी सुपर स्पेशालिटी विशेषत: कॅन्सर विभाग सुरु करण्याची मागणी केली. कोरोना काळात आपल्याला सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर किती लक्ष देण्याची आवश्यकता आहे हे आपल्या सर्वांना समजले आहे. त्या अनुषंगाने माझी अशी मागणी आहे की, नांदेड या ठिकाणी केवळ कॅन्सरच नाही तर डोक्याच्या ऑपरेशनकरिता न्युरो विभाग, प्लॅस्टिक सर्जरी, हृदय शस्त्रक्रियेकरिता कार्डियाक विभाग असेल अशा सुपर स्पेशालिटीच्या सर्व शाखा सुरु करण्याबाबत विचार करावा. कारण नांदेड हा भौगोलिकदृष्ट्या फार मोठा जिल्हा आहे. त्यामुळे या सुविधा नांदेडच्या दवाखान्यात सुरु करण्यात याव्यात.

अध्यक्ष महोदय, नांदेडच्या त्या दवाखान्यातून जेव्हा रुग्णांना मुंबईच्या हॉस्पिटलमध्ये रेफर केले जाते तेव्हा मुंबईला जायचे म्हटल्यावर त्या रुग्णांचा तसेच त्याच्या नातेवाईकांचा बी.पी. डबल होतो. कारण आपण त्या गोरगरिब रुग्णांना अँब्युलन्सची सुविधा उपलब्ध करुन देत नाही. त्यामुळे त्या वैद्यकीय

असुधारित प्रत

श्री.राजेश पवार ...

महाविद्यालयामध्ये सदरील रुग्णांना मुंबईमध्ये आणण्यासाठी अँब्युलन्सची व्यवस्था करण्यात यावी, अशी मी आपल्याला विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आदिवासी विभागाच्या मागण्यांवर बोलताना मला हे सांगावयाचे आहे की, मंत्री महोदय, अतिशय सकारात्मक आहेत. माझी त्यांच्या समवेत दोन-तीन वेळा वैयक्तिक भेट देखील झालेली आहे. मंत्री महोदय आपल्याला माहीत आहे की, नांदेड जिल्ह्यामध्ये मन्नेरवारलु व महादेव कोळी समाजाचा विषय खूप वर्षांपासून प्रलंबित आहे. आतापर्यंत त्या पावरा नावाच्या अधिकाऱ्यामुळे अनेक परिवार उद्ध्वस्त झाले असे म्हणायला हरकत नाही. व्हॅलिडिटी रिजेक्ट केल्यामुळे बऱ्याच जणांना नोकरीपासून वंचित रहावे लागले. बऱ्याच विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये ॲडमिशनच्या ज्या तारखा होत्या त्या उलटून गेल्यानंतर देखील व्हॅलिडिटी प्रमाणपत्र मिळाले नाही. त्यामुळे त्यांना उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागले. त्यामुळे यापुढे मात्र एकही सेकंद वाया न घालवता या पावरा नावाच्या अधिकाऱ्याची आपण त्वरित बदली करावी. बिगर आदिवासी जे इम्पार्शल राहतील, अशा प्रकारच्या अधिकाऱ्यांची आपण तेथे ताबडतोब नियुक्ती करावी, अशी मी आपल्याला विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, शासनाने स्थानिक स्तरावर विविध प्रमाणपत्रे मिळावीत, केवळ आदिवासींसाठी नाही तर ज्या ज्या समाजांना जातीचे प्रमाणपत्र लागते मग ते एस.डी.ओ. कार्यालय असेल, जिल्हाधिकारी कार्यालय असेल, तहसील कार्यालयाकडून लागणारी प्रमाणपत्र असतील तेथे जेव्हा जातीचे प्रमाणपत्र पाहिजे किंवा काही कागदपत्र पाहिजे म्हणून मागणी होते तेव्हा त्यांच्याकडून लाचेची अपेक्षा केली जाते. ती कामे लवकर होत नाहीत. त्यामुळे आपण एक विशेष सूचना काढून संबंधित अधिकाऱ्यांना लवकरात लवकर अशी कागदपत्रे द्यावीत, अशी विनंती करावी. नांदेड या ठिकाणी आपण कास्ट व्हॅलिडिटीसाठीचे कार्यालय स्थापन करावे, अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.राजेश पवार ...

अध्यक्ष महोदय, इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या मागण्यांवर बोलताना मला हे सांगावयाचे आहे की, ओबीसी आरक्षणाचा विषय आहे. तसेच, धनगर व मराठा समाजाचे आरक्षण या शासनाने लवकरात लवकर मार्गी लावावे. त्याच बरोबर ज्या योजना या समाजासाठी जाहीर करण्यात आलेल्या आहेत, त्यांची अंमलबजावणी होत नाही. त्यांची देखील अंमलबजावणी व्हावी यासाठी प्रयत्न करावेत.

अध्यक्ष महोदय, जी महामंडळे स्थापन करण्यात आली आहेत. जसे की, अण्णाभाऊ साठे महामंडळ, अण्णासाहेब पाटील महामंडळ आहे. अशा महामंडळांकडे तरुण स्वयंरोजगार करण्यासाठी, स्वत:चा व्यवसाय करण्यासाठी जेव्हा नस्ती सादर करतात तेव्हा एकतर या महामंडळ कार्यालयातील अधिकारी ती नस्ती लवकर मंजूर करीत नाहीत. ती जेव्हा मंजूर होते तेव्हा बँका त्यांना कर्ज देत नाहीत. त्यामुळे आपण बँकांना स्पष्ट टारगेट द्यावे, तशा सूचना द्याव्यात. जेणेकरुन ही जी गोरगरिब समाजातील मुले आहेत त्यांना स्वत:चा रोजगार सुरु करता येईल.

अध्यक्ष महोदय, केवळ लिंगायत समाजाचेच नव्हे तर सर्व समाजाचे मान्यताप्राप्त राष्ट्रसंत डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज यांना भारतरत्न प्रदान व्हावे, अशी शिफारस राज्य सरकारकडून केंद्र सरकारकडे करण्यात यावी. कारण राष्ट्रसंत डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज हे केवळ एका समाजापुरते मर्यादित नव्हते. धर्मचरण व ज्वलंत राष्ट्रवादाला वाहून घेतलेले असे ते संत होते. विद्वता व अमोघ वाणी यामुळे सर्व समाजाच्या लोकांनी त्यांना राष्ट्रसंत म्हणून मानाचे स्थान दिलेले आहे. त्यामुळे त्यांना भारतरत्न मिळावे, अशी शिफारस राज्य सरकारतर्फे करण्यात यावी, अशी मी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, जिल्हा परिषदेमध्ये दलित वस्तीसाठी मोठ्या प्रमाणात जिल्हा नियोजन समितीतून निधी वितरित केला जातो. परंतु, जिल्हा परिषदेमार्फत मात्र त्याचे समतोल वाटप होत नसून त्या ठिकाणी जो पक्ष सत्तेवर असतो त्यांच्या मनाप्रमाणे असमतोल निधीचे वाटप होते. अशी अनेक प्रकरणे कोर्टामध्ये देखील

श्री.राजेश पवार ...

गेलेली आहेत. त्यामुळे ही बाब शासनाने गांभीर्याने घेण्याची आवश्यकता आहे. मध्यंतरीच्या काळात आपल्याला माहीत आहे की, लॅम्प पोस्ट बसवत होते. त्यामध्ये १०० रुपये दाखवले जातात मात्र २० रुपयांमध्ये ते काम होते. त्यात मोठ्या प्रमाणात पैसे मिळतात.

अध्यक्ष महोदय, माझा शेवटचा विषय असा आहे की, माझ्या मतदारसंघात नायगाव व उमरी येथील मागासवर्गीय हॉस्टेलची अत्यंत दयनीय अवस्था झालेली आहे. त्याकरिता विशेष दुरुस्ती कालबध्द वेळेत करण्यात यावी, अशी मी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री.विजय वडेट्टीवार सभागृहात उपस्थित आहेत. मी त्यांना पुन्हा एकदा विनंतीपूर्वक सांगतो की, माझ्या भागात बंजारा समाज मोठ्या प्रमाणात असल्यामुळे आपण यावेळेस भरपूर निधी मला द्यावा. मागच्या वेळेस माननीय श्री.धनंजय मुंडे यांनी विरोधी पक्षाच्या आमदारांना ५० लाख रुपये दिले होते. यावेळेस त्यांनी २ कोटी रुपये द्यावेत व आपण २ कोटी रुपये द्यावेत, अशी मी मागणी करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

..........

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.दीपक चव्हाण)**

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण)** : सन्माननीय सदस्यांना आपले म्हणणे मांडण्याकरिता केवळ २-२ मिनिटांची संधी मिळेल. आज चर्चारोध आहे. त्यामुळे आपल्याला साडेपाच वाजता चर्चा संपवायची आहे. पावणेपाच वाजता मंत्री महोदयांचे उत्तर सुरु होईल. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी २-२ मिनिटांमध्ये आपले मुद्दे मांडावेत.

........

असुधारित प्रत

श्री मुफ्ती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगाव मध्य) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ के अर्थसंकल्प में की अनुदानों की मांगों पर बोलने के लिए मैं खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, नाशिक जिले के मालेगाव से मेरा ताल्लुक है. मालेगाव टेक्सटाईल सिटी है. ६७ प्रतिशत लोग झोपड़पट्टी में रहते है. इन लोगों को मुलभूत सुविधाएं भी नहीं मिलती है. मालेगाव में १० लाख से भी ज्यादा की आबादी है. ३ लाख से ज्यादा मतदार है. मालेगाव टेक्सटाईल सिटी है. वहां पर पावरलूम मजदूर रहते है. वहां के लोग टी.बी., कॅन्सर और अन्य कई बिमारियों से जुझ रहे है. मेरे मतदार क्षेत्र में ८७ प्रतिशत से ज्यादा लोग मायनॉरिटी से ताल्लुक रखते है. मालेगाव में मेडिकल एज्युकेशन या मेडिकल की सुविधा मिलना बहुत मुश्किल है. सरकार से मेरी विनती है कि मालेगाव में एक मायनॉरिटी मेडिकल कॉलेज दिया जाए, ताकि मायनॉरिटी के लोगों को मेडिकल एज्युकेशन की और अन्य सुविधाएं मिल सके. आपने मुझे बोलने के लिए दो मिनट का समय दिया, उसके लिए मैं आपका शुक्रगुजार हूं. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं.

-----

असुधारित प्रत

श्री.चंद्रकांत नवघरे (बसमत) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्याकरिता उभा आहे. आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याकरिता मी आपले आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या मागण्यांवर बोलताना मला हे सांगावयाचे आहे की, सन २०२२-२०२३ या वर्षाकरिता अत्यंत भरीव तरतूद माननीय श्री.अजित पवार, माननीय श्री.धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून झालेली आहे. मला एकच मागणी करायची आहे, जगातील टाटा, बिर्ला असतील किंवा या सभागृहातील एखादे सामान्य सदस्य असतील किंवा सेवक असतील या दोघांच्याही मतांचा अधिकार समान ठेवण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले आहे. मग त्यांच्या बाबतीत असे का होत आहे? डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अप्रकाशित ग्रंथ, साहित्य प्रकाशित करण्याच्या बाबतीत... केवळ भारतातच नव्हे तर जगातील कोणत्याही राजकीय नेत्याने केले नसेल एवढे प्रचंड प्रमाणात लेखन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले आहे. त्यांचे संपूर्ण साहित्य प्रकाशित करण्यासाठी शासनाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र साधने प्रकाशन समिती सन १९७६ मध्ये स्थापन केली.

अध्यक्ष महोदय, सदर समितीने ३७ वर्षांच्या कार्यकाळात ४२ ग्रंथांपैकी फक्त २२ खंड प्रकाशित केले असून २१ व २२ क्रमांकाच्या खंडामध्ये अनेक चुका व त्रुटी असल्याचे निदर्शनास आलेले आहे. दि.१८.११.२००९ च्या शासन निर्णयानुसार एका वर्षात किमान २ खंड प्रकाशित करणे समितीवर बंधनकारक असताना सन २००४ पासून अप्रकाशित साहित्यातील एकही खंड प्रकाशित केलेला नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ... संकलित केलेली महाड सत्याग्रह व इतर महत्वाची कागदपत्रे ८० वर्षांपेक्षाही जुनी असून ती आता नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे निदर्शनास येत आहे. मी आपल्या माध्यमातून विनंती करतो की, दि. १४ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने तरी या खंडांच्या बाबतीत माननीय सामाजिक न्याय मंत्री निर्णय घेतील.

श्री.चंद्रकांत नवघरे

अध्यक्ष महोदय, बसमत हे ८० हजार लोकसंख्या असलेले शहर आहे. तेथे अद्याप मुला-मुलींकरिता शासकीय वसतिगृह नाही.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे...

माझ्या मतदारसंघामध्ये वसमत येथे मागासवर्गीय मुलामुलींसाठी शासकीय वसतिगृहाची आवश्यकता आहे. वसमत येथील श्री.बेल्हे कुटुंबियांची वसतिगृहाची २७ लाख रुपये रक्कम सामाजिक न्याय विभागाकडून येणे बाकी आहे. सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून निवासी शाळा सुरु करण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, विधि व न्याय विभाग – आमच्या हिंगोली जिल्ह्यातील असीस्टंट चॅरिटी कमिश्नरचे पद अद्याप रिक्त आहे ते भरण्यात यावे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, वैद्यकीय शिक्षण – माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री हे मराठवाड्यातील आहेत. त्यांच्या व आमच्या गावाचे नाव एकच आहे. हिंगोली जिल्हा हा ना-ऊद्योग जिल्हा असून या जिल्ह्याचा मोठ्या प्रमाणात अनुशेष आहे. आदरणीय माजी मंत्री श्री.जयप्रकाश दांडेगावकर मार्गदर्शनाखाली पूर्णा सहकारी साखर कारखान्याच्या स्थायी समितीच्या बैठकीत ठराव केला आहे. वसमत येथे वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यात यावे. त्यामध्ये आमचा साखर कारखाना सहभागी होण्यास तयार आहे.

अध्यक्ष महोदय, आदिवासी विकास मंत्री महोदयांनी आमच्या जिल्ह्यातील आदिवासींच्या शाळेसाठी व वसतिगृहासाठी ४० कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिला, त्याबद्दल मी त्यांचे व माननीय उप मुख्यमंत्री यांचे अभिनंदन करतो व आभार मानतो. त्यांनी आमच्या जिल्ह्यातील आदिवासी समाजातील लोकांना न्याय देण्याचे काम केले आहे.

अध्यक्ष महोदय, इतर मागासवर्गीयांना राजकीय आरक्षण मिळेपर्यंत जिल्हा परिषदेच्या व नगरपालिकांच्या निवडणुका घेण्यात येऊ नयेत. त्या घेतल्या तर उक्त समाजावर मोठा अन्याय होईल. मराठा, मुस्लीम व धनगर समाजाला आरक्षण द्यावे, ही माझी आग्रही मागणी आहे.

श्री.चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे...

अध्यक्ष महोदय, आमच्या जिल्ह्यातील हळद प्रक्रिया उद्योगासाठी १०० कोटी रुपये व मॉडर्न मार्केटसाठीही १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिला आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी सभागृहातील सन्माननीय सदस्यांपैकी सर्वाधिक निधी आमच्या तालुक्याला उपलब्ध करुन दिला आहे. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे. धन्यवाद !

---------

असुधारित प्रत

श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आदिवासी विकास विभाग – आदिवासींची सामाजिक, आर्थिक प्रगती व्हावी याकरिता हा विभाग अविरत कार्यरत असतो. आदिवासी समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक अशा सर्व समस्या मुळापासून नष्ट झाल्या पाहिजेत. या बाबींवर लक्ष केंद्रीत करुन आदिवासी विकास विभाग काम करतो.

अध्यक्ष महोदय, माझा मतदारसंघ आदिवासी बहुल क्षेत्र असलेला व नक्षलग्रस्त भागात आहे. माझ्या मतदारसंघाचा बराचसा भाग जंगलाने व्यापलेला असून तेथे लहान टोले व गाव वसलेले आहेत. या भागात रस्ते नाहीत, दळणवळणाची साधने नाहीत. आदिवासींच्या विकासासाठी अविरत प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये आदिवासी संस्थांच्या माध्यमातून धान खरेदी करण्यात येते. देवरी येथील धान खरेदी केंद्रावर उघड्यावर धान खरेदी करण्यात आली आहे. वेळे अभावी मी भाषण पूर्ण करतो.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे. धन्यवाद !

------------

श्री.शेखर निकम (चिपळूण) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, दिनांक १६ मे, १९३८ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी चिपळून तालुक्यातील खेरडी येथील हत्तीचा माळ येथे खोती या प्रश्नाच्या संदर्भात जाहीर परिषद घेतली होती. परिणामी तत्कालीन सरकारने खोती विरोधी कायदा मंजूर केला. त्यामुळे हजारो बहुजन समाजामध्ये मोठी क्रांती निर्माण झली. सदरहू ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे उत्तम स्मारक उभारण्यात यावे. तेथे स्पर्धा परिक्षांसाठी ग्रंथालय, प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात यावे, अशी माझी आग्रही मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, वयोवृद्ध लोकांना जातीचा दाखला मिळवण्यासाठी खूप मोठी अडचण निर्माण होते. ज्यांची वये ७० ते ९० इतकी आहेत त्यांना जातीचा दाखला घेण्यासाठी प्रवास करुन कार्यालयात जाणे कठीण होते. अशा व्यक्तींना तातडीने जातीचे दाखले देण्यात यावेत, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, एसबीसी, ओबीसी व एनटी संवर्गातील विद्यार्थ्यांकडून फीस न घेता ती शिष्यवृत्तीमधून वसूल करण्यात यावी. त्यांची ट्यूशन फीची रक्कम कॉलेजच्या नावाने देण्यात यावी. एसबीसी, एसटी व एनटी संवर्गातील विद्यार्थ्यांना ज्याप्रमाणे पूर्ण शिष्यवृत्ती देण्यात येते त्यापद्धतीने ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांना पूर्ण शिष्यवृत्ती देण्याचे धोरण निश्चित करण्यात यावे. मुंबई विद्यापीठांतर्गत येणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांसाठी उक्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, दिव्यांगांना स्वतंत्र शिधापत्रिका देण्याकरिता निर्णय घेण्यात यावा. सहायक आयुक्त, अन्न व औषधी प्रशासन हे रत्नागिरी येथे नसल्याने त्यांचेशी संबंधित प्रत्येक कामासाठी रायगड येथे लोकांना जावे लागते. त्यामुळे त्यांचे खूप आर्थिक व वेळेचे नुकसान होते. यासंदर्भातही विचार करण्यात यावा, अशी माझी विनंती आहे. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे. धन्यवाद !

--------------

असुधारित प्रत

डॉ.देवराव होळी (गडचिरोली) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय विभाग – सन १९६२ मध्ये बंगाली समाजाचे लोक मोठ्या प्रमाणात गडचिरोली येथे स्थलांतरित झाले होते. त्यांचे मागील सरकारच्या काळात सामाजिक सर्वेक्षण करण्यात आले असून ते राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्र सरकारला सादर करावयाचे आहे. यासंदर्भातील कार्यवाही लवकर करण्यात यावी, ही विनंती.

अध्यक्ष महोदय, समाज कल्याण विभागाच्या माध्यमातून शॉर्ट टर्म योजना राबविण्यात येत असून लाँग टर्म योजनाही राबविण्यात याव्यात, अशी माझी आग्रही मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, अनेक योजनांच्या संदर्भात मार्जीन मनीचे प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत, ते मंजूर करण्यात यावेत.

अध्यक्ष महोदय, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग – गडचिरोली जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याची सर्व कार्यवाही पूर्ण झाली आहे. हा जिल्हा मागासलेला व आदिवासी असल्याने उक्त महाविद्यालयाच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात यावी, अशी मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, गडचिरोली येथे औषधीद्रव्ये विभागाचे कार्यालय नसून चंद्रपूर येथून मॉनेटरींग करण्यात येते. त्यामुळे उक्त कार्यालय गडचिरोली येथे सुरु करण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, इतर मागस बहुजन कल्याण विभाग – या विभागाचे माननीय मंत्री श्री.विजय वडेट्टीवार गडचिरोली जिल्ह्याचे आहेत. त्यांच्या व माझ्या मतदारसंघामध्ये धाडे कुणबी समाज मोठ्या प्रमाणात आहे. त्यांना इतर मागासवर्गीय जातीचे आरक्षण मिळत नाही. याबाबत आपण मागील बैठकीमध्ये सांगितले होते की, त्यांचा एनटी सी संवर्गामध्ये समावेश करण्यात येईल. यासंदर्भात मंत्री महोदयांनी तातडीने कार्यवाही करावी.

असुधारित प्रत

डॉ.देवराव होळी...

अध्यक्ष महोदय, इतर मागास वर्ग समाज गडचिरोलीत मोठ्या प्रमाणात आहे. त्यांचेकरिता प्रत्येक तालुक्यात वसतिगृह सुरु केले तर खूप बरे होईल.

अध्यक्ष महोदय, आदिवासी व अनुसूचित जाती समाजाला उद्योग उभारणीसाठी राज्य व केंद्र शासनाच्या स्टार्टअप आणि स्टँडअप योजनेचा मार्जीन मनी देण्यात येतो त्याप्रमाणे तो इतर मागासवर्गीयांना उद्योग उभारण्यासाठीही देण्यात यावा, अशी माझी आग्रही मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे. धन्यवाद !

--------------

असुधारित प्रत

श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आदिवासी विकास विभाग – या विभागाला राज्याच्या अर्थसंकल्पाच्या ९.२७ टक्के इतका निधी देण्यात येतो.

असुधारित प्रत

यानंतर श्री.तेलंग...

श्री.श्रीनिवास वनगा.......

हा निधी आदिवासी विकास विभागासाठी आणि आदिवासी विकास विभागातील कर्मचाऱ्यांच्या वेतनसाठी दिला जातो. सामान्य प्रशासन आणि वित्त विभागाला माझी विनंती आहे की, कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून द्यावा. जेणेकरून आदिवासी कल्याणाकरिता सदर सर्व निधीचा वापर करता येईल.

अध्यक्ष महोदय, आम्ही सर्व लोकप्रतिनिधींनी मागणी केल्यानंतर आदिवासी जात पडताळणी कार्यालय पालघर येथे स्थलांतरित करण्यात आलेले आहे. ऑनलाईन प्रणालीमध्ये जिल्हा निवड करताना पालघर हा पर्याय उपलब्ध नसल्यामुळे अर्ज सादर करण्यासाठी ठाणे जिल्ह्याची निवड करावी लागते. त्यामुळे सदर प्रकरणे ही ठाणे जिल्ह्याकडे वर्ग होत आहेत. परंतु ठाणे येथील कार्यालयाला गेले असता तुमच्यासाठी पालघर येथे नवीन कार्यालय सुरू केले आहे असे सांगितले जाते. जात पडताळणीसाठी अर्ज सादर करण्यात अडचणी निर्माण होत आहेत. तरी ऑनलाईन प्रणालीमध्ये दुरुस्ती करून आम्हाला दोन्ही पर्याय उपलब्ध करून देण्यात यावेत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आदिवासी विद्यार्थी आश्रम शाळेमध्ये शिकण्यासाठी शहरी भागात येतात. बऱ्याच मुलांना त्या ठिकाणी प्रवेश मिळत नाही. आश्रम शाळेतील खाटांची संख्या कमी असल्यामुळे त्यांना ये-जा करणे गैरसोयीचे होते. त्यांच्यासाठी अधिक खाटांची सोय उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मी विनंती करातो व वेळेअभावी मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------

असुधारित प्रत

श्रीमती सरोज अहिरे (देवळाली) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यावर बोलण्यासाठी मी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या देवळाली मतदारसंघातील पश्चिम भागामध्ये जवळपास २५ ते ३० ग्राम पंचायतींमध्ये ८० ते ८५ हजार आदिवासी बांधव वास्तव्यास आहेत. माझी आदिवासी विकास मंत्री महोदयांना अशी नम्र विनंती आहे की, आदिवासी समाज हा बहुतांश स्थलांतर करतो. त्यांना एका ठिकाणी स्थायी करायचे असेल आणि त्यांना मुख्य प्रवाहामध्ये आणून त्यांची प्रगती करावयाची असेल तर त्यांना कोठेतरी एका ठिकाणी रोजगार निर्मिती करून देणे अत्यंत आवश्यक आहे. माझ्या गिरनारे गटातील सर्व आदिवासी बांधवांसाठी आणि खास करून महिलांसाठी तेथे महिला बचत गट अतिशय चांगले काम करतात. सर्व महिला कर्तबगार आणि कर्तृत्ववान अशा आहेत. वेगवेगळे पदार्थ आणि पारंपारिक पदार्थ बनविणे आणि त्याच बरोबर आदिवासी बांधवाच्या ज्या काही कलाकृती आहेत यासाठी कोठेही एखादी बाजारपेठ उपलब्ध नाही. अशा आदिवासी भगिनी आणि बांधवांसाठी गिरनारे गटामध्ये एखादे मार्केट उभारण्यात आले तर आदिवासी समाजाचे होणारे स्थलांतर थांबविण्यास मदत होईल. खऱ्या अर्थाने महिलांचे सबलीकरण करावयाचे असेल तर त्यांच्या हाताला निश्चित स्वरूपाचे काम मिळवून देणे खूप महत्त्वाचे आहे.

अध्यक्ष महोदय, गेल्या अडीच वर्षामध्ये माझ्या मतदारसंघाला आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून निधी थोडा कमी प्रमाणात मिळालेला आहे. परंतु पुढील अडीच वर्षात मंत्री महोदय आदिवासी बांधवांच्या विकासासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देतील, अशी मला अपेक्षा आहे. डोंगराळ भागांमध्ये आदिवासी समाजाचे वास्तव्य असते. आदिवासी भागामध्ये पावसाचे प्रमाण जास्त असल्यामुळे तेथील रस्ते अतिशय लवकर खराब होतात. आदिवासी वसाहतीचा व त्या भागातील रस्त्यांचा विकास करण्यासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत

श्रीमती सरोज अहिरे.........

अध्यक्ष महोदय, मी महिला व बाल हक्क समितीची अध्यक्ष ा असल्यामुळे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये माझे दौरे असतात. उक्त दौऱ्या दरम्यान एक खूप महत्त्वाची गोष्ट माझ्या निदर्शनास आली आहे की, बहुविकलांग मुलांच्या संगोपन ासाठी कोणतीही व्यवस्था नाही. अशा बहुविकलांग मुला-मुलींना शासनामार्फत चालविल्या जाणाऱ्या आधारगृहामध्ये राहण्याची व्यवस्था करणे अत्यंत आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, जी मुले १०० टक्के बेड रिडन आहेत, त्यांना जन्मत:च सोडून दिले जाते. अशा मुलांना भविष्यामध्ये कुठलाही आधार नसतो. त्यामुळे शासनाने याबाबत योग्य निर्णय घ ेणे आवश्यक आहे. दिव्यांग बांधवांना घरकुल व रेशनकार्ड उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने विशेष लक्ष देण्यात यावे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, तृतीयपंथी भगिनींना अतिशय चांगल्या प्रकारचा न्याय या महाविकास आघाडी सरकारने दिलेला आहे. दिव्यांग बांधवांचा जो दुर्लक्षित घटक आहे त्याला न्याय देण्यासाठी, त्यांना आपल्या बरोबरीने मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कृपया शासनाने विशेष तरतूद करावी, अशी मी नम्र विनंती करते. धन्यवाद.

---------

श्री.राम सातपुते (माळशिरस) : अध्यक्ष महोदय, बार्टी संस्थेच्या धर्तीवर मातंग समाजाच्या शिक्षण व प्रशिक्षणासाठी, उन्नतीसाठी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने एक वेगळी आरटीई संस्था स्थापन करून या समाजाला मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी प्रयत्न करावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, गेल्या अनेक वर्षापासून पूजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे इंदु मिलच्या जागेवर भव्य स्मारक व्हावे याचे आम्ही स्वप्न पाहतो आहोत. परंतु या अर्थसंकल्पामध्ये त्याबाबतची कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. अर्थसंकल्पामध्ये त्यासाठी तरतूद होणे अपेक्षित होते. दुर्दैवाने या सरकारने त्यासाठी काहीही केलेले नाही आहे.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील हिंदू खाटीक समाज, होलार समाज या समाजातील बांधवांना जातीचे दाखले मिळत नाही. त्या समाजाला मुख्य प्रवाहात आणायचे असेल, शिक्षण द्यावयाचे असेल तर त्यांना लवकरात लवकर जातीचे दाखले उपलब्ध देण्यासाठी शासनाने प्रयत्न करावे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, बार्टी संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्र केडरसाठी MPSC चे आणि UPSC चे प्रशिक्षण दिले जाते. सदर प्रशिक्षण ग्रामीण जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, होलार आणि खाटीक समाजाला मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी शासनाने विशेष योजना राबवाव्यात, अशी मी सामाजिक न्याय मंत्री महोदयांना विनंती करतो. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

----------

श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) : अध्यक्ष महोदय, आपण देत असलेल्या अपुऱ्या वेळेमध्ये माझे मुद्दे मांडणे शक्य होणार नाहीत, त्यामुळे मी कोणतेही मुद्दे मांडू इच्छित नाही. धन्यवाद.

----------

असुधारित प्रत

श्री.हिरामण खोसकर (इगतपुरी) अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आदिवासी भागामध्ये आदिवासींसाठी मिळणाऱ्या कृषीपंप, गायी, म्हशी, किंवा इतर अनेक योजना मागील ७ वर्षापासून बंद आहेत. वरील योजनासाठी केंद्र सरकार ६० टक्के तर राज्य सरकार ४० टक्के निधी उपलब्ध करुन देत होते. परंतु आता त्या सर्व योजना बंद करण्यात आलेल्या आहेत. माझी आदिवासी विकास मंत्री महोदयांना विनंती आहे की, सदर सर्वच्या सर्व योजना पुन्हा चालू करण्यात याव्यात. या योजना बंद केल्यामुळे आदिवासी भागात राहणारा आदिवासी मागील ७ वर्षा्पासून इतर जिल्ह्यांमध्ये स्थलांतरित होत आहे. आदिवासी बांधवांचे होणारे स्थलांतर जर थांबवावयाचे असेल तर १ ते २१ पर्यंतच्या सर्व योजना पुन्हा सुरु करुन आदिवासींना सहकार्य करावे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आदिवासी बांधवांना शबरी विकास घरकुल, पंतप्रधान घरकुल योजनेचा लाभ मिळण्यासाठी पक्क्या घराची जी अट घालण्यात आलेली आहे ती अट काढून टाकण्यात यावी.

यानंतर श्री.कुलकर्णी........

असुधारित प्रत

श्री. हिरामण खोसकर....

आदिवासी व्यक्ती स्वत: पक्क्या घरांचे बांधकाम करीत असतो. आदिवासींना वन जमिनी मिळाल्या आहेत. त्यांचे नाव इतर हक्कामध्ये आहे. काही ठिकाणी अतिवृष्टी होत असते. तेथील शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळत नाही. म्हणून मी विनंती करतो की, त्यांचे नाव इतर हक्कामध्ये लागले पाहिजे. आदिवासी भागामध्ये जलसिंचनाचे प्रश्न आहेत. आज जलसंपदा विभागाचा विषय नसला तरी आदिवासी विकास विभाग आणि जलसंधारण विभागाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन द्यावा. जेणेकरुन साठवण तलाव बांधता येतील व त्यातून आदिवासींचे स्थलांतर थांबेल.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो.

धन्यवाद !

--------

असुधारित प्रत

श्री. कृष्णा गजबे (आरमोरी) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी आणि माझे मत मांडण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय विभागाबाबत मी सुरुवातीला माझे मत मांडणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सन १९५६ मध्ये वडसा तालुक्यातील दिक्षाभुमीस स्पर्श केला होता. या दिक्षाभुमीबाबतचा प्रस्ताव मंत्री महोदयांकडे पाठविण्यात आला आहे. हा प्रस्ताव १६ कोटी रुपयांचा असून तो मंत्री महोदयांनी मंजूर करावा, अशी मी विनंती करतो. पवित्र दिक्षाभुमीसाठी तरतूद करावी.(....अडथळा....) रमाई घरकूल आवास योजना किंवा शबरी घरकूल योजना, ठक्करबाप्पा योजनाचा निधी वाढविण्यात यावा. याकरिता दीड लाख रुपयांचा निधी दिला जातो. नागरी विभागाकरिता अडीच लाख रुपयांचा निधी दिला जातो. यात वाढ करावी, अशी मी विनंती करतो. सामाजिक न्याय विभागाच्या मंत्री महोदयांना मी विनंती करतो की, श्रावणबाळ योजना, संजय गांधी निराधार योजना व इतर पाच योजनांचे मानधन लाभार्थ्यांना चार-पाच महिन्यापर्यंत मिळत नाही. त्यांना दर महिन्याला मानधन मिळाले पाहिजे. दुसरे असे की, इतर मागास व बहुजन कल्याण विभागाच्या माध्यमातून बांधण्यात येणाऱ्या वसतीगृहाबाबत मी बोलणार आहे. हे वसतीगृह जिल्हा आणि तालुक्याच्या ठिकाणी झाले पाहिजे. तसेच तांडा, वस्तीच्या निधीमध्ये वाढ करण्यात यावी. बंजारा, कुणबी, मावसार, कुंभार व इतर समाजाच्या मुलांचे प्रश्न सोडविण्यासाठी विशेषबाब म्हणून निधी उपलब्ध करुन द्यावा.

अध्यक्ष महोदय, ओबीसी समाजाच्या विद्यार्थ्यांकरिता महाज्योती संस्था स्थापन करण्यात आली आहे. या संस्थेकरिता २५० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या विद्यार्थ्यांना विदेशात शिक्षण मिळावे, याकरिता नियोजन करण्यात आले आहे. अधिकाधिक विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळाला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

धन्यवाद !

श्री. किशोर अप्पा पाटील (पाचोरा) : अध्यक्ष महोदय, मी सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे. मी चार विभागांपैकी केवळ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागासंदर्भात माझे मत मांडणार आहे. आता बोलण्यासाठी वेळेची जी मर्यादा प्रत्येक सन्माननीय सदस्यांकरिता घालून दिली आहे ती सुरुवातीपासून ठेवली असती तर शेवटच्या सन्माननीय सदस्यांनाही बोलण्यासाठी न्याय मिळाला असता. आम्ही सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भात बोलत असताना आमच्यावर अन्याय होत आहे.

अध्यक्ष महोदय, मी अतिशय महत्त्वाच्या विषयावर बोलणार आहे. मागील अनेक वर्षापासून caste scrutiny committee च्या अध्यक्षांकडून सर्व समाजावर अन्याय होत आहे. मागील सरकारच्या काळात माननीय श्री. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ रोजी एक विधेयक संमत करण्यात आले होते. त्यात असे म्हटले होते की, रक्ताच्या नात्यातील कोणाकडे जात प्रमाणपत्र असेल तर त्या व्यक्तीच्या मुलांना किंवा इतर रक्ताच्या नातेवाईकांना कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे तपासण्याची आवश्यकता नाही. परंतु आजही caste scrutiny committee चे अध्यक्ष किंवा ती समिती पैशाशिवाय जात वैधता प्रामाणपत्र देत नाही. या कायद्याच्या कलम १८(५) अन्वये असे सांगण्यात आले की, ९० दिवसांच्या आत caste scrutiny committee ने जात वैधता प्रमाणपत्र दिले पाहिजे. परंतु या कायद्याची पायमल्ली होत आहे. देशातील हरियाणा, पंजाब, तामिळनाडू आणि महाराष्ट्र या चार राज्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही राज्यात caste scrutiny committee नाही. प्रांत अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र ९९.५ टक्के ठिकाणी ग्राह्य धरले जातात. असे असताना ०.५ टक्क्यांकरिता ही caste scrutiny committee का ठेवली जात आहे ? याबाबत मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. जयकुमार रावल यांच्या धुळे मतदारसंघात श्री. पेंडसे नावाचे एक अधिकारी आहेत. त्यांनी त्यांच्या अध्यक्ष पदाच्या कार्यकाळात व्हीजेएनटी समाजाचे एकही प्रमाणपत्र व्हॅलिड केले नाही. याबाबतचे रेकॉर्ड मंत्री महोदयांनी तपासले पाहिजे.

श्री. किशोर अप्पा पाटील.....

अध्यक्ष महोदय, या अधिकाऱ्यांने सन २०१७ पासून अध्यक्ष असताना एकही व्हीजेएनटी जातीचे प्रामणपत्र व्हॅलिड केले नाही. मी माननीय मंत्र्यांकडे याबाबत लेखी स्वरुपात तक्रार केली आहे. तरीही त्या अधिकाऱ्यावर कोणतीही कारवाई झाली नाही किंवा त्यांची बदलीही करण्यात आली नाही. म्हणून मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपल्या शेजारच्या गुजरात राज्यात caste scrutiny committee नाही. तेथे प्रांत अधिकाऱ्यांनी दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाते. आपल्या राज्यात केवळ पाच अध्यक्ष आहेत. यांच्याकडे संपूर्ण राज्याचे काम देण्यात आले. त्यांच्याकडून caste scrutiny committee द्वारे कशा प्रकारे प्रमाणपत्र दिले जात असतील ? मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, सदर श्री. पेंडसे नावाच्या अधिकाऱ्याविरुद्ध कारवाई केली जाणार आहे काय ?

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

धन्यवाद !

-------

असुधारित प्रत

श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, मी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना आणि मंत्री महोदयांना विनंती करते की, ओबीसी समाजाचे आरक्षण टिकविण्यासाठी आपण सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करावेत. ओबीसी समाजात वर्किंग वुमेन्सकरिता कोठेही हॉस्टेल नाही. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छिते की, नवी मुंबई येथे सिडकोकडून ओबीसीकरिता राखीव भूखंड ठेवला जातो. तेथे वर्किंग वुमेन्सकरिता हॉस्टेल काढावे.

अध्यक्ष महोदय, मी जात पडताळणीबाबत बोलणार आहे. ओबीसी समाजामध्ये माळी समाज, पाचकळशी, चौकळशी, वाडवळ हे माळी समाजामध्ये येतात. पालघर जिल्ह्यात जात पडताळणी अध्यक्षांकडून ज्यावेळेस जात वैधता प्रमाणपत्र तपासले जाते, तेव्हा त्या प्रमाणपत्रावर जर 'सोक्ष' म्हणजे 'सोमवंशी क्षत्रिय' असे लिहिले असेल तर ती जात होत नाही. परंतु त्यासमोर पूर्वीच्या काळात काही लोकांच्या प्रमाणपत्रावर 'सोक्ष' असे लिहिले आहे. परंतु मुलांच्या प्रमाणपत्रावर वाडवळ, पाचकळशी, मळे करणारे माळी आणि वाडी करणारे वाडवळ असा निर्णय मनिषा चौधरी यांच्या प्रकरणात दिला आहे. असे असतानाही जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी तेथील विद्यार्थ्यांना त्रास होत आहे. याकडे शासनाने लक्ष द्यावे, अशी मी विनंती करते.

अध्यक्ष महोदय, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या लोकांना घरकुले दिली जातात. त्याचप्रमाणे ओबीसी समाजाकरिताही घरकूल योजना सरकार सुरु करावी, अशी मी मागणी करते.

यानंतर श्री. चौधरी....

श्रीमती मनिषा चौधरी.....

अध्यक्ष महोदय, मी आदिवासी विकास विभागाच्या मागण्यांवर बोलत आहे. माझ्या मतदारसंघामध्ये ओरी पाडा, कोमल टँक यांच्यासह एकूण तीन आदिवासी पाडे आहेत. झरी बोरिवली येथे आदिवासी विभागाचे प्रकल्प कार्यालय आहे. परंतु मुंबईमध्ये राहणाऱ्या आदिवासींकडे १९५० चा पुरावा नसल्याने ते सर्व योजनांपासून वंचित राहत आहेत. त्यांना जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी सरकारने मदत करावी, ही विनंती आहे.

---------

असुधारित प्रत

श्री.मनोहर चंद्रिकापुरे (अर्जुनी मोरगाव) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री श्री.अजित पवार यांनी सामाजिक न्याय विभागासाठी भरीव निधीची तरतूद केली आहे. आपल्या देशामध्ये भारतीय संविधान लागू झाल्यापासून अनुसूचित जाती प्रवर्गाला १४ टक्के, अनुसूचित जमाती प्रवर्गाला ७ टक्के व इतर मागासवर्ग प्रवर्गाला २७ टक्के आरक्षण आहे. परंतु नोकऱ्यांची आकडेवारी पाहिली तर दिसून येते की, ५० टक्के देखील पदे भारत सरकारने भरलेली नाहीत. तसेच उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयामध्ये देखील अनेक प्रकरणे सुरु आहेत. मराठा, ओबीसी, अ.जा., अ.ज. प्रवर्गांचे अनेक प्रश्न आहेत. या सभागृहातील २८८ पैकी २९ आमदार अ.जा. प्रवर्गाचे व २५ आमदार अ.ज. प्रवर्गाचे आहेत. या ५४ सन्माननीय सदस्यांना किमान ५४ मिनिटे तरी बोलण्यासाठी वेळ दिला पाहिजे. परंतु गेल्या अनेक दिवसांपासून मी पाहत आहे की, केवळ विरोधी पक्षातील सदस्यांना बोलण्याची संधी देण्यात येते व दुर्दैवाने सत्ताधारी बाजूच्या सदस्यांना संधी देण्यात येत नाही.

अध्यक्ष महोदय, मागील सरकारच्या काळातील आकडेवारी पाहिली असता असे दिसून आले की, अ.जा. प्रवर्गासाठी तरतूद करण्यात आलेल्या निधीपैकी ६० ते ७५ टक्क्यांपेक्षा जास्त निधी खर्च झालेला नाही. सन २०२०-२१ मध्ये ७३ टक्के खर्च करण्यात आला. सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पामध्ये १० हजार ६३५ कोटी रुपयांचा नियतव्यय व कार्यक्रम खर्च ३ हजार ५९५ रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी ६ हजार ६२६ कोटी रुपये निधी वितरित झाला. कदाचित, दोन वर्षे कोरोना महामारीमुळे जास्त निधी खर्च होऊ शकला नसेल. परंतु माझी आपल्या माध्यमातून माननीय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांना विनंती आहे की, या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेल्या तरतुदीमधून अ.जा. व अ.ज. प्रवर्गासाठी लोकसंख्येप्रमाणे निधी देण्यात यावा. धन्यवाद.

---------

श्री.प्रताप अडसड (धामनगाव रेल्वे) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, अमरावती हे महसुली विभागाचे ठिकाण आहे. परंतु तेथे अद्यापही शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नाही. माझी या निमित्ताने विनंती आहे की, अमरावती येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यात यावे. त्यासाठी आवश्यक सर्व इन्फ्रास्ट्रक्चर तयार आहे. २० कोटी रुपयांची तरतूद केली तर या वर्षीच पहिली बॅच सुरु होऊ शकते. त्यामुळे मंत्री महोदयांनी यासाठी निधी द्यावा, अशी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, तांडा-वस्तीवर राहणारे आदिवासी लोक यांच्या छोटया-छोटया कार्यक्रमांसाठी गावांमध्ये सभागृहे नाहीत. त्यामुळे माझी विनंती आहे की, त्यांना सभागृह व रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा.

अध्यक्ष महोदय, लेखाशिर्ष ३०५४ अंतर्गत दिल्या जाणाऱ्या निधीचे वितरण पी.सी.आय. नुसार केले जावे. तसे न करता अमरावती जिल्हा परिषदेमध्ये पहिल्या क्रमांकावरील सोडून चौथ्या क्रमांकावरच्याला निधी देण्यात आला आहे. या अनियमिततेबाबत चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, अशी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामधील १५ वर्षे आमदारकी भोगलेले गृहस्थ संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजनेचे अध्यक्ष आहेत. त्यांच्यामार्फत फक्त स्वत:च्या पक्षाचा अजेंडा राबविणे सुरु आहे. त्यांच्या पक्षातील ४५ ते ५५ वर्षांच्या लोकांना देखील संजय गांधी निराधार योजनेचे लाभ देण्यात येत आहेत. त्याउलट शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस वा भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता किंवा मतदार असेल व त्याचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक असले तरीही त्याला न्याय दिला जात नाही. त्याच्या प्रकरणाला स्थगिती दिली जाते. कार्यालयाबाहेर पात्र लाभार्थ्यांची यादी जाहीर झाली होती परंतु सदर यादी अध्यक्षांनी घरी मागवून घेतली व इतर पक्षातील लोकांच्या नावांना स्थगिती दिली.

असुधारित प्रत

श्री.प्रताप अडसड.....

संजय गांधी निराधार योजनेच्या तहसिलदारांनी देखील या सर्व प्रकाराला कंटाळून पत्र दिले की, आमच्यावर दबाव आणून चुकीची कामे करायला भाग पाडण्यात येत आहे. त्यामुळे मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरामध्ये या प्रकरणाबाबत चौकशी करण्याचे ठोस आश्वासन द्यावे, ही विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

---------

असुधारित प्रत

श्री.रमेश कोरगावकर (भांडुप पश्चिम) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या भांडुप पश्चिम विधानसभा क्षेत्रामध्ये काही आदिवासी पाडे आहेत. या आदिवासी पाडयातील नागरिकांना मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव भासत आहे व त्यामुळे त्यांची मोठी गैरसोय होत आहे. भांडुप विधानसभा क्षेत्रातील आदिवासी पाडयांचा विकास व्हावा, तेथील नागरिकांना तातडीने मूलभूत नागरी सुविधा मिळाव्यात यासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या विधानसभा क्षेत्रातील नालंदा बुध्दविहार, माता रमा आंबेडकर नगर, पंचशील बुध्द विहार, आम्रपाली बुध्द विहार, साई कृपा चाळ, महात्मा ज्योतिबा फुले नगर, कवि संत कबीर चाळ, संकटमोचन चाळ, समता चाळ येथील विकासकामे होणे अत्यंत गरजेचे आहे. सदर भागातील कामे करण्यासाठी दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत माझ्या मतदारसंघातील माता रमाबाई आंबेडकर नगर नंबर-१, जमील नगर, कोकण नगर, तानाजी वाडी, वाघोबा वाडी, साई हिल, हनुमाननगर टेकडी, उत्कर्ष नगर, महात्मा फुले नगर या दलित वस्त्यांमध्ये विविध विकासकामे व सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणे अत्यंत गरजेचे आहे. त्याकरिता डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मागणी करतो व माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------

डॉ.विजयकुमार गावित (नंदुरबार) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागाच्या मागण्यांवर मी बोलत आहे. नंदुरबार हा आदिवासीबहुल जिल्हा आहे. गेल्या वर्षी या ठिकाणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयत एम.बी.बी.एस. ची पहिली बॅच सुरु झाली. यावर्षी दुसरी बॅच सुरु होणार आहे. परंतु त्यापूर्वी इंडियन मेडिकल कौन्सिलने केलेल्या इन्स्पेक्शनमध्ये असे दिसून आले की, एम.बी.बी.एस. च्या दुसऱ्या बॅचसाठी आवश्यक एकही पद अद्याप भरलेले नाही तसेच पहिल्या बॅचसाठी भरण्यात आलेली पदे ही कायमस्वरुपी नसून प्रतिनियुक्तीने घेण्यात आलेली आहेत. त्यामुळे त्यांनी आम्हाला नोटीस देऊन त्यामध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, "आपण दुसऱ्या बॅचसाठी आवश्यक पदे भरलेली नाहीत. ही पदे लवकरात लवकर भरली नाहीत तर एम.बी.बी.एस. च्या दुसऱ्या बॅचसाठी परवानगी मिळणार नाही." माझी या निमित्ताने मंत्री महोदयांना विनंती आहे की, ही पदे त्वरित भरावित. जेणेकरुन एम.बी.बी.एस. च्या दुसऱ्या बॅचला इंडियन मेडिकल कौन्सिलची मान्यता मिळेल. धन्यवाद.

---------

अप्रकाशित प्रत

श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था अर्थात बार्टीच्या धर्तीवर मातंग समाजाला उच्च शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नाव देऊन आर्टी संस्थेची स्थापना करावी, अशी मी आपणास विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे विशेष पाठपुरावा करावा, अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, नांदेड जिल्हयातील देगलूर, बिलोली व मुखेड या तालुक्यांतील मन्नेरवारलू, महादेव कोळी या जमातींच्या वैधता प्रमाणपत्रांचे प्रस्ताव जात पडताळणी समिती, औरंगाबाद यांच्याकडे प्रलंबित आहेत. या जमातींच्या व्यक्तींवर अन्याय होत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. प्रलंबित जात पडताळणीच्या प्रमाणपत्रांमुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. तसेच ते नोकरीपासून वंचित राहिले आहेत. यामुळे आदिवासींची प्रगती होण्याऐवजी मोठया प्रमाणात अधोगतीच झाली आहे. त्यामुळे अशा प्रकरणी चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करुन आदिवासी बांधवांना लवकरात लवकर न्याय द्यावा, अशी माझी विनंती आहे. धन्यवाद.

---------

असुधारित प्रत

श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) : अध्यक्ष महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मागास प्रवर्गातील बी.ए.एम.एस. विद्यार्थ्यांना राज्य कोटयातून प्रवेश मिळून देखील शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित ठेवल्याचे जानेवारी, २०२२ मध्ये निदर्शनास आले आहे. राज्यभरातील ८४ आयुर्वेद महाविद्यालयातील ५०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांचा हा प्रश्न आहे. शिष्यवृत्ती मिळत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना लाखोंचा भुर्दंड बसत आहे. आरक्षित, मागासवर्गीय व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना पात्र असताना देखील शिष्यवृत्तीपासून वंचित ठेवण्याचे कारण सरकारने स्पष्ट करावे. तसेच मागास प्रवर्गातील बी.ए.एम.एस. विद्यार्थ्यांना लवकरात लवकर शिष्यवृत्ती देण्यात येईल का याबाबत देखील स्पष्टता द्यावी.

अध्यक्ष महोदय, दिव्यांगांना वेळेवर दिव्यांग प्रमाणपत्रे मिळत नाहीत. त्यासाठी त्यांना तीन-चार वेळा हेलपाटे मारावे लागतात. अगोदरच त्यांच्या पालकांना खूप मानसिक ताण असतो. त्यामुळे कमी वेळेत दिव्यांग प्रमाणपत्र मिळण्यासाठी सदर प्रक्रिया अधिक सोपी आणि ऑनलाईन करावी ही माझी विनंती आहे. धन्यवाद.

---------

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

डॉ. किरण लहामटे (अकोले) : अध्यक्ष महोदय, आदिवासी विकास विभागाच्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर बोलताना माझी सर्वात महत्त्वाची मागणी आहे की, ९ ऑगस्ट हा जागतिक आदिवासी दिवस म्हणून सर्व जगभर पाळला जातो. त्या निमित्ताने सर्वत्र कार्यक्रम असतात. म्हणून महाराष्ट्र शासनाने ९ ऑगस्ट रोजी शासकीय सुट्टी जाहीर करावी अशी मी माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री आणि माननीय आदिवासी विकास मंत्री यांना विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, दुसरे म्हणजे आदिवासी विकास विभागांची शासकीय वसतिगृहे संपूर्ण महाराष्ट्रभर आहेत. त्यामुळे त्यांची संख्या वाढविण्यात यावी. कारण आताचे मेरीट पाहिले तर जवळपास ७५ ते ८० टक्क्यांपर्यंत विद्यार्थ्यांचे वसतिगृहामध्ये नंबर लागतात आणि इतर ५० ते ६० टक्केवारीचे विद्यार्थी आहेत ते वसतिगृहाच्या लाभापासून वंचित राहतात. त्यामुळे ही वसतिगृहांची संख्या वाढवावी.

अध्यक्ष महोदय, समाजकल्याण विभागावर बोलत असताना माझी महत्त्वाची मागणी अशी आहे की, आमच्या अकोले शहरामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर येऊन गेले आहेत. परंतु तेथे त्यांचे स्मारक आणि स्पर्धा परीक्षा केंद्राच्या माध्यमातून उभे रहावे, ही एक माझी महत्त्वाची मागणी आहे. तसेच समाजकल्याण विभागाचे एक वसतिगृह तेथे असावे, अशीही माझी एक मागणी आहे.

----------

श्रीमती मंजुळा गावित (साक्री) : अध्यक्ष महोदय, २०२२-२३ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या साक्री मतदार संघामध्ये गोरगरीब आदिवासी समाज आहे. माझ्या तालुक्यात वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षण संस्था नाहीत. अभ्यासासाठी अभ्यासिका नाहीत. शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना नाशिक, पुणे आणि मुंबईला जावे लागते. राहण्याची व्यवस्था नसल्यामुळे इच्छा असूनही विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येत नाही. म्हणून मी या ठिकाणी शासनाला विनंती करते की, माझ्या तालुक्यात वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षणाची व्यवस्था झाली तर माझा गोरगरीब विद्यार्थी डॉक्टर आणि इंजिनिअर होईल.

अध्यक्ष महोदय, माझ्या आदिवासी समाजाचा सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकास घडवून आणण्यासाठी त्यांचे हक्क आणि अधिकार याबाबत जाणीव आणि जागृती मोठ्या प्रमाणावर होण्यासाठी जागतिक आदिवासी दिन म्हणून ९ ऑगस्ट या दिवशी शासकीय सुट्टी जाहीर करावी, अशी मी विनंती करते.

श्री. लहू कानडे : (बसून) : अध्यक्ष महोदय, आम्हाला बोलण्याची संधी मिळाली नाही म्हणून आम्ही ते सभागृहाच्या पटलावर सादर करतो.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण) :** आपण दिलेले निवेदन मी मंत्री महोदयांकडे सुपूर्द करतो. मंत्री महोदयांनी त्यांच्या निवेदनाची दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

असुधारित प्रत

श्री. धनंजय मुंडे (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागावरील अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये या सदनाच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी या विभागासंबंधी महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. त्या सर्वांची नावे घेऊन मी आणखी सदनाचा वेळ घेत नाही. कारण अगोदरच वेळ झाला आहे आणि नावे घेण्यात आणखी वेळ जाईल.

अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाचा मंत्री झाल्यानंतर आणि राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर मोकळेपणाने आज या विभागावर चर्चा होत आहे आणि मंत्री म्हणूनही २ वर्षानंतर आज मोकळेपणाने बोलण्याची संधी मिळत आहे. कोविडच्या निर्बंधामुळे अधिवेशनाचा काळ अतिशय मर्यादेत करण्यात आला. त्यामुळे प्रत्येक विभागावर सन्माननीय सदस्यांना बोलण्यास मर्यादा आली. मंत्र्यांना उत्तर देण्यासही मर्यादा आली.

अध्यक्ष महोदय, आज सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या मागण्यांवर सन्माननीय सदस्यांनी आपापल्या मनातल्या भावना बोलल्या. हे खरे आहे की, आज पहिल्यांदाच अनेक सन्माननीय सदस्यांनी गेल्या २ वर्षात आपापल्या ज्या काही अडचणी होत्या त्या या ठिकाणी मांडल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, स्वाभाविकच अनेकांना अपेक्षा आहे की, सामाजिक न्याय विभागाकडून न्याय मिळावा. खरं तर या विभागाची स्थापनाच घटनेचे शिल्पकार परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी केली आहे. सामाजिक न्याय, समता आणि संविधान ज्यांनी दिले, त्याच सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून न्याय देताना हे स्वाभाविक आहे की, प्रत्येक सन्माननीय सदस्याची मागणी त्या पध्दतीची असेल. सामाजिक न्याय विभागाला वेगळी तरतूद आहे. अनेकांनी या ठिकाणी बोलून दाखविले की, या विभागासाठी १९ हजार कोटी रुपये, १२ हजार कोटी, १४ हजार कोटी असे या विभागाचे एकूण बजेट आहे.

अध्यक्ष महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, सन २०११ च्या जनगणनेनुसार जी ११ ते १२ टक्के लोकसंख्या आहे त्या लोकसंख्येच्या प्रमाणात सामाजिक न्याय विभागाला निधी मिळावा, हे अभिप्रेत आहे. आजपर्यंत या

श्री. धनंजय मुंडे...

लोकसंख्येच्या प्रमाणात निधी मिळाला नाही. मागच्या २ वर्षातील काळ तर कोविडचा होता. त्यामुळे सर्व बाबींवर निर्बंध लागले होते. त्यामुळे खर्च होताना आपण विचार करतो की, १२ ते १५ हजार कोटी रुपयांचा हा विभाग आहे. पण या विभागातील सुमारे ८५ टक्के निधी हा व्यक्तीगत लाभापोटी वापरला जातो. मग त्यामध्ये शिष्यवृत्ती योजना, स्वाधार योजना आणि रमाई आवास योजनेपासून दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेपर्यंत ज्या ज्या काही योजना असतील त्या सर्व व्यक्तीगत लाभांच्या योजना आहेत. इतर विभागामध्ये सुध्दा जी मॅचिंग अनुदानाची रक्कम द्यावी लागते. मग त्यामध्ये कृषी विभागाला सुध्दा सामाजिक न्याय विभागाने निधी द्यायचा असतो.

अध्यक्ष महोदय, मागच्या ३ वर्षात डॉ. बाबासाहेब आंबेडकर वस्ती सुधार योजना या योजनेच्या बाबतीत सर्व सन्माननीय सदस्यांनी मागणी केली की हा निधी कमी आहे. संबंध राज्य आणि देशच आर्थिक संकटात होते आणि त्या संकटाच्या काळात स्वाभाविक आहे की, लोकसंख्येच्या प्रमाणात निधी मिळायचा विषयच सोडा. कारण लोकंच संकटात होते. त्यामुळे ज्या प्रमाणात निधी मिळाला त्या प्रमाणातच आपण या दोन्ही योजनांना निधी देऊ शकलो.

अध्यक्ष महोदय, स्वाधार योजनेच्या बाबतीत आणि वसतिगृहाच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी प्रश्न उपस्थित केला. ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांला वसतिगृहामध्ये प्रवेश मिळत नाही त्याला स्वाधार योजनेचा लाभ घेता येतो. दोन वर्षापूर्वीची स्वाधार योजना आणि आताच्या स्वाधार योजनेत फार फरक आहे. पूर्वीची स्वाधार योजना ही जिल्ह्याच्या ठिकाणी होती आता ती तालुक्याच्या ठिकाणांपर्यंत नेली आहे. त्यामुळे तालुक्यातील विद्यार्थी सुध्दा या योजनेमध्ये लाभार्थी ठरू शकला की ज्याला वसतिगृहामध्ये प्रवेश मिळाला नाही. त्या विद्यार्थ्यांला वसतिगृहाप्रमाणे निधी देण्याची ही स्वाधार योजना तालुक्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम महाविकास आघाडी सरकारच्या सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने या २ वर्षात केले आहे.

श्री. धनंजय मुंडे...

अध्यक्ष महोदय, या स्वाधार योजनेचे उद्दिष्ट २५ हजार विद्यार्थी इतके होते. पण या २५ हजार विद्यार्थ्यांचे उद्दिष्ट सुध्दा यापूर्वी कधी गाठले गेले नव्हते. कारण या योजनेच्या परीघाला मर्यादा होती आणि ती फक्त जिल्हा स्तरापर्यंत होती. आता तालुका हे परीघ झाल्यामुळे आणि त्या परिसरातील १० कि.मी.चे अंतर केल्यामुळे त्या भागातील जेवढे काही कॉलेजेस असतील, त्यात मागासवर्गीय म्हणून ज्यांना कॉलेजमध्ये किंवा वसतिगृहामध्ये आरक्षण मिळते अशा २५ हजार विद्यार्थ्यांच्या पुढे आता ६० हजार विद्यार्थी या स्वाधार योजनेचा लाभ घेत आहेत, हे या विभागाचा मंत्री म्हणून माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. धनंजय मुंडे.....

अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी परदेशी शिष्यवृत्तीचा विषय मांडला आहे. छत्रपती शाहू महाराज यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना बोलावले आणि तुम्ही देशाचे नेते होऊ शकता असे सांगितले. तसेच छत्रपती शाहू महाराज यांनी पहिल्यांदा शिष्यवृत्तीची योजना सुरु केली. ही परदेशी शिष्यवृत्ती पूर्वी राज्यातील ठरलेल्या फक्त ७५ विद्यार्थ्यांना मिळत होती. तेव्हा ७५ विद्यार्थी सुद्धा मिळत नव्हते. ७५ विद्यार्थ्यावरुन आम्ही १०० विद्यार्थ्यावर गेलो. पूर्वी एखाद्या विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती मिळालेली असताना तयाने ती नाकारली असेल तर वेटिंग लिस्ट नव्हती पण आता ती करण्यात आली आहे. कोरोनाच्या आर्थिक संकटामध्ये सुद्धा दरवर्षी ७५ विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्ती दिलेली आहे. एवढेच नाही तर कोरोनाच्या काळात जे विद्यार्थी देशात परत आले परंतु त्याच विद्यापीठामध्ये शिक्षण घेत होते त्यांना ऑनलाईन शिक्षण घेताना ते फिजिकली नव्हते त्यांना सुद्धा शिष्यवृत्ती सुरु ठेवली. स्वाभाविकपणे असे होत नाही.

अध्यक्ष महोदय, पुरोगामी महाराष्ट्र राज्याबाबत बोलत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी महामानवांची, महापुरुषांची नावे घेतली आणि त्यासोबतच जातींची नावे लावली. शाहू-फुले-आंबेडकर आणि छत्रपती महाराजांच्या पुरोगामी महाराष्ट्रात आजही जातीवाचक वाडे,वस्ती, गावे आहेत. हे सर्व कुठेतरी थांबायला पाहिजे. त्यामुळे आताच्या शासनाने जे गाव वाडी, वस्ती, तांडा जातीवाचक आहे त्यांची नावे काढण्याच्या बाबतीत निर्णय घेतला आहे...(अडथळा)..ही दोन वर्षापासूनची मळमळ आहे त्यामुळे माननीय मंत्री किंवा सन्माननीय सदस्य असतील त्या प्रत्येकालाच ही बाहेर निघावी असे वाटते.

अध्यक्ष महोदय, ऊसतोड मजूरांच्या संदर्भात बोलत असताना मी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांचे मनापासून आभार मानतो की, त्यांनी ऊसतोड मजूरांच्या बाबतीत मनातून संवेदना ठेवून विचार केला नव्हता. माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांचे मी मनापासून आभार मानतो की, ऊसतोड मजुरांच्या बाबतीत त्यांचे कष्टाचे खरे चीज महाविकास आघाडी सरकारने केले आहे.

श्री. धनंजय मुंडे.....

मला याचा आनंद वाटतो. ऊसतोड मजुरांचे तृतीय पंथीयांचे महामंडळ काढले. सामाजिक विकास योजनेमध्ये आपण वस्ती विकास म्हणतो किंवा संविधानाच्या गोष्टी करतो. सर्व सन्माननीय सदस्यांनी मागणी केली त्याप्रमाणे सन २०२२-२३मध्ये प्रत्येक वस्तीमध्ये ५०० लोकसंख्येच्या वर संविधान सभागृह करण्याचानिर्णय सामाजिक न्याय विभागाने केला आहे. रमाई आवास योजनेच्या बाबतीत सन २०२०-२१ आणि सन २०२१-२२ या दोन वर्षात १.५ लाख घरकुलांना आपण लाभ दिलेला आहे. यापुढे ज्या काही सूचना आलेल्या आहेत त्या सूचनांप्रमाणे रमाई आवास योजनेचा सुद्धा निधी दिला जाईल. काही सन्माननीय सदस्यांनी आपापल्या मतदारसंघातील विकास योजनांच्याबाबत प्रश्न मांडले आहेत. तसेच सन्माननीय सदस्य श्री. हरिभाऊ बागडे यांनी त्यांच्या फुलंब्री मतदारसंघाचा उल्लेख केला आहे. त्या सर्वांचे प्रस्ताव आलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, बार्टीच्या संदर्भात सांगायचे झाले तर या संस्थेने लॉकडाऊनच्या काळात सुद्धा डॉ. बाबासाहेब संशोधन आणि प्रशिक्षण असा विषय सर्वांसाठी ऑनलाईन सहकार्य केले. या संस्थेची व्याप्ती आणखी वाढावी आणि ती प्रत्येक मागसवर्गीय समाजातील विद्यार्थ्यांपर्यंत आणि खऱ्या अर्थाने त्यांच्या हाताला रोजगार मिळेलय अशा प्रकारचे काम ही संस्था करेल. मधल्या काळात कोविडच्या निर्बंध काळात सुद्धा याविभागाने सलग दोन वर्षात ९९ टक्के निधी खर्च केला आहे. शिक्षण तसेच दिव्यांगाच्या बाबतीत काही सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. दिव्यांगाच्या बाबतील युनिफाईड कोड म्हणजे युनिक आयडेंटीटी केंद्र आणि राज्य शासनाने ठरवलेली आहे. त्यामुळे कोणालाही त्यासाठी अडचण नाही.

अध्यक्ष महोदय, संजय गांधी निराधार योजनेच्या बाबतीत सकाळच्या सत्रात एक लक्षवेधी सूचना मांडण्यात आली होती. तसेच आताही त्याबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी मागणी केली आहे. संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ पेन्शन योजना यामध्ये वेगवेगळया पाच योजना येतात. यामध्ये महाराष्ट्रातील जवळपास ४५ लाख लाभार्थ्यांना लाभ मिळतो. अनेक सन्माननीय

असुधारित प्रत

श्री. धनंजय मुंडे.....

सदस्यांचे म्हणणे आहे की, यातील २१ हजार रुपये उत्पन्नाची अट कमी करावी. ही अट कमी केली तर जवळपास ९ हजार कोटी रुपयांचा भार शासनावर येणार आहे. परंतु यासंबंधात देखील सरकार सकारात्मक आहे. नक्कीच हा विषय राज्याचे माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांच्यासमोर आणून मार्ग काढला जाईल. बार्टीच्या संदर्भात आज प्रत्येक जिल्ह्यात याची मागणी होत आहे. अनेक सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सुद्धा पंचतारांकित शिक्षण मिळावे. या समाजात आपण जन्माला आलो आहे तर मला आणि माझ्या मुलांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे. त्या दर्जाचे शिक्षण मिळण्यासाठी त्या दर्जाची शाळा सुद्धा असणे आवश्यक आहे. यासाठी प्रायोगिक तत्वावर सामाजिक न्याय विभागाची ११ एकर जागा आहे तिथे पंचतारांकित शाळा सुरु करण्याचा निर्णय विभागाने केला आहे.

अध्यक्ष महोदय, मागासवर्गीय म्हणजे त्यामध्ये बौद्ध, नवबौद्ध, मातंग किंवा चर्मकार देखील येतात. तर बार्टी किंवा सामाजिक न्याय विभाग याबाबत कुठेही भेदभाव करीत नाही. त्यामुळे सर्वांना समान न्याय मिळत आहे. आपण म्हणतो की, काही जणांना जातीचे प्रमाणपत्र मिळत नाही. किती लाख जातींचे प्रकार झाले हे आपल्याला सांगता येईल त्याप्रमाणे जात प्रमाणपत्र देण्याच्या संदर्भातील निर्णय देखील घ्यावे लागतील. पण हे खरे आहे की, जात प्रमाणपत्र समिती खूप कॉसिज्युडिसियल आहे. त्यात आवश्यकता आहे किंवा नाही माहीत नाही परंतु एक बाब निश्चित आहे की, ज्याप्रमाणे पासपोर्ट देण्यासाठी डाटा लागतो त्यासाठी ५० वर्षाचा डाटा आज आपल्याकडे आहे. त्या प्रमाणात येणाऱ्या दोन ते तीन महिन्यात जातीचे प्रमाणपत्र मिळेल, असे मी या निमित्ताने सांगतो.

अध्यक्ष महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्याचा आदर आणि सकारात्मक विचार करुन मी आपल्यासमोर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत मागणी क्र. एन १,२,३,४,५,६,७ व ८ खाली अनिवार्य खर्च, कार्यक्रम खर्च, राज्य हिस्सा व केंद्र हिस्सा मिळून रुपये १९ हजार ९२६कोटी ६६

असुधारित प्रत

श्री. धनंजय मुंडे.....

लाख ९१ हजार फक्त चा सन २०२२-२३ चा अर्थसंकल्प सभागृहाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. त्यास मान्यता देण्याची आपल्यामार्फत मी सभागृहास विनंती करतो. अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अर्थसंकल्पावरील चर्चेदरम्यान सन्माननीय सदस्यांनी या क्षेत्रासंदर्भात ज्या सूचना केल्या आहेत त्याची मी नोंद घेतो आणि सकारात्मक विचार करुन नक्कीच विभाग त्याबाबत निर्णय घेईल.

अध्यक्ष महोदय, या मागण्यांना मान्यता द्यावी, अशी मी आपल्याला विनंती करतो.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

श्री. अमित देशमुख ( वैद्यकीय शिक्षण मंत्री ) : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्याकरता मी उभा आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य सर्वश्री हरिभाऊ बागडे, सुनील भुसारा, तुषार राठोड, किशोर जोरगेवार, दादाराव केचे व इतर अनेकांनी या चर्चेमध्ये सहभाग नोंदवला आहे. या सर्वांची या ठिकाणी नावे घेऊन मी सदनाचा वेळ घेणार नाही.

अध्यक्ष महोदय, या चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केलेल्या आहेत. या चर्चेचे सार समजून घेतले तर असे लक्षात येईल की, आपल्या विभागात, जिल्ह्यामध्ये वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय उभे राहिले पाहिजे अशी सन्माननीय सदस्यांची मागणी आहे. महाविकास आघाडी सरकारची ही भूमिका आहे. जिल्हा तेथे वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय. सन्माननीय सदस्य श्री हरिभाऊ बागडे यांनी या बाबत उल्लेख केला. महाविकास आघाडी सरकारने गेल्या २ वर्षामध्ये नंदूरबार, नागपूर, जळगाव, गोंदिया, परभणी, नाशिक, उस्मानाबाद, सिंधुदूर्ग, रायगड, अशा अनेक जिल्ह्यांमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांना मान्यता दिली. अतिशय सकारात्मक धोरण वैद्यकीय शिक्षण विभागाने स्वीकारलेले आहे. यासाठी भरीव निधी दिलेला आहे. एवढेच नव्हे तर नर्सिंग, फिजीओथेरपी, आयुर्वेद, होमिओपॅथी, योग इ. गोष्टींचाही विचार केला आहे.

अध्यक्ष महोदय, कोव्हिड महामारीमध्ये असे लक्षात आले आहे की, मनुष्यबळाची राज्याला व देशाला आवश्यकता आहे. मागील काही काळात माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री, मंत्रिमंडळ यांनी सकारात्मक भावनेतूनच काम केले आहे. सत्तारुढ पक्षाच्या काही सदस्यांनी शासनाचे कौतुक केले. मात्र विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी देखील कौतुक व समाधान व्यक्त केले. या करिता मी त्यांचे आभार व्यक्त करु इच्छितो. राज्यातील पहिले किंवा कदाचित देशातील पहिले अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास महाविकास आघाडी सरकारने मान्यता दिली आहे. सर्वांना सोबत घेऊन राज्याचा गाडा हाकण्याचे काम हे सरकार करीत आहे.

अध्यक्ष महोदय, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या संबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी विनंती, आग्रह सूचना केल्या असून त्यांचा मी स्वीकार केला आहे. आता एमएसएमटीए च्या संबंधी काम बंद आंदोलन केले. या संबंधी येथे मुद्दे उपस्थित करण्यात आले. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आंदोलकांच्या सर्व मागण्या तत्वत: मान्य केल्या आहेत. काही मागण्या तातडीने मान्य करता येत नाहीत. यामध्ये सर्वोच्च न्यायालयामध्ये काही निवाडे असून त्या बाबत त्यांनी काही निकाल दिलेले आहेत. यामुळे शासनाची अडचण होत आहे. या बाबत शासनाला विशेष अधिकार उपयोगात आणून काही उपाय निघतो काय, या संबंधी पावले उचलली जाणार आहेत.

अध्यक्ष महोदय, गडचिरोली, वाशिम, जालना, परभणी येथे व्यवस्था विकसित केली जाणार आहे. या जिल्ह्यांमध्ये व्यवस्था विकसित करण्यासाठी केंद्र शासनाच्या पीपीपीचा स्वीकार केला आहे. राज्य शासनाने स्वत: पीपीपी नुसार वैद्यकीय शिक्षणाची व्यवस्था कशी विकसित करता येईल, या करिता धोरण स्वीकारले आहे. या करिता खाजगी क्षेत्रातून इरादा पत्र अपेक्षित आहे. सर्व सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, जेथे सरकार निधी देऊ शकते तेथे सरकार निधी देणारच आहे. सरकारलाही काही मर्यादा असतात. एका वेळेला किती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करु शकतो, यास मर्यादा आहेत. माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांचे कौतुक करावे लागेल. या सर्व दुर्गम भागांमध्ये व्यवस्था उभी करण्याचा निर्णय त्यांनी केला. महाराष्ट्रात आता पहिल्यांदा इंटीग्रेटेड मेडीसीन मेडीसिटी पुण्याच्या शेजारी सुरु करण्याचा निर्णय राज्य शासनाने केलेला आहे. माननीय वित्त मंत्री यांनी या बाबत अर्थसंकल्पाच्या भाषणात जाहीर केले आहे. राज्यातच नव्हे तर देशात अशी व्यवस्था नसेल ती आता आपल्या राज्यात उभी राहणार आहे. अनेक योजना सुरु करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या संबंधी मुद्दा उपस्थित केला आहे. सभागृहाला सांगू इच्छितो. वैद्यकीय शिक्षण विभागात पद भरती करायची आहे. याची चर्चा २-३ वर्षे करीत आहोत. राज्य शासन व वैद्यकीय

असुधारित प्रत

शिक्षण विभागाने परवानगी दिली आहे. बिंदू नामावली, आरक्षण या सर्व अडचणींमधून बाहेर काढले आहे. एमपीएससी यांनी जाहीरात दिली आहे. आपल्याशी संवाद साधत आहे त्या क्षणी देखील मुलाखती व परिक्षा सुरु आहेत. विक्रमी कालावधीमध्ये पद भरती करता येईल. सर्व सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत, त्या बाबत आम्ही नोंद घेतलेली आहे. या नुसार शासन त्यावर कार्यवाही करेल. या बद्दल मी सभागृहाला आश्वस्त करु इच्छितो.

अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ -२०२३ च्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाची मागणी क्र. एस-१ ते एस-५ मुख्य लेखाशीर्ष रु ५, ८७१. ९३ कोटी एवढी अर्थसंकल्पीय तरतूद अनिवार्य कार्यक्रमांतर्गत मंजूर करण्याची विनंती मी सदनाला करतो.

--------

ॲड के.सी पाडवी ( आदिवासी विकास विभाग ) : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर मी चर्चा करण्याकरता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी अनेक सदस्यांनी चर्चेत भाग घेतला. मी विधानमंडळात मागील ३० ते ३२ वर्षांपासून सदस्य आहे. आता पर्यंत आदिवासी विकास विभागाच्या चर्चेवर २१ सदस्यांनी सहभाग घेतला हे पहिल्यांदाच घडले आहे. आदिवासी सन्माननीय सदस्य तर बोललेच मात्र बिगर आदिवासी सदस्यांनी देखील आपल्या भागातील आदिवासी वस्त्यांचे प्रश्न मांडले, आपले मत व्यक्त केले. या सर्वांनी मौलिक सूचना केल्या असून त्याची मी नोंद घेतली आहे. त्यांना उत्तरे दिली जातील.

अध्यक्ष महोदय, आदिवासी विकास विभागाकडून सर्वांची अपेक्षा असते. या विभागाकडे बराच निधी आहे असे सर्वांना वाटते. हा विभाग खरे तर टपालाचे काम करते असे मला वाटते. डीपीडीसीला निधी देणे, मंत्रालयातील विभागाला निधी देणे, अशा प्रकारे प्रत्येक विभागाला निधी दिल्यानंतर आमचे नेते देखील आमच्यावर अनेकदा नाराज होतात. आम्हाला काहीच निधी दिला जात नाही असे ते सांगतात.

असुधारित प्रत

ॲड.के.सी.पाडवी ...

खरे तर पूर्वी या खात्याला प्लॅन, नॉन प्लॅन असा निधी दिला जात होता. आता निती आयोग आल्यापासून अनिवार्य खर्च व कार्यक्रम खर्च असा कार्यक्रम दिला. दि.२७ जानेवारी, २०१७ रोजी आपल्या कार्यकाळात जो शासन निर्णय झालेला आहे, त्यात विकासाच्या पैशातून आस्थापनेवर खर्च करणे... हा मी जेव्हा मंत्री झालो तेव्हा १८५३ कोटी होता. तो वाढतवाढत आता २४४२ कोटी एवढा हा खर्च वाढलेला आहे. आस्थापनेवर खर्च करीत असू तर विकास कोठून करणार? आपल्या सर्वांची अपेक्षा आहे की, या खात्याकडून विकास कामाला निधी मिळाला पाहिजे. विकास कामाला फार अल्प निधी ... मी माननीय श्री.अजित पवार यांना वारंवार विनंती करतो. ते तयार होतात परंतु, वित्त विभागातील अधिकारी ऐकायला तयार नाहीत. नियोजन अधिकारी जे ए.सी.एस. होते ते श्री.चक्रवर्ती माझ्या बाजूने बोलायचे. ते सी.एस. देखील झाले. माननीय श्री.अजित पवार आमच्या बाजूने आहेत. ते एक दिवस देतील अशी अपेक्षा आहे. परंतु, या खात्याबाबत अनेक नेत्यांचे... माझ्या पक्षातील असतील सर्वांनाच असे वाटते की, के.सी.पाडवी आम्हाला पैसा देत नाही.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री.अजित पवार यांना सर्व माहीत आहे. ते करण्यास तयार आहेत. परंतु, अधिकारी ते ऐकण्यास तयार नाहीत. आपण देखील त्यावेळेस चूक केली. निती आयोग आल्यानंतर खरे तर आम्हाला निधी मिळत नाही. निती आयोगाला आपण देखील समजावून सांगावे आणि हा निधी आदिवासींच्या कल्याणासाठी, विकासासाठी माझ्या भागाला... माझ्या आदिवासी विकास विभागाला निधी उपलब्ध करुन दिला तर निश्चितपणे .... हे तर पक्केच आहे की, आदिवासींना या वर्षी देखील मिळेल.

अध्यक्ष महोदय, या मागण्यांवर जे २०-२१ सन्माननीय सदस्य बोलले त्यातील आमच्या एका सहकाऱ्यांनी, एका सन्माननीय सदस्यांनी ४० कोटी रुपये आश्रमशाळांच्या बांधकाम करण्याकरिता दिले म्हणून माझे आभार मानले. १२००-१३०० कोटीची बांधकामे घेतलेली आहेत, मंजूर देखील केलेली आहेत. परंतु, आभार मानणारे एकच सापडले. बाकीच्यांच्या मागण्या काही कमी होत नाहीत.

ॲड.के.सी.पाडवी ...

अध्यक्ष महोदय, मी आता काही जास्त बोलणार नाही. वेळ कमी आहे. माननीय श्री.अजित पवार यांच्याच धर्तीवर मी देखील पंचसूत्री कार्यक्रम घेणार आहे.... (अडथळा) ... सिकल सेल हा खरे तर आजार नाही. अनुवंशिक दोष आहे. लग्न पध्दती बदलणे हाच फक्त त्यावर इलाज आहे. बाकीचा कुठलाही निधी देऊन काही होणार नाही. लग्न पध्दती बदला, लग्न पध्दती बदलल्याशिवाय हा विषय सुटणार नाही. मी डॉक्टर नसलो तरी, डॉक्टरांसारखे बोलू शकतो एवढे पक्के आहे ... (अडथळा) ... त्या अधिकाऱ्यांची बदली केली आहे. ती नस्ती मुख्यमंत्री महोदयांकडे आहे.

अध्यक्ष महोदय, बोलण्यासारखे खूप आहे. सर्वांच्या मागण्यांना मी नीटपणे उत्तरे देईन. आदिवासी विकास विभागाच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक टी-२, टी-३, टी-४, टी-५, टी-६, टी-८, टी-९, टी-१०, टी-११ अंतर्गत एकूण रुपये १४ हजार, ९४९ कोटी, ८३ लाख एवढ्या रक्कमेच्या मागण्या मान्य कराव्यात, अशी मी सभागृहास विनंती करीत आहे.

...........

श्री.विजय वडेट्टीवार(इतर मागास बहुजन कल्याण विभाग): अध्यक्ष महोदय, इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या सन २०२२-२०२३ च्या अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला. फार उपयुक्त अशा सूचना देखील अनेक सन्माननीय सदस्यांनी या विभागावर बोलताना दिल्या.

अध्यक्ष महोदय, विशेष करुन सन्माननीय सदस्या श्रीमती मनिषा चौधरी यांनी ओबीसी आरक्षणाच्या संदर्भात सांगितले. मी या सभागृहाच्या सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानतो की, त्यांच्या सर्वांमुळे आज ओबीसींच्या राजकीय आरक्षणाच्या संदर्भात सर्वांचे एकमत झाले. त्याला कोणीही विरोध केला नाही. अनेक न्यायालयीन लढाईमध्ये या विभागाच्या विशेष करुन ओबीसींच्या राजकीय आरक्षणाचा तिढा सोडविण्याचा प्रयत्न तुम्ही, आम्ही सर्वांनीच केला. न्यायालयाच्या निकालानंतर ते टिकावे अशी भूमिका आपल्या सर्वांची होती. त्याचे प्रयत्न झाले. त्यानंतर आम्ही डि-लिमिटेशनचा कायदा केला, त्याला सर्वांनी एकमताने मंजुरी दिली. माननीय राज्यपाल महोदयांनी त्याला मान्यता दिली, त्याचे कायद्यामध्ये रुपांतर झाले. त्यामुळे मला असे वाटते की, आपल्याला कुठेही अडचण येणार नाही.

अध्यक्ष महोदय, विशेष करुन ओबीसींच्या वसतिगृहांच्या संदर्भात प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी हे वसतिगृह झाले पाहिजे अशा प्रकारची भूमिका या ठिकाणी मांडली गेली. या संदर्भात मुख्यमंत्री महोदय व उप मुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थितीत बैठक झाली. प्रत्येक जिल्ह्यात दोन वसतिगृहे सुरु करण्यासाठी त्यांच्या उपस्थितीत त्याला मान्यता दिलेली आहे. मला असे वाटते की, पुढच्या सत्रामध्ये प्रत्येक जिल्ह्यांमध्ये १०० मुलींचे व १०० मुलांचे वसतिगृह सुरु होण्यात कुठलीही अडचण येणार नाही.

अध्यक्ष महोदय, तांडावस्तीची वाढ असेल... विशेष करुन सन्माननीय सदस्य डॉ.देवराव होळी यांनी चांगला विषय मांडला. मी त्यांना सांगू इच्छितो की, त्या संदर्भात तुम्ही व आम्ही मिळून बरेच प्रयत्न केले. मागच्या वेळेसही आपण प्रयत्न केले. धाडे समाज जो आज ओपनमध्ये आहे खरे म्हणजे तो गरीब समाज आहे. त्याला आज कुठल्याही कॅटेगरीमध्ये स्थान नाही. या संदर्भात आम्ही

असुधारित प्रत

श्री.विजय वडेट्टीवार ....

मागासवर्गीय आयोगाला नक्की लिहू. त्याचा वेगळा सर्व्हे करुन या समाजाला कुठल्या कॅटेगरीमध्ये आणता येईल, यासाठी आपण नक्की प्रयत्न करु व ते पूर्णत्वास नेऊ, असा विश्वास देखील मी या निमित्ताने आपल्याला देत आहे.

अध्यक्ष महोदय, खरे तर आश्रमशाळांच्या बाबतीत या वेळेस नांदेडमध्ये प्रायोगिक तत्वावर जी शाळा नवोदय विद्यालयाच्या धर्तीवर आपण केली ...

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण)** : मंत्री महोदय माननीय डॉ.राजेंद्र शिंगणे यांना देखील दोन मिनिटे बोलावयाचे आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, माननीय श्री.धनंजय मुंडे यांनी १६ मिनिटे घेतली. मला असे वाटले की, ६ मिनिटे घ्यावीत. ठीक आहे. ...(अडथळा)... आपण दोघेही रिझर्व्हेशनवाले आहोत. अनेक सन्माननीय सदस्यांच्या उपयुक्त सूचनांची नोंद मी घेतलेली आहे. नक्कीच त्यावर सकारात्मक निर्णय घेऊन ज्या ज्या सूचना केल्या आहेत, त्यावर आपण कारवाई करु, असा विश्वास मी सन्माननीय सदस्यांना देत आहे.

अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक झेडजी-२, झेडजी-३, झेडजी-४, झेडजी-५ अंतर्गत अनिवार्य खर्च, कार्यक्रम खर्च, राज्य हिस्सा व केंद्र हिस्सा मिळून एकूण ३७९३ कोटी, २१ लक्ष, ८९ हजार रुपयांच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी सभागृहास विनंती करीत आहे.

........

असुधारित प्रत

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने (१)सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (३) आदिवासी विकास विभाग (४) इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक एन-२, एन-३, एन-४, एन-५, एन-६, एन-७, एन-८, एस-१, एस-२, एस-३, एस-४, एस-५, टी-२, टी-३, टी-४, टी-५, टी-६, टी-८, टी-९, टी-१०, टी-११, झेडजी-२, झेडजी-३, झेडजी-४, झेडजी-५ अशा एकूण दत्तमत रुपये ४४ हजार, ४४३ कोटी, ३६ लाख, २ हजार रुपयांच्या मागण्या सभागृहाच्या मंजुरीकरिता सादर करीत आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : आता मी (१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (३) आदिवासी विकास विभाग (४) इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक एन-२, एन-३, एन-४, एन-५, एन-६, एन-७, एन-८, एस-१, एस-२, एस-३, एस-४, एस-५, टी-२, टी-३, टी-४, टी-५, टी-६, टी-८, टी-९, टी-१०, टी-११, झेडजी-२, झेडजी-३, झेडजी-४, झेडजी-५ आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

.......

यानंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

| | |
|---|---|
| **पृ.शी. :** | अनुदानाकरिता पुरवणी मागण्या |
| **मु.शी. :** | सन २०२२-२३ या वर्षाच्या अनुदानाकरिता पुरवणी मागण्या : चर्चारोधानंतरचे विभाग<br>१) सामान्य प्रशासन विभाग<br>२) विधि व न्याय विभाग<br>३) नियोजन विभाग<br>४) संसदीय कार्य विभाग<br>५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग<br>६) महिला व बाल विकास विभाग<br>७) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग<br>८) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग<br>९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय<br>१०) अल्पसंख्यांक विकास विभाग |

**उपाध्यक्ष :** आता मी चर्चारोधानंतर असलेल्या विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक -

| | |
|---|---|
| (एक) | सामान्य प्रशासन विभाग : ए-१, ए-२, ए-३, ए-४, ए-५, ए-६, ए-७, ए-८, ए-९, ए-१०, |
| (दोन) | विधि व न्याय विभाग : जे-१, जे-२, जे-३, जे-४, जे-५ |
| (तीन) | नियोजन विभाग : ओ-१, ओ-२, ओ-३, ओ-४, ओ-६, ओ-७, ओ-८, ओ-९, ओ-१०, ओ-११, ओ-१२, ओ-१३, ओ-१४, ओ-१५, ओ-१६, ओ-१७, ओ-१८, ओ-१९, ओ-२०, ओ-२१, ओ-२२, ओ-२३, ओ-२४, ओ-२५, ओ-२६, ओ-२७, ओ-२८, ओ-२९, ओ-३०, ओ-३१, ओ-३२, ओ-३३, ओ-३४, ओ-३५, ओ-३६, ओ-३७, ओ-३८, ओ-३९, ओ-४०, ओ-४१, ओ-४२, ओ-४३, ओ-४४, ओ-४५, ओ-४६, ओ-४७, ओ-४८, ओ-४९, ओ-५०, ओ-५१, ओ-५२, ओ-५३, ओ-५४, ओ-५५, ओ-५६, ओ-५७, ओ-५८, ओ-५९, ओ-६०, ओ-६१, ओ-६२, ओ-६३, ओ-६४, ओ-६५, ओ-६६, ओ-६७, ओ-६८, ओ-६९, ओ-७०, ओ-७१, ओ-७२, ओ-७३, ओ-७४, ओ-७५, ओ-७६, ओ-७७, ओ-७८, ओ-७९, ओ-८०, ओ-८१, ओ-८२, ओ-८३, ओ-८४, ओ-८५, |
| (चार) | संसदीय कार्य विभाग : पी-१, पी-२, पी-३ |
| (पाच) | उच्च व तंत्र शिक्षण विभाग : डब्ल्यू-२, डब्ल्यू-३, डब्ल्यू-४, डब्ल्यू-५, डब्ल्यू-६, डब्ल्यू-७, डब्ल्यू-८, डब्ल्यू-९ |
| (सहा) | महिला व बाल विकास विभाग : एक्स-१, एक्स-२, एक्स-३, एक्स-४ |
| (सात) | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग : वाय-२, वाय-३, वाय-४, वाय-५, वाय-६, वाय-७ |
| (आठ) | कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग : झेडए-२, झेडए-३ |
| (नऊ) | महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय : झेडसी-१, झेडसी-२, झेडसी-३ |
| (दहा) | अल्पसंख्यांक विकास विभाग : झेडई-१, झेडई-२, झेडई-३ |
| (अकरा) | मराठी भाषा विभाग : झेडएफ-१, झेडएफ-२, झेडएफ-३, झेडएफ-४, झेडएफ-५ |
| (बारा) | मृद व जलसंधारण विभाग : झेडएच-२, झेडएच-३, झेडएच-४, झेडएच-५, झेडएच-७ |

आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

(प्रेस : सोबत जोडलेले मागण्याचे जोडपत्र छापावे)

असुधारित प्रत

**पृ.शी.**: विनियोजन विधेयक.

L.A. BILL NO. XII OF 2022

(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES AND PURPOSES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH, 2023.)

श्री.अजित पवार (वित्त मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपलया अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक १२ – दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या सेवांसाठी व प्रयोजनांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक सभागृहासमोर मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७, खंड (१) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक विचार घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस केली आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.अजित पवार (वित्त मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक १२ – दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या सेवांसाठी व प्रयोजनांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

(प्रश्न प्रस्तुत झाला.)

**तालिका सभाध्यक्ष :** विनियोजन विधेयकाच्या अनुषंगाने काही सन्माननीय सदस्यांनी सूचना दिल्या आहेत. त्यांनी त्या मांडाव्यात.

श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक १२ – विनियोजन विधेयकाच्या संदर्भात म.वि.स.नियम २६४ (५) नुसार पुढील प्रमाणे काही सूचना मांडू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, मुख्य लेखाशिर्ष २२६६- पोषण आहार - अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका, मदतनीस या नियुक्तीच्या अटी व शर्ती संदर्भात दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे . त्यामधील एक (क) मध्ये नमूद करण्यात आले आहे की, अंगणवाडी सेविकेचे पद रिक्त झाले असेल अथवा या क्षेत्रात नवीन अंगणवाडी केंद्र सुरू करावयाचे असेल तर ग्रामीण आदिवासी भागातील त्या गावात ग्रामपंचायत नव्हे नागरी भागातील वार्डात/प्रभागात कार्यरत अंगणवाडी केंद्राच्या मदतनीसाला सेवा ज्येष्ठता शैक्षणिक अर्हता स्थानिक रहिवासी व मदतनीस म्हणून दोन वर्षाची सेवा या अटीची पूर्तता करीत असल्यास तिला अंगणवाडी सेविका म्हणून थेट नियुक्ती देण्यात यावी. त्या क्षेत्रातील एकापेक्षा जास्त मदतनीसाचा अनुभव कालावधी समान असल्यास, जास्त शिक्षण असलेल्या मदतनिसाला प्राधान्य देण्यात यावे. अनुभव शिक्षण समान असल्यास जास्त वय असलेल्या मदतनीसाला प्राधान्य देण्यात यावे. सदरहू तरतूद अंगणवाडी मदतनीस यांच्या पदोन्नती संदर्भात अन्यायकारक आहे. माननीय अर्थ मंत्री यांनी स्वतः या सूचनेकडे लक्ष द्यावे. या संदर्भात शासनास मी ९३ स्मरण पत्रे पाठविली आहेत. परंतु या २ लक्ष कोटीच्या प्रशासनाला अजूनही जाग आली नाही.

अध्यक्ष महोदय, सूचना क्रमांक २, पोषण आहार - बल्लारपूर नागरी प्रकल्पांतर्गत अतिरिक्त अंगणवाडी केंद्र मंजुरीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. चंद्रपूर जिल्हा मागास जिल्ह्याच्या यादीतील शेवटचा जिल्हा आहे. या दृष्टीने या ठिकाणी शून्य ते सहा वयोगटातील बालकांना गरोदर मातांना तसेच किशोरी मुलींना एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचा अपेक्षित लाभ प्राप्त व्हावा या दृष्टीने लोकसंख्येच्या अनुपातामध्ये अंगणवाडीची निर्मिती करावी, यासंदर्भात मी विभागाला ८४ स्मरण पत्रे पाठविली आहेत. विभागाच्या अधिकाऱ्यांचा ब्रेन किती

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार...

जीबीचा आहे माहिती नाही. मी आता आदिवासी मंत्री महोदयांचे बोलणे ऐकत होतो. ते म्हणाले की, माननीय वित्त मंत्री महोदय तयार आहेत परंतु अधिकारी तयार नाहीत. हे राज्य असे कसे चालत आहे. सर्व मंत्री महोदयांना सूचना दिली पाहिजे की, मंत्री महोदय अधिकाऱ्यांपेक्षा वरिष्ठ आहेत. अधिकाऱ्यांनी राज्य चालविणे हे राज्याच्या हिताचे नाही.

अध्यक्ष महोदय, सूचना क्रमांक ३ - मुख्यलेखाशिर्ष २२०२ - गोंडवाना विद्यापीठाची सन २०११ मध्ये स्थापना करण्यात आली आहे. या विद्यापीठाचे परिक्षेत्र गडचिरोली व चंद्रपूर आहे. या क्षेत्रात घनदाट जंगल असून जगातील सर्वाधिक वाघ या दोन जिल्ह्यात आहेत. हा आदिवासी बहूल जिल्हा आहे. त्याकरिता आदिवासीभिमुख विद्यापीठ करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील प्रकरण १३ च्या अंती विशेष प्रावधान तरतुदीची आवश्यकता आहे. ज्यामुळे विद्यापीठास व गडचिरोलीस विशेष दर्जा प्राप्त होऊ शकेल. केंद्र सरकार या कारणास्तव मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन देऊ शकते. हा जिल्हा नक्षलग्रस्त जिल्हा आहे. या प्रकरणी विशेष बैठक घेण्यात यावी, अशी माझी उप मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, सूचना क्रमांक ४ – बिगर नेट सेट अध्यापकांना निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात यावी. याप्रकरणी लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, सूचना क्रमांक ५ – शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय चंद्रपूर हे सन १९९५ मध्ये राज्यात शिवसेना व भारतीय जनता पक्षाचे सरकारच्या काळात सुरु झाले आहे. त्यामध्ये काही कोर्सेस सुरु करण्याच्या संदर्भात प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यास दिनांक ११ ऑगस्ट, २०२० अन्वये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांनी महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेस अधीन राहून मान्यता दिली आहे. या प्रस्तावास राज्य सरकारनेही ताबडतोब मान्यता द्यावी.

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार...

अध्यक्ष महोदय, सूचना क्रमांक ६ - शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये ६५ शिक्षकेतर पद निर्मितीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. तो त्वरीत मान्य करण्याकरिता माननीय वित्त मंत्री यांनी आदेश द्यावेत, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, सूचना क्रमांक ७ - विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतन यांची थकीत शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती त्वरीत देण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, सूचना क्रमांक ८ - कर्मचारी निवड आयोग स्टाफ सिलेक्शन कमिशन अंतर्गत राज्यातील स्थापत्य अभियांत्रिकी पदविधारकांना अर्ज करताना अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्वरित ही प्रक्रिया सुरू करण्याचा संदर्भात विभागाने लक्ष द्यावे, अशी माझी सूचना आहे.

अध्यक्ष महोदय, सूचना क्रमांक ९ - प्राचार्यांच्या मूळ वेतनाबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाने शासन निर्णयात केलेल्या चुकीचा शब्द प्रयोगामुळे प्राचार्यांना फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सन २०२१ मध्ये प्राचार्यांच्या मूळ वेतनाबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यामध्ये नमूद केल्यनुसार "दिनांक १ जानेवारी २००६ रोजी किंवा त्यानंतर प्राचार्य पदांच्या नियुक्त प्राचार्यांना १३ हजार रुपये किमान मूळ वेतनानुसार वेतन निश्चित करणे" या शब्दरचनेमुळे प्राचार्यांच्या वेतन व निवृत्ती वेतनामध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत, यासंदर्भात त्यांचा आक्रोश आहे. यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, सूचना क्रमांक १० - गडचिरोली चंद्रपूर आणि विशेष करून विदर्भात १३ हजार धडक सिंचन विहिरींना मंजुरी देण्यात आली होती. परंतु त्याकरिता शेतकऱ्यांना निधी देण्यात आला नाही. तो दिला नाही तर याच विहिरीमध्ये शेतकरी उडी घेऊन त्यांचा जीव देण्याची शक्यता आहे. त्यामुळे उक्त धडक सिंचन विहिरींसाठी धडक निधी देण्याची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार...

अध्यक्ष महोदय, सूचना क्रमांक ११ - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी विश्वशांती, स्वातंत्र्य लढा, राष्ट्रीय एकात्मता, ग्रामविकास व मानवता धर्मावर वेगवेगळ्या क्षेत्रात जनजागृती केली आहे. गुरुदेव नगर, दास टेकडी, गुरुकुंज मोजरी, तालुका तिवसा जिल्हा अमरावती यांनी हे योगदान पाहून या राष्ट्रसंताच्या जीवनावर एक चित्रपट तयार करण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. ज्या राष्ट्रसंताने ग्रामगीता दिली, जीवनाचा मार्ग सांगितला, मानव धर्म सांगितला त्यांच्या जीवनावरील चित्रपट निर्माण होण्याच्या दृष्टीकोनातून सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी, अशी माझी उप मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार......

लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी दीन, दुर्बल, शोषित, पीडित व श्रमीक यांचे दु:ख आणि समस्या.....अध्यक्ष महोदय, आम्हाला लहानपणी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या "यह आजादी झूठी है, गरीब जनता भूखी है." या वाक्यामुळे अधिक प्रेरणा मिळत होती. अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याला सलाम करण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी विनंती  यह अकरतो.

अध्यक्ष महोदय, देशाला स्वातंत्र मिळण्याकरिता लढा देऊन त्यासाठी काळया पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतीकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोधर सावरकर यांना मरणोत्तर भारतरत्न या सर्वोच्च उपाधीने सन्माननीय करावे, यासाठी राज्य शसनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा. राज्य शासनाने याबाबतचा पत्रव्यवहार थांबविलेला आहे. राजकारण खुर्च्यांच्या बाहेर जाऊन तो पत्रव्यवहार पुन्हा सुरु करुन याबाबत सतत पाठपुरावा करावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी उपेक्षित, वंचितांच्या जीवनात समृद्धीचा प्रकाश निर्माण करण्याकरिता सामाजिक न्यायासाठी आयुष्य खर्ची घालणारे, अस्पृश्यता निवारण आणि स्त्री शिक्षणासाठी संघर्ष करणारे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर भारतरत्न या उपाधीने यासाठी राज्य शासनाने पुन्हा एकदा केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा. यासंदर्भात मी ठराव मांडला होता. त्या ठरावाला उत्तर देताना राज्य शासनाने सांगितले होते की, या सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या समितीचे एक शिष्टमंडळ दिल्ली येथे घेऊन जाऊ. परंतु या आश्वासनाची अद्याप पूर्तता करण्यात आलेली नाही. या सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या शिष्टमंडळाची एक समिती दिल्ली येथे घेऊन जाण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे आपण ती समिती घेऊन जावी, अशी मी विनंती करतो.ि

अध्यक्ष महोदय, स्व.मा.सा.कन्नमवार हे राज्याचे मुख्यमंत्री होते. काँग्रेसचे नेते म्हणून या राज्यातील जनतेची सेवा केली होती.

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार......

सामान्य प्रशासन विभागाने सन २०२१ मध्ये राष्ट्रपुरुष/थोर व्यक्तींची जयंती साजरी करण्याबाबत परिशिष्ट जाहीर केले होते. त्यात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कर्मवारी स्व.मा.सा.कन्नमवार यांच्या जयंती दिनाचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे राज्य शासनाने या राज्याचे दुसरे मुख्यमंत्री स्व.मा.सा.कन्नमवार यांची जयंती व पुण्यतिथीचा समावेश सामान्य प्रशासन विभागाच्या यादीमध्ये करावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, सूचना क्रमांक १६. चांदा ते बांदा ही योजना मी सुरु केली होती. या योजनेंतर्गत हडस्ती उपसा सिंचन योजनेच्या विशेष दुरुस्तीसाठी ६०.८५० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, सूचना क्रमांक १७. चांदा ते बांदा या योजनेंतर्गत मोलझरी लघुप्रकल्पाच्या विशेष दुरुस्तीसाठी १९९.४८ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, सूचना क्रमांक-१८. चांदा ते बांदा या योजनेंतर्गत शिवणी ता.जि.चंद्रपूर मधील शिवणी उपसा सिंचन योजनेच्या बंद नलिका वितरण कामाकरिता ४३५ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, सूचना क्रमांक-१९. चांदा ते बांदा या योजनेंर्गत मंजूर आराखड्यातील मुल तालुक्यातील राजोली माजी मालगुजारी तलवाच्या विशेष दुरुस्तीकरिता ९४.२९५ रुपयांचा निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, सूचना क्रमांक-२० मुल तालुका जिल्हा चंद्रपूर मधील जानाळा लघु प्रकल्पाच्या विशेष दुरुस्तीकरिता १३३.२७ लक्ष रुपये उपलब्ध करुन द्यावेत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, सूचना क्रमांक-२१. चांदा ते बांदा योजनेंतर्गत मंजूर आराखड्यातील मुल तालुका जिल्हा चंद्रपूर मधील करवन येथील भसबोरण लघु

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार......

प्रक्लप या कालव्याच्या विशेष दुरुस्तीकरिता२९८.२४ लक्ष रुपये उपलब्ध करुन द्यावेत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, सूचना क्रमांक-२२. चांदा ते बांदा योजनेंतर्गत मंजूर आराखड्यातील मुल तालुका जिल्हा चंद्रपूर मधील पिपरी दिक्षीत लघु प्रकल्पाच्या विशेष दुरुस्तीकरिता २३७.२४ लक्ष रुपये उपलब्ध करुन देण्यात यावेत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, सूचना क्रमांक-२३. चांदा ते बांदा योजनेंतर्गत मंजूर आराखड्यातील मुल तालुका जिल्हा चंद्रपूर मधील काळाडोह पुरक कालव्याच्या विशेष दुरुस्तीकरिता ९९.१२ लक्ष रुपये उपलब्ध करुन देण्यात यावेत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभुर्णा तालुक्यातील देवाडा खुर्द अंतर्गत सन १९८४ साली गावात पाणी पुरवठा करण्यारिता ७५ हजार लिटर क्षमतेची ग्रामीण पाणी पुरवठा योजना तयार करण्यात आली. परंतु या योजनेचे नवीन प्रस्ताव दिनांक २४ जुलै, २०२१ रोजी सादर केला आहे. उक्त प्रस्तावास ताबडतोब मान्यत देण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, जिल्हा परिषद चंद्रपूर येथील सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरिता वेतन व वेतनेत्तर खर्चाकरिता अनुदान लेखाशीर्ष २२२१५-१८८१ या अंतर्गत निधी भरीव निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, सूचना क्रमांक-२६. महाराष्ट्र्र सरकार कौशल्य विकास व उद्योजकता विभाग. ३३४ कंत्राटी शिक्षकांची औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये कंत्राटी निदेशक या पदावर नियुक्ती करण्यात आली. परंतु त्यांचे अद्याप मानधन देण्यात आले नाही. त्यांचे सदर मानधान ताबडतोब देण्यात यावे, अशी मी विनंती करतो.

श्री.सुधीर मुनगंटीवार......

अध्यक्ष महोदय, सूचना क्रमांक-२७. व्होकेशनल प्रशिक्षण संस्थाकरिता स्मार्टची अट रद्द करुन पूर्वीप्रमाणे प्रमोद महाजन कौशल्य विकास योजना कार्यपद्धतीसुरु करणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, सूचना क्रमांक-२८. चंद्रपूर वन प्रशासन विकास संशोधन व व्यवस्थापन प्रबोधिनी अर्थात वनअकादमी चंद्रपूर येथे कौशल्य विकास विद्यापीठ स्थापन करण्याबाबत शासनाशी मी सातत्याने पत्रव्यवहार केलेला आहे. सन २०२१ च्या हिवाळी अधिवशेनामध्ये माननीय कौशल्य विकास मंत्री यांनी याबाबतचा प्रस्ताव तपासून सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन सभागृहाला दिले होते. परंतु अद्याप सकारात्मक निर्णय झालेला नाही. तो प्रस्ताव तपासला की नाही हेही माहिती नाही.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय स्वत: मंत्रालयामध्ये येऊ शकत नसल्यामुळे मी अर्थ मंत्री महोदयांना विनंती करतो की, त्यांनी हा प्रस्ताव त्वरीत तपासून सकारात्मक/नकारात्मक उत्तर द्यावे.

अध्यक्ष महोदय, माझी शेवटची सूचना अशी आहे की, चंद्रपूर आणि लातूर येथे स्मार्ट आयटीआय निर्मितीबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे. या साठी राज्य शासनाने तत्त्वत: मान्यता देऊन २० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. लातूर आणि चंद्रपूर येथील स्मार्ट आयटीआयच्या संदर्भात माननीय श्री.अजित पवार यांनी स्वत: लक्ष देऊन स्मार्ट निर्णय घेत या स्मार्ट आयटीआयला मान्यता द्यावी, अशी मी विनंती करतो. या विनियोजन विधेयकाला दिलेल्या सर्व सूचनांचा सन्मान करतील व याबाबत एक बैठक घेतील, अशी आशा करतो. सदर बैठक घेतल्यानंतर मी माझ्या सूचना मागे घेईन.

---------

असुधारित प्रत

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री) : महाराष्ट्र विधानसभा नियम २६४ (५) अन्वये अर्थसंकल्पीय मागण्यांच्या वरील विनियोजन विधेयकावरील चर्चेसाठी प्राप्त झालेल्या सूचनांचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, एकूण ४८ सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यापैकी ४४ सूचना मान्य करण्यात आलेल्या आहेत व उर्वरित ४ सूचना अमान्य करण्यात आलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, सदर ४८ सूचनांपैकी सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी ३१ सूचना दिल्या होत्या. त्यापैकी २९ सूचना मान्य करण्यात आलेल्या आहेत. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांनी दोन सूचना दिल्या होत्या. त्यांच्या दोन्ही सूचना मान्य करण्यात आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.लक्ष्मण जगताप यांनी १५ सूचना दिल्या होत्या. त्यापैकी १३ सूचना मान्य करण्यात आलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, प्राप्त झालेल्या सूचनांच्या अनुषंगाने नियमानुसार विहित पद्धतीने जी कार्यवाही करावयाची असते आणि केलेल्या कार्यवाहीची माहिती संबंधित सन्माननीय सदस्यांना त्वरीत अवगत करण्याबाबत संबंधित विभागांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. यामध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महिला व बाल कल्याण विकास विभाग, सामान्य प्रशासन विभाग, मृद् व जलसंधारण विभाग, नियोजन विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विभाग, संसदीय कार्य विभाग, मराठी भाषा विभाग व विधि व न्याय विभागासंदर्भात तिन्ही सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत. या सर्व विभागानी केलेल्या कार्यवाहीची माहिती त्वरीत अवगत करुन देण्याच्या देखील सूचना दिलेल्या आहेत. कौशल्य व उद्योजकता विभागाचा अतिरिक्त कार्यभार माननीय श्री.राजेश टोपे यांच्याकडे देण्यात आलेला आहे. मी पुनश्च एकदा सभागृहाला विनंती करतो की, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १२ विचारात घ्यावे.

**तालिका सभाध्यक्ष :** आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ व ३, अनुसूची, विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १२ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक १२ संमत झाले आहे.

----------

असुधारित प्रत

**पृ.शी. :** सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. X OF 2022

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016)

श्री. उदय सामंत (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक – १० महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारत घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

अध्यक्ष महोदय, कोविड – १९ मुळे नवीन महाविद्यालयांच्या तारखा विस्कळीत झाल्या होत्या. त्या तारखा जुलै महिन्यापर्यंत घेण्याबाबतचा हा प्रस्ताव आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव व सन्माननीय सदस्य ॲड. राहूल कुल, वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव आहे. त्यांनी ते अनुक्रमे मांडावेत.

प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड २ ते खंड ८ (दोन्ही सम्मिलीत) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

असुधारित प्रत

श्री. उदय सामंत : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक – १० संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक – १० संमत झाले.

------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** मुद्रांक (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XI OF 2022.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STAMP ACT.)

श्री. बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक – ११ महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ मधील अनुच्छेद ५ (जीए) मधील कालावधी एक वर्षाऐवजी तीन वर्षाचा करण्यासंदर्भात हे विधेयक आहे. रेरा कायदा दिनांक १ मे, २०१७ पासून महाराष्ट्र राज्यात लागू झाला आहे. या कायद्यातील अटी व शर्तींनुसार काम करण्यासाठी तीन वर्षाचा कालावधी आहे. कोरोना काळात घरे बांधण्यासंदर्भात विकासकांना अनेक अडचणी निर्माण झाल्या होत्या. गुंतवणूकदारांनी सदनिका विकत घेतल्या आहेत. एक वर्षामध्ये नोंदणी व मुद्रांक शुल्कामध्ये एक वर्षाकरिता सवलत देण्यात येत होती. त्यामध्ये आता वाढ करुन ती तीन वर्षे इतकी करण्यात येत आहे. इमारत पूर्ण करण्याकरिता तीन वर्षाचा कालावधी लागत आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांना प्रोत्साहन मिळेल. पर्यायाने घरांचे खरेदी-विक्रीचे व्यवहार वाढतील. शासनासही चांगला महसूल यानिमित्ताने मिळणार आहे. तसेच बांधकाम व्यवसायला चालना मिळून रोजगारात वाढ होईल. यादृष्टीकोनातून हे विधेयक आणले आहे. या विधेयकास मान्यता देण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तूत झाला.

श्री. योगेश सागर (चारकोप) : अध्यक्ष महोदय, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ११ वर बोलण्यासाठी आणि त्यावर माझे मत मांडण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या विधेयकानुसार वेळ वाढवून दिली जाणार आहे. यात कट ऑफ डेट किती राहणार आहे ? सुरुवातीपासून शेवटपर्यंत ही तीन वर्षे कुठपर्यंत होत आहेत ? तसेच आता दोन वर्षाचे एक्स्टेंशन आहे. ते कोणत्या कालावधीसाठी देण्यात येत आहे. दुसरे असे की, दिनांक १ एप्रिल पासून १ टक्के मेट्रो सेस लागू केला जाणार आहे. राज्य सरकारला कोरोना काळ संपला आहे, असे वाटत असेल तर अनेक मंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये कोरोना काळाचे सावट, असा उल्लेख केला आहे. ही बाब खरी आहे. या उद्योगांना चालना देण्याची आवश्यकता आहे. तसेच मुद्रांक शुल्काच्या माध्यमातून राज्य सरकारला महसूल मिळत असतो. राज्याच्या उत्पन्नात मुद्रांक शुल्काचा हिस्सा अतिशय मोठा आहे. या विधेयकाच्या माध्यमातून मी मंत्री महोदयांना विनंती करु इच्छितो. १ टक्के मेट्रो सेस परत लागू केला जात आहे. यासाठी आणखी वेळ वाढवून देण्याची आवश्यकता आहे. याबाबत इतरही सन्माननीय सदस्य त्यांच्या भावना व्यक्त करतील. परंतु यात किमान सहा महिन्यांची वाढ केली तर महसुली वाढ होईल. मागील वर्षी महसुली घट दिसून आली होती व तेव्हा तुटीचा अर्थसंकल्प मांडावा लागला होता. यामुळे आपणास दिलासा मिळेल. याबाबत मंत्री महोदयांनी माहिती द्यावी, अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत

ॲड. राहुल नार्वेकर (कुलाबा) : अध्यक्ष महोदय, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक – ११ वर बोलण्यासाठी आणि माझे मत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, हे विधेयक महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात सुधारणा आणण्यासाठी शासनाने मांडले आहे. या विधेयकाचे हेतूवाक्य आपण पाहिले तर आपल्या लक्षात येईल की सदर विधेयक हे रिअल इस्टेट आणि बांधकाम व्यवसायाला भरारी देण्यासाठी आहे. ही बाब या विधेयकाच्या हेतुवाक्यात स्पष्टपणे नमूद केली आहे.

अध्यक्ष महोदय, कोणत्याही वेलफेअर स्टेटचे ऑब्जेक्टीव्ह असते की, कोणतेही फायदे देताना त्याचा विचार मॅक्रो लेव्हलवर केला पाहिजे. तो मायक्रो लेव्हलवर करुन चालणार नाही. याची व्याप्ती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास पाहिजे. एखाद्या क्षेत्रासाठी किंवा एखाद्या इंडस्ट्रीकरिता रिस्ट्रक्ट केले तर कदाचित ते वेलफेअर स्टेटच्या धोरणाशी विसंगत होईल. ज्यावेळेस आपण ॲग्रीमेंट टू सेल रजिस्टर करतो तेव्हा अनुच्छेद २५ अंतर्गत नोंदणी व मुद्रांक शुल्काचा भरणा केला जातो. हे शुल्क भरल्यानंतर ती सदनिका किंवा गाळा त्याच व्यक्तीला न विकता एका वर्षात दुसऱ्या व्यक्तीला हस्तांतरीत केली तर पुन्हा नोंदणी व मुद्रांक शुल्काचा भरणा करावा लागणार नाही, अशी तरतूद अनुच्छेद २५ मध्ये होती. आता यातील मुदत एक वर्षापासून तीन वर्षापर्यंत करण्यात आली आहे. जो सामान्य सदनिकाधारक असतो, ज्याला सदनिका वापरावयाची असते तो कधीच ती सदनिका एक वर्षात विकत नाही. परंतु जे गुंतवणूकदार असतात किंवा ज्यांना यातून नफा कमवावयाचा असतो ते लोक अशा सदनिका ॲडव्हान्समध्ये बूक करतात व नंतर एक वर्ष किंवा आताच्या कायद्यानुसार तीन वर्षात नोंदणी व मुद्रांक शुल्काशिवाय हस्तांतरीत करीत असतात. यातून वेलफेअर स्टेटचे परवडणाऱ्या घरांच्या ऑब्जेक्टीव्हमध्ये कॉम्प्रमाईज होत आहे काय, याचा विचार करावा लागणार आहे. याचे कारण असे की, गुंतवणूकदारांना अशा सुविधा दिल्या तर याचा परिणाम परवडणाऱ्या घरांवर होणार आहे. याचा शासनाने विचार केला पाहिजे. आज आर्थिक उलाढालीकरिता सुविधा दिल्या पाहिजेत. परंतु त्या देत असताना जर त्याचा विपरीत परिणाम सामान्य

ॲड. राहुल नार्वेकर .....

जनतेवर होत असेल तर त्याचा विचार होण्याची आवश्यकता आहे. म्हणून मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, त्यांनी याबाबत खुलासा करावा व त्यानंतर हे विधेयक संमत करावे.

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष :** सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, दोघे सन्माननीय सदस्य बांधकाम व्यवसाय अत्यंत जवळून पाहत आहेत...(अडथळा...) मेट्रो सेसचा विषय नगर विकास विभागाचा असला तरीही मी सांगू इच्छितो की, आजघडीला तरी तो थांबलेला नाही. दिनांक १ एप्रिलपासून तो सुरु होणार आहे. हा निर्णय होईल तेव्हापासून अंमलबजावणी सुरु होईल.

अध्यक्ष महोदय, अफोर्डेबल हौसिंगच्या माध्यमातून बांधकाम व्यवसायाला चालना देण्याचा आमचा प्रयत्न आहे. यासंदर्भात बांधकाम व्यवसायाशी संबंधित निरनिराळया संघटना आमच्याकडे आल्या होत्या. त्यांनी सांगितले की, काही लोक केवळ गुंतवणूक म्हणून घरांची खरेदी करतात. त्यांनी केलेल्या गुंतवणुकीतूनच बांधकाम व्यावसायिक इमारतीचे काम पूर्ण करतो. ज्यांनी गुंतवणूक केलेली आहे ते दोन-तीन वर्षांनी घर विकतात. तोपर्यंत इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले असते. त्यामुळे त्या गुंतवणूकदाराला जास्तीचे पैसे मिळतात. अशा परिस्थितीत जेवढी किंमत वाढेल त्यावर स्टॅम्प डयुटी लागेल, बाकी सेट ऑफ होईल. यातून स्पष्ट होते की, जास्तीत जास्त घरे तयार होण्यास प्रोत्साहन देणारा व मदत करणाराच हा निर्णय आहे. यामुळे बांधकाम व्यवसायावर विपरित परिणाम होणार नाही याची मला खात्री आहे.

असुधारित प्रत

श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी अतिशय चांगले विधेयक सभागृहासमोर आणले आहे. दिनांक १ मे, २०१७ पासून हा कायदा झाल्यापासून ग्राहकांची फसवणूक फार कमी झाली आहे. परंतु या निमित्ताने मी एक बाब मंत्री महोदयांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो. ग्राहकांची फसवणूक केल्यास विकासकाला काळया यादीत टाकले जाते व त्याचे मोठया प्रमाणात नुकसान होते त्यामुळे सहसा कोणी विकासक ग्राहकांची फसवणूक करण्यास धजावत नाही. अनेक जिल्हयांमध्ये भूखंड विक्रीचा व्यवसाय मोठया प्रमाणात चालतो. यामध्ये जमीन खरेदी करुन ती एन.ए. करुन घेतली जाते व त्यानंतर तिचे प्लॉटस् पाडून विक्री केली जाते. प्रत्येक जिल्हा व तालुक्यामध्ये हा व्यवसाय खूप मोठया प्रमाणात चालतो. परंतु असे प्लॉटस् विकताना आवश्यकतेप्रमाणे रेरा कायद्यानुसार नोंदणी केली जात नाही. मी स्वत: कमीत कमी आठ-दहा तरी ले-आऊट असे पाहिले असतील की ज्यांची रेरा कायद्यांतर्गत नोंदणी होणे आवश्यकता असतानाही तसे केले गेलेले नाही. नोंदणी न करता प्लॉटस् विक्री केली जात असेल तर असे करणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे. कारण ही एक प्रकारे ग्राहकांची फसवणूकच आहे. माझी मागणी आहे की, तालुका व जिल्हा पातळीवरील ले-आऊट धारकांची तपासणी केली पाहिजे व नोंदणी न करता विकल्या जाणाऱ्या प्लॉटसकडे लक्ष दिले पाहिजे.

---------

अप्रकाशित प्रत

श्री.विजयसिंग राजपूत (कन्नड) : अध्यक्ष महोदय, बहुतेक आमदार किंवा माजी आमदारांची मुंबईमध्ये एखादी सदनिका असते. आम्ही पहिल्याच टर्मचे आमदार आहोत. आम्हाला देखील असे वाटते की, आमचेही मुंबईत कुठे तरी किमान १ बी.एच.के. घर असावे. लॉबीमध्ये बसल्यानंतर यावर आपापसात चर्चा देखील होत असते. त्यामुळे मी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री व माननीय महसूल मंत्र्यांना विनंती करतो की, आमच्यासाठी एखादी जागा उपलब्ध करुन द्यावी. सन २०२४ मध्ये आमची टर्म संपेपर्यंत आमचे मुंबईमध्ये किमान १ बी.एच.के. घर झाले तरी आमच्यासाठी समाधानाची गोष्ट असेल. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

श्री.बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, त्यांची ही पहिलीच टर्म आहे. परंतु त्यांनी उपस्थित केलेला मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे असे माझे मत आहे. श्री.रा.सु.गवई साहेब असताना आमदारांना एकत्रित करुन वरळी येथे सागर ही इमारत बांधण्यात आली. त्यावेळच्या अनेक सन्माननीय सदस्यांना संकट काळामध्ये या घरांचा अतिशय उपयोग झाला. त्यानंतर आपण अशा प्रकारचे एक-दोनच प्रकल्प करु शकलो. परंतु मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, महसूल मंत्री म्हणून माझी अशा प्रकल्पासाठी मदत करण्याची पूर्ण तयारी आहे. आपण आमदारांचा गट तयार करावा. यामध्ये कोणत्याही प्रकारचे राजकारण नाही. सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार हे ज्येष्ठ सदस्य असल्याने त्यांनी यामध्ये पुढाकार घेण्यास हरकत नाही, असे मला वाटते. गट करुन इमारतीसाठी जागा शोधावी. मी वैयक्तिकरित्या व सरकार म्हणून आम्ही यासाठी पूर्णपणे सहकार्य करु. कारण आपली टर्म संपल्यानंतर देखील आपण मुंबईमध्ये येतो त्यावेळी निवासासाठी खोली असणे ही खूप महत्त्वाची बाब आहे. माझी या प्रकल्पासाठी पूर्ण तयारी आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संदीप कुणावार यांनी प्लॉटच्या संदर्भात काही बाबी या ठिकाणी मांडल्या. त्यांच्या सर्व सूचनांचा निश्चितपणे विचार करण्यात येईल.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ विधेयकाचा भाग झाला.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ११ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ११ संमत झाले आहे.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** मुंबईसह राज्यातील इतर ठिकाणच्या इमारतींचा पुनर्विकास करणे.

**मु.शी.:** मुंबईसह राज्यातील इतर ठिकाणच्या इमारतींचा पुनर्विकास करणे या विषयावर सर्वश्री सुनिल प्रभू, अमिन पटेल, अनिल पाटील, रविंद्र वायकर, नाना पटोले, यशवंत माने, अजय चौधरी, पृथ्वीराज चव्हाण, प्रकाश सोळंके, सदा सरवणकर, सुरेश वरपुडकर, ॲड अशोक पवार, सर्वश्री मंगेश कुडाळकर, झीशान सिद्दीकी, रोहित पवार, सुनील राऊत, संग्राम थोपटे, दीपक चव्हाण, प्रकाश सुर्वे, कैलास गोरंट्याल, दौलत दरोडा, रमेश लटके, अमित झनक, ॲड माणिकराव कोकाटे, सर्वश्री संजय पोतनीस, कुणाल पाटील, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री प्रकाश फातर्पेकर, शिरीष चौधरी, शेखर निकम, प्रताप सरनाईक, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री बाबासाहेब पाटील, भास्कर जाधव, सुभाष धोटे, बाळासाहेब आजबे, रमेश कोरगावकर, माधवराव जवळगांवकर-पाटील, संग्राम जगताप, राजन साळवी, पी.एन.पाटील (सडोलीकर), संजय राठोड, शिरीषकुमार नाईक, डॉ.किरण लहामटे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री राजेश एकडे, निलेश लंके, ज्ञानराज चौगुले, बळवंत वानखडे, संदिप क्षीरसागर, डॉ. संजय रायमुलकर, सर्वश्री विकास ठाकरे, सुनिल शेळके, अनिल बाबर, रणजित कांबळे, संजय जगताप, भरतशेठ गोगावले, नितीन पवार, धीरज देखमुख, वैभव नाईक, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री सुनिल टिंगरे, दिलीप लांडे, विक्रमसिंग सावंत, जितेश अंतापूरकर, दिपक केसरकर, चेतन तुपे, संजय शिरसाट, राजू पारवे, सहसराम कोरोटे, चिमणराव पाटील, मोहनराव हंबर्डे, लहु कानडे, प्रकाश आबिटकर, ऋतुराज पाटील, राजू आवळे, किशोर पाटील, चंद्रकांत नवघरे, शांताराम मोरे, डॉ.राहुल पाटील, श्री.श्रीनिवास वनगा, ॲड.शहाजी पाटील, सर्वश्री संजय गायकवाड, नितीन देशमुख, बालाजी कल्याणकर, उदयसिंग राजपूत, रमेश बोरनारे, सुहास कांदे, महेंद्र थोरवे, विश्वनाथ भोईर, संतोष बांगर, योगेश कदम, श्रीमती लता सोनवणे, सर्वश्री कैलास घाडगे-पाटील, महेश शिंदे, महेंद्र दळवी, वि.स.स. यांचा प्रस्ताव.

चर्चा पुढे सुरु.....)

श्री.सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय, नियम २९३ च्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या प्रस्तावामध्ये महाराष्ट्रातील प्रमुख शहर असलेल्या मुंबईसह इतर शहरांच्या प्रश्नांचा समावेश आहे. तसेच म्हाडा आणि म्हाडाच्या अंतर्गत होणाऱ्या कामांना चालना देणे या बाबीचाही समावेश आहे... (अडथळा...)

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, सत्ताधारी पक्षाच्या वतीने मांडण्यात आलेला हा अतिशय महत्त्वाचा प्रस्ताव आहे. यामध्ये गृहनिर्माण विभाग, नगरविकास विभाग, महसूल विभाग, सहकार विभाग या महत्त्वाच्या चार विभागांसह इतर दोन विभागांचा संबंध आहे. माननीय महसूल मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. परंतु तुलनेत त्यांच्या विभागाचा केवळ एन.ए. पुरता छोटा विषय असून तो क्लिअर देखील झालेला आहे. या प्रस्तावाशी संबंधित असलेल्या महत्त्वाच्या गृहनिर्माण, नगरविकास विभागांचे मंत्री किंवा राज्यमंत्री देखील सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.सुनिल प्रभू यांना मी विचारु इच्छितो की, आपल्या राज्यामध्ये मुंबई शहराला एवढेच महत्त्व आहे का ? सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव असून देखील एकही मंत्री महोदय उपस्थित नाहीत. अर्थात, तरीही आपल्याला बोलायचे असेल तर बोलावे. आमची काहीही हरकत नाही.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री.योगश सागर यांना मी सांगू इच्छितो की, मी संबंधित मंत्री महोदयांना निरोप देतो, तोपर्यंत आपण चर्चेला सुरुवात करु.

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, सत्ताधारी पक्षाच्या वतीने हा प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. मुंबईचे माजी महापौर आणि ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.सुनिल प्रभू यांच्यासारखे नेते प्रस्ताव मांडत आहेत परंतु सरकारला त्याचे गांभीर्य नाही, एवढेच मला सांगायचे आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

श्री. सुनील प्रभू : अध्यक्ष महोदय, या प्रस्तावावरील चर्चेला सुरूवात करताना मी मुंबई शहरापासून बोलायचे झाले तर मुंबई शहर हे ७ बेटांवर वसलेले आहे. त्या ७ बेटांमध्ये माहीम, वरळी, परेल, माझगांव, मुंबई, कुलाबा, छोटा कुलाबा आहे. या ७ बेटावर समुद्राच्या खाडीलगत असलेले हे शहर आहे. याचा उल्लेख मी मुद्दाम करतो. कारण मुंबई शहरातील इमारतींचे सरासरी आयुष्य हे ५० वर्षापर्यंत येऊन सिमित झाले आहे. मुंबई शहरातील जमिनीचा विचार केला तर ७७१ चौरस किलोमिटरचे ते असले तरी मुंबई शहराच्या नकाशावर आपण पाहिले तर ५४ चौरस किलोमिटर इतकी जमीन भराव टाकून या शहरामध्ये निर्माण केली आहे. ज्याला आपण "रिक्लेम" असे म्हणतो. त्यामुळे समुद्राची हवा, रिक्लेम केलेली जमीन आणि त्यावर मुंबई शहराचा झालेला विकास आणि अगोदरच बेटावर वसलेले शहर यामुळे मुंबईतील इमारतींचे आयुर्मान दिवसेंदिवस कमी होत आहे. वातावरणातील बदल, तापमान या सर्व गोष्टी त्याला कारणीभूत आहेत. मुंबई शहरातील इमारतींचे कमी होणारे आयुष्य आणि त्यातून पुन्हा टुमदारपणे उभी राहणारी मुंबई याकडे आपण पाहिले तर मुंबई शहर आणि या शहराची लोकप्रियता, अस्तित्त्व याबद्दल या सभागृहात आपण अनेकवेळा हे म्हटले आहे की, मुंबई श्रमिकांच्या घामावर आणि श्रमिकांच्या मोलावर या मुंबई शहराची जडणघडण झाली. मग त्यामध्ये सुरूवातीचा काळ गिरणगावाचा असेल, गिरणीमध्ये काम करणारा कामगार असेल, डॉकयार्डमध्ये काम करणारा कामगार असेल, कामगारांच्या या सर्व मेहनतीतून, घामातून, संघर्षातून या मुंबई शहराचा लौकिक टिकविण्याचे काम झाले आहे. मुंबईचा इतिहास आणि मुंबईचा टुमदारपणा अखंड ठेवण्यासाठी आणि मुंबईकरांचे अस्तित्त्व या मुंबई शहरात टिकवून ठेवण्यासाठी येथील इमारतींच्या पुनर्विकासाची आवश्यकता या मुंबई शहरासाठी आहे, हे आपल्यापैकी कोणीही नाकारु शकत नाही.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहराच्या पुनर्विकासाची जेव्हा आपण चर्चा करतो तेव्हा आपल्याला लक्षात येते की, या पुनर्विकासामध्ये अनेक अडचणी असतात. मुंबईतील जमिनींची मालकी वेगवेगळया संस्थांकडे आहे. त्यामध्ये माझगांव डॉक, एमएमआरडीए, बीएमसी, खाजगी संस्था, बीपीटी, रेल्वे, महानगर टेलिफोन अशा अनेक एजन्सीच्या जमिनी मुंबई शहरात आहेत. या वेगवेगळया संस्थांचे वेगवेगळे

श्री. सुनील प्रभू...

निकष आहेत, वेगवेगळे नियम आहेत. या सर्वांची एकत्रित सांगड घालून आपल्याला या मुंबई शहराचा पुनर्विकास करावा लागेल. परंतु या पुनर्विकासात काही अडचणी आहेत त्या अडचणी दूर करणे म्हणजे खऱ्या अर्थाने मुंबईच्या विकासाला गती देण्यापैकी पहिले काम होईल, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहराच्या विकासाची जेव्हा आपण चर्चा करतो तेव्हा या शहरातील विमानतळ हा या शहराच्या मध्यावर आहे. हवाईमार्ग म्हणजे ज्याला आपण "फनेल झोन" म्हणतो त्या परिसरात येणाऱ्या इमारतींची मर्यादा सिमित केलेली आहे. त्यामुळे या ठिकाणी अतिरिक्त बांधकाम करुन विकास करणे शक्य होणार नाही. गेल्या अनेक वर्षापासून आपण यावर चर्चा करतो, मागणी करतो. स्थानिक लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून केंद्र सरकार आणि राज्य सरकारकडे विकासाच्या दृष्टीकोनातून मागणी होते. परंतु याबाबत अद्यापपर्यंत कोणताही ठोस निर्णय या विकासाच्या दृष्टीने का घेऊ शकलो नाही, याचे कारण त्यामध्ये अनेक तांत्रिक अडचणी आहेत. म्हणून येथील इमारतींचा पुनर्विकास ज्या कारणांमुळे होत नाही ती कारणे शोधून त्या कारणांचा विचार शासनाने सहानुभूतीने करुन जे मूळ लोक या "फनेल झोन"च्या परिसरात किंवा सिमारेषेमध्ये येतात त्यांना पुनर्विकासामध्ये न्याय देऊन आणि त्यांचे अस्तित्त्व तेथे टिकवून ठेवायचे असेल तर शासनाच्या नगरविकास विभागाने, गृहनिर्माण विभागाने, केंद्र शासनाने आणि सर्व विविध संबंधित विभागांनी एकत्रित येऊन निर्णय घेणे, हे या मुंबई शहराच्या पुनर्विकास आणखी एक महत्त्वाचे अंग आहे, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, जेव्हा मुंबई शहराच्या पुनर्विकासाची चर्चा करतो त्यावेळी या मुंबई शहरातील जवळपास ६० ते ६५ टक्के क्षेत्र म्हणजे ज्याचा मी उल्लेख केला की, मुंबई शहराच्या ४७१ चौरस किलोमिटर क्षेत्रापैकी ७० टक्के जागा ही झोपडपट्ट्यांनी व्यापलेली आहे आणि ३० टक्के जमिनीवर इमारती उभ्या आहेत. त्यामुळे या झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास करणे तितकेच महत्त्वाचे आहे. आपल्याला कल्पना असेल की, या राज्यात सन १९९० मध्ये शिवशाहीचे सरकार असताना

श्री. सुनील प्रभू...

हिंदूहृदयसम्राट शिवसेना प्रमुख माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी एक स्वप्न पाहिले होते की, झोपडीत राहणाऱ्या नागरिकाला हक्काचे घर मोफत दिले पाहिजे आणि झोपडपट्टीवासियांसाठी पुनर्विकास योजना या मुंबई शहरात झाली पाहिजे. त्या उद्देशाने ती योजना आणली गेली. त्यांचे सरकार नसताना तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शरद पवार यांच्याकडे ही योजना सोपविली होती त्या काळात ती योजना होऊ शकली नाही. पण त्यानंतरच्या काळात शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाचे सरकार आल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी यांनी ही योजना महाराष्ट्रात लागू केली. या पुनर्वसन योजनेचा हेतू चांगला असल्याने आणि त्या योजनेची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने पुढील काळात ज्या काही अडचणी आल्या त्याबाबत तेव्हा तेव्हा जी जी सरकारे या महाराष्ट्रात आली त्या त्या सरकारांनी या झोपडपट्टी सुधार योजनेमध्ये अनेक सुधारणा केल्या. परंतु या सुधारणा करीत असताना मुंबई शहरातील एसआरएच्या अनेक योजना स्तब्ध झाल्या आहेत. कारण एसआरएच्या योजनांमध्ये अनेक अडचणी येतात. या ठिकाणचे अनेक विकासक आर्थिक कारणास्तव प्रकल्प सोडून निघून गेले आहेत. अशा स्थितीत तेथे असणाऱ्या मूळ झोपडपट्टीधारकांना कोणी वाली नाही. त्यामुळे मुंबई शहरातील अनेक लोक बेघर झाली आहेत. अनेक प्रकल्प अशा पध्दतीने अर्धवट स्थितीत अडकून पडले आहेत. त्यामुळे या संपूर्ण पुनर्विकास योजनेतील सर्व नागरिक सरकारकडे मोठ्या आशेने, सरकार काही तरी निर्णय घेईल अशा विश्वासाने सरकारकडे नजर लावून बसले आहेत.

अध्यक्ष महोदय, या प्रस्तावावर बोलत असताना मी राज्य सरकारकडे मागणी करु इच्छितो की, अशा पध्दतीने ज्या योजना बंद पडल्या व त्यामुळे जे लोक बाधित झालेले आहेत त्या लोकांना सरकारने विश्वास देणे गरजेचे आहे. विकासकाला विश्वास नको आहे. पण ज्याने आपले राहते घर स्वत:च्या मेहनतीने, स्वत:च्या पोटाला चिमटा काढून, कच्च्याबच्च्यांना सांभाळीत जे झोपडे घेतले होते ते पुनर्विकासाच्या नावाने आणि माझी कच्चीबच्ची कधी तरी जाऊन त्या इमारतीत

श्री. सुनील प्रभू...

राहतील, या भावनेतून तेथे असलेल्या सोसायटीमार्फत त्या विकासकाला दिले होते आणि ज्याने ॲनेक्चर मिळवून ते काम सुरू झाल्यानंतर कधी तरी मी त्या इमारतीत रहायला जाईल, असे जे स्वप्न बघितले होते आणि ज्याला आता आपले ते स्वप्न भंग पावले असे वाटते, त्याला सरकारने आधार दिला पाहिजे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. सुनिल प्रभू.....

पण या प्रस्तावातील ज्या सर्वंकष बाबी आहेत त्यावर माझे मित्र श्री. रविंद्र वायकर आपले मत मांडणार आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्य ॲड . आशिष शेलार यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी मला डिस्टर्ब करु नये.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, माझी काही हरकत नाही. सन्माननीय सदस्य श्री. सुनिल प्रभू यांना माझी एकच विनंती आहे की, ते आता बोलताना म्हणाले की,"माझे मित्र श्री. रविंद्र वायकर" तर यामध्ये त्यांनी दुरुस्ती करुन "माझे वरिष्ठ मित्र" असे म्हणावे.

श्री. सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय, नियम २९३ च्या प्रस्तावावर बोलत असताना मी असे म्हणालो की, खऱ्या अर्थाने सरकारने या सर्व झोपडपट्टीवासियांच्या मागे उभे राहायला पाहिजे. परंतु हे बोलत असताना माझी विनंती आहे की, विकासक ही योजना सोडून गेले आहेत तर त्यामध्ये गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणुकदारांना विश्वासात घेऊन ही योजना पूर्ण करायची असेल तर एसआरएने याबाबत पुन्हा एकदा साधक बाधक विचार करुन सरकार म्हणून निर्णय घेऊन एक क्षमापित योजना तयार करावी. ज्याला आपण ॲमनेस्टी स्कीम म्हणजे अभय योजना म्हणतो. ही योजना लागू करावी. जेणेकरुन मुंबई शहरामध्ये ज्या अशा प्रकारच्या रेंगाळलेल्या योजना पूर्ण करण्याच्या दृष्टीने मदत होणार आहे. ही अभय योजना कशी आहे किंवा ती राबविण्याच्या दृष्टीने सरकार या नात्याने आपण काय केलेले आहे, यासाठी आपण कोणते धोरण घेणार आहात तसेच झोपडपट्टीवासियांना दिलासा देऊन या इमारतीमध्ये रहिवाशी कसे जाणार आहेत या सर्व बाबींचा प्रस्तावावर बोलत उत्तर असताना माननीय गृहनिर्माण मंत्र्यांनी उल्लेख करावा, अशी माझी विनंती आहे

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरातील पुनर्विकासाच्या बाबतची अडचण सर्वात मोठी आहे. एसआरएमधील क्षमापित योजनेच्या बाबतीत निर्णय घेत असताना आणखी एक बाब तितकीच महत्त्वाची आहे. कारण एसआरएमध्ये अनेक बाबी आहेत त्याचा उल्लेख मागील सात वर्ष मी सदस्य या नात्याने जेव्हा जेव्हा प्रस्तावावर बोलतो तेव्हा सर्वसामान्य नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणींचा उल्लेख केला

श्री. सुनिल प्रभू.....

होता. आजही मी एका बाबीचा उल्लेख एका ठिकाणी करत आहे की, सदर योजनेतील झोपडपट्टीधारकांची पात्रता हा गंभीर विषय असून ती निश्चित करीत असताना एसआरएच्या अधिकाऱ्यांना म्हणजे जिल्हाधिकारी किंवा अतिरिक्त जिल्हाधिकारी यांना वाटेल तितका कार्यकाळ ते घेतात. त्यामुळे पात्रता निश्चित न झाल्यामुळे आपण सोसायटी फॉम करु शकत नाही, ॲनेक्चर होऊ शकत नाही. योजनेसाठी लोक तयार असून सुद्धा ते पुढे जात नाहीत. यामुळे पुनर्विकासाचे काम रेंगाळते.

अध्यक्ष महोदय, मागच्या सरकारमध्ये या बाबत चर्चा झाली होती आणि माननीय माजी मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक दृष्टीकोन दर्शविला होता. परंतु आताच्या सरकारने डायरेक्ट सिक्सर मारण्याची गरज आहे. याचा अर्थ आपण ही पात्रता निश्चित करण्याचा निर्णय ९० दिवसांच्या आत घ्यावा. कॅबिनेटच्या बैठकीमध्ये हा निर्णय घेऊन सभागृहामध्ये जेव्हा आपण उत्तर द्याल तेव्हा तो जाहीर करावा. येणाऱ्या काळामध्ये या निर्णयामुळे झोपडपट्टीवासियांच्या पुनर्विकासाच्या कामासाठी खूप मोठी मदत होणार आहे. अशी अपेक्षा संपूर्ण सभागृहाला आहे. जेणेकरुन पुनर्विकासाच्या ज्या योजना रखडलेल्या आहेत त्यामध्ये क्षमापित योजना आणि पात्रतेची अट ९० दिवसांवर आणण्याचा निर्णय आपण घ्यावा, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहराचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या अनेक आमदारांनी येथील अत्यंत महत्त्वाचा विषय मागच्या २० ते २५ वर्षापासून सभागृहामध्ये मांडलेला आहे. माझ्या कार्यकाळात मी जेव्हा आमदार या नात्याने या शहराचे प्रतिनिधीत्व करतो तसेच नगरसेवक या नात्याने मुंबई शहरात २० वर्षापासून काम करीत होतो तेव्हा त्या त्या भागात प्रत्येकाला येणारा अनुभव.... मुंबई शहरामध्ये भोगवटा प्रमाणपत्राशिवाय असणाऱ्या इमारती त्या त्या काळातील विकासकांनी केलेल्या चुकीमुळे तो काम सोडून गेला आर्किटेक्ट हयातीत नाही. परंतु सर्वसामान्य माणसांनी तिथे घर घेतले आहे. तेव्हा त्या घरात राहयला जाण्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय नव्हता. परंतु त्या इमारतीमध्ये भोगवटा प्रमाणपत्र नाही. त्यामुळे पिण्याच्या

असुधारित प्रत

श्री. सुनिल प्रभू....

पाण्याचा चार्ज, सिवरेज कर आणि मालमत्ता कर हे दुप्पट भरावा लागतो. मग शेवटी मुंबई शहरामध्ये मध्यमवर्गीयांनी जी घर घेतले त्यावेळेला स्वत:च्या घरामध्ये जाण्याचे त्यांचे स्वप्न होते. त्यामुळे त्यांनी ती गुंतवणूक केली. परंतु तिकडे असणाऱ्या विकासकांनी मुंबई महानगरपालिकेने घालून दिलेल्या अटी व शर्ती इमारत बांधताना पूर्ण केल्या नसल्यामुळे भोगवटा प्रमाणपत्र मिळाले नाही. यामध्ये त्या सर्वसामान्य मध्यमवर्गीयांचा गुन्हा नव्हता. पर्यायाने भोगवटा प्रमाणपत्र नसल्यामुळे त्या इमारतीमध्ये राहायला जातायेत नाही हा जरी महानगरपालिकेचा नियम असेल तरी देखील तिकडे त्यांच्यावर आलेली आपत्ती आणि त्यांच्या झालेला नाईलाज यामुळे त्याला जबरदस्ती इमारतीमध्ये राहावे लागते. परंतु भोगवटा प्रमाणपत्र नसल्यामुळे आज पुनर्विकासाठी असलेली इमारत आपण पूर्ण करु शकत नाही. ही सर्वात महत्त्वाची आणि दुर्दैवी बाब आहे. मुंबई शहरातील २० ते २५ वर्षापूर्वीच्या विना भोगवटा प्रमाणापत्राच्या ज्या इमारती आहेत त्याबाबत मागील सरकारच्या काळात एक निर्णय घेण्यात आला होता. त्यामध्ये काही कालावधीसाठी काही नियम होते. त्या नियमात बसून काही भोगवटा प्रमाणपत्र देण्याचे काम तत्कालीन महापालिका प्रशासनाने आणि सरकारने घेतलेल्या निर्णयाने केले होते. त्यावेळी कोण माननीय मुख्यमंत्री होते हे मला माहीत नाही. तो निर्णय लोकांना भावला होता. परंतु त्या पलिकडे जाऊन उर्वरित इमारतींना क्षमापित योजना लागू करून जसे आहे तसे भोगवटा प्रमाणपत्र देण्याच्या दृष्टीने या शासनाने ऐतिहासिक निर्णय घेतला तर मुंबई शहरातील किती तरी इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र मिळू शकेल. यांच्यावर मालमत्ता कर आणि पाण्याचे बिल दुप्पट पद्धतीने लावले जातात. जे इमारतीमध्ये राहतात त्यांना भोगवटा प्रमाणपत्र नसल्यामुळे रहिवाशी इमारतीमध्ये राहत असतील तर त्यांच्या आणि महापालिकेच्या नियमाच्या दृष्टीने त्याची किंमत शून्य आहे. अशा लोकांना भोगवटा खऱ्या अर्थाने दिलासा देण्यासाठी भोगवटा प्रमाणपत्र बाबत आपण निर्णय घेतला पाहिजे. असे मलावाटते, सरकारने याबाबत तात्काळ निर्णय घ्यावा.

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, चर्चा सुरु असताना नगर विकास विभागाचे निदान राज्य मंत्री तरी सभागृहात उपस्थित असायला पाहिजे.

डॉ. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, ओसी संबंधातील प्रश्न हा म्हाडाचा ही आहे. त्यामुळे आपण काही काळजी करु नका माझा जो निर्णय असेल तोच माननीय मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांचाही असेल.

श्री. सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्यासारखे कृतीशील मंत्री आहेत म्हणून मी एवढे बोलत आहे.

अध्यक्ष महोदय, पुनर्विकासबाबत चर्चा करीत असताना मी हवाई मार्गात येणाऱ्या घरांबाबत, झोपडपट्टीच्या पुनर्विकास योजनेबाबत आणि भोगवटा प्रमाणपत्र नसल्यामुळे इमारतीमध्ये राहणाऱ्या मध्यमवर्गीयांचे जे हाल होतात त्याबाबत बोललो आहे. याबाबत सरकारने काहीतरी निर्णय घ्यावा अशी विनंतीही मी केली आहे.

अध्यक्ष महोदय, आज मुंबई उपनगरातून मी महाराष्ट्र विधानसभेमध्ये लोकांचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी सभागृहात आलो आहे. त्या उपनगरामध्ये जुन्या आणि मोडकळीस आलेल्या ज्या इमारती आहेत त्यांच्याबद्दल शासनाने सर्वंकष निर्णय घेणे आवश्यक आहे. अध्यक्ष महोदय, मागील १५ वर्षापासून जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींसाठी रिपेअरिंग मोड व्हावा यासाठी सभागृहामध्ये त्या कालावधीमध्ये जे जे आमदार लोकप्रतिनिधी म्हणून आले त्यांनी सातत्याने आवाज उठवला होता. मला आठवते की, सन १९९०-९५ च्या काळात प्रकाश मेहता समितीने दिलेला आणि त्यानंतरचे अहवाल या सर्वाचा विचार करुन उपनगरासाठी रिपेअरिंग मोड तयार करुन तिथे मोडकळीस आलेल्या चाळी, इमारती यांचे पुनर्निमाण करण्यासाठी आपण जी भूमिका घेतली होती त्या दृष्टीने सरकार या नात्याने कोणता निर्णय घेणार आहात ? याचा उल्लेख माननीय मंत्र्यांनी आपल्या भाषणामध्ये करणे आवश्यक आहे.

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. संजय शिरसाट)**

यानंतर श्रीमती करंदीकर....

श्री. सुनील प्रभू ...

मागील ७ वर्षांच्या कार्यकाळात या सदनात या विषयावर विविध माध्यमातून अनेकदा चर्चा झालेली आहे. मुंबईमधील अनेक आमदारांनी व दोन्ही बाजूच्या सदस्यांनी या विषयावर चर्चा केली. या संबंधी लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती. मुंबई व मुंबई उप नगरामध्ये जुन्या, मोडकळीस आलेल्या इमारतींकरिता दुरुस्ती मंडळ स्थापन केले जाणार आहे अशी घोषणा केली. मात्र ती अद्याप अमलात आलेली नाही. या संबंधी आपण कालबध्द उत्तर द्यावे. मुंबईतील चाळींच्या पुनर्निमाण होण्याकरिता अमुक कालावधीमध्ये दुरस्ती मंडळाची स्थापना करु, याची कार्यवाही येणाऱ्या काळात करु अशी घोषणा अपेक्षित आहे. तरच मुंबई उपनगरातील मोडकळीस आलेल्या चाळींचा पुनर्विकास होऊ शकेल.

अध्यक्ष महोदय, मुंबईचा आद्य नागरिक हा कोळी आहे. मुंबई शहरात अनेक कोळीवाडे आहेत, आदिवासी पाडे आहेत. मुंबईमधील कोळीवाडे हे येथील वैभव आहे. कोळीवाड्यांना ऐतिहासिक वैभव, पुरातन वास्तूचे वैभव प्राप्त झालेले आहे. मुंबईचे गावठाण व कोळीवाडे यांच्याकरिता विशेष डीसी रुल उपलब्ध नाही. या बाबत शासनाने सकारात्मक दृष्टीने निर्णय घेण्याचा प्रयत्न केला तरी देखील तांत्रिक अडचणीमुळे तो घेता आला नाही. गावठाण, कोळीवाड्यांच्या पुनर्विकासाठी विशेष डीसीआर मंजूर करण्याकरिता प्रयत्न करुन कार्यवाही करणे आवश्यक आहे. माझ्या मताशी सन्माननीय सदस्य ॲड आशिष शेलार सहमत आहे की नाही, हे मला माहीत नाही. कोळीवाड्यांचा विकास करताना ज्या इतर योजना असतात त्या नुसार न करता कोळीवाडे त्याच ठिकाणी शाबूत राहिले पाहिजेत, त्याचे वैभव टिकवले पाहिजे. कोळीवाड्यांचा विकास करताना जो एफएसआय मिळेल तो वाढीव कुटुंबासाठी दिला पाहिजे. सेलेबल एफएसआय दिला तर कोळीवाड्यांचे महत्व कमी होऊ शकते. माझे स्वत:चे असे मत आहे की, कोळीवाड्यांना सुविधा देताना, मुंबई शहराचा विकास करताना नागरी सेवेसह पर्यटनाचा दृष्टीकोन ठेवणे आवश्यक आहे.

श्री. सुनील प्रभू ...

अध्यक्ष महोदय, मी सांगू इच्छितो की, पोर्तुगल येथे समुद्रकिनाऱ्यावरील कोळीवाड्यांचा विकास केला, तेव्हा तेथील शासनाने कोळीवाड्यांचे परंपरागत महत्व टिकवण्यासाठी, तेथील कोळीवाड्यांच्या घरांचा विकास केला. त्या घरांमध्ये राहणाऱ्या कुटुंबांचा परिवार वाढला आहे, म्हणून ती घरे दुरुस्त करण्यासाठी, उंच करण्यासाठी तेवढाच एफएसआय दिला. कोळीवाड्यामध्ये सेलेबल एफएसआय वापरुन बाहेरची मंडळी तेथे येऊन कोळीवाड्यांचा लूक बदलू नये, या करिता तो तसाच ठेवून विकास केला गेला. ज्या प्रमाणे पोर्तुगलमध्ये विकास केला त्याचा साधकबाधक अभ्यास आपण करावा. माननीय गृह निर्माण मंत्री, आपण पोर्तुगलमध्ये जाऊन बघावे असे मी म्हणणार नाही. मात्र या बाबतची आपण माहिती घ्यावी. स्थानिक कोळी बांधवांच्या पुढाकाराने त्यांना जे अपेक्षित आहे त्याचा अंतर्भाव करुन पुनर्विकासाबाबत शासनाने निर्णय घेतला पाहिजे. पुनर्विकास करताना कोळीवाड्यांचे मूळ स्वरुप पर्यटकांच्या दृष्टीने देखील विकसित होणे गरजेचे आहे. याचा शासनाने विचार करावा, असे माझे मत आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई उपनगरातील सुमारे ६० हजार हून अधिक नागरिकांना अकृषिक कराच्या नोटीसा बजावण्यात आल्या. यावर काल लक्षवेधी सूचनेद्वारे चर्चा केली. सन्माननीय सदस्य ॲड आशिष शेलार यांनी ती उपस्थित केली होती. मंत्री महोदयांनी सकारात्मक विचार करुन स्टे दिलेला आहे. काही लोकांना अकृषिक कर भरण्याच्या नोटीसेस दिलेल्या आहेत या बाबत सन्माननीय सदस्य श्री. रविंद्र वायकर यांनी सांगितले की, हा कर १५ टक्क्यांवरुन ०.५ टक्क्यांवर आणला. तरी देखील व्याजासह कर भरणे कोव्हिडच्या काळात परवडणारे नाही. माझे असे मत आहे की, हा कर कायमस्वरुपी रद्द करावा. या करिता आम्ही मागणी केली आहे. आता या ठिकाणी माननीय गृह निर्माण मंत्री आहेत. मघाशी माननीय महसूल मंत्री होते.मुंबई व राज्यातील इतर शहराच्या बाबत एन ए टॅक्स कधी लावू शकतो. मुंबई शहराच्या

श्री. सुनील प्रभू ...

परिसरात विकास आराखड्याला मान्यता दिली आहे. डीपीमध्ये जी आरक्षणे आहेत त्याचा वापर त्याच कामासाठी करणे निश्चित झालेले आहे. यामुळे मुंबई शहरात अकृषिक कर लावू शकत नाही. मुंबई शहर सीमांकित होते. त्या नंतर माहिम पासून उपनगर, पलिकडे मुलुंड चेंबूर व दहिसर पर्यंत वाढले. यामुळे कायद्यात जो बदल करणे आवश्यक आहे तो केल्यानंतर मुंबई शहरातील कर कायमस्वरुपी कमी करु शकतो. या बाबत शासनाने निर्णय घेणे गरजेचे आहे. मुंबई सोबतच राज्याचा देखील विचार करण्यासाठी आपल्याला येथे लोकांनी पाठवलेले आहे. महाराष्ट्राच्या संबंधी जो जाचक अकृषिक कर आहे, तो रद्द करण्याबाबत शासनाने विचार करुन निर्णय घ्यावा. या बाबत माननीय गृह निर्माण मंत्री किंवा संबंधित मंत्री उत्तर देतील तेव्हा सर्व गोष्टीचा उहापोह करुन खास बाब म्हणून हा कर कायमस्वरुपी रद्द करण्याबाबत पावले उचलून या बाबत घोषणा करावी, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, झोपडपट्टयांच्या पुनर्विकासाकरिता राज्य व केंद्र शासनाचे धोरण नसल्यामुळे ते थांबले आहे. बीपीटीची जागा, महापालिकेच्या जागेवर आपण परवानगी देतो, मात्र मधल्या काळात काही अडचणीमुळे विकास थांबला आहे. काही ठिकाणी म्हाडाच्या जमिनी आहेत. म्हाडा स्वतंत्र प्राधिकरण म्हणून पुनर्विकासाचे काम करते मात्र त्यामध्ये देखील अनेक अडचणी आहेत. पुनर्विकासावर बोललो तर २४ तास कमी पडतील एवढी चर्चा होऊ शकते. मुंबई शहरात वेगवेगळया एजन्सीची जागा आहे. रेल्वे, म्हाडा, बीपीटी अशा अनेक एजन्सीच्या जमिनी येथे असून त्याच्या पुनर्विकासाकरिता राज्य शासनाने बैठक घेऊनही अद्याप पूर्णविराम मिळालेला नाही. माझी अशी मागणी आहे की, या विविध एजन्सीच्या ज्या जमिनी आहेत, ज्यांचा पुनर्विकासाचा विषय रखडलेला आहे या बाबत केंद्र व राज्य शासनाने सांगड घालून तत्काळ निर्णय घेतला तर या जमिनीवरील इमारतींचा किंवा नव्याने बांधलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी ठोस निर्णय घेता येईल. राज्य व केंद्र शासनाच्या विविध जमिनीवरील पुनर्विकासाबाबत शासनाने निर्णय घ्यावा.

श्री. सुनील प्रभू ...

अध्यक्ष महोदय, पीएमजीपी प्रकल्पांतर्गत शासनाच्या खाजगी जमिनीवरील व म्हाडाच्या ५६ सोसायट्यांना कर लावला आहे. मघाशी एन.ए कराबाबत मी बोललो होतो. याबाबत जेव्हा निर्णय होईल तेव्हा मुंबई शहरात खाजगी जमिनीवर वसलेल्या सोसायटीबाबतही आपण निर्णय घ्याल असा मला विश्वास आहे. या दृष्टीने शासनाने उहापोह करावा. या प्रस्तावामध्ये अनेक गोष्टींचा उल्लेख केलेला आहे. कोळीवाडे, गावठाणे, क्षमापित योजना, पुनर्विकासाचा प्रश्न, विविध सरकारी एजन्सीच्या जमिनींवरील पुनर्विकास, म्हाडाने स्वतंत्रपणे पुनर्विकास करण्यासाठी केलेल्या वेगवेगळया योजना इ. बाबींचा समावेश आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.सुनील प्रभू...

त्याच बरोबर सर्वात महत्वाचे म्हणजे बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास व धारावी झोपडपट्टीचा पुनर्विकास याबाबत सरकारचे नेमके धोरण काय आहे, बी.डी.डी. चाळींच्या कामाला आपण सुरुवात केली आहे. ती साधारणपणे कधीपर्यंत पूर्ण होणार आहे, बी.डी.डी. चाळीतील ज्या इतर चाळी आहेत, त्याबद्दल सरकार नेमकी काय भूमिका घेणार आहे?

अध्यक्ष महोदय, धारावीच्या पुनर्विकासाबाबत आपण केवळ चर्चा ऐकत आहोत. मागील सरकारच्या काळात अनेक गोष्टी बैठकीच्या रुपाने झाल्या. कृतीमध्ये काही करण्याचा प्रयत्न केला. परंतु, तेथे असणाऱ्या स्थानिक नागरिकांच्या, तेथे वास्तव्यास असलेल्या लोकांच्या काही अडचणी व मागण्या होत्या, त्यामुळे आपण ती योजना पूर्ण करु शकलो नाही. त्यांना सकारात्मक म्हणजे धारावीत राहणाऱ्या नागरिकांना अपेक्षित असणारा जो काही वापरण्याजोगा एरिया त्या ठिकाणी आपण देणार आहोत किंवा एफएसआय देणार आहोत तो कोणत्या पध्दतीचा असणार आहे, ते त्या नागरिकांना मान्य आहे काय, त्यानुसार सरकार कोणती भूमिका घेऊन कशा पध्दतीने त्या धारावीचा पुनर्विकास करणार आहे, याचा देखील उल्लेख या प्रस्तावावर आपले मत मांडताना मंत्री महोदयांनी करावा.

अध्यक्ष महोदय, या प्रस्तावामध्ये म्हाडामार्फत बांधण्यात येणाऱ्या हॉस्पिटलबाबत, म्हाडामार्फत बांधण्यात येणाऱ्या हॉस्टेलबाबत, अशा अनेक गोष्टींचा उल्लेख आहे. मला असे वाटते की, सर्वच मुद्दयांना मी स्पर्श केला तर... माझ्या पक्षाच्या वतीने किंवा आमच्या सहयोगी पक्षाच्या वतीने या प्रस्तावावर जे अनेक वक्ते बोलणार आहेत ते मी जे मुद्दे सोडले आहेत त्या मुद्दयांवर त्यांच्याकडे असलेली विविध माहिती या सभागृहात चर्चेच्या माध्यमातून मांडतील. मला असा विश्वास आहे की, मंत्री महोदय या प्रस्तावावर जेव्हा आपले मत व्यक्त करतील व त्यावेळी जी घोषणा करतील त्या केलेल्या योजनांच्या घोषणांमुळे मुंबईच्या पुनर्विकासाला गती मिळेल.

असुधारित प्रत

श्री.सुनील प्रभू...

अध्यक्ष महोदय, मुंबईच्या पुनर्विकासाला गती मिळत असताना माझी अशी मागणी आहे की, जी एसआरए योजना आहे... जसे मुंबई शहर आहे तशी या राज्यातील अनेक शहरे आहेत ती देखील आता विकसित होऊ लागली आहेत. स्मार्ट सिटी म्हणून आपण ती शहरे विकसित केली. परंतु, तेथे असणाऱ्या झोपडपट्ट्या देखील आता त्या शहराला पुनर्विकासाची गरज आहे, अशा पध्दतीने लोकांना साद घालू लागल्या आहेत. त्यामुळे एसआरए स्कीम ही पूर्ण महाराष्ट्रासाठी लागू करण्याच्या दृष्टीने हे सरकार काय करणार आहे, याबाबत देखील गृहनिर्माण मंत्री महोदयांनी भूमिका मांडावी.

अध्यक्ष महोदय, या म.वि.स. नियम २९३ अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेच्या रुपाने मुंबईकरांसाठी सरकारने ज्या ज्या गोष्टी करणे आवश्यक आहे त्या, तसेच, रिडेव्हलमेंटमध्ये ज्या अडचणी मुंबईकरांना एक सर्वसामान्य मुंबईकर म्हणून भेडसावतात, ज्या लोकप्रतिनिधी म्हणून आमच्याकडे पोहोचतात, त्या मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे. सरकार सकारात्मक आहे. मागील काळात यावर प्रयत्न झालेला आहे. परंतु, खऱ्या अर्थाने जर डेव्हलपमेंट व्हायची असेल तर कोणते निर्णय घेतले पाहिजेत, त्याबाबतची मागणी मी या निमित्ताने केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, सरकारने चांगले निर्णय घेतले त्याचे मी अभिनंदन करतो. मी काही गोष्टीची मागणी केली आहे. या चर्चेवर जेव्हा मंत्री महोदय उत्तर देतील व घोषणा करतील तेव्हा मुंबईकरांसाठी ती घोषणा म्हणजे खऱ्या अर्थाने पुनर्विकासाचे वरदान ठरेल अशी अपेक्षा मी व्यक्त करतो व येथेच थांबतो. धन्यवाद. जय हिंद. जय महाराष्ट्र.

प्रस्ताव प्रस्तुत झाला

श्री.योगेश सागर (चारकोप): अध्यक्ष महोदय, मी सत्ताधारी पक्षाच्या म.वि.स. नियम २९३ अन्वयेच्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करीत आहे.

अध्यक्ष महोदय, हा प्रस्ताव जेव्हा सन्माननीय सदस्य श्री.सुनील प्रभू यांनी वाचला व त्यावर बोलण्यास सुरुवात केली तेव्हा अशी अपेक्षा होती की, सरकार म्हणून मागील २ वर्षांत मुंबई शहरासाठी या सरकारच्या माध्यमातून काय काय उपलब्धी मिळाली, त्या उपलब्धींबाबतचा प्रस्ताव या सभागृहात मांडून आम्हालाही त्या संदर्भात बोलण्यास बाध्य करतील की, नाही हे तर चांगलेच झाले आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहराबाबत सन्माननीय सदस्य श्री.सुनील प्रभू यांनी सांगितले ते खरेच आहे. मुंबई शहराची परिस्थिती पाहता, सत्ताधारी पक्षांना देखील बकाल व बेहाल मुंबई. प्रत्येक ठिकाणी म्हणजे हाऊसिंग, नगरविकास, महसूल, आरोग्य, पशुवैद्यकीय विभाग असो किंवा अन्य विभाग असो, प्रत्येक विषयात मुंबईला कशाची आवश्यकता आहे व मुंबई कशी मागे आहे याचा केवळ पाढा या प्रस्तावामध्ये वाचलेला दिसत आहे.

अध्यक्ष महोदय, आपल्या इतिहासात, शास्त्रात एका पत्नीला पाच पती असा एक उल्लेख आहे. मुंबईचे हे दुर्भाग्य आहे. मुंबई शहराला किती पती आहेत ते पहा. मुंबई शहरामध्ये मुंबई महानगरपालिका प्लॅनिंग ऑथॉरिटी आहे, एमएमआरडीए प्लॅनिंग ऑथॉरिटी आहे, एसआरए प्लॅनिंग ऑथॉरिटी आहे, एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडिया प्लॅनिंग ऑथॉरिटी आहे, बीपीटी प्लॅनिंग ऑथॉरिटी आहे, त्यानंतर म्हाडा प्लॅनिंग ऑथॉरिटी आहे. एका मुंबई शहराला ७-७ प्लॅनिंग ऑथॉरिटी आहेत म्हणजे [***]. त्यामुळे मुंबई शहराबाबतचा कुठचाही निर्णय करावयाचा असेल मंत्री महोदय आपल्याकडे फार ...

डॉ.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, [***], या वाक्याला माझा आक्षेप आहे. ते कृपया रेकॉर्डवरुन काढून टाकावे. [***] ते वाईट वाक्य आहे. तेव्हा त्यांनी ते काढून टाकावे.

श्री.योगेश सागर : ठीक आहे, मी ते वाक्य मी मागे घेतो. मैंने [***] बोला है. क्या उसमें बुरा है?आप उसका अर्थ अलग लगाओगे, तो अलग बात है.आपके मन

---

*** आदेशानुसार विलोपित मजकूर.

श्री.योगेश सागर …

में अलग विचार होते होंगे, तो अलग बात है. हमारे मन में तो... [***].

**तालिका सभाध्यक्ष (श्री.संजय शिरसाट):** हा शब्द सभागृहाच्या कार्यवृत्तातून काढून टाकण्यात येईल.

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, हा काही असंसदीय शब्द नाही. आपापले विचार आहेत. आपण त्याबाबत निर्णय करु शकता. माझे काही म्हणणे नाही. मुंबई शहरामध्ये मुंबईच्या विकासाचा जेव्हा संदर्भ...(अडथळा)..

**तालिका सभाध्यक्ष** : अर्थ अनेक निघतात. आपण अर्थ काढत न बसता आपल्या विषयावर बोलावे.

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, [***] असते. अध्यक्ष महोदय, मी विषयावरच बोलत आहे. मंत्री महोदयांच्या मनात काही वेगळा विचार आला, [***] म्हटल्यावर ते लगेच बोलण्याकरिता उठले.

अध्यक्ष महोदय, ही मुंबईची परिस्थिती आहे. मुंबईच्या विकासाच्या संदर्भामध्ये मुंबई महापालिका असो, एमएमआरडीए असो, म्हाडा असो, एसआरए असो, कुठलीही एजन्सी मुंबईची काळजी करीत नाही. मी तुम्हाला परिस्थिती सांगतो. मुंबई म्हणजे एकेकाळी मुंबई महानगरपालिका असे एक चित्र होते. मुंबई म्हणजे मुंबईचा विकास म्हणजे मुंबई महानगरपालिका असे होते. आज काय परिस्थिती आहे? मी आज सकाळी या सभागृहात बोललो. त्यानंतर जी अधिकची माहिती मिळाली ती सांगत आहे. मुंबई महानगरपालिकेची अवस्था अशी आहे की, पोलीस विभागासाठी एमपीएससीच्या परीक्षा दिलेले किंवा उत्तीर्ण झालेले जे विद्यार्थी असतात ते पोलीसची नोकरी न करता महानगरपालिकेमध्ये असिस्टंट कमिशनर होण्याकरिता येतात. अध्यक्ष महोदय आपण देखील या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य आहात. एकेकाळी अबकारी जकात विभागात नोकरीसाठी, नोकरीच्या

*** आदेशानुसार विलोपित मजकूर.

श्री.योगेश सागर ....

पोस्टींगसाठी किती धावपळ व्हायची, परंतु एक्साईज डिपार्टमेंटचेही अधिकारी आता मुंबई महानगरपालिकेमध्ये पोस्टींगवर येतात. याचा अर्थ एक्साईज डिपार्टमेंटमध्ये काही कस नाही, पोलीस खात्यात देखील काही रस नाही. जो काही कस व रस आहे तो महानगरपालिकेमध्ये आहे, ही मुंबईची अवस्था आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील प्रभू सभागृहात उपस्थित नाहीत. या प्रस्तावाच्या विषयात असे नमूद केले आहे की, जुन्या इमारतीचा पुर्नविकास, फनेलचा परिसर असेल, इमारतींच्या ऊंचींच्या संदर्भातील प्रश्न, केवळ प्रलंबित प्रश्न, भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या इमारतींचा प्रश्न, एसआरएच्या पात्रता व एसआरएच्या रखडलेल्या पुनर्विकासाच्या प्रकल्पाचे प्रश्न, अकृषिक खर्च... ही मलमपट्टी आहे. जी आपण स्थगिती दिली आहे, त्याने आम्ही समाधानी नाही. ती मुंबईकरांसाठी मलमपट्टी आहे. त्यांचे प्रश्न, अकृषिक करांच्या वसुलीसाठी सोसायट्यांची, गृहनिर्माण संस्थांची बँक खाती गोठवणे, त्यांना लॉक करुन टाकणे, सील करुन टाकणे, नॉन ऑपरेशनल करुन टाकणे इथपर्यंत सरकारची मजल गेली आहे.

अध्यक्ष महोदय, म्हाडाच्या लेआऊटचे प्रश्न माननीय डॉ.जितेंद्र आव्हाड आपल्याला माहीत आहेत. म्हाडा लेआऊटसाठी रोज आपल्याकडे लोक डेलिगेशन घेऊन येत असतील. डेव्हलपमेंटचे असतील, म्हाडाचे सर्व्हीस टॅक्सेसच्या संदर्भातील असतील. म्हाडाच्या जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न, धारावीचा प्रश्न, बीडीडी चाळींचा प्रश्न....

नंतर श्री.शिंदे ...

श्री.योगेश सागर...

हे अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. मुंबई ही सोन्याचे अंडे देणारी कोंबडी आहे. या मुंबईच्या तोंडाला पाणी पुसण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या योजनांचा निधी वगळता मुंबई शहराला महाविकास आघाडी सरकारने काही दिले नाही. त्यामुळे हे सर्व प्रश्न निर्माण झाले असून सत्ताधारी आमदार महोदयांनाही ते मांडावे लागत आहे. यासंदर्भात काही तरी मार्ग काढण्यात यावा. मी या प्रकरणी सरकारला सकारात्मक सूचना करणार आहे. गृह निर्माण मंत्री महोदय व राज्यमंत्री महोदय सकारात्मक आहेत. ते सर्व विषयांचे उत्तर देतात.

अध्यक्ष महोदय, मुंबई उपनगरातील जुन्या इमारतींचे पुनर्विकास रखडले आहेत. त्यासंदर्भात या सभागृहामध्ये अशासकीय विधेयक सन्माननीय सदस्य श्री.पराग अळवणी यांनी मांडले होते. जुन्या इमारती केवळ मुंबई शहरात आहेत असे नसून उप नगरामध्येही आहेत. त्याबाबत उल्लेख करीत सन्माननीय सदस्य श्री.सुनिल प्रभू यांनी सांगितले की, उक्त विभागामध्ये सेस इमारतींसाठी म्हाडाचे रिपेअर बोर्ड उभारले आहेत. त्यामाध्यमातून इमारतींची रिपेअरींग व पुनर्बांधणी करण्यात येते. मात्र, उपनगरातील इमारतींसाठी अशी व्यवस्था करण्यात आली नाही.

अध्यक्ष महोदय, सन १९५७ मध्ये मुंबई उपनगर मुंबई शहरास जोडण्यात आले. त्यापूर्वी मुंबई शहराचा भाग वांद्रे ते कुलाबा व सायन ते कुलाबा एवढा होता. सन १९५७ पुर्वी मुंबई उप नगरांचा विकास झाला होता म्हणून ते मुंबई शहराला जोडण्यात आले. सन १९३८ पासून माझा परिवार मालाड येथे भाड्याच्या जी+२ कौलारुच्या इमारतीमध्ये राहत आहे. याचा अर्थ आमच्या भागामध्ये सन १९३८ पासून भाड्याच्या इमारती होत्या. ...(अडथळा).....

अध्यक्ष महोदय, मुंबई उपनगरातील रखडलेल्या इमारतींचा पुनर्विकास प्रकल्प या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.पराग अळवणी यांनी अशासकीय विधेयक मांडले होते. ज्या भाड्याच्या इमारती महानगरपालिकेच्या नोटीसच्या

श्री.योगेश सागर...

माध्यमातून मोडकळीस आलेली इमारत पाडण्यात येते. त्यानंतर त्याचा मालक तेथे नवीन इमारत बांधत नव्हता. त्यांना वाटत होते की, टेनन्सी राईट संपला आहे. आपण त्या भाडेकरुंना टेनन्सी ॲक्टच्या माध्यमातून संरक्षण दिले आहे. परंतु इमारत मालक इमारतच बांधत नव्हता त्यामुळे त्यांच्या राहण्याचा प्रश्न निर्माण झाला. याकरिता त्यांनी विधेयक आणले होते की, जी इमारत महानगरपालिकेच्या नोटीसच्या माध्यमातून तोडण्यात आली असेल तिचा पुनर्विकास एक वर्षाच्या आत इमारत मालकाने सुरु करुन ३ वर्षांच्या आत काम संपविले नाही तर Tenants should be entitled to develop their own houses. त्यांना कायद्यानुसार त्या ठिकाणी स्वत:चे घर बांधण्याचा अधिकार देण्यात आला होता. उक्त कायदा केल्यानंतर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये काही बदल करण्यात आला नाही. त्याचा आजपर्यंत कोणताही उल्लेख करण्यात आला नाही.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्येही भाड्याच्या ७ इमारती आहेत, त्या तोडल्या गेल्यामुळे त्यामधील भाडोत्रींना बाहेर जाऊन रहावे लागत आहे. मंत्री महोदयांनी या विषयाच्या संदर्भात मुंबई शहरातील सर्व आमदार महोदयांना सोबत घेऊन एक बैठक घ्यावी. त्यामध्ये या सभागृहाने मंजूर केलेला कायदा त्या भाडेकरुंना उपयोगी पडेल यादृष्टीकोनातून उपाययोजना निश्चित करण्याची आवश्यकता आहे. तसेच विकास नियंत्रण नियमावलीत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. त्या शिवाय हा प्रश्न सुटणार नाही.

अध्यक्ष महोदय, सन १९९१ मध्ये विकास नियंत्रण नियमावली लागू झाली आहे व विकास आराखडा लागू झाला. सन १९६७ मध्ये नियोजन सुरु करण्यात आले होते. त्यास सन १९९१ मध्ये मंजुरी मिळाली. सन १९९१-९२ पासून विकास आराखडा लागू झाला. त्यापूर्वी ज्या ठिकाणी टाऊन प्लॅनिंग इंप्लिमेंट झाले नाही तेथे झोपडपट्ट्या झाल्या होत्या, महानगरपालिकेला टाऊन प्लॅनिंगची जागा रिकामी

श्री.योगेश सागर...

करुन घेणे बंधनकारक होते. ज्या ठिकाणी टाऊन प्लॅनिंग झाले नाही त्या भागामध्ये झोपडपट्ट्या निर्माण झाल्या. ज्या ठिकाणी टाऊन प्लनिंग नव्हते, तेथे महानगरपालिका अस्तित्वात येण्यापूर्वी व टीडीआर संकल्पना नव्हती तोपर्यंत छोटा किंवा मोठा रस्ता असला तरी प्लॉट साईजनुसार कन्झ्युमेबल एफएसआय देण्यात येत होता. आता रस्त्याची लांबी, रुंदीची मर्यादा घालून टीडीआर देण्याचा निर्णय घेण्यात आला.

अध्यक्ष महोदय, यासंदर्भात ज्यांनी राईट ऑफ वे घेतला असेल अशा इमारतींच्या संदर्भात, रोडच्या संदर्भात काही उल्लेख नाही. ज्या ठिकाणच्या संदर्भात उल्लेख आहे तेथे ५० मीटर जागा दिली आहे. ज्या ठिकाणी राईट ऑफ वे च्या माध्यमातून इमारती उभारल्या त्यांचा पुनर्विकास झाला नाही तर त्यांची दुर्दशा सुरुच राहणार आहे. या संदर्भात शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहराचा व उपनगरांचा पुनर्विकास करीत असताना ३३(७)(अे) लागू केल्यानंतर त्याच्या डीसीआरसाठी ज्या नियमावली आहेत त्यात सुधारणा करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, एअरपोर्ट फनेलचा विषय अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. त्यासंदर्भात एक समिती गठीत करण्यात आली होती. तिच्यामध्ये एकाही जनप्रतिनिधीला सदस्य म्हणून घेण्यात आले नाही. याप्रकरणी अधिकारी त्यांना सोईस्कर असेल त्याप्रमाणे कार्यालयात बसून आखणी करीत आहेत. एअरपोर्ट अथॉरिटीच्या लोकांकडून एनओसी देण्यात येत होती. परंतु आता याप्रकरणी देखील खाजगीकरण करण्यात आले आहे. यासर्व दृष्टीकोनातून ज्यांच्या सोसायटी फनेलमध्ये येतात त्यांचे काही प्रतिनिधी सोबत घेऊन या विषयावर तोडगा काढण्याची आवश्यकता आहे.

श्री.योगेश सागर...

अध्यक्ष महोदय, या प्रस्तावात नमूद फनेलच्या संदर्भात शासन जाहिरात काढणार आहे. ही जाहिरात फसवी राहणार आहे. त्या भागातील स्टेकहोल्डर्स व रहिवासी यांना सोबत न घेता जाहिरात काढल्यास मोठा इश्यू होणार आहे. It will not be fruitful. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार व सन्माननीय सदस्य श्री.पराग अळवणी फनेलच्या संदर्भात त्यांचे विचार सविस्तर सांगतील. सर्व स्टेकहोल्डर्स यांचे म्हणणे शासनाने ऐकून घेतले पाहिजे. आतापर्यंत त्यांच्याकडून हरकती व सूचना मागवून त्यांना मुख्य अभियंता, महानगरपालिका यांच्या स्तरावरुन सुनावण्या घेतल्या व त्यानंतर जो निर्णय घ्यावयाचा होता तो घेण्यात आला. आता शासन जी जाहिरात काढणार आहे त्यामध्ये स्टेकहोल्डर्सच्या एकाही गोष्टीचा उल्लेख राहणार नाही. हे मी जाहिरात येण्यापूर्वीच सांगतो. ज्यांनी रोड विडथ् करिता राईट ऑफ वे घेतला असेल, त्यांना ॲक्सेस केवळ त्या इमारती पुरता असेल. त्यांच्या संदर्भात विचार करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अतुल भातकळकर यांनी सांगितले की, मुंबई शहरातील २२ हजार इमारती भोगवटा प्रमाणपत्र व ताबा प्रमाणपत्र नसलेल्या आहेत. यासंदर्भात निर्णय घ्यावयाचा असेल तर महसूल, गृहनिर्माण, सहकार, नगरविकास विभाग यांना एकत्रित बसून विचार करावा लागणार आहे. विकासक इमारत बांधून जातात. त्यांनी परमिसेबल, अनपरमिसेबल, विना सीसी इमारती बांधल्या आहेत. आता फंजीबलचा कायदा आला आहे. हा कायदा नसताना वॉशिंग प्लेस, लिफ्टचा एरिया, फ्लॉवर बेडचा एरिया यांच्या मोजमापासह पैसे आकारुन विकासक सदनिका विक्री करुन निघून गेले आहेत. त्यावेळी रेरा नव्हता व कोणाचे नियंत्रण नव्हते. आज त्या इमारतीमधील लोकांना पाण्याचा दुप्पट कर भरावा लागत आहे. त्यांना मालमत्ता करामध्ये कोणतीही सवलत मिळत नाही. त्यांना सिव्हरेज टॅक्स, वॉटर टॅक्स, सिव्हर चार्जेस दुप्पट दराने भरावे लागतात.

श्री.योगेश सागर...

अध्यक्ष महोदय, नॉन-ऑक्युपेशन व ऑक्युपेशन प्रमाणपत्रामध्ये ज्यांचे भोगवटा प्रमाणपत्र नाहीत त्यांना सरसकट माफी दिली पाहिजे. कारण ते मुंबई शहराचे निवासी आहेत, महानगरपालिकेला कर देणारे करदाते आहेत. त्यांच्यासाठी ताबा प्रमाणपत्रासाठीची नियमावली कितीही शिथील केली तरी मार्ग निघणार नाही.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

श्री.योगेश सागर......

ज्यांनी एफएसआयचे उल्लंघन केले नाही, फंजीबलमध्ये जो एरिया बसत आहे, त्यांना फंजीबलचा चार्ज लावण्यात यावा. त्यामुळे राज्य शासनाला व महानगरपालिकेला उत्पन्न मिळेल आणि संबंधितांना ऑक्युपेशन सटिफिकेट मिळणार. अशा पद्धतीने कार्यवाही केली परत आपणास अधिकारी सांगतील की, "आज के रेट के हिसाब फंजिबल का रेट लगाओ." सन १९९५ मध्ये इमारत बांधली असेल आणि त्या इमारतीला सन २०२२ मधील फंजीबलचा दर लावला तर ते चालणार नाही. मानवतेच्या दृष्टीकोनातून ज्या वेळी पाण्याचे कनेक्शन देण्यात आले त्या दिवशी जो दर असेल तोच दर लावून त्यांना फंजिबल व्हॅल्युएशन करून दिली पाहिजे. तरच हा प्रश्न सुटेल. माननीय श्री.प्राजक्त तनपुरे यांच्याकडून आमच्या फार मोठ्या अपेक्षा आहेत. कारण दुसरे सर्व सिझन्ड मंत्री झालेले आहेत. कुछ नहीं सुनना. इधर से सुनना और इधर से निकाल देना. क्या करना है, बात करन, अगली बार देखेंगे.

श्री.सदानंद सरवणकर : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, काही तांत्रिक अडचणींमुळे अनेक इमारतींना ओसी देण्यात आली नाही, ही वस्तुस्थिती आहे. मात्र अनेक इमारतींचे जे विकासक आहेत त्यांनी ओसी घेतल्यानंतर सुद्धा किंवा इमारत बांधून पूर्ण झाल्यांनतर सुद्धा आपल्याला इतर सुविधांमार्फत FSI पुन्हा कधीतरी वाढविता येईल म्हणून कम्प्लीशन सर्टिफिकेट घ्यायचे नाही, अशा प्रकारचा ट्रेंड या लोकांमध्ये तयार झालेला आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्याना सांगू इच्छितो की, आपण आपल्या भाषणामध्ये हे सर्व मुद्दे मांडू शकता. त्यामुळे सन्माननीय सदस्य बोलत असताना आपण त्यावर हरकत घेऊ नका, अशी माझी सूचना आहे.

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, विकासकाने केलेल्या चुकांना भूर्दंड गाळाधारकांना, घरमालकांना बसला नाही पाहिजे. सरकारने या संदर्भात एक

श्री.योगेश सागर......

ॲम्नेस्टी स्कीम आणण्याची आवश्यकता आहे. असे न केल्यास सदर प्रश्न कायमचा कधीही सुटू शकणार नाही.

अध्यक्ष महोदय, माझ्यासारखा व्यक्ती जर न्यायालयात गेला की, ऑक्युपेशन सर्टीफीकेट नाही रेरा लागू नाही त्यामुळे इमारत अपूर्ण आहे. कम्प्लीशन सर्टिफिकेट ऑक्युपेशन नंतर मिळत असते. तर त्यांना त्याच इमारतीसाठी अमेंडमेंट प्लान टाकून सगळ्या बाबी नियमित करून घेता येऊ शकतात. पण हा मार्ग दाखविला तर महानगरपालिकेचे मोठे नुकसान होईल. त्याचसोबत सरकारचेही नुकसान होईल. त्यामुळे असे मार्ग दाखविणे योग्य होणार नाही. असे मार्ग दाखविले जावेत ज्यातून महापालिका आणि सरकार दोघांनाही उत्पन्न मिळेल.

अध्यक्ष महोदय, भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या इमारतींबाबत गृह निर्माण विभाग, नगर विकास विभाग, सहकार विभाग आणि महसूल विभाग यांनी एकत्रितरीत्या विचार केला तर यातून मार्ग निघू शकेल. सदर बाब आपण कधी करणार याचा उल्लेख उत्तरामध्ये करण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मुंबई शहराच्या ४० लाख झोपडपट्टीवासियांना पक्की घरे मिळाली पाहिजेत या उद्देशाने सन १९९५ मध्ये हिंदुहृदयसम्राट सन्माननीय बाळासाहेब ठाकरे यांनी एसआरए योजना आणली होती. सन १९९५ ते सन २०२२ पर्यंत चालू केलेली पण पूर्ण न झालेली योजना माझ्या क्षेत्रामध्ये चालू आहे. सदर योजना कशासाठी चालू आहे हेच कळत नाही. हे सरकार असो की आणखी कोणतेही सरकार असो रोजच्या रोज नवीन परिपत्रके काढण्यात येतात. या योजनेमध्ये सर्वात मोठा प्रश्न हा पात्रतेचा आहे. पात्रता निश्चित करण्याचे अधिकार एसआरएच्या अधिकाऱ्यांकडून काढून घेतलेले आहेत. त्या ठिकाणी उप उप जिल्हाधिकारी स्तरावरील अधिकारी एसआरएमध्ये नियुक्त केलेला आहे. गोर◌ेगाव, बोरिवली, दहिसर,चेंबुरमध्ये राहणाऱ्या माणसाला त्याची पात्रता सिद्ध करावयाची असेल तर

श्री.योगेश सागर......

असुधारित प्रत

त्या त्या विभागाच्या संबंधित अधिकाऱ्याकडे जाऊन पात्रतेसाठी अपील करावयाचे आहे.

अध्यक्ष महोदय, नियोजन विभागाची जागा कोणाची आहे? महानगरपालिकेची, म्हाडाची किंवा महसूल विभागाची असेल. ज्या विभागाची जागा असेल त्या विभागाकडेच अपिलीय अथॉरिटी देणे आवश्यक आहे. सर्व अधिकार स्वत: जवळ का ठेवत आहात ? एखाद्या अधिकाऱ्याने पात्रतेची यादी तयार केली असेल त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे अपिलीय अथॉरिटी दिली पाहिजे. किंवा त्यांच्या पेक्षाही वरिष्ठ अधिकाऱ्याकडे अपिलीय अथॉरिटी देण्यात यावी. म्हणजे दोन अधिकाऱ्यांकडे अपिलीय अथॉरिटी देण्यात यावी. असे न करता सर्व अधिकार स्वत: जवळ ठेवण्यात आलेले आहेत. एसआरएची सर्व व्यवस्था एसआरएच्या इमारतीमध्ये असतील पाहिजे. पात्रतेसाठी एका झोपडपट्टीमागे एक ते दीड लाख रुपये कशाला लागतात. याबाबतचे मी पुरावे देऊ शकेन. माझ्या विभागामध्ये ५५ ते ६० टक्के क्षेत्र झोपडपट्टीचे आहे. याबाबत मी आतापर्यंत जवळपास १०० तरी पत्रे दिलेली असतील. आतापर्यंत मी जेवढे अपील केलेले आहेत त्यापैकी एकही अपील फेटाळण्यात आलेली नाही. पात्रता मिळविण्यासाठी लोकांना दहा-दहा वर्षे फिरावे लागते आहे. सोसायटी वेगळा पैसा मागते तर SRA चे अधिकारी वेगळा पैसा मागतात. उप जिल्हाधिकारी यांचेकडे गेले तर त्यांचा कर्मचारी वर्ग आणि ते वेगळे पैसे मागतात. झोपडपट्टीवासियांना पक्के घर मिळवून देण्याची सरकारचीच मानसिकता नाही. याचाच अर्थ याबाबत सरकारचा हेतू योग्य नाही आहे. गरिबांसाठी भाषणे करावयाची, तळमळ दाखवावयाची पण गरिबांना पात्रता सिद्ध करण्यासाठी शेकडो वेळा चकरा मारल्याशिवाय तो पात्र होत नाही. यासाठी ज्या ज्या प्लानिंग अथॉरिटीच्या जागा असतील त्यांनाच पात्रता सिद्ध करण्याचे अधिकारी देण्यात यावेत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, सन २००५ साली राडो कन्स्ट्रक्शन कंपनीनी एक प्रकल्प घेतला होता, सदर प्रकल्प पूर्ण करून त्याने तो ठाकूर ग्रुपला विकला. ठाकूर ग्रुपने तो प्रकल्प रवि ग्रुपला विकला. रवि ग्रुपने सन २००७ पासून सन २०२२ पर्यंत

एकही पात्रता केलेली नाही. या प्रकल्पामध्ये मूळ ६०० झोपडपट्टया होत्या त्या आता जवळपास १८०० झोपडपट्टया झालेले आहेत. त्यामुळे आता हा प्रकल्प पूर्ण होऊच शकणार नाही. ३०० चौरस फुटाचे घर मिळणार आहे हे आता लोकांना कळून चेकले आहे. १०X१० की खोली, १०X१० का ग्राऊंड फ्लोर, १०X१० का पहला माला, १०X१० का दूसरा माला, १०० फूट, २०० फूट, ३०० फूट और १०० फूट का टेरेस. आसमान भी हमारा और जमीन भी हमारी. भाड़ में जाए ये सारे. मुंबई शहरामध्ये अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. मी फक्त दोन मजल्यापर्यंतची माहिती दिलेली आहे. काही जणांनी तर चार मजल्यापर्यंत बांधकाम केलेले आहे. असे केले तर मुंबई शहराचे काय होणार ? या बाबी कोण थांबविणार आहे? ४० लाख झोपडपट्टीवासियांपैकी इतक्या वर्षात केवळ १० ते १२ लाख लोकांनाच घरे देण्यात आलेली आहेत. उर्वरित झोपडपट्टीधारक संख्येने कमी राहायला पाहिजेत पण शिल्लक मात्र ७० लाख लोक राहिलेले आहेत. म्हणजेच आतापर्यंत ३० लाख लोक वाढलेले आहेत. झोपडपट्टया वाढल्या आहेत की, लोक वाढले, हे कोणालाही माहिती नाही. हे कुठेतरी थांबविण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, एसआरएमध्ये जाहीर न केलेली दरपत्रके आहेत, ती आपल्याला दिसत नाहीत. पैसे घेऊन सर्व कामे केली जातात. कोणत्या टेबला कोणते काम होईल व त्यासाठी किती पैसे लागतील, हे सर्व लिहून ठेवलेले आहे. पैशाशिवाय काहीही होत नाही. एसआरए प्लानिंग अथॉरिटी आहे, त्यांची स्वतंत्र व्यवस्था आहे तर म्हाडाचे, महानगरपालिकेचे अधिकारी का उसने घेतले जातात? आपल्याकडे MMRDA सारखी परिस्थिती नाही आहे. त्यांना तरी प्रकल्प करावयाचे आहेत. आपल्याला कोणतेही प्रकल्प करावयाचे नाही आहेत. प्रकल्प करण्याचे काम विकासकाचे आहे त्यामुळे आपण आपला स्वतंत्र कर्मचारी वर्ग नेमला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, एसआरएमध्ये पोस्टिंग मिळविण्यासाठी ५-५ कोटी रुपये लागतात. रुजू झाल्यावर तो काय करणार ? एसआरएसाठी स्वतंत्र कर्मचारी वर्ग नेमला जावा अधिकारी उसनवारीने घेतले जाऊ नयेत, अशी मंत्री महोदयांना माझी विनंती आहे. उसने घेतलेले अधिकारी जात नाहीत, गेलेच तर लगेच परत येतात.

अग्रथमित प्रत

श्री.योगेश सागर......

एसआरएमध्ये किती अधिकारी केव्हापासून नियुक्त केले आहेत व त्यांची बदली झाल्यानंतर ते किती दिवसांमध्ये परत आले आहेत, हे लिगल डिपार्टमेंट, इंजिनिअरींग डिपार्टमेंटपासून फायनान्स डिपार्टमेंटपर्यंतची सर्व माहिती मंत्री महोदयांनी माहिती घ्यावी.

अध्यक्ष महोदय, एसआरएसाठी अभय योजना आणली जाणार आहे. जे प्रकल्प रखडलेले आहेत त्या त्या कॉम्पीटंट अथॉरिटीला, संबंधित जमीन मालकाला किंवा ज्यांची जागा असेल त्यांना त्याबाबतचे टेंडर काढण्याची सूचना करावी.

यानंतर कुलकर्णी.......

असुधारित प्रत

श्री. योगेश सागर....

ज्यांचे घर २०० चौ.स्क्वेअर फुटाच्या आत आहे, त्यांना जे करावयाचे असेल ते त्यांना करु द्यावे. परंतु २०० चौ.स्क्वेअर फुटाच्या पुढील झोपड्यांचे टेंडर संबंधित प्राधिकरणाने काढलेच पाहिजे. दहा लाख रुपयांच्या वरचे काम असेल तर ते निविदेशिवाय दिले जात नाही. परंतु तिथे १०० कोटी, २०० कोटी, ५०० कोटी रुपयांच्या प्रकल्पांकरिता कोणत्याही प्रकारे निविदा काढली जात नाही. एकाने दुसऱ्याला, दुसऱ्याने तिसऱ्यास, तिसऱ्याने चौथ्यास काम दिले असते. ज्यांनी सन २००१ मध्ये कन्सेन्ट दिला असेल तो व्यक्ती सन २०२२ पर्यंतही झोपडपट्टीतच राहतो. परंतु ज्यांनी एलाओआयचा कन्सेंट किंवा परिशिष्ट घेतले असेल तो ५० लाख रुपयात १५ हजार फूट जागा, ५ कोटी रुपयात २० हजार फूट जागा अशा प्रकारचे धंदे करीत असतात. त्यामुळे यासंदर्भात संबंधित प्राधिकरणाने निविदा प्रक्रिया काढली पाहिजे. हे काम एसआरए ही प्लॅनिंग ॲथोरिटीचे आहे. एसआरएने ॲप्रुव्हल आणि मॉनिटरींगशिवाय काहीही करावयाचे नसते. सक्षम प्राधिकाऱ्याने निविदा काढल्याशिवाय ठराविक झोपड्यांच्या वर प्रोजेक्ट देता येणार नाही, अशी व्यवस्था केली तर एसआरएचा प्रकल्प मार्गी लागेल. अन्यथा स्व. बाळासाहेब ठाकरे यांचा आत्मा स्वर्गातून ओरडून सांगत असेल की, महाराष्ट्रात आणि मुंबई शहरामध्ये हे काय प्रकार सुरु आहेत ? सन १९९५ पासून आतापर्यंत १२ लाख लोकांना घरे दिली आहेत. आणखी ७० लाख लोकांना घरे द्यावयाची आहेत. यासाठी किती कालावधी लागणार आहे ? तोपर्यंत मुंबईची लोकसंख्या किती वाढेल ? याबाबत विचार करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, एसआरएच्या पात्रतेसंदर्भात शासनाने शिथिलता आणली आहे. पात्रतेची जबाबदारी सोसायटीची आणि विकासकाची असली तरी ज्या सक्षम प्राधिकाऱ्याने परिशिष्ट – २ दिले असेल त्यालाच पात्रता अंतिम करण्याचे अधिकार दिले पाहिजे. उप जिल्हाधिकारी स्तरावर पात्रता अंतिम करण्यासाठी का घेतली जाते ? जिल्हाधिकारी कार्यालयाची जमीन असेल तर जिल्हाधिकारी यांनी पात्रता अंतिम करावी. अन्यथा ज्यांची जमीन असेल त्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी ही पात्रता अंतिम

असुधारित प्रत

श्री. योगेश सागर....

केली पाहिजे. रखडलेल्या प्रकल्पामध्ये कोणत्याही प्रकारे अभय योजना किंवा क्षमापित योजना विकासकाच्या हितासाठी केली तर मुंबई शहरात रान पेटेल. या योजना विकासकाच्या हितासाठी केल्यानंतर मुंबईकर गप्प बसणार नाही आणि झोपडपट्टीवासी बांधव माहविकास आघाडीला सोडणार नाही. त्यामुळे अशा अभय योजनांमध्ये झोपडपट्टीधारकाचा विचार केला पाहिजे. ज्यावेळेस माननीय श्री. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना पहिल्या मजल्याच्या झोपडपट्टीधारकांना त्यांच्या पात्रता करण्याबाबत कायदा केला होता. सन २०११ पर्यंतच्या झोपडपट्टीधारकांना त्यांचे घर मिळण्यासाठी किती रक्कम घ्यावयाची याबाबत वाद होते. परंतु त्याचा अद्यापपर्यंत निकाल लागला नाही. पहिल्या मजल्यावरील झोपडपट्टीधारकांनासुद्धा सन २०११ च्या आरक्षणाचा लाभ मिळाला पाहिजे. यात आणखी एक तरतूद करावी. त्याला बांधकामाचे पैसे भरावे लागतील. प्रिमियमचे पैसेसुद्धा हफ्त्यांमध्ये आणि मूळ जमिनीच्या किंमतीपेक्षा कमी भरत असेल तर त्याचे पैसेही विकासकाने भरले पाहिजेत. कन्स्ट्रक्शन कॉस्ट विकासकाने भरली पाहिजे. तरच त्या विकासकाच्या कामाला मंजुरी मिळेल. याबाबतची घोषणा मंत्री महोदयांनी त्यांच्या भाषणात करावी.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांच्या लक्षवेधी सचूनेवर उत्तर देताना महसूल मंत्री महोदयांनी एनए टॅक्सबाबत स्थगिती दिली आहे. अकृषक कर लावण्यासाठी मुंबईमध्ये शेती होती काय ? ज्यावेळेस पहिल्यांदा जागा अकृषक होते, तेव्हा हा कर लागला पाहिजे. आजही सुरुवातीला १५ टक्के, ३ टक्के, ०.५ टक्के असे पेनल्टी आणि इंटरेस्टचे कॅलक्युलेशन केले आहे. जेव्हा ३ टक्के कर लागला होता तेव्हा त्या हिशेबाने पेनॉल्टी लावली आहे. आता ०.५ टक्के आहे. सुरुवातीला १५ टक्के कर होता. नंतर तो ३ टक्के, ०.५ टक्के झाला होता. हे सरसकट माफ केले पाहिजे. मी मागणी करतो की, इंडस्ट्रीयल आणि कमर्शिअल एरिया सोडून जेवढे रेसिडेन्शिल एरिया महाराष्ट्रात असतील व जेथे एमआरटीपी ॲक्ट ४२ अनुसार डीपी लागू असेल त्या त्या ठिकाणचा अकृषक कर सरसकट माफ झाला पाहिजे.

श्री. योगेश सागर....

इंडस्ट्रीअल आणि कमर्शिअल जागेला हा कर लावला तरी हरकत नाही. यातून सरकारला उत्पन्न मिळेल. अनेक ठिकाणी लोक मालमत्ता कर, घरपट्टी, नळपट्टी भरत असतात. असे असताना ते अकृषक कर कसा भरतील ? याबाबत माननीय महसूल मंत्र्यांना अवगत करावे किंवा अदृश्य गॅलरीत बसलेल्या अदृश्य अधिकाऱ्यांना सांगावे. परंतु आता त्या गॅलरीतील सर्वजण अदृश्य असल्याचे आहेत.

अध्यक्ष महोदय, माननीय सहकार मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यांच्याशी संबंधित विषयावर मी बोलणार आहे. गृहनिर्माण संस्थांचे बँक खाते कंट्रोल केले आहेत. त्यांना जर एनएची नोटीस गेली असेल तर त्या गृहनिर्माण संस्थांचे सिंकिंग फंड, मेंटेनन्स फंड, ईलेक्ट्रीक बिलाचे पैसे, नळपट्टीचे पैसे बँकेत भरले असतील तर आपले पैसे वसूल होईपर्यंत त्यांना तो पैसा वापरण्यास देऊ नये, अशा सूचना तहसिलदारांमार्फत सर्व बँकाना दिल्या आहेत. मला वाटते की, ही मोघलाई आहे. आपण माझ्याकडे पैसे मागत आहात. माझे आणि तुमचे पैशांसदर्भात काही वाद आहेत. सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य आपणाकडे मागील सहा महिन्यांपासून विनंती करीत आहेत. यासंदर्भात त्यांचे बँक खाते गोठविण्यात आले आहे. मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले पाहिजे की, ज्या ज्या ठिकाणी तहसिलदारांच्या मार्फत बँक खाते गोठविण्यात आले असतील ते तातडीने रद्द करण्यात येतील.

अध्यक्ष महोदय, म्हाडा म्हणजे दलालांचा अड्डा आहे. तेथे दलालांचा विळखा आहे. यहाँ देखो, वहां देखो, दलाल ही दलाल देखो. मैं छाती ठोककर कहता हूं कि मेरे जैसा व्यक्ति म्हाडा की इमारत में जाता है और अगर युनिफॉर्म नहीं है, तो मेरे पास भी आकर पूछते है कि आपको क्या काम है, आप कौन है, आपको क्या काम है? वह बताईए. आपका काम हो जाएगा. दूसरी बार आना नहीं पड़ेगा. अशी म्हाडाची परिस्थिती आहे. म्हाडाच्या सेवा शुल्काबाबत एकही व्यक्ती चॅलेंज करु शकत नाही. मी रोज याबाबत दहा व्हिडिओ आपणस देऊ शकतो. एकेक व्यक्ती कॅमेरामध्ये कितीवेळा आणि कोणत्या अधिकाऱ्यांच्या दालनात दिसतो, सायंकाळी

असुधारित प्रत

श्री. योगेश सागर....

कुठे बसतात, कुठे भेटतात याची सर्व माहिती मी देऊ शकतो. म्हाडा सर्व सामान्यांना घरे देण्यासाठी आहे. महानगरपालिका आणि म्हाडाचे ॲडजस्टमेंट बूक आहेत. क्योंकि महानगरपालिका को म्हाडा को पैसा देना है, म्हाडा को महानगरपालिका को कुछ पैसा देना है. सेवा शुल्कासंदर्भात म्हाडा कोणती सेवा देत असते ? सेवा शुल्काच्या नावे गृहनिर्माण संस्थांना लाखो रुपयांचे बिल दिले जाते. म्हाडाचा रेन्ट कलेक्टरही जात नाही. एखादा रोजाने काम करणारा सामान्य नागरीक असेल तर तो खाडा करुन शुल्काचा भरणा करण्यासाठी दिवसभर रांगेत उभा राहतो. असे असताना रेन्ट कलेक्टर दुपारी २.०० वाजेपर्यंत कार्यालयात येत नाहीत. अशा वेळेस तो येऊन सांगतो की, आज अमूक वसाहतीमधील रेन्ट जमा करण्यात येणार आहे. असे झाल्यावर रोजाने काम करणाऱ्या त्या व्यक्तीचा खाडा पडतो. त्या दिवशी तो उपाशी राहतो. परंतु यासाठी कोणतीही व्यवस्था नाही. ऑनलाईन पेमेंट गुगल पे द्वारे करावे. माननीय श्री धीरुभाई अंबानी के बच्चों से सीखना चाहिए कि पैसा कैसा लेना चाहिए. "कर ले दुनिया मुठ्ठी में" आपके हक का पैसा गुगल पे पर लेने में आपको, म्हाडा को क्या प्रॉब्लम है? लेकिन नहीं करेंगे ऑनलाईन. नेशनलाईज बैंक में म्हाडा के नाम से खाता खोलो. जिसको पैसा भरना है वह सीधा बैंक में चेक भर देगा. चेक के पीछे नाम लिख दो. सोसायटी का नाम लिख दो, घर का नाम, घर नंबर लिख दो, वसाहत का नाम लिख दो. हो गया पेमेंट. कुछ तो किजिए. लेकिन कुछ नहीं करेंगे. लोगों को किस तरह से परेशानी होगी, इस तरह से ये सब चल रहा है.

यानंतर श्री. चौधरी....

श्री.योगेश सागर.....

लोक कसे कंटाळतील हे पाहिले जात आहे. म्हाडाच्या थकीत सेवा शुल्काच्या संदर्भात मंत्री महोदयांनी एक बैठक आयोजित करावी, अशी माझी विनंती आहे. म्हाडा काय सेवा देते आणि त्याबदल्यात किती शुल्क आकारते याचा एकदा सोक्षमोक्ष लागू द्या. असे केल्यास आपल्याला हजारो परिवारांचे आशीर्वाद मिळतील. अर्थात, मते मिळतील किंवा कसे तो नंतरचा विषय आहे परंतु आशीर्वाद नक्की मिळतील.

अध्यक्ष महोदय, म्हाडाच्या आरक्षित प्लॉटस् ची जबाबदारी देखील म्हाडाचीच आहे. माझ्या माहितीप्रमाणे म्हाडाकडे मोठया प्रमाणात ठेवी आहेत. पैशांची कमी नाही. मुंबई महानगरपालिकेकडे ९२ हजार कोटी रुपयांच्या ठेवी असल्याचे मला माहिती आहे. म्हाडाकडे देखील ३५ हजार ते ३८ हजार कोटी रुपयांच्या आसपास ठेवी आहेत. म्हाडाच्या प्रॉपर्टीज संरक्षित करुन त्यावर आरक्षणानुसार कामे होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. म्हाडाच्या जागेला संरक्षित करुन संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडे सोपविण्यासाठी मंत्री महोदयांनी पुढाकार घेतला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, म्हाडाची ही दशा केवळ मुंबई शहरातच आहे असे नाही. पुणे, नागपूर, औरंगाबाद अशा ज्या-ज्या ठिकाणी म्हाडा आहे तेथील म्हाडाच्या जुन्या इमारतींचा पुनर्विकास होणे गरजेचे आहे. या इमारतींना कोणीही वाली नाही, धनी नाही. म्हाडाच्या या जीर्ण इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी त्या-त्या ठिकाणच्या सन्माननीय सदस्यांसोबत बैठका घ्याव्यात व पुनर्विकासात येणाऱ्या अडचणी दूर कराव्यात अशी या निमित्ताने मी आपणास विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी महसूल विभागाचे मंत्री महोदय उपस्थित नाहीत. वर्ग-२ च्या जमिनी वर्ग-१ करण्याबाबतचा माझा मुद्दा आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या... (अडथळा...) अध्यक्ष महोदय, हवे तर मी ऑन लेग राहतो. उद्या सकाळी ०८.०० देखील यायला मी तयार आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आता सर्वांना जाण्याची घाई आहे. उद्या सकाळी ०९.०० वाजता आपण सभागृहाची विशेष बैठक घेणार आहोत. त्यावेळी या प्रस्तावावर देखील चर्चा घेण्यात येणार आहे.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, माझी विनंती आहे की, ०८.०० वाजता सभागृहाची बैठक स्थगित करावी. आता ०७.३० वाजेपर्यंत सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर हे बोलतील. त्यानंतर पुढील १५ मिनिटे सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र वायकर व त्यानंतर...(अडथळा...) माननीय संसदीय कार्यमंत्र्यांना जायचे असल्याबाबत त्यांनी मला सांगितले आहे व ते आम्हाला मान्य आहे. माझी अशी विनंती आहे की, आपण ०८.०० वाजेपर्यंत सभागृहाची बैठक सुरु ठेऊ. सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर ०७.३० पर्यंत बोलतील. त्यानंतर सत्ताधारी पक्षाचे एक सन्माननीय सदस्य व सन्माननीय सदस्य ॲड.पराग अळवणी १५-१५ मिनिटे बोलतील. उर्वरित चर्चा उद्या घेऊ.

ॲड.अनिल परब : अध्यक्ष महोदय, सकाळी झालेल्या बैठकीत असे ठरले होते की, आज इतर कामकाज संपल्यानंतर आज हा प्रस्ताव सुरु करण्यात येईल. उद्या सकाळी ०९.०० ते १०.०० दरम्यान लक्षवेधी सूचना, १०.०० ते १०.४५ दरम्यान चार विधेयके घेण्यात येतील, त्यानंतर नियमित बैठक सुरु होऊन प्रश्नोत्तरांचा तास होईल. त्यानंतर लेइंग व चार किंवा पाच लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. दुपारी ०१.०० वाजता या प्रस्तावावर पुन्हा चर्चा सुरु करण्यात येईल. कारण ०४.०० वाजता अंतिम आठवडा प्रस्ताव सुरु केला जाणार आहे. दुपारी ०१.०० ते ०४.०० दरम्यान या प्रस्तावावर चर्चा आणि मंत्र्यांचे उत्तर होईल. हवे तर आता आमच्या पक्षाचे कोणीही सन्माननीय सदस्य बोलणार नाहीत. आपल्या पक्षाच्या ज्या सन्माननीय सदस्यांना बोलायचे असेल त्यांनी ०८.०० वाजेपर्यंत बोलावे.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, तसे असेल तर ०९.०० वाजेपर्यंत सभागृहाची बैठक सुरु ठेवावी. आमच्या पक्षातील सन्माननीय सदस्य बोलतील.

असुधारित प्रत

ॲड.अनिल परब : अध्यक्ष महोदय, ठीक आहे. आमची देखील तयारी आहे. परंतु उद्या सकाळी केवळ शिवसेना पक्षाचे सन्माननीय सदस्य बोलतील.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांचे म्हणणे आम्हाला मान्य आहे. आता त्यांना महत्त्वाची बैठक असल्यामुळे ते जाणार असतील तर आमची हरकत नाही. या प्रस्तावावर आणखी १२ सन्माननीय सदस्य बोलणार आहेत. आपण सांगितलेल्या वेळेत उद्या १२ सन्माननीय सदस्यांची भाषणे व माननीय मंत्र्यांचे उत्तर होणार नाही. त्यामुळे आम्ही आज ०९.०० वाजेपर्यंत थांबायला तयार आहोत.

ॲड.अनिल परब : ठीक आहे.

श्री अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, हमारे पार्टी की बैठक है. मैं और सम्माननीय सदस्य श्री झीशान सिद्दीकी जी यहां पर बैठे है. मैंने सम्माननीय सदस्य श्री योगेश सागर जी से विनती की थी कि मैं अपना भाषण करके चला जाता हूं. उन्होंने कहा था कि ठीक है. हमारी पार्टी की तरफ से हम दो ही सदस्य बोलने वाले है. मैं और सम्माननीय सदस्य श्री झीशान सिद्दीकी जी बोलेंगे.

**तालिका सभाध्यक्ष** : लेकिन अभी संसदीय कार्य मंत्री महोदय ने आपको विनती की है. जिस तरह से कामकाज करना तय हुआ है, कल भी अपने पास तीन घंटे का समय है, यदि आपको बोलना है तो आप दस मिनट बोल दीजिए. आपको बोलने के लिए आधे घंटे का समय चाहिए, तो कल आप आगे बोल सकते है.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी देखील हे मान्य केले आहे की, आज सभागृहाचे कामकाज ०९.०० वाजेपर्यंत चालवावे. या वेळेत काँग्रेस आणि भारतीय जनता पक्षाच्या शक्य तेवढया सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी. शिवसेना पक्षाचे सन्माननीय सदस्य आता उपस्थित नसतील. त्यामुळे कोणत्या पक्षाचा किती वेळ शिल्लक आहे ते उद्या सकाळी आपण पाहून उरलेल्या वेळेचे वाटप करु.

ॲड.अनिल परब : अध्यक्ष महोदय, जर उद्या दुपारी ०४.०० वाजता अंतिम आठवडा प्रस्ताव सुरु करायचा असेल तर विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना उद्या या प्रस्तावावर कमी बोलावे लागेल.

ॲड.आशिष शेलार : उद्या दुपारी ०१.०० ते ०४.०० दरम्यानचा जो वेळ आमच्या वाटयाला येईल तेवढाच वेळ आमचे सन्माननीय सदस्य बोलतील.

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, सभागृहाच्या कामकाजाबाबत ०७.१८ वाजता चर्चा सुरु झाली होती, आता ०७.२९ झाले आहेत. त्यामुळे माझी ही वाया गेलेली वेळ मला पुढे वाढवून देण्यात यावी, ही विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मी या ठिकाणी एकही मुद्दा राजकीय अभिनिवेशातून मांडलेला नाही. मुंबई शहरातील वर्ग-२ च्या जमिनी जिल्हाधिकारी यांनी गृहनिर्माण संस्था आणि लोकांना दिल्या होत्या. त्यांना वर्ग-१ मध्ये करण्याबाबतचा माझा विषय आहे. अध्यक्ष महोदय, दुर्दैवाची बाब म्हणजे मी हे बोलत असताना माननीय महसूल मंत्री सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. मुंबई शहरामध्ये हे अधिवेशन होत आहे. महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पामध्ये सर्वाधिक वाटा मुंबई शहर देते परंतु या शहराच्या प्रश्नांबाबत चर्चा सुरु असताना माननीय नगरविकास मंत्री व माननीय महसूल मंत्री देखील सभागृहामध्ये उपस्थित नाहीत.

यानंतर श्री.धुमाळे.....

श्री. योगेश सागर...

हे मुंबई शहराचे हे दुर्भाग्य आहे. असा एकाही प्रश्न नाही की, महाविकास आघाडी सरकारकडे त्या प्रश्नाचे उत्तर नाही. म्हणून महाविकास आघाडी सरकारच्या सत्ताधारी पक्षाने नियम २९३ च्या प्रस्तावामध्ये केवळ प्रश्न मांडले आहेत. एकही शाब्बासकी देण्यासारखे काम दाखविले नाही. मुंबई शहरासाठी अमुक योजना लागू केली, मुंबई शहराला हे मिळाले. एकही वस्तू नाही. केवळ मागण्या, मागण्या आणि मागण्या आहेत.

अध्यक्ष महोदय, राज्यातील वर्ग २ च्या ज्या जमिनी वर्ग १ मध्ये रुपांतरित करण्यासाठी मागच्या सरकारने निर्णय घेतला होता. हे सरकार सत्तेवर आल्यानंतर त्याने मागच्या सरकारच्या काळातील सर्व निर्णयांना स्थगिती दिली आहे. १ महिना, २ महिने, ३ महिने, ४ महिने झाले. त्यानंतर सरकारच्या लक्षात आले की, ही स्थगिती काही कामाची नाही. यामधून तर आपल्याला महसूल मिळणार आहे, आपल्याला त्यातून उत्पन्न मिळणार आहे. म्हणून ही स्थगिती उठवायची. पण यामध्ये ४ महिने वाया गेले. ३ वर्षासाठी ती योजना होती. दिनांक ८ मार्च २०२२ पर्यंत ती योजना होती. आता त्या योजनेला मुदतवाढ देण्याची आवश्यकता आहे. कारण सामान्य चाकरमान्यांनी सोसायटी बनवून शासनाच्या वर्ग २ च्या जमिनी घेतल्या आहेत. त्यांना पुनर्विकास करण्यासाठी सरकारकडे जेव्हा यावे लागेल तेव्हा बिल्डर त्यांची संमती घेऊन त्यांची गळचेपी करतील. यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होईल आणि सरकारला यामधून उत्पन्न मिळणार नाही. मागील २ वर्षे कोरोना काळात गेले. म्हणून महसूल मंत्री महोदयांनी याबाबत उत्तर देताना स्पष्टपणे सांगितले पाहिजे की, वर्ग-२ च्या जमिनी वर्ग-१ मध्ये रुपांतरित करण्यासाठी संपलेली मुदत ही पुढील १ वर्ष वाढविण्यात येत आहे. शासनाने यासंबंधी जी रक्कम ठरविली आहे त्यामधून त्यांच्या इमारतीचा पुनर्विकास होत असेल तर या योजनेला १ वर्ष मुदतवाढ देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरामध्ये विमानतळ प्राधिकरणाच्या अनेक जागा आहे. आपण एचडीआयएलच्या माध्यमातून त्यांचा पुनर्विकास करुन त्यांचे पुनर्वसन

श्री. योगेश सागर...

करण्याची व्यवस्था केली. मागच्या सरकारच्या काळात निर्णय घेतला गेला की विमानतळा प्राधिकरणाच्या जागेवरील लोकांचे पुनर्वसन तेथेच केले जाईल. या मुद्यावर सर्व पक्षाचे एकमत होते. यामध्ये कोणाचेही दुमत नव्हते म्हणून आपण तो निर्णय केला होता. बीपीटीच्या जागांवर असलेल्या झोपड्यांबाबत बीपीटी स्वत: निर्णय करते. ते स्वत: प्लॅनिंग ॲथॉरिटी आहेत आणि म्हणून त्यांना आपली गरज नाही. बीपीटी त्यांची व्यवस्था करते. रेल्वे ही मुंबई शहरात प्लॅनिंग ॲथॉरिटी नाही. त्यामुळे सरकारने याची जबाबदारी घेण्याची आवश्यकता आहे. रेल्वेच्या जागेवर जे लोक असतील त्यांचा पुनर्विकास झाला पाहिजे. आपण रेल्वेला टीडीआर द्या. त्याबद्दल आम्हाला काही अडचण नाही. त्यांना मार्केटमध्ये विकण्याची मुभा द्या. रेल्वेला त्याचा मोबदला द्या आणि रेल्वेच्या जागेवरील झोपडपट्टीवासियांना प्रकल्पग्रस्त न मोजता त्यांना झोपडपट्टी सुधार योजनेचे फायदे दिले पाहिजेत. त्यामुळे रेल्वेच्या जागेवरील लोकांना सुध्दा पुनर्वसन प्रकल्पामध्ये समाविष्ट करण्याची आवश्यकता आहे. रेल्वे विभाग जर आपल्याला त्याबाबत काही मदत करीत नसेल आणि रेल्वेची त्या बाबतीत काही वेगळी धोरणे असतील तरी देखील आम्ही आपल्याला जी मदत करणे शक्य असेल ती सर्व मदत करण्यास आम्ही तयार आहोत. पण त्या रेल्वेच्या जमिनीवरील लोकांना वाली म्हणून राज्याचे शासन नाही तर दुसरे कोण असेल ? कारण ते लोक महाराष्ट्रात १०, २०, २५, ५०, आणि ६० वर्षापासून राहतात. त्यांनी काय माहिती असेल की, ही जागा रेल्वेची आहे.

अध्यक्ष महोदय, आपण त्यांना रेशनकार्ड दिले, आधारकार्ड दिले, औषधे दिले, आपल्या रुग्णालयांच्या सुविधा दिल्या, महापालिकेच्या शाळांमध्ये ते शिकले आहेत. आता त्यांना असे सांगणार काय की आपण येथून बाहेर जावे. त्यामुळे त्यांच्या बाबतीत विचार करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, शेवटचा मुद्दा मी मांडतो. मुंबई शहरामध्ये जेवढ्या प्लॅनिंग ॲथॉरिटी आहेत, मग त्यामध्ये बीएमसी, म्हाडा, एमएमआरडीए, एसआरए, एअरपोर्ट ॲथॉरिटी, बीपीटी, एमआयडीसी आणि सीओडी, म्हणजे संरक्षण

श्री. योगेश सागर...

विभागाच्या जमिनी असतील तो विभाग, अशा सर्व ॲथॉरिटींचे एक संकलन समिती करा. माननीय मुख्यमंत्र्यांना या समितीचे अध्यक्ष करा. या प्लॅनिंग ॲथॉरिटीचे जे प्रमुख असतील, मग त्यामध्ये महापालिकेचे आयुक्त, एमएमआरडीएचे आयुक्त, एसआरएचे सीईओ या सर्वांना त्या समितीचे सदस्य करा आणि मुंबईचे एकत्रित नियोजन करताना त्यावर या सर्व प्लॅनिंग ॲथॉरिटीची सहमती करुन मुंबई शहराचा पुढील ५० वर्षाच्या विकासाचे नियोजन केले तर मुंबई वाचू शकेल. अन्यथा ही मुंबई वाचू शकणार नाही. ही मुंबई बकाल केली आहे.

अध्यक्ष महोदय, या मुंबई शहरामध्ये राहताना माझ्या परिवाराला ११० वर्षे पूर्ण झाली आहेत. "I am first Maharastrian then Gujarati". ही मुंबई माझी आई आहे. "ये मुंबई मेरी माँ है. हम सभी को मिलकर इस मुंबई को बचाना है." आपल्या सर्वांना मिळून मुंबईला वाचवायचे आहे. त्यामुळे या मुंबईत जेवढ्या प्लॅनिंग ॲथॉरिटी आहेत त्यांच्या प्रमुखांची माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करा. मुंबईचे विकासाचे नियोजन असेल, एमएमआरडीएचे प्रकल्प असतील, एसआरएसंदर्भातील समस्या असतील, एअरपोर्ट ॲथॉरिटीच्या समस्या असतील, बीपीटीच्या समस्या असतील, म्हाडाच्या समस्या असतील तेव्हा हे सर्व मिळून निर्णय करतील. म्हणून माननीय मुख्यमंत्री यांच्या नेतृत्त्वाखाली अशी समिती गठीत करा, एवढे बोलून मी माझे बोलणे संपवितो. धन्यवाद.

-----------

असुधारित प्रत

श्री अमिन पटेल (मुंबादेवी) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम २९३ अन्वये द्वारा सदन के सामने पेश किए गए प्रस्ताव पर अपने विचार व्यक्त करने के लिए मैं खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, सन २००९ में जब हम जीत कर आए, उससे पहले महानगरपालिका में सम्माननीय सदस्य ॲड आशिष शेलार, सम्माननीय सदस्य श्री योगेश सागर जी या सम्माननीय सदस्य ॲड पराग अलवणी जी हो, सभी साथ में मिलकर मुंबई के विकास के बारे में महानगरपालिका में और उसके बाद इस सदन में हम लोग मुंबई की बात रखते रहे है.

अध्यक्ष महोदय, मुंबई में जिने का हर एक आदमी का सपना होता है. आज आसाम में यदि किसी को ऐसा लगता है कि मुझे बड़ा बनना है, तो उसके सामने पहला शहर मुंबई होता है. बिहार में यदि किसी को लगता है कि मुझे अपने परिवार के लिए कुछ करना है, कुछ पैसा कमाना है, तो उसको मुंबई की याद आती है. मुंबई एक ऐसी जगह है जो माँ है, जो अपने बच्चे को कभी भूखा सोने नहीं देती है. इस मुंबई में हम और यहाँ बैठे सभी लोगों ने अपना पूरा जीवन देखा है. मुंबई ने हर एक को अपनाया है. मुंबई में बहुत सारा विकास हुआ है. जब हम सन २००९ में जीत कर आए, तो तब यहाँ पर जो पुरानी इमारतों की बात थी, उसमें तीन कॅटेगरी का सेस था. "ए, बी, और सी" कॅटेगरी का सेस था. "ए" कॅटेगरी की इमारतों का पुनर्विकास करेंगे, तो कितना प्रतिशत मिलेगा, "ब" को इतना प्रतिशत और "सी" को इतना प्रतिशत मिलेगा. जब सम्माननीय सदस्य श्री पृथ्वीराज चव्हाण जी मुख्यमंत्री थे, तो उन्होंने "ए,बी,और सी" कॅटेगरी को मर्ज कर दिया. क्योंकि उस चीज के लिए कई साल हो चुके थे. पहले एक इमारत का पुनर्विकास करने का इन्सेन्टिव ५० प्रतिशत था और आज वह ७५ प्रतिशत इन्सेन्टिव है. दो से पांच इमारत होती थी तो उसका इन्सेन्टिवव ६० प्रतिशत था जो कि अब ८० प्रतिशत है. पांच इमारत के ऊपर जो ७० प्रतिशत था, उसके लिए ८५ प्रतिशत इन्सेन्टिव है.

श्री अमिन पटेल.....

अध्यक्ष महोदय, मुंबई में जो सबसे बड़ा का काम हुआ है वह यह है कि पहले जब कोई इमारत रिपेअर होती थी, तो उसमें १२० फूट का घर म्हाडा बनाती थी. रिहॅब में घर देना है तो वह १२० फूट का होता था. १२० फूट का १८० फूट हो गया. १८० फूट का २२५ फूट हो गया. २२५ फूट का ३०० फूट हो गया. आज ३५ प्रतिशत फंजिबल लाने के बाद यदि एक इमारत का पुनर्विकास होता है, तो उसको ४०५ फूट का घर मिल जाता है. १०० फूट के घर में जो लोग रहते है, उनको कम से कम ४०५ फूट के घर का आश्वासन सरकार ने दिया है, यह बहुत बड़ी बात है. यह बहुत बड़ी उपलब्धी है. यह लोगों के लिए राहत की बात है. अध्यक्ष महोदय, ३३(९) की स्कीम में भी जब वह शुरु हुआ तो ५५ प्रतिशत इन्सेन्टिव था, अब ९० प्रतिशत इन्सेन्टिव है. एक बहुत बड़ा निर्णय माननीय मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड जी के समय में हुआ. ३३(७) की जो स्कीम होती है, दो स्कीम क्लब करना है, तो उसके बारे में आपने एक ऐतिहासिक निर्णय लिया. उससे बहुत फायदा होता है. अब कहीं कहीं पर ३३(९) के अंतर्गत जो पुनर्विकास हो रहा है, जो ६०-७० माले की इमारत है, उसमें व्हेरी हाय डेन्सीटी हो रही है. मेरी बात से सम्माननीय सदस्य श्री मंगलप्रभात लोढा जी सहमत होंगे. इतनी बड़ी बड़ी इमारतों को मेन्टेन करने के लिए आगे जाकर सोसायटी पर बहुत भार आएगा. जिस तरह से ३३(७) की स्कीम को आपने क्लब करने का निर्णय लिया है, उसी तरह ३३(९) की स्कीम को भी क्लब करने के लिए परमिशन देनी चाहिए. उसके ऊपर जो बंधन रखना है वह बंधन आप रखिए. लेकिन ३३(९) की भी दो स्कीम को यदि क्लब करना चाहते है, तो उसके लिए भी क्लब करने की परमिशन होनी चाहिए. ३३(७) में "ए" कॅटेगरी की जो सेस की इमारत थी, उसको कोऑपरेटीव हाऊसिंग सोसायटी में कन्व्हर्ट करने का ऑप्शन दिया गया था. वहां पर जो लोग रहते थे, उन्होंने ३३(७) में "ए" कॅटेगरी की जो सेस इमारत थी, उसको उन्होंने कोऑपरेटीव हाऊसिंग सोसायटी में कन्व्हर्ट कर दिया. कन्व्हर्ट करने के बाद बाद आज उसको २.५ एफएसआई मिल रहा है. मेरी आपसे विनती है कि कोऑपरेटीव हाऊसिंग सोसायटी की जो पहले सेस इमारते थी, आप नॉर्मल स्थिति में ३ एफएसआई पुनर्विकास में देते है, तो उसमें भी ३ एफएसआई मिलना चाहिए, जो कि सेस इमारतों को मिल रहा है.

असुधारित प्रत

श्री अमिन पटेल....

पहले जो कोऑपरेटीव सोसायटी की इमारत थी, अब नॉन सेस करके कोऑपरेटीव हाऊसिंग सोसायटी बनी है, उनको ३३(७) के अंतर्गत जिस तरह से ३ एफएसआई की मर्यादा है, उसी तरह उन इमारतों के लिए ३ एफएसआई की मर्यादा होनी चाहिए.

अध्यक्ष महोदय, जब हम पुनर्विकास की बात करते है, तो जो रिहॅब है, जो रेसिडेंस उसको रेसिडेंस और कमर्शियल वाले को कमर्शियल के हिसाब से मिलना चाहिए. लेकिन जो इन्सेन्टिव्ह है, उस पर आपने रोक लगाकर रखी है. उसको इतना प्रतिशत ही कमर्शियल बना सकते है. जैसे कि ३३(७) में २० प्रतिशत का कॅप है और ३३(९) में ३०-५० प्रतिशत का कॅप है. यदि ३३(७) में भी कोई रिहॅब करता है, कमर्शियल एरिया है, तो उसके लिए भी जिस तरह से ३३(९) में ५० प्रतिशत का कॅप है, उसी तरह ३३(७) में भी कमर्शियल के लिए ५० प्रतिशत का कॅप होना चाहिए. ऐसा मेरा निवेदन है. आपको ये काम इस तरह से करना चाहिए.

अध्यक्ष महोदय, ये कुछ प्रपोजल है जो चेंजेंस के लिए मैंने मंत्री महोदय के सामने रखे है. मंत्री महोदय ने पिछले दिनों में बहुत ही ऐतिहासिक निर्णय लिए है. मुझे उम्मीद है कि ये निर्णय भी मंत्री महोदय जरुर लेंगे. मुझसे पहले सम्माननीय सदस्य श्री सुनिल प्रभू और सम्मानीय सदस्य श्री योगेश सागर जी ने अलग अलग मुद्दे पर विस्तार से बात की है. विशेषकर जो पुरानी इमारते है, इस पर कई बार चर्चा हो चुकी है. पिछले १२ सालों से इस पर चर्चा हो रही है. मैं यह कहना चाहता हूं कि मुंबई में कुछ इमारते अच्छी खासी तादाद में रिडेव्हपमेंट हुई है. मगर जो १६ हजार या १९ हजार पुरानी इमारतों की बात होती है, जिसमें सेस इमारते है, नॉन सेस इमारते है. बीएमसी, स्टेट या म्हाडा की प्रॉपर्टी है. पीएमजीपी की इमारते है, म्हाडा की रिपेअर की, कन्स्ट्रक्शन्स की इमारते है. ये जो इमारते है, इसका पुनर्विकास होना बहुत जरुरी है. हम यह बात करते है कि मुंबई में ६०-७० प्रतिशत स्लम है. मगर बाकी की मुंबई का जो सबसे बड़ा हिस्सा है, जो मुंबईकर का हिस्सा है, जिन्होंने मुंबई को बनाया, मुंबई को संवारा, जो मुंबई के लोग है, गिरगाव, भुलेश्वर, डोंगरी, नागपाड़ा, मदनपुरा या शिवडी में रहने वाले लोग हो, इन्होंने मुंबई को बनाया. इन्होंने अपनी छोटी छोटी

श्री अमिन पटेल....

खोली लेकर मुंबई में १००-२०० साल से रहते है, जैसे कि सम्माननीय सदस्य श्री योगेश सागर जी ने बताया कि हम ११० साल मालाड में उस इमारत में रहते थे, इसलिए मुंबई के जो लोग है, उनके लिए म्हाडा जो काम करती है, उसको और गति देने की जरुरत है. मेरी आपसे कोई शिकायत नहीं है. मगर डिपार्टमेंट से जरुर शिकायत है. मैं इस बात को जानता हूं की माननीय मंत्री महोदय नीचे से लेकर ऊपर तक का डिपार्टमेंट नहीं चला सकता. मगर मिनिस्टर, जो वॉच डॉग होता है, वह उसको बराबर देखकर, उसको चेंज कर सकता है.

अध्यक्ष महोदय, जैसे कि म्हाडा में कोई रिडेव्हलपमेंट होता है, तो उसमें एनओसी ली जाती है. एक आदमी अपना घर उस एनओसी को देखकर खाली करता है. म्हाडा ने इसको एनओसी दी है, ये डेव्हलपर है, ये इमारत बनाएगा. उसके बाद म्हाडा उसमें से म्हाडा हट जाती है. विधायकों की एक समिति बनी थी. उसमें हमने सजेशन दिया था. सम्माननीय प्रेसिडेंट साहब का नोट आना बाकी है, वह आने के बाद कानून बन जाएगा. लेकिन जब वह काम होता नहीं है, तब तक म्हाडा की जिम्मेदारी उन पुरानी इमारतों में रहने वाले टेनन्ट के लिए होनी चाहिए. बेशक वे लोग डेव्हलपर को अपनी सहमति देते है. मगर म्हाडा ने उनको एनओसी देने के बाद उनको ऐसा लगता है कि म्हाडा ने इस प्रोजेक्ट को, इस डेव्हलपर को बराबर समझ लिया है, इसलिए वह देते है. पुनर्विकास का जो भी प्रोजेक्ट, विशेषकर ३३(७) और ३३(९) के अंतर्गत होता है, उसमें म्हाडा की जिम्मेदारी घर की चाबी मिलने तक रहनी चाहिए. इस तरह का कानून होना बहुत जरुरी है.

अध्यक्ष महोदय, हमने ट्रान्झीट कॅम्प की बात की थी. आपने कहा था कि बहुत सारे ट्रान्झीट कॅम्प बनने वाले है. आपसे पहले भी जो गृहनिर्माण मंत्री रहे है, उन्होंने भी यह कहा है कि ट्रान्झीट कॅम्प बनने वाले है. लेकिन वह बने नहीं है. मेरी बार बार विनती है. मेरा एक काम था तो मैंने सम्माननीय सदस्य ॲड आशिष शेलार जी से कहा था, तो उन्होंने दिल्ली को फोन किया, एक घंटे में मेरा काम हो गया. इसी तरह कोविड के समय में मुझे एक काम था तो उसके लिए मैंने सम्माननीय सदस्य ॲड

श्री अमिन पटेल....

आशिष शेलार जी से कहा कि आप सम्माननीय मुख्यमंत्री ही से बात कीजिए, तो उन्होंने बात की और मेरा काम हो गया. विपक्ष के नेता सम्मानननीय श्री देवेंद्र फडणवीस जी से बात करेंगे तो वह अपना काम पांच मिनट में करके देंगे.

अध्यक्ष महोदय, मुंबई में, मुंबई शहर और मुंबई उपनगर के ट्रान्झीट कॅम्प के मसले को हल करना है, तो बीपीटी की जगह पर ट्रान्झीट कॅम्प बनाने के अलावा कोई रास्ता नहीं है. कम से कम ५० हजार ट्रान्झीट कॅम्प मुंबई शहर और मुंबई उपनगर के लिए बहुत जरुरी है. जब तक ये नहीं बनेंगे, पुरानी इमारतों और पुरानी चॉल के बारे में हम यहाँ पर चिल्लाते रहेंगे, १२ साल से चिल्लाते रहे, दस साल और चिल्लायेंगे, मगर जब तक ट्रान्झीट कॅम्प नहीं बनेंगे, इसके लिए जब तक व्यवस्था नहीं करके देंगे, तब तक इन पुरानी इमारतों का पुनर्विकास ना आप कर सके है, ना हम कर सकते है और ना ही सम्माननीय मंत्री ॲड जितेंद्र आव्हाड जी कर सकते है. इसलिए यह बहुत महत्व का मुद्दा है.

अध्यक्ष महोदय, जब हम पुरानी इमारतों की बात करते है और जब पीएमजीपी इमारतों की बात आती है, तो उस समय के प्रधान मंत्री सम्माननीय श्री राजीव गांधी जी ने १०० करोड़ रुपये इन इमारतों को बनाने के लिए दिया था. मगर उस समय नियम यह था कि १६०-१८० फूट के घर बनेंगे. उमरखाड़ी का हिस्सा मेरे मतदार क्षेत्र में आता है. वहां पर एक हजार घर है. वे सभी घर मेरे मराठी भाइयों के है. छोटे छोटे घरों में, १८० फूट के घरों में वे रहते है. उनको खेलने के लिए न कोई पार्क है और ना ही गाड़ी पार्क करने के लिए रास्ते पर जगह है. उन इमारतों का पुनर्विकास का प्रोजेक्ट काफी समय से रुका हुआ है. माननीय श्री गौतम चॅटर्जी जब म्हाडा के व्ही.पी. थे, तब एक प्रपोजल हुआ था कि उस प्रोजेक्ट को बनाना है. उसमें कई समस्याएं है, उसको हल करते करते, आज हम यहाँ तक पहुंचे है. आज म्हाडा ने एक प्रोजेक्ट तैयार किया है. मैं आपको ये प्रोजेक्ट देना चाहता हूं. ये प्रोजेक्ट आपके पास अभी आया नहीं होगा. ये पहली स्टेज पर है. मैं इस प्रोजेक्ट से सहमत नहीं हूं. लेकिन ये प्रोजेक्ट आगे बढ़ा सकते है. मैंने इस प्रोजेक्ट को पढ़ने पर देखा है कि टेनेन्ट को केवल ४०५ फूट

श्री अमिन पटेल.......

का घर दिया जाता है. जिस तरह से बीडीडी चॉल में घर दिए गए थे. उसी तरह से पीएमजीपी में भी लोगों को घर देने चाहिए. उसके मालिक आप है, म्हाडा उसका मालिक है. वे घर ओनरशिप के नहीं है. वह टेनेन्टेड प्रॉपर्टी है. वे लोग वहां रहते है, आप उनसे भाड़ा जमा करते हो. उमरखाड़ी का पायलट प्रोजेक्ट का यह जो प्रपोजल है, वह मैं सम्माननीय अध्यक्ष जी के माध्यम से सम्माननीय मंत्री जी को देना चाहता हूं. इसको म्हाडा ने उमरखाड़ी में बनाया है. उमरखाड़ी में पीएमजीपी का एक पायलट प्रोजेक्ट करते है, पूरी मुंबई में इसकी ज्यादा इमारते नहीं है. पीएमजीपी की केवल ६६ इमारते है. इसकी २२ इमारते मेरे मतदार क्षेत्र में आती है और बाकी ४४ इमारते बची है. यह प्रोजेक्ट हो सकता है. हमारे मराठी भाइयों के लिए यह बहुत बड़ी उपलब्धी हो सकती है. वहां पर जो हमारे मराठी भाई रहते है, उनको एक बहुत बड़ा दिलासा मिलेगा. वे १२०-१८० फूट के घर में रहते है. उनको ५५० फूट का घर मिलेगा, तो उनकी भी क्वॉलिटी ऑफ लाईफ में इम्प्रू होगा.

अध्यक्ष महोदय, दूसरा एक प्रोजेक्ट है. माननीय मंत्री महोदय ने यह निर्णय लिया है कि कामाठीपुरा का पुनर्विकास करना है, उसके बारे में २-३ सप्ताह में कॅबिनेट नोट के साथ तैयार हो जाएगा. कामाठीपुरा के पुनर्विकास के बारे में मैं यह कहना चाहता हूं कि सन २००९ में, जब मैं विधायक नहीं बना था, उसके पहले का यह प्रोजेक्ट है. सन २००७ से हम इस प्रोजेक्ट पर काम कर रहे थे. सम्माननीय श्री सचिन अहिर जी उस समय रिपेअर और रिकन्स्ट्रक्शन बोर्ड के चेअरमन थे, तो वे वहां पर आए थे. वह प्रोजेक्ट किसी न किसी कारण से नहीं हो पा रहा था. आज कामाठीपुरा का हर एक व्यक्ति, हर एक लँड लॉर्ड इस बात के लिए तैयार हो गया है कि पुनर्विकास करना चाहिए.

.....यानंतर श्रीमती करंदीकर

असुधारित प्रत

श्री अमिन पटेल.....

अध्यक्ष महोदय, एबीएन ग्रूप है, देवले ब्रदर्स है, एसबीपी आर्किटेक्ट है. इन्होंने मिलकर एक प्रोजेक्ट तैयार किया, जिसमें टेनेन्ट को ५०८ चौ.फूट का घर होगा. मुंबई में अगर साईज में सबसे छोटा घर कहीं पर है, आपको सुनकर हैरानी होगी, जितने फूट का लोगों का बाथरुम होता है, उससे छोटा उन लोगों का रहने के लिए घर है. ६०-७० फूट का घर है. वहां वह अपने परिवार के साथ रहता है. ४०-५० चौ.मी. वाले लँड लॉर्ड है. ये प्रपोजल तैयार किया है. इसमें लँड लॉर्ड को पर ५० चौ.मी. का एक फ्लैट, १०० चौ.मी.होगा तो दो फ्लैट और टेनेन्ट के लिए ५०८ फूट का है. ये प्रोजेक्ट तैयार है. आपने इस प्रोजेक्ट पर अमल करना चाहिए. ये मैं सम्माननीय अध्यक्ष जी के पास देता हूं. जैसा कि आपने कहा है कि आने वाले १-२ कॅबिनेट में इस बारे में कॅबिनेट बनाकर इसका काम शुरु करेंगे.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदय, आप देखिए कि लोगों को म्हाडा पर कितना भरोसा है. कामाठीपुरा में रहने वाले लोगों का कहना है कि यदि म्हाडा नोडल एजेन्सी होगी, तो ही ही इस प्रोजेक्ट को रिडेव्हलपमेंट करेंगे. उन लोगों का आप पर और इस सरकार पर भरोसा है. कोरोना के पहले, दिनांक १७ फरवरी, २०२० को आप आए थे. गृहनिर्माण विभाग के सचिव श्री संजय कुमार जी थे. व्ही.पी. श्री म्हैसकर जी थे. रिपेअर और रिकन्स्ट्रक्शन बोर्ड के चेअरमन थे, आपने पूरा एरिया घूमा. दो घंटे आप उस एरिया में घूमे. आप हर एक परिवार से मिले है. उसके बाद आपने निर्णय लिया था कि म्हाडा के माध्यम से इस कामाठीपुरा का पुनर्विकास करुंगा. उसके बाद कोरोना आया. इसमें हम डेढ़ साल तक कुछ काम नहीं कर पाये. लेकिन अब पूरी उम्मीद है कि आप उस प्रोजेक्ट को करेंगे, लोगों ने आप पर विश्वास किया है. उनके विश्वास को आप पूरा करेंगे, इसका हमें आप पर पूरा भरोसा है.

अध्यक्ष महोदय, म्हाडा की जो इमारते है, जो म्हाडा ने रिकन्स्ट्रक्ट की है, जो १८०-२०० फूट बनी थी, आज उन इमारतों की हालत बहुत खराब है. उसका भी पुनर्विकास करना बहुत जरुरी है. सम्माननीय मंत्री महोदय ने एक धोरणात्मक निर्णय लेना चाहिए. म्हाडा की जो इमारत ३० साल से ज्यादा पुरानी हो गई है, जो रिकन्स्ट्रक्ट

श्री अमिन पटेल....

वाली इमारत है, उसका भी पुनर्विकास करना चाहिए, ताकि उनको भी बड़े घर मिल सके, उन इमारतों की लाईफ सुधर सके. हर तालुका स्तर पर म्हाडा के कार्यालय होने चाहिए. पूरे महाराष्ट्र में म्हाडा की जो जमीन है, उसकी एक लिस्ट बनाकर, वहां पर म्हाडा कॉलोनी बनानी चाहिए, क्योंकि आज हाऊसिंग की बहुत जरुरत है. पूरे महाराष्ट्र में म्हाडा की जो जमीन है, वहां पर म्हाडा कॉलोनी बनानी चाहिए.

अध्यक्ष महोदय, मुंबई में एक बहुत बड़ी समस्या है. पूरी दुनिया से, पूरे भारत से कॅन्सर के पेशन्ट्स मुंबई में आते है. टाटा हॉस्पिटल के सामने एक गली है, उसको सौरव इस्टेट कहा जाता है. वहां पर लोग रहते है. लोग वहां पर किस हालत में रहते है, इस बारे में हम सोचते है तो बहुत डर लगता है. मेरी मंत्री महोदय से विनती है कि यहाँ पर जो कॅन्सर पेशन्ट्स और उनके रिश्तेदार आते है, तो उनके रहने के लिए कोई व्यवस्था करनी चाहिए. म्हाडा की जमीन पर म्हाडा को एक कॉलोनी, संक्रमण शिबीर, इमारत बनानी चाहिए. टाटा मेमोरियल या दूसरे जिन चॅरिटेबल हॉस्पिटल में लोग इलाज के लिए आते है, जब तक वे वहां पर इलाज करते है, तो वे लोग वहां पर रह सकते है. इस तरह की कोई सुविधा म्हाडा के माध्यम से उपलब्ध करानी चाहिए.

अध्यक्ष महोदय, एक महत्वपूर्ण चीज आज के दौर में दिखायी दे रही है और वह है ओल्ड एज होम. जो सीनियर सिटीजन है, जिनके बच्चे किसी वजह से अपने माँ-बाप को नहीं रखते है या जिनको बच्चे नहीं है, उनके जिए ओल्ड एज होम नहीं है. इसलिए म्हाडा ने मुंबई और मुंबई के आसपास, थाना, पनवेल में ओल्ड एज होम म्हाडा की जगह पर बनाए जाने चाहिए. ये महत्वपूर्ण प्रस्ताव है.

अध्यक्ष महोदय, आपने काम करने वाली महिलाओं के लिए वर्किंग वूमन होस्टेल बनाने की बात की थी. मुझे इसकी जानकारी नहीं है कि यह प्रोजेक्ट कितना आगे बढ़ा है. म्हाडा ने मुंबई में वर्किंग वूमन के लिए एक होस्टेल बनाना चाहिए. इस बारे में शायद आपने घोषणा की थी, तो इस बारे में जानकारी पाना चाहता हूं कि वर्किंग वूमन होस्टेल के बारे में आगे क्या हुआ है? इसकी जानकारी दी जानी चाहिए.

श्री अमिन पटेल....

कई लड़के और लड़कियां मुंबई में पढ़ने के लिए आती है, तो इन लड़के और लड़कियों के लिए म्हाडा ने होस्टेल बनाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, मेरी जानकारी के अनुसार पश्चिम उपनगर में म्हाडा की एक जमीन है जिस पर हॉस्पिटल का आरक्षण है. वहां पर म्हाडा ने एक सुपर स्पेशियालिटी हॉस्पिटल बनाना चाहिए. जहां कहीं भी म्हाडा के पास हॉस्पिटल के लिए जमीन है, वहां पर उन्होंने हॉस्पिटल बनाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, कई सम्माननीय सदस्यों ने एसआरए की ॲमनेस्टी स्कीम के बारे में बात की है. इस वक्त ऐसा दौर चल रहा है कि एसआरए की कई योजनाएं रखड़ी हुई है, कई योजनाएं बंद है. उन योजनाओं को शुरु करने के लिए आप एक ॲमनेस्टी स्कीम लाईए, जिसमें बिल्डर किसी कारण से, कोई बिल्डर है या नहीं है, कई बिल्डर प्रॉब्लम में है, कोई जेल में है, कोई मुंबई से बाहर है, तो जो प्रोजेक्ट किसी कारण से रुक गया है, उस प्रोजेक्ट को शुरु करना चाहिए. जो झोपड़ीधारक है, स्लम में रहने वाले लोग है, जिनके स्लम टूट गए है या कोई ट्रान्झीट में रहने वाले है, उन सरकार ने दिलासा देना चाहिए, उस प्रोजेक्ट को शुरु करना चाहिए. वह किस तरह से शुरु करना चाहिए इस बारे में आपको डिसाईड करना है और इन लोगों को घर मिलना चाहिए.

अध्यक्ष महोदय, मुझसे पहले कई सम्माननीय सदस्यों ने अपनी बात कही है. जो कॉम्पिटंट ऑथॉरिटी है, ९० दिन में उसकी पात्रता तय करना है. कई सम्माननीय सदस्यों ने बताया है कि एसआरए की योजना मुंबई और थाना के अलावा महाराष्ट्र की और भी जगह पर इम्प्लीमेंट करनी चाहिए. इस पर आपने ध्यान देना चाहिए.

अध्यक्ष महोदय, मुंबई के बारे में और भी कुछ दूसरे मुद्दे है. ये माननीय मंत्री महोदय से संबंधित नहीं है. लेकिन माननीय मंत्री महोदय ने आश्वासन दिया है कि वे और भी विभाग के मंत्री महोदय से बात करेंगे. मुंबई में एक हँकॉक ब्रिज है जो कई साल पहले टूट गया है या तोड़ दिया गया है. वह ब्रिज किसी कारण से बन नहीं पा रहा है. आधा ब्रिज बन गया है और आधा बनना बाकी है. मेरी विनती है कि हँकॉक

श्री अमिन पटेल....

ब्रिज के लिए नगर विकास विभाग के माननीय मंत्री जी ने खुद के चेम्बर में एक बैठक बुलानी चाहिए और हँकॉक ब्रिल जल्द से जल्द लोगों के इस्तेमाल में कैसे आएगा, कहां अड़चने है, कहां बॉटलनेक है, कौनसी समस्या आती है, उसको कैसे दूर करना है, दोनों रास्तों को, माझगाव और नूरबाग को कैसे जोड़ना चाहिए, इस बात को ध्यान में रखते हुए नगर विकास विभाग के माननीय मंत्री जी ने हँकॉक ब्रिज के लिए तुरंत एक बैठक बुलाकर उस समस्या को हल करना चाहिए.

अध्यक्ष महोदय, जे.जे. हॉसिपटल का एक बहुत बड़ा मुद्दा है. यहां पर दो बड़ी समस्या है. जे.जे. हॉस्पिटल में दवाइयां बिल्कुल नहीं है. हाफकिन दवा खरीद नहीं पा रहा है. बॅण्डेज, ग्लोव्हज, पॅरासिटामोल जैसी छोटी छोटी चीजें जे.जे. हॉस्पिटल में उपलब्ध नहीं है.मेरी सरकार और संबंधित माननीय मंत्री जी से विनती है कि जे.जे.हॉस्पिटल या दूसरे जो सरकारी हॉसिप्टल्स है, उनको मेडिसीन खरीदने दिया जाए, ताकि लोगों का इलाज हो सके. क्योंकि मुंबई के जो हॉस्पिटल है, इनमें केवल मुंबई के लोगों का इलाज नहीं होता है. यहां पर लातूर, नांदेड, बारामती, अमरावती और अन्य जगहों से लोग आते है. ये १३०० बेड्स का हॉस्पिटल है और वहां पर २००० लोग रहते है. आज सुबह एक सज्जन मुझसे मिला, मैं उसको जानता नहीं हूं. उसने कहा कि साहब, आज मुंबई के विषय पर चर्चा है, आप इस बात को रखिए कि जे.जे. हॉस्पिटल का दोनों कॅथ लैब बंद है, दोनों मशीन खराब है, वहां पर कोई इलाज नहीं हो रहा है. इसलिए संबंधित माननीय मंत्री महोदय ने जे.जे.हॉस्पिटल के बारे में एक बैठक बुलानी चाहिए और इन समस्याओं को हल करना चाहिए.

अध्यक्ष महोदय, एमएसआरडीसी ने एक फ्लाईओव्हर मेरे मतदार क्षेत्र में बनाया है. ये भायखला से शुरु होकर मुंबादेवी होते हुए कुलाबा तक जाता है. मखदूम शाह माहिमी फ्लाईओव्हर है. इस फ्लाईओव्हर की अवस्था आज बहुत खराब है. वहां पर उसका ड्रेनेज टूटा है, लाईट नहीं है. इसलिए एमएसआरडीसी ने उस फ्लाईओव्हर की मरम्मत तुरंत करनी चाहिए. उसका ब्युटीफिकेशन करना चाहिए. वहां पर लाईट लगाना चाहिए, ड्रेनेज का काम करना चाहिए.

श्री अमिन पटेल....

अध्यक्ष महोदय, दो दिन पहले मैंने एक मुद्दा रखा था और सम्माननीय मंत्री श्री एकनाथ शिंदे जी ने बहुत ही सकारात्मक जवाब दिया था. यहाँ पर कई बाते हुई है. जिन इमारतों को ओ.सी. नहीं मिली है, उसके बारे में निर्णय लेना है. कुछ सम्माननीय सदस्यों ने बताया है कि जो स्लम होता है, ग्राऊंड फ्लोर होता है, पहला, दूसरा और तीसरा फ्लोर होता है, उसके बाद टेरेस होता है. उसी तरह आजकल एक नया दौर चला है, खासकर मुंबई के आई लँड सिटी में, "बी, सी, डी, ई" वॉर्ड में इल्लीगल कन्स्ट्रक्शन बहुत जोरों पर चल रहा है. जिस इमारत को एक माले की परमिशन होती है, वहां १० माले की इमारत बिना परमिशन से बन रही है. मैंने कल यह मुद्दा उठाया था, तो सम्माननीय मंत्री श्री एकनाथ शिंदे जी ने कहा था कि हम उस पर कार्रवाई करेंगे. इसमें दो मुद्दे है. एक मुद्दा ह्युमॅनिटरियन ग्राऊंड का है. इमारत बन जाती है, वह बिक जाती है. गरीब परिवार के घर सस्ता घर मिलता है. उस घर को खरीद लिया जाता है. अपनी पत्नी के जेवर बेच देते है, बेटी की शादी के जेवन बेच देते है, कर्जा लेकर आते है और वह छोटासा घर खरीद लेते है. घर खरीदेने के बाद घर बनाने वाला स्टॅम्प ड्युटी भी भर देता है, ॲग्रीमेंट भी कर देता है, रजिस्टर्ड भी हो जाता है और एक साल के बाद उसको नोटीस आती है कि इमारत इल्लीगल है, इमारत को तोड़ना पड़ेगा. वे बेचारे लोग कोर्ट में जाते है. कोर्ट कहता है कि इमारत तोड़ना पड़ेगा. सुप्रीम कोर्ट में जाते है, तो वे भी कहते है कि इमारत तोड़नी पड़ेगी. जिस व्यक्ति को नॉलेज नहीं है, उसने भारत सरकार का एक स्टॅम्प पेपर देखा, ॲग्रीमेंट देखा, उस पर साईन किया, उसने रजिस्टर्ड किया. वह सोचता है कि मेरा ये घर लिगल है. दो साल के बाद उसको पता चलता है कि उसका घर इल्लीगल है. इस तरह से जो इमारते बनी है, जैसे फंजिबल का प्रिमियम है या और कोई प्रिमियम लेकर उन इमारतों को, जो भी इल्लीगल इमारत बनी है, उसको लिगलाईज करना चाहिए और आज के बाद कोई इल्लीगल इमारत नहीं बननी चाहिए, उसके लिए एक कानून बनाना चाहिए. म्हाडा कहती है कि इसको बीएमसी ने बना दिया, बीएमसी कहती है कि इसमें पुलिस का सहयोग नहीं रहा. एक जगह पर, जहां म्हाडा या पुलिस का कार्यालय है, उसके लिए एक पुलिस अधिकारी, म्हाडा का एक अधिकारी और बीएमसी का एक अधिकारी,

श्री अमिन पटेल....

इन तीन लोगों की एक कमिटी हर वॉर्ड में होनी चाहिए. यदि कोई इल्लीगल का काम होगा तो ये तीनों कोऑर्डीनेट करके उसको डिमॉलिश करेंगे. तभी ये काम होगा. वरना आप और हम यहाँ बैठकर कितने भी कानून बना लेंगे, हमारे कानून नीचे इम्प्लीमेंट नहीं होंगे और इल्लीगल का काम चलते रहेगा. जिस दिन भूकंप का मामुलीसा भी झटका लगा, तो इन इमारतों में हजारों लोग मर जाएंगे. इसलिए इस बात को हमें ध्यान में रखना चाहिए. हमें इल्लीगल बांधकाम पर रोक लगानी चाहिए.

अध्यक्ष महोदय, बीडीडी चॉल का पुनर्विकास और धारावी का पुनर्विकास करना, ये दो बहुत बड़े मुद्दे है, आप पर बहुत बड़ी जबाबदारी है. मुझे पता है कि बीडीडी चॉल का काम चल रहा है, लेकिन धारावी का भी पुनर्विकास होना चाहिए. इस ओर आपने ध्यान देना चाहिए.

अध्यक्ष महोदय, मैं जानता हूं कि बीपीटी हमारे अंडर में नहीं आता है. लेकिन इस बारे में केंद्र सरकार से बात करनी चाहिए. वॉटर फ्रन्ट का जो काम था वह रुक गया है. वहां काम चालू नहीं है. प्रोजेक्ट रुका हुआ है. वह बीपीटी की जगह है. लेकिन उसका फायदा मुंबई के लोगों को मिलना चाहिए. बीपीटी की जगह पर विकास होना चाहिए. इस्टर्न वॉटर फ्रन्ट की जो बात होती है, वह होना चाहिए और बीपीटी का काम होना चाहि, ऐसी मेरी आपसे विनती है. कुछ मुद्दों पर मैं फिर कभी बात करुंगा. जो जो मुद्दे मैंने आपके सामने रखे है, आप पर और सरकार पर मुंबई के लोगों का भरोसा है. आशा है कि आप इन चीजों को अमल में लाएंगे, लोगों को उसका फायदा होगा. इसी बात के साथ मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

----

......यानंतर श्रीमती गिरप

असुधारित प्रत

**( अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष )**

ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) : अध्यक्ष महोदय, सत्ताधारी पक्षाच्या म.वि.स. नियम २९३ अन्वयेच्या प्रस्तावावर बोलण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मला मी सभागृहात बोलत आहे असे वाटतच नाही. मंत्री महोदयांच्या केबिनमध्ये बसून बोलत आहे, असे वाटत आहे. केवळ ८ ते १० सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित आहेत. या प्रस्तावात अतिशय महत्वाचे असे सर्व विषय आहेत. माननीय गृहनिर्माण मंत्री तसेच माननीय नगरविकास मंत्री सभागृहात उपस्थित आहेत.

अध्यक्ष महोदय, मोठ्या अपेक्षेने मुंबईकर नेहमी अधिवेशनाकडे पाहत असतात. आजचा म.वि.स. नियम २९३ अन्वयेचा प्रस्ताव आपण पाहिला तर, जवळजवळ हेच विषय दरवेळेस मुंबईचे लोकप्रतिनिधी मांडत असतात. वर्षानुवर्षे त्यांचे गांभीर्य आणखी आणखी वाढत जाते. जेवढे काम करु त्याच्या कित्येक पटीने समस्या वाढत जाते, अशा पध्दतीचा विशेष करुन हा गृहनिर्माणाचा विषय आहे.

अध्यक्ष महोदय, प्रस्तावामध्ये जुन्या, विशेष करुन ज्या इमारतींना ५० वर्षांपेक्षा अधिक काळ झाला आहे, त्यांच्या पुनर्विकासाबाबत अधिक लिहिले गेलेले आहे. प्रस्तावामध्ये फनेल झोन.. जे बाधित क्षेत्र आहे म्हणजे विमानांचा जो यायचा जायचा मार्ग आहे, त्या मार्गातील इमारतींना उंचीची परवानगी मिळत नाही. उंचीची परवानगी मिळत नाही त्यामुळे त्यांचा पुनर्विकास होत नाही. त्यामुळे आताच्या प्रचलित धोरणानुसार काही वेगळे धोरण, काही वेगळे रेग्युलेशन असावे, अशी मागणी या ठिकाणी वारंवार होत आहे.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी बोलताना प्रश्न हाच येतो की, कदाचित मंत्री महोदय सकारात्मक उत्तर देतील. परंतु, त्यापुढे त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होण्यापर्यंत आपण कधी पोहोचणार? दि. १४ मार्च, २०१८ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री यांनी या ठिकाणी आश्वासन दिले होते की, या समस्येवर आपल्याला काही तरी एक नवीन रेग्युलेशन बनवावे लागेल.

ॲड.पराग अळवणी...

अध्यक्ष महोदय, जेव्हा डीपी व डीसीपीआर बनत होता एक्झॅक्ट तारीख सांगावयाची झाली तर, दि. १३ नोव्हेंबर, २०१८ रोजी सरकारने डीपी व डीसीपीआरबाबत अंतिम निर्णय घेतला. त्या अगोदर या सदनामध्ये आम्हाला या संदर्भात काही तरी नवीन रेग्युलेशन येईल, याचे आश्वासन मिळाले होते. दि. १४ मार्च, २०१८ ते दि.१३ नोव्हेंबर, २०१८ या कालावधीमध्ये भरपूर मेहनत झाली. अनेक बैठका झाल्या, अनेक स्टेकहोल्डर्ससोबत बोलणे झाले, अधिकाऱ्यांचे बोलणे झाले. नगरविकास खात्याने महानगरपालिकेकडून एक रिपोर्ट मागविला. फनेल बाधित इमारती त्याच प्रमाणे गावठाण व कोळीवाडे या संदर्भात एक कमिटी बनली होती. त्या कमिटीचा अहवाल सप्टेंबर, २०१९ ला शासनाकडे आला.

अध्यक्ष महोदय, खरेतर एकदा महानगरपालिकेने आपला अहवाल दिला की, काय केले पाहिजे. त्या अहवालातील सर्व गोष्टी आम्हाला मान्य नाहीत. माझ्या हातात तो अहवाल आहे. या ठिकाणी अधिकचा एफएसआय हा फनेल बाधित इमारतींना दिला पाहिजे. साधारणपणे ५ एफएसआय दिला तर त्यांना तो टिडीआर विकून त्यांचा खर्च काढता येईल, असे या अहवालामध्ये नमूद आहे.

अध्यक्ष महोदय, आमचे असे म्हणणे आहे की, ५ एफएसआयमध्ये होणार नाही आणखी एफएसआय मिळाला पाहिजे. परंतु, एकदा अहवाल आल्यानंतर शासनाने खरे तर मागची २ वर्षे घेण्याचे काहीच कारण नव्हते. कोविडचा काळ होता. कोविडच्या काळात खरे तर अशा पध्दतीच्या पॉलिसी मेकिंगसाठी आपल्याला भरपूर वेळ होता. परंतु, मला हे मान्य आहे की, सरकार बदलल्यावर मागच्या सरकारमध्ये घडलेल्या गोष्टींची पूर्ण माहिती ही नवीन मंडळींना नसते त्यामुळे सर्व पुन्हा नव्याने सुरु करावे लागते. कदाचित कंटिन्युईटी मिळाली असती तर त्या कोविडच्या काळात जो वेळ उपलब्ध होता कारण अनेक गोष्टी बंद होत्या. त्यामुळे पॉलिसी मेकिंगला वेळ होता, तो वेळ आपल्याला घेता आला असता. तो नाही मिळाला ठीक आहे. परंतु, खूप मोठ्या अपेक्षेने फनेल बाधित इमारतीतील रहिवासी

या सर्व विषयाकडे पाहत आहेत की, मुंबईमध्ये अधिवेशन सुरु आहे, आता तरी काही तरी घोषणा होईल.

ॲड.पराग अळवणी...

अध्यक्ष महोदय, या अहवालामध्ये जे सांगितले होते ते आम्हाला कमी वाटत होते. परंतु, जी चर्चा आहे त्याच पध्दतीने होणार असेल तर जो फॉर्म्युला चर्चेमध्ये येत आहे मंत्री महोदय तो अत्यंत तुटपुंजा आहे. त्यामुळे खुल्या मनाने व थोड्या अधिक जबाबदारीने या प्रश्नाकडे पाहण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमिन पटेल यांनी सरकारचे भरपूर कौतुक केले. मलाही ते मान्य आहे. त्यांनी ज्या २-३ गोष्टी सांगितल्या त्या खऱ्या आहेत. दक्षिण मुंबईसाठी त्या झाल्या. परंतु, कुठे तरी एक भावना उपनगरवासियांच्या मनात अनेक वर्षांपासून आहे की, उपनगराकडे त्या त्या वेळच्या प्रशासनातील अधिकाऱ्यांचे लक्ष थोडे वेगळया पध्दतीचे असते. शहरामधील मात्र... कदाचित शहरातील डेव्हलपरची लॉबी खूप स्ट्राँग असेल परंतु, आपण नियम ३३(७)(२२) ...(अडथळा)... सन्माननीय सदस्य श्री.मंगलप्रभात लोढा उपनगरामध्ये जास्त काम करतात. मी त्यांच्या व्यवसायाबाबत बोलत नाही. परंतु, हे खरे आहे की, ते शहरात आहेत त्यामुळे शहरातील लॉबी स्ट्राँग आहे यात काहीच शंका नाही. ते स्ट्राँग आहेतच. ६ वेळा भरपूर मतांनी ते निवडून आलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी म्हाडाच्या सेस प्रॉपर्टीच्या रिडेव्हलपमेंटसाठी नियम ३३(७)(२२) मार्फत एक नवीन नियमावली बनवून क्लबिंगला परवानगी देता तर मग फनेल बाधित मंडळींना क्लबिंगला परवानगी का देत नाही? अडचण ही आहे की, तुम्ही शहराला नियमावली ३३ दिली. नियमावली ३३ मध्ये इन्सेंटिव्ह स्कीम आहे. उपनगरामध्ये आम्हाला नियमावली ३३ दिली नाही. त्यामुळे उपनगरातील ज्या इमारती रिडेव्हलप होतात त्या इन्सेंटिव्ह स्कीममध्ये होत नाहीत. इन्सेंटिव्ह स्कीममध्ये होत नसल्यामुळे आम्हाला टीडीआर विकत घ्यावा लागतो. त्यामुळे तो आमचा बेसिक एफएसआय होत नाही. नियमावली ३३ मध्ये

काय होते तर, शहरातील नियम ३३(७) असेल यांना अधिकचा एफएसआय मिळतो. त्याचे क्लबिंग शक्य होते. फनेल बाधित इमारतींच्या रिडेव्हलपमेंटचा विचार करीत असताना नियमावली ३३ च्या अंतर्गत एखादी योजना बनावी, ही पहिली मागणी आहे.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.पराग अळवणी...

जेणेकरुन नियमावली ३३ मधील तरतुदींचा लाभ मिळू शकेल. या प्रकरणी अधिक वेळ लागू नये, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. प्रत्येक अधिवेशनामध्ये या विषयावर गंभीरतेने चर्चा होते. परंतु प्रत्येक अधिवेशनागणिक या समस्येचे गांभीर्य वाढत आहे. आजपर्यंत फनेलबाधीत इमारतीमधील इमारत पडली नाही व कोणतेही नुकसान झाले नाही. परंतु त्याची वाट शासनाने पाहू नये, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, काही इमारतींना ताबा प्रमाणपत्र मिळत नसल्यामुळे अनेक अडचणी निर्माण होत आहेत, याबाबत चर्चा करण्यात आली आहे. मी ते प्रश्न पुन्हा उपस्थित करु इच्छित आहे. विकासकाने अनेक गोष्टी अर्धवट सोडल्याने त्या पूर्ण कोण करणार, हा प्रश्न असल्याने ताबा प्रमाणपत्र मिळत नाही. सदरहू इमारतींचा पुनर्विकास झाला असेल व तेथे पुर्वीचे सदनिकाधारक व नवीन सदनिकाधारक राहतात ते विकासकाने न केलेल्या गोष्टी करण्यास तयार आहेत. परंतु त्यासंदर्भात त्यांना अधिकार नाहीत. मूळ विकासकाने त्यावेळच्या आर्किटेक्टची फीस दिली नसेल तर तो ना-हरकत देण्यास तयार होत नाही. अशा अर्धवट सोडलेल्या इमारती त्या संबंधित सोसायटीला संपादन करता आली पाहिजे, यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे, हा एक उपाय आहे. एखाद्या भूखंडावर झोपडपट्टी झाली असेल व त्याचा मालक तिचा विकास करीत नसेल तर संपदनाची सुविधा ठेवण्यात आली आहे.

अध्यक्ष महोदय, काही महिन्यांपूर्वी गृह निर्माण विभागाने म्हाडाच्या जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींच्या संदर्भात निर्णय घेतला आहे की, मालक त्या इमारतींचा पुनर्विकास करीत नसेल तर ती मालमत्ता टेनंन्टला संपादित करण्याचा अधिकार आहे.

अध्यक्ष महोदय, इमारती जुन्या होऊन धोकादायक झाल्यानंतर त्यांना महानगरपालिकेने सी-१ वर्गवारीत घोषित केल्यानंतर त्या पाडण्यासाठी सांगण्यात येते. परंतु जमीन मालक काही कारणांमुळे त्या इमारतींचा पुनर्विकास करण्यास तयार

असुधारित प्रत

श्री.पराग अळवणी...

नसतील, धोकादायक इमारती महानगरपालिकेने तोडल्यानंतर मालक पुनर्विकास तयार करण्यासाठी तयार नसतील, विकासकाने अर्धवट गोष्टी सोडून दिल्यामुळे ताबा प्रमाणपत्र मिळत नाही, त्यामुळे तेथील रहिवाशांना ती जमीन संपादन करण्याचा अधिकार दिला तर त्याला पुनर्विकासाचे काम पूर्णत्वास नेता येऊ शकेल. याचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, ज्या ठिकाणी सेस प्रॉपर्टी आहेत त्या शासनाची जबाबदारी आहेत. ही जबाबदारी झटकण्यासाठी शासनाने कायदा तयार केला. परंतु केवळ सेस इमारतींचा शासनाने विचार करु नये. सर्व धोकादयक इमारतींच्या पुनर्विकासाच्या दृष्टीने भूसंपादनाची तरतूद झोपडपट्टी पुनर्वसनासाठी आहे. म्हाडाच्या सेस इमारतींसाठी आहे. तशी तरतूद उक्त प्रकरणी आणली तर त्याचा लाभ होऊ शकेल.

अध्यक्ष महोदय, गृहनिर्माण मंत्री ॲग्रेसिव्हली काम करतात. ५०० प्रकल्पांसाठी अभय योजना आणण्यात येत आहे, असे त्यांनी घोषित केले आहे व मागील आठवड्यामध्ये एका प्रश्नाचे उत्तर देतानाही सांगितले आहे. त्यांचे हे पाऊल अतिशय धाडसी आहे, यात काही शंका नाही. मुंबई शहरामध्ये केवळ ५०० योजना रखडलेल्या नाहीत. शेकडो झोपडपट्टींचे पॉकेटस् पुनर्विकासाची वाट पाहत आहेत. झोपडपट्टी पुनर्वसनाकडे चांगले विकासक का फिकत नाहीत, याचे आत्मपरीक्षण गृहनिर्माण विभागाने कधी तरी करण्याची आवश्यकता आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण भ्रष्टाचाराचा अड्डा बनल्यामुळे त्यांच्याकडे चांगले विकासक येऊ इच्छित नाहीत. यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणमधील निर्णय प्रणाली, प्रक्रिया, भ्रष्टाचार यासंदर्भात सरकारने कठोर पावले उचलली तर चांगले विकासक झोपडपट्टींचा पुनर्विकास करण्यासाठी येतील.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर यांनी ॲनेक्श्चर-२ हे ९० दिवसांच्या आत देण्याचा उल्लेख केला आहे. ॲनेक्श्चर-२ साठी केवळ एक कागद पहावा लागतो त्यासाठीचा ब्लॅकमध्ये होणारा खर्च संपविला पाहिजे. हा एक कागद पाहण्यासाठी विकासकाला पैसे जमा करण्यासाठी वेळ लागतो.

श्री.पराग अळवणी...

अध्यक्ष महोदय, आता रिहॅब सदनिका अडीच वर्षानंतर विक्री करता येणार हा अभिनंदनासपात्र असा चांगला निर्णय गृहनिर्माण मंत्री महोदयांनी घेतला आहे. मी याबद्दल आभार मानतो. यामध्ये आणखी एक सुधारणा करण्याची आवश्यकता आहे, ॲनेक्श्चर-२ झाल्यानंतर झोपडी विक्री करता येत नाही. त्यापूर्वी ती विक्री करता येते व हस्तांतरण प्रकरणात त्यांना पात्र करता येते. ॲनेक्श्चर-२ नंतर वर्षानुवर्षे योजना पूर्णत्वास जात नाही. यामुळे लोकांची अडचण होते. ॲनेक्श्चर-२ झाल्यानंतर वर्ष किंवा दोन वर्षानंतर विक्रीसाठी परवानगी देण्याबाबतचा निर्णय घेण्यात यावा, अशी माझी आग्रही मागणी आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांच्या प्रश्नाचे मी लगेच उत्तर देतो. पुनर्विकासासाठी झोपडी पाडल्यानंतर ती अडीच वर्षानंतर विक्री करता येईल, असा निर्णय घेण्यात आला आहे. झोपडी ॲनेक्श्चर-२ झाल्यानंतरच पाडण्यात येत असते.

श्री.पराग अळवणी : अध्यक्ष महोदय, ॲनेक्श्चर-२ झाल्यानंतर ती नस्ती विक्री करण्यासाठी विकासक फिरत राहतो. त्याला नवीन विकासक मिळत नाही. यामध्ये वर्षानुवर्षे वेळ जातो.

श्री.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, यापुढील कालावधीत विकासकाने एसआरए प्रकल्पात एनरोलमेंट केल्यानंतर एसआरएच्या परवानगी शिवाय कोणतीही योजना विक्री करता येणार नाही.

श्री.पराग अळवणी : अध्यक्ष महोदय, ॲनेक्श्चर-२ झाल्यानंतर विकासकाने इमारत बांधलीच नाही तर हा प्रश्न कायम राहतो.

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारच्या जमिनीवरील झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासाचा या प्रस्तावामध्ये उल्लेख आहे. विमानतळ प्राधिकरणाच्या जमिनीवरील झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनासाठी केंद्र सरकारने माहे जुलै, २०१४

श्री.पराग अळवणी...

मध्ये पत्र दिले होते. त्यामध्ये नमूद केले आहे की, त्यांच्या जमिनीवर राज्य सरकार रिहॅब इमारत बांधू शकते. अशाच पद्धतीने केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळाने National Land Monetisation Corporation तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. हे कॉर्पोरेशन त्यांच्याकडील सरप्लस लॅण्डच्या संदर्भात निर्णय घेणार आहे. राज्यातील काही वरिष्ठ मंत्री महोदय व आवश्यकता असेल तर माननीय विरोधी पक्ष नेते श्री.देवेंद्र फडणवीस यांची मदत घेऊन केंद्र सरकारकडे जाऊन उक्त कॉर्पोरेशनच्या माध्यमातून मुंबईसाठी समन्वय साधावा. सदरहू कॉर्पोरेशन तयार होत आहे. देशभरातील केंद्रीय मंत्रालयाच्या विविध खात्यांच्या सरप्लस जागांच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी उक्त कॉर्पोरेशन तयार करण्यात आले आहे. याचा लाभ मुंबईसाठी घेतला पाहिजे, असे माझे मत आहे.

अध्यक्ष महोदय, एसआरएची माननीय उच्च न्यायालयामध्ये अनेक प्रकरणे दाखल करण्यात येतात. त्यामुळे त्यांच्या कामाचा व्याप वाढतो. याकरिता माननीय उच्च न्यायालयाने सांगितले की, एसआरएच्या प्रकरणात लोक उच्च न्यायालयात येतात त्याऐवजी वरिष्ठ पातळीवर समिती तयार करावी व त्यांच्याकडे ते लोक दाद मागू शकतील. सदरहू एजीआरसीच्या अनेक महिने बैठका होत नाहीत, त्यांच्या बैठकीच्या अजेंड्यामध्ये सर्व विषय घेण्यात येत नाहीत. त्यामुळे अनेक प्रकरणे प्रलंबित राहतात. त्यांच्याकडे दाद मागितलेले लोक माननीय उच्च न्यायालयाकडे जाऊ शकत नाही कारण त्यांनी एजीआरसीकडे दाद मागण्यासाठी सांगितले आहे. परंतु एजीआरसी काम करीत नाही. यामुळे असंख्य प्रकरणे प्रलंबित आहेत.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

ॲड.पराग अळवणी.......

यामध्ये सरकारने गांभीर्याने लक्ष घालण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, काल मंत्री महोदयांनी अकृषिक कराला स्थगिती दिलेली आहे. परंतु ही स्थगिती काहीही उपयोगाची नाही. हा अकृषिक कर पूर्णत: रद्द करण्याची आवश्यकता आहे. काल बोलण्यासाठी अधिक वेळ मिळाला नाही, त्यामुळे माला सर्व मुद्दे मांडता आले नाहीत.

अध्यक्ष महोदय, सन १९६६ मध्ये Maharashtra Land Revenue Code व Maharashtra Regional Town Planning Act असे दोन कायदे तयार करण्यात आले आहेत. Maharashtra Regional Town Planning Act अंतर्गत डेव्हलमेंट प्लन आहे. ज्या ठिकाणी डेव्हलमेंट प्लॅन आहे त्या ठिकाणी Maharashtra Land Revenue Code लागू होणार नाही. मुंबईतील एकाच जमिनीवर दोन वेगवेगळ्या कायद्याच्या माध्यमातून कर वसूल केला जात आहे. मुंबईतील जमिनीला Maharashtra Land Revenue Code लागू होत नाही, अशी माझी धारणा आहे. आवश्यक वाटल्यास यासंदर्भात शासनाने महाधिवक्ता यांच्याकडून अभिमत घ्यावे. दोन कायदे एकच वर्षामध्ये तयार केले असतील आणि त्यामध्ये विरोधाभास असेल तर याबाबत विचार करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, नगर विकास विभागाने अत्यंत वेगवान पद्धतीने विकास आराखडा मंजूर केलेला आहे. तेव्हा ई.पी. म्हणून एकूण २२०० प्रकरणे बाजूला ठेवली होती. त्यापैकी केवळ ८०० प्रकरणे संमत केलेले आहेत. उर्वरित १४०० प्रकरणे अद्याप प्रलंबित आहेत.

अध्यक्ष महोदय, मघाशी फनेल झोनचा मुद्दा मांडलेला आहे. डीसीपीआरमध्ये आपण स्पष्ट म्हटलेले आहे की, उक्त प्रकरणांवर आता निर्णय घेणे शक्य नसल्यामुळे ती सर्व प्रकरणे प्रलंबित ठेवण्यात आलेली आहेत. डीसीपीआर पारित केल्यानंतर सदर विषयांचा समावेश करण्यात येईल, असे देखील सांगितले आहे. त्यामुळे आपण जे प्रलंबित ठेवलेले मुद्दे आहेत किंवा ई.पी.चे मुद्दे आहेत,

ॲड.पराग अळवणी.......

त्यावर लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी मी विनंती करतो. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो व मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

--------

असुधारित प्रत

श्री झीशान सिद्दीकी (वांद्रे पूर्व) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम २९३ के अंतर्गत मुंबई के संबंध में जो प्रस्ताव सदन के सामने पेश किया गया है, उस पर बोलने के लिए मैं खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, कई सम्माननीय सदस्यों ने एन.ए. टैक्स के बारे में बात की है. मैं सम्माननीय मंत्री श्री बालासाहब थोरात जी का बहुत बहुत शुक्रिया अदा करना चाहूंगा. कल उन्होंने एन.ए. टैक्स पर स्टे दिया है. केवल स्टे ही नहीं दिया जाना चाहिए, उसे रद्द भी किया जाना चाहिए, ऐसा मेरा कहना है. क्योंकि ये टैक्स केवल मुंबई उपनगर में ही लागू है, मुंबई शहर में लागू नहीं है. मुंबई उपनगर में ये टैक्स लागू नही होना चाहिए और मुंबई के लोगों को इसमें राहत मिलनी चाहिए.

अध्यक्ष महोदय, मैं डेटम लाईन के बारे में बात करना चाहूंगा. इस बारे में फिलहाल जो कानून है, जो नियम है, उसके हिसाब से सन १९६१ और १९६२ की डेटम लाईन रेसिडेन्स के लिए दी गई है और सन १९६४ की डेटम लाईन कमर्शियल के लिए दी गई है. स्लम एरिया में रहने वाले हमारे जो भाई-बहन है, उनके लिए सन २०११ के पहले की डेटम लाईन तय की है. मैं आपसे मिडल क्लास के बारे में विनती करना चाहूंगा कि इनके लिए भी कुछ किया जाना चाहिए. यह जो डेटम लाईन है उसको बढ़ाया जाना चाहिए. कम से कम १९८५ या १९९० तक डेटम लाईन बढ़ायी जानी चाहिए. क्योंकि इन्हें बार बार नोटीस आते रहती है. इससे करप्शन भी बढ़ रहा है. क्योंकि बिल्डिंग तोड़ी नहीं जा रही है. मिडल क्लास के लोगों को कोर्ट में जाना पड़ रहा है. उनके खर्चे बढ़ रहे है. मैं चाहता हूं कि मुंबईकर को राहत मिलनी चाहिए और डेटम लाईन को १९८५ या १९९० तक बढ़ाया जाना चाहिए. मैं मेरे मतदार क्षेत्र के कई इलाकों के बारे में बात करना चाहता हूं. सन २००५ एक सिटी सर्व्हे ने एसआरए स्कीम को रिजेक्ट किया था. क्योंकि रेलवे और राज्य सरकार के बीच लँड डिस्प्यूट थी. रेलवे ने १२७ एकड़ का क्लेम किया था और शासन उसको २०४ एकड़ जमीन दी. रेलवे को ७७ एकड़ ॲक्सेस जमीन दी गई. उसके कारण मेरे मतदार क्षेत्र के लोगों को कठिनाइयों का बहुत सामना करना पड़ रहा है. बेहराम नगर, नौपाडा, बापूजी स्टॉल, तीन बंगला और कई ऐसा एरिया है, वहां पर जो लोग है,

श्री झीशान सिद्दीकी.......

उनके लिए वहां पर इस डिस्प्यूट के कारण एसआरए की कोई योजना लागू नहीं हो रही है. क्योंकि रेलवे कहती है कि वह उसकी जमीन है. लेकिन रेलवे को यह ७७ एकड़ जमीन ज्यादा दी गई है. सरकार से मेरा निवेदन है कि इस बारे में रिसर्व्हे होना चाहिए और महाराष्ट्र सरकार की जो जमीन है, वह फिर से कलेक्टर को मिलना चाहिए, ताकि एसआरए की योजना का लाभ उठाया जा सके. इसी तरह नौपाडा में मध्य रेलवे है, उसके कारण नौपाडा के रहिवासियों को सामना करना पड़ रहा है. बांद्रा पूर्व और बांद्रा पश्चिम की जो एग्झिट है वह भी बंद किया गया है.

अध्यक्ष महोदय, मैं सरकारी वसाहत की बात करना चाहता हूं. जब भी मैं सदन में आता हूं तो हमारे सरकारी कर्मचारी, भाई-बहन मुझसे कहते है कि आप सरकारी वसाहत का मुद्दा उठा रहे हो. मैं हमेशा इस विषय को उठाता भी हूं. सन १९५६ में मेरे मतदार क्षेत्र वांद्रे पूर्व में सरकारी वसाहत का निर्माण हुआ था. ९५ एकड़ जमीन पर पूरी वसाहत बसी हुई है. तकरीबन ३७० से ज्यादा इमारते इस कॉलोनी में है. उनके बच्चे वहीं पर ही जन्म लेते है, वे पूरी जिंदगी, बुढ़ापे तक उधर ही काम करते है. लेकिन वह घर उनके नाम पर नहीं होता है. उनके बच्चे वहां की ही स्कूल में जाते है. उधर ही रहते है. लेकिन जब ये लोग सेवानिवृत्त होते है, तो उनसे कहा जाता है कि आप इस घर को छोड़ दो. इसे कारण उन लोगों को बहुत दिक्कत होती है. मैंने इसके पहले भी सदन में एक प्लान दिया है. अगर हम उस प्लान का अमल करेंगे तो सरकार को भी उससे काफी फायदा होगा. मेरे मतदार क्षेत्र में स्कूल, अस्पताल, सफाई आदि की बहुत जरुरत है. इस स्कीम से सरकार को फायदा होगा और ये सारी चीजें हमें उपलब्ध होगी. जो मालिकाना हक है, सरकारी कर्मचारियों को ओनरशिप का मुद्दा है. सरकारी वसाहत में उनका घर है. उनकी मांग है कि उन्हें ओनरशिप मिलनी चाहिए. सरकारी कर्मचारियों के बिना हमारे कोई काम हो नहीं पाते है. मैं चाहता हूं कि सरकारी कर्मचारियों को सरकार की ओर से घर मिलना चाहता, वह जिंदगी भर मिलना चाहिए. इससे उनको बहुत सहायता मिलेगी. वे जिंदगी भर सरकार और लोगों की सेवा करते है. उन्हें ओनरशिप मिलेगी तो बहुत अच्छा होगा.

श्री झीशान सिद्दीकी........

अध्यक्ष महोदय, मैं एसआरए योजना के बारे में बात करना चाहता हूं. माननीय गृहनिर्माण मंत्री जी सदन में उपस्थित नहीं है. मैं बताना चाहूंगा कि मेरे मतदार क्षेत्र में एसआरए की कई योजनाएं है जो कि कई सालों से अटकी हुई है. वांद्रे पूर्व में आप देखेंगे कि पूरे एरिया में पथरा ही पथरा लगा हुआ है. विकासक गायब है. इसमें कुछ काम हो भी नहीं रहा है. बेहराम नगर की एक योजना के बारे में मैं बताना चाहूंगा. इसमें डेव्हलपर शापूरजी पालनजी और सोलंकी ॲण्ड असोसिएट्स है. कई सालों से भाड़ा भी नहीं दिया गया और ट्रान्झीट कॅम्प बहुत बुरी स्थिति में है. मैं संजय नगर की बात करना चाहूंगा. इसके डेव्हलपर का नाम मनियार है. वहां पर २४० टेनेन्ट लटके हुए है. विजय नगर में आरएनए डेव्हलपर की वजह से आठ साल से ८० टेनेन्ट रुके हुए है. महाराष्ट्र नगर और आंबेडकर नगर के तकरीबन ६५० टेनेन्ट आठ साल से ट्रान्स डेव्हलपर्स की वजह से रुके हुए है. मेरी माननीय मंत्री महोदय से विनती है कि इसके बारे में और वांद्रे पूर्व की विभिनन समस्याओं को ध्यान में रखते हुए वे एक विशेष बैठक एसआरए के साथ, सीईओ के साथ आयोजित करे. एसआरए स्कीम के बारे में एक व्हाईट पेपर रिलिज करना चाहिए. लोगों के घर कई सालों से लटके हुए है और उनको बहुत तकलीफ हो रही है, उनको भाड़ा नहीं मिल रहा है.

अध्यक्ष महोदय, मैं एक ऐसे एसआरए स्कीम के बारे में बात करना चाहूंगा जिसको मैंने सदन में बार बार उठायी है. मुझे लगता है कि मेरी इस विषय पर बात सुनकर थक गए होंगे, लेकिन मैं बोल बोल कर थका नहीं हूं. इसमें कोई ॲक्शन नहीं होती है. मैं गोलिबार नगर की स्कीम के बारे में बात कर रहा हूं. एक शिवालीक डेव्हलपर्स है. जब भी इस सदन में शिवालीक बिल्डर का नाम लिया जाता है, तो मुझे कोई जवाब नहीं मिलता है. मुझे जवाब क्यों नहीं मिलता है ? माननीय मंत्री डॉ.जितेंद्र आव्हाड जी ने पिछली बार मुझसे इस सदन में कहा था कि इसके बाद हमारी एक संयुक्त बैठक होगी. ढ़ाई साल हो गए, लेकिन कोई बैठक नहीं हुई है. सीईओ के साथ बैठक ली जाती है तो विकासक बैठक में आता नहीं है, तो इसे कौन बचा रहा है ?

श्री झीशान सिद्दीकी.........

इस डेव्हलपर को कौन बचा रहा है ? वह चुनाव के पहले चेक्स बाटता है. वह शासन से क्यों नहीं डर रहा है. उसे कौन प्रोटेक्ट कर रहा है. शिवालीक व्हेंचर्स प्रा.लि. के बारे में मैं फिर से कहना चाहूंगा कि मेरे मतदार क्षेत्र वांद्रे पूर्व में १६ साल से ये प्रोजेक्ट रखड़ा हुआ है. सन २००६ में ये प्रोजेक्ट शुरु हुआ था. इस कंपनी ने २७ हजार झोपड़ियों का पुनर्वसन करने की जिम्मेदारी सन २००६ में ली थी. शिवालीक व्हेंचर्स प्रा.लि. द्वारा वहां की ४,३०० झोपड़ियां तुड़वायी गई. कई सालों से झोपड़पट्टीवासियों को भाड़ा भी नहीं मिला है, घर भी नहीं मिला है. उसके बाद सन २०१९ में स्टेप बाय स्टेप उन्होंने १९०० घर दिए. फिर भी पिछले साल से अब तक २,४०० लोगों को घर नहीं मिला है और पांच सालों से भाड़ा भी नहीं मिला है. इन परिवारों को भाड़ा न मिलने के कारण ये भूखे पेट सो रहे है. ये रोज आजाद मैदान में प्रदर्शन करते है, विधान भवन के बाहर भी आए थे. माननीय गृहनिर्माण मंत्री और मैं उनसे मिले. उन्होंने उनको भी आश्वासन दिया. मैंने हमारे पालक मंत्री सम्माननीय श्री आदित्य ठाकरे जी से भी इस बारे में बात की है. उन्होंने उनसे कहा कि हमारी बैठक जरुर होंगी. एक-दो सप्ताह में बैठक होंगे. लेकिन कई सालों के बाद भी इस बारे में कोई बैठक नहीं हुई है.

यानंतर श्री कुलकर्णी........

असुधारित प्रत

श्री झीशान सिद्दीकी..........

अध्यक्ष महोदय, झोपड़पट्टीवासियों का पुनर्वसन न होने के कारण उनको बहुत कठिनाइयों का सामना करना पड़ रहा है. उन्होंने बीच के समय में ४०० घर बनाये भी थे. लेकिन वह भी बेच दिए और विकासक ने झोपड़पट्टिवासियों के लिए कुछ भी काम नहीं किया, उनको पक्का घर भी नहीं दिया और भाड़ा भी नहीं दिया. इससे कई लोग नाराज है. मैं चाहता हूं कि ये जो 3K की स्कीम लागू है, इसे रद्द किया जाना चाहिए. क्योंकि इस प्रोजेक्ट को करने के लिए विकासक कॅपेबल नहीं है. वह कोई जवाब भी नहीं दे रहे है. हमें माननीय मंत्री से भी कोई जवाब नहीं मिलता है. विकासक ये प्रोजेक्ट नहीं कर पा रहे है. बिना टाईमफ्रेम के वादे कर रहे है. नागरिकों को मोर्चा निकालने के अलावा कोई उपाय नहीं है. मेरी विनती है कि एक व्हाईट पेपर गोलिबार नगर के इश्यू के बारे में शिवालीक व्हेंचर्स का भी निकलना चाहिए.

अध्यक्ष महोदय, मैं मेरे मतदार क्षेत्र के स्कूल के बारे में बात करना चाहता हूं. नगर विकास विभाग के माननीय मंत्री अभी सदन में है. मैं बताना चाहता हूं कि स्कूल की स्थिति बहुत खराब है. सम्माननीय मंत्री श्री आदित्य ठाकरे जी का एक सपना था कि पूरे मुंबई में बीएमसी के सीबीएसई के स्कूल होने चाहिए. लेकिन वांद्रे पूर्व में अभी तक ऐसा कुछ देखने को नहीं मिला है. मैं उम्मीद करता हूं कि वांद्रे पूर्व के स्कूल की स्थिति अच्छी होनी चाहिए. वहां पर भी सीबीएसई और अलग अलग बोर्ड के स्कूल होने चाहिए, हमारे भी बच्चे उसमें पढ़ सके.

अध्यक्ष महोदय, मैं अस्पताल के बारे में बताना चाहूंगा कि हमारे मतदार क्षेत्र में अस्पतालों की कमी है. बीकेसी में एक जम्बो कोविड सेंटर बनाया गया था. व्ही.एन.देसाई अस्पताल में बहुत गंदी व्यवस्था है. भारत नगर में एक लैंड है. उसके बाजु में म्हाडा की जमीन है. भारत नगर में अस्पताल के लिए जो जगह है वह तोड़ दिया गया है. मगर मेरी यही मांग है कि बाजु वाली लैंड भी इस अस्पताल को दी जाए और एक सुपर स्पेशियालिटी हॉस्पिटल बांद्रा पूर्व में बनाया जाए. ये लोगों के लिए बहुत मददगार साबित होगा.

श्री झीशान सिद्दीकी..........

अध्यक्ष महोदय, महानगरपालिका की तरफ से एसडब्ल्यूएम के जो स्कॅम वांद्रे पूर्व में चल रहे है, उसके बारे में मैंने कई बार लिखित रुप में दिया है. हर बार वांद्रे पूर्व की गंदगी के बारे में चर्चा होती है. मेरे मतदार क्षेत्र में हर आदमी की गंदगी के बारे में शिकायत है. एक हजार लोगों के पीछे एक सफाई कर्मचारी होना चाहिए. लेकिन मेरे मतदार में कभी कोई सफाई कर्मचारी दिखा नहीं है. इसलिए इस पर कार्रवाई होनी चाहिए. सफाई कर्मचारी क्यों नहीं है, क्यों नाला ओव्हरफ्लो हो रहा है, सब जगह पर क्यों गंदगी है ? इस बारे में कठोर से कठोर कार्रवाई होनी चाहिए.

अध्यक्ष महोदय, मेरी विनती है कि जो एसआरए की योजना है, उसके बारे में मुझे जवाब दिया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, मुंबई और महाराष्ट्र के मुसलमानों को आरक्षण की जरुरत है. मराठा आरक्षण की जरुरत है. ओबीसी, एससी और एसटी समाज के हक को न मानते हुए मुसलमानों को आरक्षण मिलना चाहिए. सरकार से मेरा निवेदन है कि इस बारे में जल्द से इम्प्लीमेंटशन करना चाहिए. आपने मुझे बोलने के लिए समय दिया, उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं और अपना भाषण पूरा करता हूं. जय हिंद, जय महाराष्ट्र.

-----------

असुधारित प्रत

श्री मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम २९३ के अंतर्गत मुंबई के संबंध में जो प्रस्ताव सदन के सामने पेश किया गया है, उस पर बोलने के लिए मैं खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, मैं केवल कुछ मुद्दे ही यहां पर रखना चाहता हूं. यहाँ पर माननीय मंत्री जी बैठे है. मेरा एक सुझाव यह रहेगा कि जो फनल झोन का विषय है, इसको महाराष्ट्र के स्तर पर या अकेली महाराष्ट्र सरकार हल नहीं कर सकती. अभी दिल्ली में इसके बारे में केंद्र सरकार का रिव्ह्यू चल रहा है. मेरा सरकार से निवेदन है कि नगर विकास मंत्री जी इस बारे में थोड़ी लीड लें. यदि एक डेलिगेशन लेकर जाते है, जो फनल झोन से संबंधित पार्ले, वांद्रे और कुर्ला की इमारते है, उसके बारे में वहां के जनप्रतिनिधियों को साथ में लेकर डेलिगेशन लेकर जाते है, तो जो चेंज होने वाला है, वह एक बार चेंज हो गया तो फिर उसके बाद कुछ नहीं होगा. फनल झोन के बाद, सिव्हिल एव्हिएशन मिनिस्टर से मिलकर, सम्माननीय श्री ज्योतीरादित्य सिंधिया जी से मिलकर, हमने जो प्रस्ताव महानगरपालिका या सरकार की ओर से रखा है, वह प्रस्ताव लेकर जाएंगे, तो वास्तव में लोगों को रिलिफ दिलवा पायेंगे.

अध्यक्ष महोदय, रेलवे की जमीन को लेकर लोगों को बहुत तकलीफ है, असमंजसता है. लोगों को रेलवे चाहिए. रेलवे का विकास होना चाहिए. लेकिन एमएमआरडीए की जिम्मेदारी है कि वह अपने प्रोजेक्ट में, अपनी जगह में रेलवे के विस्थापितों को जगह दें. एमएमआरडीए उसको ओन करने के लिए तैयार नहीं है. सरकार से मेरा निवेदन है कि रेलवे के अधिकारियों को, एमएमआरडीए के अधिकारियों को एकसाथ बिठाकर, इसको राजकीय मुद्दा बनाकर किसी को फायदा नहीं है. हम सभी को मिलकर इसे ओन करना होगा. ये समस्या हल हो सकती है. सम्माननीय नगर विकास मंत्री इसमें लीड लेंगे तो ये समस्या हल हो जाएगी.

अध्यक्ष महोदय, सरकार से मेरा निवेदन है कि हम सब को घर दे रहे है, बीडीडी चॉल में घर दे रहे है, अन्य जगहों पर भी घर बना रहे है. मुंबई जिनके कारण चलती है ऐसे सफाई कामगार है. २० हजार से ज्यादा सफाई कामगारों को केवल इसके लिए उनके बच्चों को आज भी मैला ढोना पड़ताा है, सफाई का काम करना पड़ता है.

श्री मंगलप्रभात लोढा...

मजबूरी में ये काम करना पड़ता है. क्योंकि यदि वे महानगरपालिका की नौकरी छोड़ देंगे तो उनका घर चला जाएगा. तुलसीवाड़ी में एक स्कीम हुई थी. २० साल से स्कीम चल रही है. वह अभी तक पूरी नहीं हुई है. जहां जहां पर सफाई कामगारों के घर है, पूरे मुंबई में सफाई कामगारों की बस्तियां है, महानगरपालिका में उनकी बस्तियां है. यदि आप इस बारे में निर्णय लेंगे, तो सफाई कामगारों को न्याय की अपेक्षा है. मैं सम्माननीय मंत्री श्री एकनाथ शिंदे जी से विनती करना चाहूंगा कि इस बारे में व्यक्तिगत रुप से ध्यान दीजिए. ये बहुत दुआ का काम होगा. वे बहुत बुरी जिंदगी जी रहे है. आप उनको ओनरशिप का घर दीजिए. यदि आप उसमें फ्री सेल का प्रावधान जिसके लिए भी रखना चाहेंगे, उसमें आपकी कॉस्ट निकल जाएगी. सफाई कामगारों की समस्याओं को और ज्यादा समय तक लटकाकर नहीं रखना चाहिए, ऐसा मेरा निवेदन है.

अध्यक्ष महोदय, यहाँ पर माननीय गृहनिर्माण मंत्री नहीं है. मैं उनसे ३-४ मुद्दे कहना चाहता हूं. कई सालों से मॉडेल ॲग्रीमेंट की बात हो रही है. हमारी सरकार ने भी एक प्रस्ताव रखा था. म्हाडा, एसआरए और नगर विकास विभाग ने मिलकर मॉडेल ॲग्रीमेंट बनाना चाहिए, ऐसी बात हुई थी. तब आप सरकार में भी थे. लेकिन मॉडेल ॲग्रीमेंट नहीं बना है. मॉडेल ॲग्रीमेंट न बनने के कारण जब इमारतों का पुनर्विकास होता है, लोग एसआरए के लिए जाते है या फ्लैट खरीदने के लिए लोग जाते है, तो रेरा में मॉडेल ॲग्रीमेंट दिया हुआ है. लेकिन एसआरए और म्हाडा के लिए मॉडेल ॲग्रीमेंट नहीं है. एक छोटीसी बात है. मॉडेल ॲग्रीमेंट का ड्राफ्ट म्हाडा में, एसआरए में बनाकर रखा था. नगर विकास के पास भेजा था. सरकार बदल गई और विषय वहीं पर रह गया. यदि आप मॉडेल ॲग्रीमेंट बनवायेंगे, तो जो फ्लैट खरीदने वाले हजारो, लाखों लोग है, एसआरए के लोग ॲग्रीमेंट करते है. आप उनकी मानसिक स्थिति समझ सकते है कि जब कोई एसआरए में पुनर्विकास करने के लिए आता है, पुरानी इमारतों के पुनर्विकास के लिए आता है, तो उनको ऐसा लगता है कि भगवान आ गया. वे जो बोलते है, उस पर साईन कर देते है. ॲग्रीमेंट साईन हो गया.

श्री मंगलप्रभात लोढा...

इसमें ही वे खुश हो जाते है. उसके एक एक क्लॉज को लेकर पीढ़ी दर पीढ़ी कोर्ट में लटकना पड़ता है. माननीय मंत्री महोदय को यह बात पता है कि कम से कम एक लाख घर खाली करा दिए गए है, तोड़ दिए गए है, लेकिन उनको भाड़ा नहीं दिया जा रहा है. एक लाख परिवार दूर दूर कहीं पर रहने के लिए चले गए है. उन्होंने दूर पर कही घर ले लिया है. उनकी इतनी इन्कम नहीं होती है कि अपने पास से भाड़ा भर सके. पुरानी इमारत टूट गई है, वहां पर अब जा नहीं सकते. इसका फैसला कौन करेगा, इसकी जिम्मेदारी कौन लेगा ? सरकार को इसकी जिम्मेदारी लेनी चाहिए या फिर पहले सरकार स्वयं या म्हाडा के माध्यम से भाड़ा भरे. जब उस प्लॉट का ऑक्शन होगा तो उसको लँड रेवेन्यू की तरह रिकव्हर करे या डेव्हलपर के बाकी सारे प्रोजेक्ट को रोके, लँड लॉर्ड के बाकी सारे काम रोके. आप उसको नोटीस देते रहोगे, लोग मोर्चा लेकर जाते रहेंगे. इससे कुछ नहीं होगा. बीच में हमने भाजपा की ओर से एक अभियान चलाया था. ५० हजार लोगों ने सात दिन में साईन किए. लेकिन उसके बाद भी अगर सरकार की तरफ से कोई निर्णय नहीं होगा, तब तक कुछ नहीं होगा. ये सब नॉन पॉलिटिकल बाते है.

अध्यक्ष महोदय, मेरा एक और निवेदन है. हम देखते है कि जो एसआरए और पुनर्विकास की इमारत है, वहां पर पार्किंग की व्यवस्था नहीं होती है. मेरे विधानसभा क्षेत्र में पुनर्विकास की ३-४ बड़ी योजनाएं हुई. वहां पर पार्किंग की कोई व्यवस्था नहीं है. पहले तो वे ओपन स्पेस नहीं छोड़ते है. गार्डन के लिए बहुत कम जगह छोड़ते है और पार्किंग के लिए कोई व्यवस्था नहीं की जाती है. इससे छोटी छोटी रोड ब्लॉक हो जाती है. कहीं पर आग लग गई या ॲम्ब्युलंस को लाना हो, तो उस समय कुछ भी करना संभव नहीं होता है. सरकार से मेरा निवेदन है कि वे इस बारे में भी निवेदन करे.

अध्यक्ष महोदय, आपने पूरे महाराष्ट्र के लिए युनिफाईड डीसीआर बनाया. यह एक बहुत अच्छा काम किया है. तो क्या मुंबई के लिए डीसीआर नहीं बना सकते ? मुंबई के बारे में हम हर बार बात करते है. म्हाडा, एसआरए, बीपीटी, बीएमसी,

श्री मंगलप्रभात लोढा...

एमसीजीएम, ये सब अलग अलग संस्थाएं है. कोई भी अपनी ऑथॉरिटी छोड़ना नहीं चाहता है. ठीक है. लेकिन हम युनिफाईड डीसीआर तो बना सकते है ना? कि किसको किस तरीके से परमिशन मिलेगी. ऐसा काम यदि आपके हाथ से हो जाएगा, तो आने वाले समय में मुंबई का समतोल विकास हो सकेगा.

अध्यक्ष महोदय, पुनर्विकास के प्रोजेक्ट्स के बारे में मैं कहना चाहता हूं. मैं मलबार हिल से चुनकर आता हूं. उसमें मलबार हिल की हाईराईज है. साथ में खेतवाड़ी, ताड़देव और गिरगाव की पुरानी चॉल्स भी है. एक हजार से ज्यादा इमारते मेरे क्षेत्र में है. मुंबई की जो पुरानी इमारते है, उनकी संख्या बढ़ते जा रही है. म्हाडा के पास फंड नहीं है. इमारतों की मरम्मत के लिए फंड नहीं मिलता है. हमने लिमिट बढ़ा दी, इतना देंगे, उतना देंगे, ऐसा कहा जाता है, लेकिन कुछ होता नहीं है. सरकार से मेरे दो निवेदन है. जिस तरह से हमने मेट्रो सेस लगाया, उसी तरह से क्या हम बिल्डिंग के रिपेअर के लिए जो सेस का जो फंड लेते है, महानगरपालिका को जो डेव्हलपमेंट चार्जे मिलते है, महानगरपालिका के पास बहुत फंड है. ७०-७५ हजार करोड़ रुपये का एफडी आपके पास है. तो इन पुरानी इमारतों के बारे में किसकी जिम्मेदारी है ? मेरा माननीय मंत्री महोदय से निवेदन है कि इस पर विचार किया जाए. आप जो डेव्हलपमेंट फंड लेते है, रिपेअर सेस का फंड लेते है, उसमें से कुछ फंड पुरानी इमारतों की रिपेअर के लिए दीजिए. आप बीएमसी, म्हाडा या कॉन्ट्रैक्टर के माध्यम से दीजिए. लेकिन उनको बेहाल नहीं छोड़ना चाहिए.

अध्यक्ष महोदय, सरकार से मेरी विनती है कि म्हाडा की पुरानी इमारतों को डेव्हलपमेंट करने के लिए जब जाते है, तो उसमें फंड नहीं होता है. कहा जाता है कि ओनर से एनओसी लेकर आओ. ओनर एनओसी नहीं देता है. फिर वे कहते है कि आप सभी टेनेन्ट्स को इकट्ठा करके, मेजॉरिटी से पास करके लाओ, लोकल आर्किटेक्ट से एस्टीमेट लेकर आओ. सरकार से मेरा निवेदन है कि आप कुछ प्रतिशत रखिए. ७० प्रतिशत टेनेन्ट्स मिलकर यदि आपके पास आते है, म्हाडा के पास आते है और कहते है कि हम इस इमारत को रिपेअर करना चाहते है, तो आपके पास सेस

श्री मंगलप्रभात लोढा...

में जो फंड पड़ा है, वह दीजिए. बाकी फंड वे एमएलए, एमएलसी, एमपी से लायेंगे या खुद का लगायेंगे. लेकिन उनको रेडटेप में से तो मुक्त कीजिए. आज यदि प्रपोजल डालते है तो दो साल के कम समय में उनको परमिशन नहीं मिलती है. सरकार ने इसके बारे में विचार करना चाहिए.

अध्यक्ष महोदय, एक विषय पर सभी ने अपने विचार रखे है. मैं भी अपनी बात रखना चाहता हूं. २५ हजार, २७ हजार या जितनी भी बिना ओसी की इमारते है, उनके बारे में क्या किया जाएगा? ये मसला कभी हल नहीं होगा. ओसी, नॉन ओसी की इमारत में हर समय कोई न कोई समस्या पेंडींग रहेगी. एफएसआई का व्हायोलेशन है, ओपन स्पेस का व्हायोलेशन है, पुराने नियम में ये बैठता नहीं है, ऐसी दुनिया भर की समस्या उसमें रहेगी. तो उसके बाद उसका अंत क्या होगा ? सरकार से मेरा निवेदन है. मैं माननीय मंत्री महोदय का इस सदन में प्रशंसा करना चाहता हूं. वे नॉन पॉलिटिकली बहुत अच्छा निर्णय लेते है. नॉन ओसी की इमारतों के बारे में एक ॲमनेस्टी स्कीम लेकर आए. टैक्स की चोरी करने वालों के लिए हमॲमनेस्टी स्कीम लाकर माफ करते है, हल निकालते है. स्टॅम्प ड्युटी के बारे में, जीएसटी के बारे में और हर जगह पर माफ करते है तो फिर फ्लैट ओनर्स का क्या गुनाह है ? उन्होंने जब फ्लैट लिया, तो उनको पता नहीं था कि इसकी ओसी कभी नहीं मिलेगी. उन्होंने तो फ्लैट का, बिल्डिंग का प्लान समझकर लिया था. सरकार से मेरा निवेदन है कि जिन पुरानी इमारतों का पार्ट ओसी है, उन सब के बारे में सरकार ने एक ॲमनेस्टी स्कीम लानी चाहिए. उन पर कम से कम फाईन लगाना चाहिए और ३-६ महीने में आप सभी इमारतों को ओसी दे दीजिए. ओसी देने में आपके पास से कुछ नहीं जा रहा है, केवल एक सर्टिफिकेट जा रहा है. इससे उनके पानी का टैक्स, महानगरपालिका टैक्स, उनका टेंशन कम हो जाएगा. इन सारी बातों पर सरकार ने ध्यान देना चाहिए और ये काम करना चाहिए.

श्री मंगलप्रभात लोढा....

अध्यक्ष महोदय, मैं गृहनिर्माण मंत्री महोदय से निवेदन करना चाहता हूं. बीच के समय में विधायकों की एक समिति बनी थी. मैं भी उस समिति में था. हमने उस समिति में एक प्रस्ताव पारित किया था. लेकिन उसके बाद सरकार बदल गई. आप सरकार में आ गए है. अब वह प्रस्ताव सम्माननीय राष्ट्रपति जी के पास पेंडींग है. मेरा निवेदन है कि आप ऑल पार्टी का एक डेलिगेशन लेकर, सम्माननीय राष्ट्रपति जी के पास सब को लेकर चलिए. हम सभी ने जो प्रस्ताव यहाँ पास करके भेजा है, उसको आप पूरा करवाकर, मुंबई में जो एसआरए और पुनर्विकास के पुराने प्रोजेक्ट रुके हुए है, उनको चालना देने के लिए एक अच्छा निर्णय किजिए. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

---------

.........यानंतर श्री चौधरी

असुधारित प्रत

डॉ.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मंगलप्रभात लोढा हे आता जे बोलले त्यावर मी स्पष्टीकरण देऊ इच्छितो. मध्यंतरी मी त्यांना विनंती केली होती की, सदर प्रस्ताव दीड वर्षापासून राष्ट्रपती भवनामध्ये पडून आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमीन पटेल यांनी सांगितल्याप्रमाणे सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी फोन केल्यानंतर केवळ चार तासांमध्ये काम झाले. तशी काही तरी जादुची कांडी फिरवावी, अशी माझी विनंती आहे. कारण हा खूप मोठा प्रस्ताव अडकून पडलेला आहे. सर्वात दुर्दैवाची बाब म्हणजे श्री.भट्टड या माणसाला आपण सर्वोच्च न्यायालयामध्ये देखील हरवले तो यासंदर्भात तिकडे पत्र देत राहतो व त्याचे उत्त्र आपल्याला मागितले जाते. त्यामुळे दिल्लीमध्ये याबाबत कोणाला तरी सांगितले पाहिजे.

श्री मंगलप्रभात लोढा : अध्यक्ष महोदय, मैं सम्माननीय मंत्री महोदय को बताना चाहता हूं कि हम आपके साथ है. आप हम सभी को साथ लेकर चलिए. आप समय मांग लीजिए. हम भी आपके साथ उस पत्र पर साईन करेंगे. ऑल पार्टी डेलिगेशन जाएगा.

डॉ.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, उसमें बात ऐसी है कि अपना एकमत का ठराव है. बहुमत का ठराव नहीं है. आप लोगों में से यदि कोई ऊपर बोल देगा कि जरा उधर कन्व्हे कर दो, यह एक दिन का काम है. दो लोगों का भी डेलिगेशन जाएंगा, तो भी काम हो जाएगा.

---------

श्री.मनिषा चौधरी (दहिसर) : अध्यक्ष महोदय, सत्ताधारी पक्षाच्या वतीने मांडण्यात आलेल्या २९३ च्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय गृहनिर्माण मंत्र्यांचे मी सर्वप्रथम अभिनंदन करते. कारण सन १९९५ पासून माझ्या मतदारसंघातील एक्सेल डोंगरी या प्रकल्पास चालना देऊन त्यांनी तेथील झोपडपट्टीवासियांना न्याय दिला आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील रोकडिया लेन येथील कपिल कुंज ही इमारत मुंबई महानगरपालिकेने सी-१ कॅटेगरीमधील इमारत म्हणून जाहीर करुन डिमॉलिश केली. सदर इमारतीमध्ये राहणारे रहिवासी बेघर झाले असून त्या भुखंडाचा मालक कोण हा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा प्लॉटसाठी म्हाडाने पुढे येऊन त्यांचा विकास करावा अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई हे शहर सात बेटांवर वसलेले आहे. या शहरातील इमारतींचा पुनर्विकास करणे अत्यंत गरजेचे आहे. माझ्या मतदारसंघामध्ये एअरपोर्ट ॲथॉरिटीचे सिग्नल सेंटर आहे. त्याच्या १ किमी. रेडियसमधील सर्व इमारतींचे पुनर्विकास रखडले आहे. इमारतींच्या उंचीवर बंधने आलेली असल्यामुळे संभाजीनगर, आनंदनगर, कांदरपाडा, मेडोना कॉलनी, सी.एस. कॉम्प्लेक्स्, आशिष कॉम्प्लेक्स्, पराग नगर, म्हाडा कॉलनी येथील पुनर्विकास रखडला आहे. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना त्यांनी एअरपोर्ट ॲथॉरिटीला गोराई गावामध्ये जागा दिली होती. यासंदर्भात मंत्री महोदयांनी बैठक घ्यावी. जर एअरपोर्ट ॲथॉरिटीची यंत्रणा गोराई गावामध्ये नेली तर मिरा रोड, मागाठाणे, बोरिवली व दहिसर येथील रखडलेले बरेच प्रकल्प मार्गी लागतील.

अध्यक्ष महोदय, ज्या सोसायटयांना ओ.सी. नाही त्यांचा पुनर्विकास करण्यासाठी सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा. अशा इमारतींना पाणी पट्टी व विजेचे बिल जास्त आकारण्यात येते. खरे तर विकासकाच्या चुकीचा त्रास अशा सोसायटयांना होत आहे. त्यामुळे याबाबत सकारात्मक निर्णय घेऊन महापालिकेस सूचना द्याव्यात, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

श्रीमती मनिषा चौधरी...

माझ्या मतदार संघामध्ये मंडपेश्वर गुंफा आहेत आणि पुरातन खात्याच्या अडचणीमुळे एसआरएचे प्रकल्प, मग त्यामध्ये पंचशील नगर, शिवाजीनगर, बाजूला असलेली मेडोना कॉलनी, मंडपेश्वर धाम असेल या सर्व विभागांचा उंचीच्या निर्बंधामुळे पुनर्विकास होत नाही. मध्यंतरी सायन येथील पुनर्विकास विभागाकडून क्राईम विभागाकडे दिल्या गेल्या होत्या. परंतु क्राईम आणि एसआरए योजनेचा संबंध कुठे येतो? त्यामुळे त्यासंबंधी मी तेथे स्वत: जाऊन भेटले. त्यानंतर त्या त्यांनी दिल्या आणि आता ती प्रकरणे दिल्लीला पाठविली आहेत. पण त्या कामाला खूप वेळ लागतो म्हणून सरकारने यामध्ये लक्ष घालणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, महत्त्वाचा विषय म्हणजे माझ्या विभागामध्ये एन.डी. झोन मोठ्या प्रमाणावर आहे. त्याचप्रमाणे गणपत पाटीलनगर... तसेच काही ठिकाणी मॅन्ग्रोज आहेत. त्यामुळे विकासामध्ये अनेक अडचणी येतात. दरम्यानच्या काळात मंत्री महोदयांनी मला पत्र लिहून कळविले होते की, यामध्ये मालकाने हरकत घेतल्यामुळे तत्कालीन सीईओ यांनी सन २०१७ मध्ये सर्व्हे करण्यासाठी ५७ लाख रुपये भरले आहेत. पण इतर पक्षाच्या लोकांनी तेथे सर्व्हे करु दिला नसल्यामुळे तो सर्व्हे होऊ शकला नाही. मला पाणी आणि वीज देण्यासाठी दाजी सामंत आणि संजय नाईक यांनी ना हरकत दाखला दिलेला आहे आणि सर्व्हे करण्यासाठी सुध्दा ना हरकत दाखला दिला आहे. त्यामुळे गणपत पाटीलनगरसंबंधी आपण पैसे भरले असल्यामुळे त्याचा सर्व्हे करुन घ्यावा. त्यानंतर ती गलिच्छ वस्ती घोषित करण्यासाठी संबंधित मालकासमवेत बसून तो विषय मिटवावा. कारण जवळपास ६८ जागा असून तेथे संपूर्ण झोपडपट्टी आहे. तेथे आपण चांगला प्रकल्प उभारु शकतो. देशाचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचे स्वप्न आहे की, प्रत्येक झोपडीमध्ये राहणाऱ्या व्यक्तीला घर मिळाले पाहिजे. त्यामुळे माझ्या गणपत पाटीलनगर झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना स्वत:चे हक्काचे घर मिळण्यासाठी आपण सर्वजण प्रयत्न करु.

श्रीमती मनिषा चौधरी...

अध्यक्ष महोदय, आता युएलसी कायदा नाही. पण अनेक सोसायट्यांच्या कागदावर युएलसीचा रिमार्क्स मारलेला आहे. त्यामुळे त्या इमारतींचाही पुनर्विकास होत नाही. त्यामुळे ज्या ठिकाणी अशा पध्दतीने युएलसीचा रिमार्क्स लागलेले आहेत त्या इमारतींच्या बाबतीत सुध्दा शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन त्या इमारतींचा पुनर्विकास केला पाहिजे. काही सोसायट्यांमध्ये जेव्हा राखीव १० टक्के आणि २ टक्के कोटा होता तेव्हा काही विकासकांनी अशा इमारतींमधील जे फ्लॅट वितरित झाले नाहीत त्यांच्या बाबतीत त्या सोसायटीने आणि विकासकाने संगनमत करुन ते दुसऱ्यांना विकले आहेत. परंतु त्यावरील युएलसीचा रिमार्क्स तसाच आहे. त्यामुळे अशा सोसायट्यांमधील जे फ्लॅट्स आहेत त्यांच्यासंबंधी शासनाने सकारात्मक निर्णय करुन जे प्रकल्प रखडलेले आहेत त्यासाठी आम्हाला सहकार्य करावे, अशी मी विनंती करते.

अध्यक्ष महोदय, या गणपत पाटीलनगरमध्ये आम्ही एमसीझेडएमएच्या परवानगी घेऊन आणि मालकांच्या परवानग्या घेऊन आम्ही १ ते १४ नंबरच्या गल्लीमध्ये सर्वांना पाणी आणि वीज दिली. पण आज तिथे पद पथकर करण्यासाठी महापालिकेकडून परवानगी मिळत नाही. त्यामुळे तेथील सर्व गल्ल्यांमध्ये नागरिकांना पायाभूत सुविधा देण्यासाठी पायवाटा करण्यासाठी ना हरकत दाखला देण्यात यावा, अशी मी विनंती करते.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदार संघात एलआयसीची सर्वात मोठी कॉलनी आहे. जवळपास ४० ते ५० एकर जमिनीवर ही एलआयसी कॉलनी वसलेली आहे. या एलआयसी कॉलनीतील डी.पी.मध्ये आरक्षणाचे रस्ते, मार्केटचे आरक्षण, मैदानांचे आरक्षण हे एलआयसीकडून अजून महापालिकेला देण्यात येत नाही. त्यांच्या अधिकाऱ्यांनी बैठका घेतल्या तरी ते सकारात्मक कोणतेही उत्तर देत नाहीत. पण तेथील रस्त्यांची हालत बघितली तर मी सांगू इच्छितो की, एका महिलेला रिक्षातून प्रवास करताना तेथे गर्भपात होतो. परिणामी त्या रस्त्यांमधील महिलांना खूप त्रास होतो. त्यासाठी एलआयसीने सकारात्मक निर्णय करावा की त्यांचा आता

श्रीमती मनिषा चौधरी...

पुनर्विकास होत आहे. त्यामुळे जोपर्यंत ते अंतर्गत रस्ते महापालिकेला हस्तांतर करीत नाहीत तोपर्यंत एलआयसीला पुनर्विकासाची परवानगी देऊ नये. एलआयसीने बागेचे आरक्षित भूखंड, मैदानांचे आरक्षित भूखंड आणि रस्त्यांच्या जागा लवकरात लवकर मुंबई महापालिकेला हस्तांतरीत करण्यासाठी शासनाने मदत करावी.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदार संघात किमान ६० टक्के झोपडपट्ट्या आहेत. राष्ट्रीय मजदूर संघाच्या इमारती देखील माझ्या मतदार संघात आहेत. तसेच म्हाडाच्या देखील अनेक इमारती माझ्या मतदार संघात आहेत. आता या इमारतींचा पुनर्विकास करताना अकृषित आकरणीमध्ये माननीय महसूल मंत्री यांनी स्थगिती दिल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते. पण त्याचबरोबर या सोसायट्यांची बँक खाती सरकारने सील केली आहेत. याबाबत सहकार मंत्री महोदयांनी तातडीने निर्णय घेऊन ज्या सोसायट्यांची बँक खाती सील केली आहेत ती तलाठी आणि तहसिलदार यांच्यामार्फत बँक खाती सील केलेली बँक खाती सुरू करण्यासाठी आदेश द्यावेत, अशी मी शासनाकडे मागणी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, जे लोक पहिल्या मजल्यावर राहतात आणि ज्यांच्याकडे सन २०११ चा पुरावा आहे अशा लोकांच्या बाबतीत एक निर्णय करा. त्यांच्यासाठी परवडणारी घरे अशा पध्दतीची एखादी योजना किंवा कायदा करुन त्यांचा प्रश्न सोडवा. त्या पहिल्या मजल्यावरील लोकांना वेगळी जागा द्यावी असे मी म्हणत नाही. पण एसआरए प्रकल्प राबवित असताना त्यांना सुध्दा बांधकामाची रक्कम स्वीकारुन जर त्यांना घरे दिली तरी त्यांना ते परवडेल. म्हणून आपण सन २०११ च्या बाबतीत निर्णय करावा, अशी मी गृहनिर्माण मंत्री महोदयांना विनंती करते. आतापर्यंत आपण सर्व प्रकल्पांमध्ये सहकार्य केले आहे. तशाच पध्दतीने सन २०११ मधील आमचे जे झोपडपट्टीधारक आहेत त्यांना देखील न्याय द्यावा, धन्यवाद.

----------

श्री. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण आता एलआयसीच्या जागेबद्दल जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याबद्दल ती जमीन कोणाच्या मालकीची आहे त्याची माहिती कृपया मला द्यावी.

श्रीमती मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, ती जमीन एलआयसीसीच आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : मला असे वाटते की, ती शासनाची जमीन असेल आणि त्यांनी शासनाकडे मागणी केल्यानुसार त्यांना ती जमीन दिली असेल. त्यामुळे आपण कृपया तेवढी माहिती घेऊन मला द्यावी.

असुधारित प्रत

डॉ. भारती लव्हेकर (वर्सोवा) : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र विधानसभा नियम २९३ अन्वये सत्ताधारी पक्षाने जो प्रस्ताव या सभागृहासमोर ठेवला आहे त्यावर मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, सर्वात आधी मी आपल्या मुंबईतील कोळीवाड्यांचा विषय मांडते. कारण आपल्या मुंबईमध्ये एकूण ३५ कोळीवाडे आहेत. या आमच्या भुमिपूत्रांचा खूप आग्रह आहे की, मुंबई महापालिकेचा जो सन २०३४ पर्यंतचा डीपी आहे त्यामध्ये हे कोळीवाडे अधोरेखित करण्यात यावेत आणि त्यांच्यासाठी स्वतंत्र विकास नियंत्रण नियमावली करण्यात यावी, अशी आमची कळकळीची विनंती आहे. कारण ते खरे भुमिपूत्र आहेत आणि त्यांना जर आपण न्याय देऊ शकलो नाही तर ते योग्य होणार नाही. काही ठिकाणी एसआरएच्या योजना होत आहेत, असे दिसून येते. अशा पध्दतीने कोणताही एसआरए प्रकल्प येऊ देऊ नका, यासाठी त्यांची आणि माझी देखील माननीय गृहनिर्माण मंत्री महोदयांना कळकळीची विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, म्हाडाच्या ५६ वसाहती आहेत आणि त्यांच्या पुनर्विकासाचा प्रश्न आहे. माझ्या मतदार संघातील म्हाडाचे आरामनगर आणि एसपीपीनगर यांचे अतिशय मोठे ले-आऊट आहेत. आरामनगरच्या पुनर्विकासाच्या बाबतीत मी आपल्याला जरुर विचारणा करते. कारण आता १६ ते १७ वर्षे झाली आहेत. मी आमदार होऊन सुध्दा साडे सात वर्षे पूर्ण झाली आहेत. तेथील लोक सातत्याने विचारणा करतात की, याचा विकास कधी होणार आहे. सन २००७-०८ मध्ये आरएनए यांच्यासमवेत ट्राय-पार्टी ॲग्रीमेंट झाले आहे. त्यानंतर ते प्रकरण कोर्टामध्ये गेले. आता आरामनगरमध्ये एकूण ३६० रहिवाशी आहेत. परंतु त्यामधील ४० लोकांना एका खाजगी विकासकाने ५-५ लाख रुपये देऊन सह्या व संमती घेण्याचे काम सुरू आहे आणि इतर लोकांना २-२ लाख रुपये देऊन अशा सह्या व संमती घेण्याचे काम सुरू आहे. पण हे कशाच्या आधारे होत आहे ते कळत नाही. अनेक लोक येऊन मला विचारतात. कारण तो माझ्या मतदार संघातील प्रश्न आहे. मला वाटते आपण याबाबत लक्ष घालावे की नक्की कोण या संमती घेत आहे आणि कोणाच्या आशिर्वादाने घेत आहे. तसेच शासनाच्या मनात नेमकी काय

असुधारित प्रत

डॉ. भारती लव्हेकर...

योजना आहे, म्हाडा पुनर्विकास करणार आहे की, खाजगी विकासक नेमणार आहात की आणखी काही करणार आहात, कारण तेथील प्रश्न अत्यंत त्रासदायक झाले आहेत. एका पिढी संपली आणि दुसरी पिढी ५० शी पर्यंत आली आहे. शेवटी लोक कुठपर्यंत वाट पाहतील हा महत्त्वाचा विषय आहे. एसव्हीपी नगरला मोठा ले-आऊट आहे. त्या ठिकाणी एका एका इमारतीचा पुनर्विकास होत होता. परंतु तो रोखण्यात आला आहे. तो कधी सुरू करणार आहात की पूर्ण इमारतींचा पुनर्विकास करणार आहात या संदर्भात मला आपल्या उत्तरातून समजेल अशी अपेक्षा आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्या डॉ. भारती लव्हेकर यांचे भाषण संपेपर्यंत सभागृहाच्या वेळ वाढविण्यात येईल.

डॉ. भारती लव्हेकर : अध्यक्ष महोदय, आराम नगर किंवा ५६ वसाहतीच्या संदर्भात सांगायचे झाले त्या ठिकाणी पाण्याची पाईपलाईन अतिशय जीर्ण झालेली आहे. तिथून पाणी गळून ते मातीमिश्रीत येत आहे. त्यामुळे त्या पाण्याच्या पाईपलाईन बदलण्याची गरज आहे. मी म्हाडाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठका देखील आयोजित केल्या होत्या. त्यांनी मला सांगितले की, आता आम्ही हे काम आणि पैसे ही महानगरपालिकेकडे वर्ग केले आहे. पण हे काम कुणीही करत नाही. त्यामुळे तेथील लोकांना प्रचंड त्रास होत आहे. आराम नगरमधील माझ्या मतदासंघातील उदाहरण मी देईल परंतु तसेच उदाहरण ५६ वसाहतीमध्ये देखील असू शकेल. त्या ठिकाणचे लाईटचे पोल बंद आहेत आणि त्यामुळे लाईट नाही म्हणून तिथे गर्दुल्ले येतात. यामुळे तिथे मुलींची छेडछाड, ड्रग्सचा व्यवसाय होत आहे. या सर्व बाबींसाठी कारणीभूत कारण मी महानगरपालिकेला विचारले की, आपल्याकडे हे काम वर्ग केल्याचे म्हाडने सांगितले तर त्यांनी माझ्याकडे म्हाडाने न भरलेले १९ लाख रुपयांचे लाईट बिल माझ्याकडे दिले आहे. आपण म्हाडाकडून हे पैसे लवकर भरावे म्हणजे मग महानगरपालिका तिथे काम करेल अशी अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, आराम नगरमधील आणखी एक विषय असा आहे की, मधल्या ठिकाणी रस्ते नाहीत त्यामुळे तिथे काम करण्याची गरज आहे. त्यासाठी मी पत्र दिले होते की, तेथील पुनर्विकास होईपर्यंत मी माझ्या आमदार निधीतून तिथे रस्तेबांधून देईल किंवा इतर काही व्यवस्था करायची असेल तर ती करेल. तिथे कंपाऊंड वॉलची देखील गरज आहे. कारण तिथे खूप ड्रग्सचे प्रकार आणि गुंडगिरी चालते. ते सर्व रोखण्याची गरज आहे. मला कळत नाही की, आराम नगरच्या बाबतीत नक्की काय सुरु आहे ? कारण तेथील पुनर्विकासही होत नाही आणि लोकांचे प्रश्न सुटत नाहीत त्यामुळे लोक त्रासलेली आहेत. तेथील पुनर्विकास होईल तेव्हा तिथे रुग्णालयाची देखील मागणी आहे. अशा अनेक बाबी आहेत. यामुळे मला वाटते की, आपण तेथील स्थानिक लोकांना विश्वासात घेऊन काम करावे. यावर

डॉ. भारती लव्हेकर....

नक्की काय निर्णय घ्यायचा हे आपण सभागृहात सांगावे, अशी माझी आपल्याकडून अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, म्हाडाच्या जागेवर अनेकवेळा अतिक्रमण होते. माझ्या मतदारसंघामध्ये सुद्धा अनेक मोकळया जागा आहेत. माननीय मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांचे पत्र सुद्धा मला आलेले आहे. अनेक ठिकाणी अतिक्रमण होत असताना आम्ही त्वरित म्हाडाला कळवितो. त्यावेळेला त्यांनी त्वरित लोक पाठवले यासाठी मी त्यांचे अभिनंदन करेल. इंजिनियर्स तिथे आले आणि कंपाऊंड वॉल बांधली. परंतु ती वॉल छोटी असल्यामुळे परत भंगारवाले तिथे आत जात आहेत. त्यामुळे ती वॉल थोडी मोठी करावी, अशी माझी मागणी आहे. परंतु बऱ्याच प्लॉटवर अतिक्रमण होत आहे. त्यामुळे म्हाडाने यामध्ये लक्ष दिले नाही तर ते आपल्या हातून जातील असेही दिसून येत आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये म्हाडाच्या ज्या सुविधा होण्याची गरज आहे. कोविडच्या काळात आपण बघितले की, १५ वर्षापासून आपण मुंबईमध्ये नवीन रुग्णालये आणलेली नाहीत. त्याचा त्रास आपण काळात भोगलेला आहे. म्हाडाच्या अनेक जागा आहेत की तिथे रुग्णालयाचे आरक्षण आहे. तसेच महानगरपालिकेच्या जागेवर सुद्धा आपण रुग्णालये उभे करु शकतो. आज सेंट जॉर्ज रुग्णालय किंवा के.ई.एम.सारखे रुग्णालये तिथे होणे गरजेचे आहे. यामुळे आपण यावर जास्तीत जास्त भर द्यावा अशी मागणी आहे. माननीय नगरविकास मंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. डीपीमध्ये अधोरेखीत किंवा मंजूर करण्याच्या ज्या जागा आहेत. ईपीमध्ये अनेक बाबी गेलेल्या आहेत ज्या आपण काढतच नाही. यामुळे नक्की कोणता विकास होणार आहे हे कळायला मार्गच नाही.

अध्यक्ष महोदय, अग्निशमन केंद्राच्या संदर्भातील निर्णय देखील होत नाही. त्यामुळे माझ्या मतदारसंघामध्ये अग्निशमन दलासाठी जागा राखीव असून सुद्धा ते केले जात नाही. मग आग लागली तर तिथे गाडी येण्यासाठी अर्धा ते एक तास लागतो. त्यामुळे या बाबी छोटया असल्या तरी त्या मोठया परिणाम करणाऱ्या

डॉ. भारती लव्हेकर....

असतात म्हणून आपण याकडे लक्ष देण्याची गरज आहे. अध्यक्ष महोदय, रुग्णालयाप्रमाणेच वर्किंग महिलांसाठी वसतीगृह, विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे वृद्धाश्रम याची सुद्धा गरज आहे. याकडे आपण लक्ष द्यावे असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, एनए कराच्या संदर्भात माननीय महसूल मंत्र्यानी स्थगिती दिली आहे त्याबाबत मी त्यांचे अभिनंदन करतो. परंतु त्याला स्थगिती न देता ते रद्दच करण्यात यावे, अशी आमची मागणी आहे. यामुळे लोक खूप अडचणीत आलेले आहेत. बाकीच्या बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी याबाबत आपले मत मांडलेले आहे त्यामुळे मी काही जास्त बोलणार नाही. परंतु आपण तो कर रद्द करण्याच्या संदर्भात विचार करावा, असे माझे म्हणणे आहे.

अध्यक्ष महोदय, महानगरपालिका, जिल्हाधिकारी किंवा म्हाडा यांची जमीन असली तरी आपण तेथील गार्डनमध्ये खेळणी, व्यायामाचे साहित्य अशा सर्व सुविधा देतो. परंतु तिथे शौचालय, पिण्याचे पाणी याची सोय नसल्यामुळे अनेक तक्रारी येतात. सिनियर सिटीझन किंवा मुलांसाठी प्रत्येक गार्डनमध्ये ही सुविधा केली पाहिजे, अशा मी मागणी करते.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानते. धन्यवाद !

-------

असुधारित प्रत

**उपाध्यक्ष :** सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या गुरुवार दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी सकाळी ९.०० वाजता विशेष बैठक भरेल. उक्त बैठकीत सकाळी ९.०० ते १०.०० या वेळेत लक्षवेधी सूचना आणि सकाळी १०.०० ते १०.४५ वाजेपर्यंत शासकीय विधेयके घेण्यात येतील. त्यानंतर सकाळी ११.०० वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री ०९ वाजून ०५ मिनिटांनी गुरुवार, दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----

असुधारित प्रत